# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

एम. ए. भाग–१ : राज्यशास्त्र

# भारतीय विचारातील सामाजिक सुधारणा आणि राष्ट्रवाद

**(Social Reforms and Nationalism in Indian Thought)**

**सत्र २ : पेपर– MM7**

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार सुधारित अभ्यासक्रम

शैक्षणिक वर्ष २०२३–२४ पासून

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)

**प्रथमावृत्ती :** २०२४

एम. ए. (राज्यशास्त्र) भाग-१ पेपर

सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती : ५००**

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. एन. शिंदे**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर-४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

ISBN- 978-93-89345-71-1

★ दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

# दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## ■ सल्लागार समिती ■


**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) प्रकाश पवार**
राज्यशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. विद्याशंकर**
कुलगुरू, केएसओयू,
मुक्तगंगोत्री, म्हैसूर, कर्नाटक-५७० ००६

**डॉ. राजेंद्र कांकरिया**
जी-२/१२१, इंदिरा पार्क,
चिंचवडगांव, पुणे-४११ ०३३

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**डॉ. संजय रत्नपारखी**
डी-१६, शिक्षक वसाहत, विद्यानगरी, मुंबई विद्यापीठ,
सांताक्रुझ (पु.) मुंबई-४०० ०९८

**प्रा. (डॉ.) कविता ओझा**
संगणकशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) चेतन आवटी**
तंत्रज्ञान अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. एस. महाजन**
अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एस. देशमुख**
अधिष्ठाता, मानव्य विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) श्रीमती एस. एच. ठकार**
प्रभारी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्या (डॉ.) श्रीमती एम. व्ही. गुळवणी**
प्रभारी अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. ए. एन. जाधव**
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्रीमती सुहासिनी सरदार पाटील**
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) डी. के. मोरे** (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


■ **अभ्यासमंडळ : राज्यशास्त्र** ■

अध्यक्ष - **डॉ. रविंद्र पांडुरंग भणगे**
राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **डॉ. प्रकाश रामचंद्र पवार**
  राज्यशास्त्र अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **डॉ. अरुण मारुतीराव चव्हाण**
  भोगावती महाविद्यालय, कुरुकली, जि. कोल्हापूर

- **डॉ. शिरीषकुमार धोंडिराम पवार**
  बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण, ता. कराड,
  जि. सातारा

- **डॉ. सचिन महादेव पाटील**
  श्रीमती कुसुमताई राजारामबापू पाटील कन्या महाविद्यालय,
  उरूण-इस्लामपूर, जि. सांगली

- **डॉ. विक्रमराव एन. पाटील**
  शंकरराव जगताप जगताप आर्टस कॉलेज, वाघोली,
  जि. सातारा

- **डॉ. श्रीमती मेघा संजय पाटील**
  कै. मालती व. पाटील कन्या महाविद्यालय,
  उरूण-इस्लामपूर, जि. सांगली

- **डॉ. संतोष केशव खडसे**
  कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरूण-इस्लामपूर,
  ता. वाळवा, जि. सांगली

- **डॉ. श्रद्धा विनोद कोठावळे**
  सहकारभूषण मा. एस. के. पाटील कॉलेज, कुरुंदवाड,
  ता. शिरोळ, जि. कोल्हापूर

- **डॉ. राहुल दत्ता मांडणीकर**
  श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, २९६८, 'सी',
  दसरा चौक, कोल्हापूर

- **प्राचार्य डॉ. बाळ अनंत कांबळे**
  धनंजयराव गाडगीळ कॉलेज ऑफ कॉमर्स, सातारा

- **डॉ. वासंती प्रतापचंद्र रासम**
  घरोंदा ३८४/३८५ आर. के. नगर सोसायटी नं. ५,
  मोरेवाडी, कोल्हापूर

- **डॉ. अनिल देवगौडा पाटील**
  आर्टस, कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेज, गडहिंग्लज,
  जि. कोल्हापूर

- **डॉ. सिकंदर आप्पासाहेब जमादार**
  राजहंस हौसिंग कार्पोरेशन प्लॉट नं. ०९, विजय नगर,
  इस्ट सांगली मिरज रोड, सांगली

- **रमेश दिनकर डुबल**
  किसन वीर महाविद्यालय वाई, जि. सातारा

# प्रस्तावना

शिवाजी विद्यापीठाने दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या माध्यमातून शिक्षणापासून व्यक्तीगत आणि भौतिक परिस्थितीने दूर गेलेल्या अनेकांना पुन्हा शिक्षण प्रवाहात येण्याची सुवर्णसंधी उपलब्ध करून दिली याचे संपूर्ण श्रेय विद्यापीठाला जाते. 'ज्ञानमेवामृतम्' या शिवाजी विद्यापीठाच्या ब्रीद वाक्याप्रमाणे ज्ञानरूपी अमृत प्राप्त करण्याची संधी सर्वांसाठी उपलब्ध करून दिली. याच दूरशिक्षण केंद्राद्वारे नोंद झालेल्या बहिःस्थ विद्यार्थ्यांना स्वयंअध्ययन साहित्य उपलब्ध करून दिले आहे.

हे पुस्तक एम. ए. भाग एक च्या राज्यशास्त्र विषयाच्या पेपर-MM7 सत्र दोन साठी 'भारतीय विचारातील सामाजिक सुधारणा आणि राष्ट्रवाद' हे पुस्तक विद्यार्थ्यांच्या हाती देताना आम्हाला विशेष आनंद होत आहे.

सदर पुस्तकामध्ये भारतातील प्रबोधन व सामाजिक सुधारणा, उदारमतवादी राजकीय विचार, राष्ट्रवादी राजकीय विचार, धर्म आणि राष्ट्रवाद या संबंधी भारतीय रिचारवंतांनी मांडलेले विचार, केलेले कार्य घेतलेल्या भूमिकांची विस्ताराने मांडणी केली असून याचा विद्यार्थ्यांना विस्ताराने अभ्यासासाठी उपयोग होईल अशी आशा आहे.

या पुस्तक निर्मितीमध्ये शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू मा. डॉ. डी. टी. शिर्के यांची प्रेरणा व प्रोत्साहन आम्हाला मिळाले त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार. त्याचप्रमाणे राज्यशास्त्र विभाग शिवाजी विद्यापीठ मधील प्राध्यापक डॉ. प्रकाश पवार, डॉ. सुखदेव उंदरे, डॉ. नेहा वाडेकर, डॉ. जयश्री कांबळे, शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचे सर्व सन्माननीय सदस्य व सर्व लेखक यांचे सहकार्य लाभल्याबद्दल त्या सर्वांचे मी आभार मानते.

वरील सर्वांइतकेच महत्त्वाचे म्हणजे दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे संचालक प्रा. डॉ. डी. के. मोरे तसेच केंद्रातील सर्व सहकारी विद्यापीठाचे सर्व पदाधिकारी यांचे सहकार्याबद्दल व तत्परतेबद्दल सर्वांचे मनःपूर्वक आभार.

■ **संपादक** ■

**प्रा. डॉ. रविंद्र भणगे**
राज्यशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखक | घटक क्रमांक |
|---|---|
| **डॉ. रविंद्र भणगे**<br>राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | १ |
| **डॉ. जयश्री कांबळे**<br>राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | २ |
| **डॉ. सुखदेव उंदरे**<br>राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | ३ |
| **डॉ. नेहा वाडेकर**<br>राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | ४ |

**■ संपादक ■**

**प्रा. डॉ. रविंद्र भणगे**
राज्यशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| १. | भारतातील प्रबोधन आणि समाजसुधारणा | १ |
| २. | उदारमतवादी राजकीय विचार | २७ |
| ३. | राष्ट्रवादी राजकीय विचार | ६४ |
| ४. | धर्म आणि राष्ट्रवाद | ८९ |

## ■ विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०२३-२४ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

# घटक १
# भारतातील प्रबोधन आणि समाजसुधारणा

**अनुक्रमणिका**

१.० उद्दिष्टे

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

१.२.१ राजा राममोहन रॉय

१.२.१.१ राजा राममोहन रॉय यांचे प्रबोधन आणि समाज सुधारणाबाबतचे विचार

१.२.१.२ ब्राह्मोसमाज

१.२.२ स्वामी दयानंद सरस्वती

१.२.२.१ स्वामी दयानंद सरस्वती यांचे प्रबोधन आणि धर्मसुधारणाबाबतचे विचार

१.२.२.२ स्वामी दयानंद सरस्वती आणि आध्यात्मिक राष्ट्रवाद

१.२.३ महात्मा जोतिबा फुले

१.२.३.१ महात्मा जोतिबा फुल्यांचा सत्यधर्म

१.२.३.२ महात्मा जोतिबा फुल्यांचे सामाजिक समतेबद्दलचे विचार

१.३ सारांश

१.४ महत्त्वाच्या पारिभाषिक संकल्पना

१.५ स्वयं अध्ययनातील प्रश्न व त्याची वस्तुनिष्ठ उत्तरे

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ संदर्भग्रंथ

## १.० उद्दिष्टे

१. भारतातील प्रबोधन आणि समाज सुधारणा कालखंडातील समाज सुधारणा चळवळींचा अभ्यास करणे.

२. प्रबोधन आणि समाज सुधारणाबाबतचे राजा राममोहन रॉय यांचे विचार व कार्य अभ्यासणे.

३. स्वामी दयानंद यांचे सामाजिक आणि धर्मसुधारणाबाबतचे विचार व कार्य अभ्यासणे.

४. महात्मा जोतिबा फुले यांच्या समाजसुधारणा चळवळींचा व कार्याचा अभ्यास करणे.

## १.१ प्रास्ताविक

समाज प्रबोधन आणि समाज सुधारणा ही एक सामाजिक आणि सातत्यपूर्ण परिवर्तनाची प्रक्रिया असते. मध्ययुगीन कालखंडात मध्य युरोपातील पुनरूज्जीवन झाले त्याला प्रबोधन असे म्हणतात. ही प्रक्रिया धर्मसुधारणा व ज्ञान प्रक्रियेशी निगडीत होती. कालौघात प्रबोधनाची व्याप्ती वाढत गेली आणि समाज सुधारणांना पुढे गती येत गेली. अर्थातच हे दोन्ही शब्द एकमेकाला पर्यायी म्हणूनच वापरले जातात. राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक परिवर्तनाचा आणि आधुनिक शास्त्रीय विचारांचा अभ्यास या प्रबोधनात अभिप्रेत असतो.

प्रस्तुत प्रकरणात आपणास राजा राममोहन रॉय, स्वामी दयानंद सरस्वती, म. जोतिबा फुले यांच्या समाजसुधारणा चळवळींचा अभ्यास करावयाचा आहे. रॉय यांनी ब्राह्मो समाजाच्या माध्यमातून धर्मसुधारणा व समाजसुधारणेबरोबर विज्ञान-निष्ठ, स्वातंत्र्यवादी समाज तयार करण्यावर भर दिला तर स्वामी दयानंद यांनी आर्य समाजाच्या माध्यमातून लोकसंग्रह आणि लोकसंग्रहातून सामाजिक समतेचे प्रयोग केले. राजा राममोहन रॉय बुध्दिप्रामाण्यवादी प्रबोधनाचे पुरस्कर्ते असल्याने त्यांना आद्य प्रबोधनकार मानले जाते. आर्य समाजाची लोकचळवळ देश व्यापक असली तरी त्यांचा वेदप्रामाण्यवाद काहीसा पारंपरिक व स्थितीवादी होता. म. फुल्यांनी सत्यशोधक समाजातून शेतकरी, कष्टकरी, स्त्रिया व अस्पृश्यांच्या मूलभूत प्रश्नांना वाचा फोडली. शिक्षणप्रसार, स्त्री स्वातंत्र्य, अस्पृश्यता निवारण, कष्टकऱ्यांना न्याय याबरोबर बुध्दिप्रामाण्यवादी समाज निर्मितीवर त्यांनी भर दिला. भारतीय राजकारण समजावून घ्यायचे असेल तर राजकीय व सामाजिक विचारांची पार्श्वभूमी आपणास माहित असावी लागते. सदर घटकांच्या अभ्यासामधून भारतातील प्रमुख राजकीय विचार व प्रबोधनातील महत्वाचे टप्पे आपणास समजू शकतील. कारण या सर्व सामूहिक व परस्परावलंबी चळवळी आहेत.

भारतीय राजकीय प्रक्रियांना प्रदीर्घ असा समाज सुधारणेचा, परिवर्तनाचा व प्रबोधनाचा इतिहास आहे. अगदी संत साहित्यापासून किंवा त्याही अगोदरच्या कालखंडापासून या देशात सतत नवनविन विचार मांडले गेले. वेगवेगळ्या समाजशील राजांनी धर्मप्रसाराबरोबर सांस्कृतिक कलाकृती, मंदिरे, साहित्य, नाट्य, चित्र, स्थापत्य या सर्वच क्षेत्रात कल्याणकारी व मानवतावादी प्रयोग करुन प्रबोधनाची प्रक्रिया गतिमान केली. भागवत धार्मिय चळवळीतील ज्ञानेश्वरापासून तुकारामादी अनेक संतांनी सामाजिक समता, न्याय, बंधुता व लोकशाही कल्याणकारी विचारांचाच प्रसार केला. ज्ञानेश्वराच्या पसायदानाचा पाया हा तर उदारमतवादी सार्वत्रिक कल्याणाचा व सर्वोदयाचा होता. ही परंपरा वेगवेगळ्या सुधारणा चळवळी, धर्म चळवळी, सांस्कृतिक उत्सवांनी विकसित होत गेली.

इंग्रज भारतात आल्यानंतर भारतीय प्रबोधनाला अधिक व्यावहारिक, शास्त्रीय, राजकीय व उपयोगितावादी बनवण्यावर त्यांनी भर दिला. यासाठी विचाराबरोबर तंत्रज्ञान व कृतीशील नवनिर्मितीवर त्यांनी अधिक लक्ष केंद्रित केले. धर्म चिकित्सेपुरते असणारे भारतीय प्रबोधन अधिक व्यापक बनवण्यावर त्यांनी भर दिला. भारतीय स्थितीशिलता, अंतस्थ धार्मिक जातिय संघर्ष, सततचे दुष्काळ, निरक्षरता, दारिद्र्य आणि या

सर्वातून आलेले सार्वत्रिक औदासिन्य यातून भारतात व्यापार व राज्यही करता येईल या स्वार्थातून ब्रिटिशांनी येथे राज्यकारभार करताना स्वतःच्या सोईसाठी काही सुधारणा केल्या. ज्याचा भारतीय प्रबोधन चळवळीला उपयोग झाला. तसेच ब्रिटिशांच्या एकंदर आचार विचार व राजकारणात भारतीय लोकांना एतद्देशिय सुधारणांची कल्पना आली व भारतात नवप्रबोधनाची सुरुवात झाली. ब्रिटिश राजवटीमध्ये भारतीय प्रबोधनावर ब्रिटिश विचारवंत, राज्यकर्ते याबरोबर भारतातील मध्यमवर्गीय सुशिक्षितवर्गाचा मोठा प्रभाव होता. यात जे. एस. मिल, मोर्ले मिंटो, ॲलन ह्यूम, स्पेन्सर, बर्क यासारख्या विचारवंत व उदारमतवादी ब्रिटिशांमुळे भारतात स्वातंत्र्यवादी लोकसत्ताक विचारांची सुरुवात झाली. याच काळात भारतात या पाश्चात्य विचारातून व भारतीय राष्ट्रवादातून काही नवे आदर्शवादी, मानवतावादी, सुधारणात्मक प्रयोग करण्यासाठी राजा राममोहन रॉय, दयानंद सरस्वती, म. फुले, भाऊ महाजन, बाळशास्त्री जांभेकर, मामा परमानंद, दादोबापांडुरंग, आत्माराम पांडुरंग, न्या. रानडे, रामकृष्ण परमहंस, विवेकानंद, लोकहितवादी असे अनेक सुधारक, धर्मसुधारक, पत्रकार, विचारवंत तयार झाले. या सर्व सुधारकांनी टप्प्या टप्प्याने समाज सुधारणांना सुरुवात केली. साधारणतः १९ व्या शतकाच्या सुरुवातीला या सुधारणांचा कल समाज सुधारणेपेक्षा धर्मसुधारणेकडे होता. द्वैतवाद की अद्वैतवाद, निराकाराची पूजा की आकाराची पूजा, एकेश्वरीवाद की अनेकेश्वरीवाद यासारख्या मर्यादित क्षेत्रात काम करणाऱ्या या धर्म चिकित्सा चळवळी, १८५० नंतर अधिक समाजशील बनल्या. अस्पृश्यता निवारण, स्त्रीस्वातंत्र्य, शेतकऱ्यांना न्याय, शिक्षण प्रसार, विज्ञानवाद व राजकीय स्वातंत्र्याचा यात विचार होऊ लागला. धर्म सुधारणा चळवळींच्या जोडीला मुंबई, पुणे, मद्रास व कलकत्त्यामध्ये तयार झालेल्या राजकीय संस्था व राष्ट्रीय कॉंग्रेस यांनी समाजामध्ये नव्या सामाजिक, राजकीय जाणिवा तयार केल्या. या व्यापक प्रबोधनाला ब्रिटिशांनी तयार केलेल्या तंत्रज्ञानाने, शिक्षण प्रसाराने व औद्योगिकीकरणाने मोठी चालना दिली.

इंग्रजी माध्यमांच्या शाळांबरोबर ब्रिटिशांनी भारतात मुंबई येथे १८५७ मध्ये मुंबई विद्यापीठाची स्थापना केली. त्याअगोदर १८३५ मध्ये ब्रिटिशांनी इंग्रजी माध्यमाच्या शाळांचा निर्णय घेतला. याच काळात रेल्वे, पोस्ट व इंग्रजी माध्यमांमुळे भारतामध्ये वैचारिक संसूचनास सुरुवात झाली. एक प्रकारे ही व्यापक राष्ट्रीयकरणाची एकसंध प्रक्रिया होती. ब्रिटिशांनी सुरू केलेल्या शाळांमध्ये भाषा, व्याकरण हेच पारंपरिक विषय व कामचलाऊ इंग्रजी असल्याने या शाळांवर राजाराममोहन रॉय यांनी टीका केली. त्यांच्यामते शास्त्रीय विज्ञानवादी, गणिती विषय महत्वाचे असतात कारण त्याशिवाय पायाभूत सुधारणा होत नाहीत. तशा मागणीचे पत्र त्यांनी सरकारला दिले होते. एवढ्यावर न थांबता १८१७ मध्ये रॉय यांनी कलकत्त्याला हिंदू कॉलेज व १८२५ ला वेदांत महाविद्यालय काढून एकेश्वरीवाद व शास्त्र या विषयांना प्राधान्य दिले. या सर्व समकालीन चळवळीतून प्रेरणा घेऊन पुढे जगन्नाथ शंकरशेठ, बाळशास्त्री जांभेकर, लोकहितवादी, म. फुले, न्या. रानडे, लो. टिळक, यांनी वेगवेळ्या शिक्षणसंस्था काढल्या. १८५७ मध्येच कलकत्ता व मद्रास येथे व नंतर लाहोर, अलाहाबाद येथे विद्यापीठांची स्थापना झाली. एलफिन्स्टन, हिस्लॉप व कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजने या काळात प्रबोधनात महत्वाची भूमिका बजावली. ब्रिटिशांनी सुरू केलेल्या रेल्वे व पोस्ट सेवेमुळे भारतीय प्रबोधनाला गती मिळाली. छपाई यंत्राच्या विकासामुळे भारतात वृत्तपत्रांची सुरुवात झाली. १८३२

मध्ये मराठीत बाळशास्त्री जांभेकर यांनी 'दर्पण' नावाचे पहिले वृत्तपत्र सुरू केले. यानंतर 'ज्ञानप्रकाश' भाऊ महाजनांचा 'प्रभाकर' 'सुबोध पत्रिका' बंगालमध्ये 'बंगाल गॅझेट', 'अमृत बझार पत्रिका', 'कलकत्ता जर्नल', 'बेंगाल हेरॉल्ड', 'मीरतउल अखबार' व नंतरच्याकाळात 'बडोदा वत्सल', 'भगवा झेंडा', 'दीनबंधू', 'केसरी' व 'मराठा', इत्यादी अनेक वृत्तपत्रे तयार झाली. या साऱ्या वृत्तपत्रांनी सामाजिक, राजकीय असे वेगवेगळे प्रश्न यशस्वीपणे हाताळले.

**भारतीय प्रबोधन व धर्मसुधारणा चळवळी –** भारतीय धर्मसुधारणा व प्रबोधनाच्या चळवळींना जसा ब्रिटिशांच्या राजवटीचा संदर्भ आहे. तसेच या चळवळींना भारतातील धर्मसुधारणा चळवळींचा मोठा संदर्भ आहे. भारतीय समाजप्रबोधन धर्मसुधारणेनंतर समाजसुधारणेकडे व शेवटच्या टप्प्यात म्हणजे विसाव्या शतकात राजकीय सुधारणांना प्राधान्य देताना दिसते. १९ व्या शतकात ब्रिटिशांनी भारतात ख्रिश्चन धर्माच्या प्रसाराला सुरुवात केली. किंबहुना ब्रिटिशांच्या सानिध्यात भारतातील काही युवकांना या धर्माबद्दल आपुलकी वाटू लागली. याच काळात भारतात हिंदू धर्माची अवस्था अतिशय खराब बनली होती. असंख्य अंधश्रद्धा, कर्मकांडे, सती, बालविवाह, केशवपनासारख्या अनिष्ठ प्रथांबरोबर पुरोहितवर्गाचे प्राबल्य वाढले होते. अस्पृश्यता व स्त्रियांच्या गुलामगिरीमुळे हा धर्म सहिष्णू व उदारमतवादी असूनही संकुचित आणि गतिहिन बनला होता. अवतारवाद, मूर्तिपूजा व धार्मिक अनिष्ठ प्रथापरंपरामुळे आधुनिक विचार स्वीकारण्याची लोकांची तयारी नव्हती. अशावेळी विशेषतः प्रथम बंगालमध्ये राजा राममोहन रॉय यांनी ब्राह्मो समाजाची १८२८ मध्ये स्थापना करून भारतीय प्रबोधनाला एकाअर्थी सुरुवात केली. याच धर्तीवर महाराष्ट्रात परमहंस सभेची स्थापना झाली. तिचे काम गुप्त स्वरुपात चाले म्हणून तिला 'गुप्तसभा' असे म्हणत मात्र ती फार दिवस काम करू शकल नाही. पण यातून प्रेरणा घेऊन महाराष्ट्रात १८६७ मध्ये डॉ. आत्माराम पांडुरंग, दादोबा पांडुरंग व भास्कर पांडुरंग यानी प्रार्थना समाजाची स्थापना केली. पुढे यात न्या. रानडे, न्या. चंदावरकर, डॉ. भांडारकर, महर्षी शिंदे यांनी काम केले. कर्मबद्ध माणसाच्या ठिकाणी अखंड उत्साह, विज्ञानदृष्टी, मोकळा विश्वास, विचारस्वातंत्र्य आणि श्रद्धा, सेवा, प्रेम व त्याग यावर ब्राह्मो व प्रार्थना समाज उभा होता. केवळ मूर्तिपूजेला विरोध न करता समाजसुधारणेचा आग्रह, बुद्धिप्रामाण्यता व पारंपरिक संकुचित प्रथांना विरोध करणारे धर्म म्हणून ब्राह्मो व प्रार्थना समाजाने काम केले. १८७३ मध्ये महाराष्ट्रात म. फुल्यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना करुन खऱ्या अर्थाने समाजातील दबलेल्या अस्पृश्य, कष्टकरी, शेतकरी व स्त्रियांना न्याय देण्याचा प्रयत्न केला. ईश्वर निराकर निर्गुण असून 'आपण सर्व त्या ईश्वराची लेकरे आहोत' असे म. फुले म्हणत. हिंदू धर्मातील जन्मावर आधारीत जाती व त्यातील विषमतेवर त्यांनी कठोर प्रहार केला. व्यक्तीचे मोठेपण हे जातीपेक्षा कर्तृत्व, शिक्षण व त्याच्या समाजसेवेवर अवलंबून असते असे त्यांचे मत होते. लोकांना त्यांचे मूलभूत अधिकार प्रदान करणारी व बुद्धिप्रामाण्याच्या शास्त्रीय कसोटीवर सत्य शोधणारी सत्यशोधक चळवळ शिक्षणप्रसाराला प्राधान्य देत होती. सामाजिक समता, स्त्रीयांना स्वातंत्र्य, अस्पृश्यता निवारण व शेतकरी कष्टकऱ्यांना न्याय देणारी ही चळवळ त्या काळात खेड्यापाड्यापर्यंत पोहोचली होती.

रामकृष्ण परमहंस यांनी रामकृष्ण मिशनच्या माध्यमातून प्रबोधनाचे काम सुरु केले. हिंदू धर्मातील अभिजात हिंदुत्वाला पुन्हा आपले गत वैभव मिळून देण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. सर्व धर्मातील मूलभूत तत्वांना वेदांत जोडू शकते आणि त्यासाठी हिंदुत्वामधील वैश्विकता, नैतिकता, सहिष्णूता व उदारमूल्यांच्या पुनर्निर्मितीसाठी त्यांनी काम केले. पुढे ही चळवळ विवेकानंदानी वाढवून भारतीय उदात्तसंस्कृतीला जागतिक प्रतिष्ठा मिळवून दिली. याबरोबर या मिशनने दवाखाने, शाळा, वसतीगृहे, वाचनालये यातून देशाभिमान व सार्वत्रिक चैतन्य अधिक जागृत करण्याचा प्रयत्न केला.

स्वामी दयानंद यांनी १८७५ मध्ये पंजाबमध्ये आर्य समाजाची स्थापना केली. 'सत्यार्थ प्रकाश' या ग्रंथातून त्यांनी सामाजिक सुधारणांचे महत्व सांगताना अफाट असा लोकसंग्रह तयार केला. 'ईश्वर एकच आहे', हे मूलभूत तत्वज्ञान सांगताना आर्य समाजाने ईश्वर समजावून घेण्यासाठी वेदांना प्राधान्य दिले. त्यांच्या मते वेदांचा अभ्यास केल्याशिवाय ईश्वराचा व मनुष्यजीवनाचा अर्थ कळत नाही. वेद हे प्रमाण असून तेच एकमेव खऱ्या ज्ञानाचे साधन आहे, असा आर्य समाजाचा विश्वास होता. सामाजिक समतेचा पुरस्कार करणारा आर्य समाज चार आश्रम व गुणकर्म आधारीत चार वर्ण मान्य करत होता. दैववाद व अवतारवादाऐवजी सतत कर्म करण्यावर आर्य समाजाचा भर होता. हिंदूधर्मात नवचैतन्य तयार करण्यासाठी आर्य समाजाने मोठे काम केले.

अवतारवाद व गूढवादातील सत्यता जाणून घेण्यासाठी दक्षिण भारतात अडयार (चेन्नई जवळील) येथे थिऑसॉफिकल सोसायटीची स्थापना झाली. मुंबईत त्यांनी पहिल्यांदा कार्यालय सुरु केले. ही अमेरिकन अभ्यासक ऑलनॉट व रशियन विचारवंत मॅडम ब्लॅव्हॅटस्की यांनी न्यूयॉर्क येथे स्थापना केलेली संस्था होती. भारतातील वेद, उपनिषदे, पुराणे याचे थिऑसॉफिकल सोसायटीला आकर्षण होते. त्याचा ते पाश्चात्य देशात प्रचार करीत असत. भारतात ॲनी बेझंट यांनी या चळवळीत काम करुन 'रिइनकारनेशन' नावाचे पुनर्जन्मावर आधारीत पुस्तक लिहिले. हिंदू धर्म सर्वश्रेष्ठ असून त्यातील विश्वबंधुत्व, तार्किक बौद्धिक युक्तिवाद, जीवनाबद्दल उदात्त आकलन, सदाचार कौतुकास्पद आहे असे थिऑसॉफिकल सोसायटीचे मत होते. बनारसला त्यांनी हिंदू विद्यापीठाची स्थापना करुन समाजकार्य, शिक्षण, राजकारण याही क्षेत्रात आपले विचार मांडले.

याशिवाय या प्रबोधनात वेगवेगळ्या समाजधुरिणांनी व काही छोट्या छोट्या चळवळींनीही महत्वाचे योगदान दिले. यात हिंदू महासभेची व अभिनव भारतसारख्या प्रखर राष्ट्रवादी संघटनेची स्थापना करुन हिंदूराष्ट्रांची संकल्पना मांडणाऱ्या वि. दा. सावरकरांनी बुद्धिप्रामाण्यता, विज्ञाननिष्ठा व आधुनिकतेचा पुरस्कार केला. यांत्रिकीकरणाचा त्यांनी पुरस्कार केला. तसेच जातिव्यवस्थेच्या विरुद्ध संघर्ष केला. राजकीय स्वातंत्र्याशिवाय वास्तविक सुधारणा करता येत नाही, असे त्याचे मत होते. मुस्लीम समाजातही या समकाळात सुधारणांची प्रक्रिया मूळ धरत होती. वहाबी, अहमदिया, अलीगढ यासारख्या उदारमतवादी व शैक्षणिक चळवळीतून मुस्लीम समाजाने समाज प्रबोधनास सुरुवात केली. सरहदगांधी खान अब्दुल गफार खान या गांधीवादी नेत्याने खुदाई खिदमतगार चळवळीच्या माध्यमातून समाजसुधारणा करण्याचा प्रयत्न केला. याच सामूहिक प्रयत्नातून समन्वयवादी लोकसत्ताक राष्ट्रवादाची पायाभरणी झाली. राष्ट्रीय

काँग्रसमधील बद्रुद्दीन तय्यबजी सारख्या मुस्लीम नेत्यांनी काँग्रेसच्या माध्यमातून समाजात राजकीय जाणिवा तयार करण्याचा प्रयत्न केला. भारतीय पारशी समाज हा मूलतःच श्रीमंत, शांततावादी व सुधारकी असल्याने भारतीय प्रबोधनात त्यांनी महत्वाची भूमिका बजावली. इंग्रजी भाषेवरील प्रभुत्व, उद्योग व व्यापाराची मनस्वी आवड यामुळे पारशी समाजाचा ब्रिटिशांशी जवळून संबंध आला. या संबंधातून पारशी समाजाने भारतात समाजसुधारणेला गती देण्याचा प्रयत्न केला. विशेषतः विकृत धर्म व कर्म कांडावर पैसा खर्च न करता शिक्षणासारख्या टिकावू समाजसुधारणांना पारशी समाजाने प्राधान्य दिले. यात सर जमशेटजी जीजीभॉय, दिनशा माणेकजी पेटिट, सरकावसजी जहांगीर, बेहरामजी मलबारी, फिरोजशहा मेहता, दिनशावाच्छा, दादाभाई नौरोजी इत्यादी नावे सांगता येतील. शाळा, दवाखाने, वाचनालये, कलादालने याबरोबर विज्ञान, तंत्रज्ञान याच्या विकासासाठी पारशी समाजाने काम केले. १९ व्या शतकात इतर बहुजन समाजापेक्षा पारशी समाज सुशिक्षित व सधन असल्याने या समाजाने वृत्तपत्रीय क्षेत्रात बहुमोल काम करून राजकीय सामाजीकरण केले. यात बॉम्बे समाचार, मुंबई वर्तमान, जाम ए जमशेद, मुंबईना चाबुक, समाचार दर्पण, चित्रंजन दर्पण इत्यादींचा उल्लेख करता येईल. या पारशी समाजाने भारतात उदारमतवाद, सहिष्णुता, विवेकवाद व आधुनिकतेचा विचार मांडला. सहनशीलता, मवाळता, समाजसेवा या पारशी समाजातील मूलभूत वैशिष्ट्यांमुळेच बेहरामजी मलबारीसारख्या पारशी सुधारकाने स्वतःचे पैसे खर्च करुन युनेटेरियन या सहिष्णू धर्मविचाराच्या मॅक्समूलर या विद्वान धर्मसुधारकाची भाषणे भारतामध्ये आयोजित केली.

**राजकीय प्रबोधन व समाज सुधारणा-** १९ वे शतक हे धर्मसुधारणेचे शतक असल्याने या काळात धर्मसुधारणेतून मर्यादित समाजसुधारणा झाल्या. पण राजकीय सुधारणांना फारसा वेग आला नाही. तरीसुद्धा ब्राह्मो, आर्य व प्रार्थना समाजाने निर्माण केलेली स्वत्वाची अस्मिता राजकीय सुधारणांना प्रेरक ठरली. पाश्चात्य लोकशाहीवाद्यांचे स्वातंत्र्यविषयक विचार, वृत्तपत्रांनी तयार केलेले जनजागरण, मुंबई विद्यापीठाची स्थापना, रेल्वेची झालेली सुरुवात व संपर्काची नवी भाषा म्हणून इंग्रजीला आलेले महत्व यातून भारतात मद्रास, कलकत्ता व मुंबई सारख्या महत्वाच्या शहरात राजकीय विचार मांडणाऱ्या संस्था तयार होऊ लागल्या. १८७० मध्ये न्या. रानड्यांनी स्थापन केलेली सार्वजनिक सभा हे त्यातील एक प्रातिनिधिक उदाहरण होय. या सार्वजनिक सभेतून ब्रिटिशांनी केलेले आर्थिक शोषण व स्वदेशीचा वापर यासारख्या विषयावर न्या. रानडे व ग. वा. उर्फ सार्वजनिक काका यांनी विचारमंथन केले. १८७४, १८७७, १८८२ या सर्वच वर्षांमध्ये भारतात प्रचंड दुष्काळ पडले. मोठ्या प्रमाणात पसरलेल्या एन्फ्युएंझाच्या साथी, वाढते दारिद्र्य, दुष्काळ, उपासमारी व त्यात अंधश्रद्धा तथा निरक्षरतेची भर यामुळे समाजात वाढता असंतोष तयार होऊ लागला. भारतातील सुशिक्षित वर्गात तयार होत असलेल्या स्वातंत्र्यविषयक भावना व दुसऱ्या बाजुला सामान्य लोकात तयार होत असलेल्या असंतोषामुळे भारतात पुन्हा १८५७ सारखे एखादे व्यापक बंड वा क्रांती होईल अशी संभाव्य भिती ब्रिटिश राज्यकर्त्यांना वाटू लागली व त्यातून भारतीयांना खुश करण्यासाठी तसेच वाढत्या असंतोषाला वाट काढून देण्यासाठी एक 'सेफ्टी वॉल्व' म्हणून राष्ट्रीय काँग्रेसची १८८५ मध्ये स्थापना झाली राष्ट्रीय काँग्रेसची निर्मिती ही तशी पहिली रचनात्मक संस्थात्मक राजकीय सुधारणा होती. हा भारतीय समग्र प्रबोधनाचा एक महत्वाचा टप्पा होता.

ब्रिटिशांप्रमाणे भारतातही लोकशाही व्यवस्था, न्याय व कायदा व्यवस्था, आधुनिकता यावी यासाठी या काळात प्रयत्न सुरू झाले. सुरुवातीला राष्ट्रीय काँग्रेसमध्ये उच्चभ्रू ब्राह्मणवर्गाचे व पेशाने वकील असणाऱ्यांचे प्रभुत्व होते. राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापनेत ब्रिटिशांचा सहभाग असल्याने काँग्रेसने ब्रिटिशांना विरोध न करता त्यांच्या सहकार्याने भारतात पहिल्यांदा समाजसुधारणा कराव्यात व टप्प्या टप्प्याने राजकीय सुधारणांकडे जावे असा विचार मांडला. याला पुढे 'आधी राजकीय की आधी सामाजिक' असे वैचारिक वादाचे स्वरुप प्राप्त झाले. काँग्रेसची ही सुरुवातीची मवाळ कार्यपद्धतीही ब्रिटिशांचा काहीसा अनुनय करणारी व समाजसुधारणेवर भर देणारी असल्याने काँग्रेसमधल्या या गटाला मवाळवादी किंवा सनदशीर, नेमस्त या नावाने ओळखले जाई. या सुरुवातीच्या राजकीय प्रबोधनात भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे नेतृत्व दादाभाई नौरोजी, ना. गोपाळ कृष्ण गोखले, न्या. महादेव गोविंद रानडे, सुरेशचंद्र बॅनर्जी यासारख्या मवाळवाद्यांच्या हातात होते. उदारमतवाद, घटनात्मक संयत मार्गावरील विश्वास आणि ब्रिटिशांच्या लोकसत्ताक सुसंस्कृतपणाबद्दल आदर यातून भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने समाजसुधारणा, राजकीय सुधारणा व सनदशीर पद्धतीने ब्रिटिशांच्या चूका त्यांनी दाखवून देण्याचे काम केले. ब्रिटिश साम्राज्य व त्यांची राजवट ही ईश्वरी कृपा असून ते भारतात आपल्या कल्याणासाठी आले आहेत, असा समज काँग्रेसमधील काही नेत्यांमध्ये असल्याने हे भारतीय राजकीय प्रबोधन ब्रिटिश व काँग्रेस यांच्या संयुक्त सहकार्यातून आकार घेत होते.

अर्ज, विनंत्या करुन साम्राज्यवादी ब्रिटिश सरकार आपल्या मागण्या मान्य करणार नाहीत असे राष्ट्रीय काँग्रेसमधील काहींचे मत होते. ब्रिटिश हे परकीय लोक असून त्यांना या देशातून संघर्ष, क्रांती करुन हाकलून द्यावे व प्रथम राजकीय स्वातंत्र्य मिळवावे, असे जहाल गटातील लो. टिळकांचे मत होते. त्यांच्या मते समाजसुधारणा ही किचकट व दीर्घ प्रक्रिया असून त्यासाठी शेकडो वर्षे प्रतिक्षा करावी लागते. त्यापेक्षा राजकीय स्वांतत्र्य निर्णायक प्रक्रिया असून नंतर समाजसुधारणा करता येतील. विशेषतः १९०५ मध्ये बंगालची फाळणी झाल्यानंतर पुन्हा एकदा भारतात असंतोष तयार झाला. मवाळांच्या बोटचेप्या कचखावू धोरणामुळे बंगालची फाळणी झाल्याचे चित्र समाजात प्रस्तुत झाले. यामुळे राष्ट्रीय काँग्रेसमधील जहाल गटाचे प्रभुत्व हळूहळू वाढू लागले. सनदशीर मार्ग योग्य की जहाल मार्ग, आधी राजकीय सुधारणा महत्वाच्या की सामाजिक सुधारणा महत्वाच्या, या अंतस्थवादातून सूरत अधिवेशनात काँग्रेसमध्ये अधिक उघडस्वरुपाचे दोन गट तयार झाले. हिंदू महासभा व मुस्लीम लीगची स्थापना ही या काळातील तशी विघटीत पण राष्ट्रवादाची प्रक्रिया होती. या सर्व अस्वस्थ करणाऱ्या घटनांवर सामोपचाराचा विचार म्हणून १९०९ मध्ये मोर्ले-मिंटो सुधारणा ब्रिटिशांनी जाहिर केली. याच काळात लो. टिळकांना मंडालेच्या तुरुंगात राष्ट्रद्रोहाच्या आरोपाखाली टाकण्यात आले. लो. टिळकांनी १९ व्या शतकाच्या शेवटी व २० व्या शतकाच्या सुरुवातीच्या कालखंडात सांस्कृतिक राष्ट्रवादाची बांधणी केली. १८८२ मध्ये सुरू केलेल्या सार्वजनिक गणेशोत्सव व शिवजयंतीमुळे भारतात संघटीत राष्ट्रवादी प्रेरणांना अधिक मजबुती मिळाली. आर्थिक व राजकीय राष्ट्रवादापेक्षा लोकमान्यांचा सांस्कृतिक राष्ट्रवाद अधिक प्रभावी ठरला. याच समकाळात महर्षी अरविंदो, बिपीन चंद्रपाल, लाला लजपतराय यांनी राष्ट्रवादी विचार मजबूत केले. वीर सावकरांची अभिनव भारत व चाफेकर बंधु तथा वासुदेव बळवंत फडक्यांच्या सशस्त्र क्रांतीच्या विचारांनी भारतीय प्रबोधनात प्रखर

संघर्षाचे विचार पुढे आले. स्वदेशी, स्वराज्य, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षणाबरोबर होमरुल चळवळीमुळे भारतात राजकीय प्रबोधनाला अधिक गती मिळाली. १९१६ च्या लखनौ कराराने हिंदू मुस्लीम ऐक्य तयार होऊन राष्ट्रीय काँग्रेसची शक्ती अधिक वाढत गेली.

१९२० मध्ये लो. टिळकांच्या मृत्यूनंतर काँग्रेसमधील जहाल विचारसरणी मागे पडली. त्या अगोदर १९१६ मध्ये ना. गोखले व साधारणतः १९१६ च्या आसपास इतर काही मवाळ नेत्यांचे निधन झाल्याने म. गांधींच्या निमित्ताने नवा सुधारकी प्रयोगशील सत्याग्रही पर्याय भारतीय प्रबोधनाला मिळाला. सत्य, अहिंसा, सत्याग्रह, नैतिकता, आत्मबळ, उदारमतवाद व सद्सद्विवेकशिलतेच्या आधारावर सविनय प्रतिकार करुन ब्रिटिशांविरुद्ध व सर्व प्रकारच्या अन्यायाविरुद्ध लढता येते, हे म. गांधींनी दाखवून दिले. भारतातील खेडी, शेतकरी, अस्पृश्यता व एकंदर मागासलेपणाच्या पार्श्वभूमीवर राजकीय स्वातंत्र्य लढ्याबरोबर भारतीय मूलभूत अर्थव्यवस्था सुधारताना शुद्ध नैतिक मार्गांचा वापर करुन त्यांनी नवे सामाजिक, आर्थिक, राजकीय पर्याय समाजाला देण्याचा प्रयत्न केला. शास्त्रीय विवेकशिलता व अध्यात्मिक आंतरिक बळ यांचा समन्वय साधून महात्मा गांधींनी पारंपरिक भारतीय उदार मूल्ये व नवे शास्त्रीय दृष्टिकोन यांचा मेळ घालण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे मोठ्या प्रमाणात लोक त्यांच्या चळवळीत सामील झाले व भारतात नवे प्रबोधन सुरू झाले.

## १.२ विषय विवेचन

समाजसुधारणा व भारतातील राष्ट्रवादी विचार या विषया अंतर्गत प्रकरण एकमध्ये आपणास भारतातील आद्य समाजसुधारक राजा राममोहन रॉय, स्वामी दयानंद सरस्वती व महात्मा जोतिबा फुले यांच्या समाजसुधारणांचा व प्रबोधनात्मक विचारांचा अभ्यास करावयाचा आहे.

### १.२.१ राजा राममोहन रॉय

अल्पपरिचय- राजा राममोहन रॉय यांचा जन्म बंगाल प्रांतात राधानगर नावाच्या गावात २२ मे १७७२ रोजी झाला. रॉय हा त्यांच्या घराण्याला मिळालेला बहुमान होता. त्यांचे मूळ आडनाव बॅनर्जी होते पण रॉय याच नावाने ते प्रसिद्ध झाले. त्यांचे कुटुंब सनातनी वैष्णव समाजाचे तर त्यांच्या मातोश्री शाक्तपंथाच्या कट्टर समर्थक होत्या. राजा राममोहन यांचे प्राथमिक शिक्षण मौलवींच्या हाताखाली झाले. ते अरबी, फारसी, इस्लामी, अध्यात्म व समाजशास्त्र विषयात चमकू लागले. त्यांनी कुराणाचा अभ्यास केला. अरबी भाषेत असणाऱ्या तर्कसंगत व तीव्र बुद्धिप्रामाण्यवादी विचारांनी ते प्रभावीत झाले. याच काळात हिंदू धर्मात वाढत असलेल्या कर्मकांडानी, अंधश्रद्धेने व अनेकेश्वरवादातील उपासनेत अडकलेल्या समाजाकडे पाहून ते व्यतीत झाले. त्यांनी या सर्वावर टीका करणारा एक कठोर लेख लिहिला. त्यामुळे घरातून त्यांना बाहेर पडावे लागले. काही दिवस ते तिबेटमध्ये राहिले. तिथे बौद्ध धर्मही मूर्तिपूजेत व कर्मकांडात अडकल्याचे पाहून ते व्यतीत झाले. याच काळात ब्रिटिशांनी भारतात महत्वाच्या शहरात शाळा काढून ख्रिश्चन धर्माचा प्रसार व प्रचार चालू केला होता. हिंदू धर्मासारख्या मूळात सहिष्णूउदार व सेवाभावी धर्मावर केवळ आपल्यातील काही दोषांमुळे बाह्य धर्माची आक्रमणे होत आहेत. हे त्यांच्या लक्षात आले, यातूनच हिंदू धर्मसुधारणेबरोबर समतोल धर्म कोणता याचे त्यांनी चिंतन केले व ब्राह्मो समाजाची स्थापना केली. या संदर्भात आचार्य

जावडेकर म्हणतात, ''हिंदू धर्मावरील ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या हल्ल्याला प्रतिकार करणे हे रॉय यांच्या विविध अंगीकृत कार्यापैकी एक महत्वाचे कार्य होते. पण केवळ ख्रिस्ती धर्माला विरोध करण्यासाठी ब्राह्मो समाजाची स्थापना झाली नव्हती. हिंदू धर्माची सुधारणा व्हावी एकेश्वरी धर्मतत्वाचा सर्वत्र प्रसार होऊन सर्व धर्माचे अंतरंग एकच आहे हे दाखवून द्यावे. तसेच जगातील धर्मभेदांचा अंधार नष्ट होऊन सार्वत्रिक विश्वधर्माचा प्रसार व्हावा'' असे रॉय यांना वाटत होते.

हिंदू धर्मातील दोष शोधताना त्यांच्या असे लक्षात आले की, कार्यकारणभाव लक्षात न घेतल्याने हिंदू धर्मात अंधश्रद्धा तयार झाल्या आणि याचे मूळ कारण अज्ञानात आहे. संकुचित विचार, मूर्तिपूजा, अंधश्रद्धा व अनेकेश्वरवाद यावर त्यांनी कठोर टिका केली. मानवी जीवनातील धर्माचे महत्व त्यांना मान्य होते पण ते बुद्धी, विवेक, विश्लेषण व शास्त्रीय निकषावर तपासून घ्यावे असे त्यांचे मत होते. हिंदू धर्मातील गतीशून्यतेला प्रवाही करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. राजा राममोहन रॉय अलौकिक बुद्धिचे वैचारीक चर्चा व निरुपण करणारे पंडित होते.

वडीलांच्या मृत्यूनंतर ते मुर्शिदाबादेस आले. त्यांनी फारसी भाषेत 'तोअफत-उल मुवाहिद्दिन' या नावाचा प्रबंध लिहिला. घर सोडून भ्रमंती केल्याने आपले अनुभव विश्वव्यापक झाल्याचे ते म्हणतात. अनेक लोकांना भेटताना त्यांचे भिन्न भिन्न विचार व अनुभव रॉय यांनी समजावून घेतले. या सर्वात त्यांना एक समान दुवा दिसला व तो म्हणजे सर्वांचा या विश्वाच्यापलीकडे असणाऱ्या सर्वोच्च ईश्वरी शक्तीवर विश्वास आहे. यातून रॉय यांनी पुढे सर्व धर्मातील सत्वांश स्वीकारून ब्राह्मो समाज या वैश्विक धर्माची स्थापना केली. सुरुवातीच्या अभ्यासू दशेत त्यांनी ब्रिटिश सरकारची नोकरी केली. तिथे इंग्रजी भाषेबरोबर जैन धर्माचा त्यांनी अभ्यास केला. मात्र फार दिवस ते नोकरीत राहिले नाही.

पुढे त्यांनी १८१५ मध्ये 'आत्मीय सभा' स्थापन केली. विशेषतः मुलींची विक्री, विषमता, जातीभेद बंद करणे, स्त्रियांना आत्मप्रतिष्ठा व स्वातंत्र्य मिळवून देणे यासाठी रॉय यांनी काम केले. १८१८ मध्ये महाराष्ट्रात पेशवाईचा शेवट झाला. याचवेळी हिंदूधर्मातील सतीसारख्या रानटी व अमानवी प्रथेविरुद्ध त्यांनी कठोर टीका केली. मात्र त्यांच्या या समाजसुधारणेला प्रचंड असा विरोध झाला. सनातनी कर्मठ हिंदूना रॉय यांच्या सुधारणा मान्य नव्हत्या, तसेच ब्रिटिशांनाही असे क्रांतिकारी बदल त्यांच्या सोईसाठी योग्य वाटत नव्हते पण तरीही विरोधाची तमा न बाळगता राजा राममोहन रॉय यांनी आपले विवेकी विचार पुढे चालवले. यातूनच त्यांनी १८२१ मध्ये 'कलकत्ता युनिटेरियन असोशिएशन'ची स्थापना केली. त्याकाळी इंग्लंड व अमेरिकेत युनिटेरियन समाजाने भारतातील सहिष्णू भागवत धर्माप्रमाणे समाजबांधणीचे व विकासाचे काम केले. रॉय यांचा ब्राह्मो समाज किंवा दादोबा पांडुरंग, आत्माराम पांडुरंग यांचा प्रार्थना समाज व परमहंस सभाही युनिटेरियन समाजाचीच भारतीय आवृत्ती होती. युनिटेरियन समाज हा आध्यात्मिकतेबरोबर ऐहिक व भौतिक विकासाकडेही लक्ष देत होता याचे रॉय यांना कौतुक वाटत होते.

रॉय हे कुशाग्र बुद्धिचे उत्साही विद्यार्थी व विचारवंत होते. अरबी फारशी प्रमाणे त्यांनी इंग्रजी, ग्रीक, हिब्रू, लॅटिन या भाषांचा अभ्यास करुन ख्रिश्चन धर्माचा अभ्यास केला. ख्रिस्ती धर्मातील मर्यादावर त्यांनी

टीका केली. तौलनिक धर्मशास्त्राचा अभ्यास व नविन समतोल धर्माचा शोध हा त्यांच्या सतत चिंतनाचा विषय राहिला. याच सखोल चिंतनातून प्रत्येक धर्मातील आदर्श मूल्यांचे एकत्रीकरण करून त्यांनी १८२८ मध्ये ब्राह्मो समाजाची स्थापना केली. श्रद्धा, सेवा, प्रेम, त्याग, स्वातंत्र्य, विवेकशीलता, नैतिकता, अखंड उत्साह, समन्वयशीलता व बंधुता यावर ब्राह्मो समाज उभा होता. मूर्तिपूजेला विरोध करताना ब्राह्मो समाज सर्वांना खुला होता. त्यांनी आत्मशुद्धी, आत्मपरिक्षण व आत्मबळासाठी प्रार्थनेला महत्व दिले. या समाजात चर्चा व विचारमंथन केले जाई, त्यामुळे आवश्यक त्या बदलास मोकळ्या मनाने सामोरे जाण्याची लोकशाही उदारवृत्ती व निखळ सहिष्णुता हे या ब्राह्मो समाजाचे वैशिष्ट्य होते. मुघल बादशाह अकबर-२ याने कर्तृत्व पाहून त्यांना 'राजा' ही पदवी दिली पण राजाराम मोहन रॉय हे राजेशाही ऐवजी लोकशाहीचे खंदे पुरस्कर्ते होते. इंग्लंडमध्ये ब्रिटिश पार्लमेंटसमोर त्यांनी सती बंदी, बालविवाह बंदी, विधवा विवाहाला चालना यासाठी निवेदन दिले. या काळात जगात लोकशाहीचा नवा आधुनिक प्रयोग सर्वत्र होत होता. हा प्रयोग पाहण्यासाठी ते फ्रान्सला गेले. तेथील स्वातंत्र्य, समता व बंधुता या मूल्याबद्दल त्यांना फ्रान्सचा आदर वाटला. याच वेळी त्यांची प्रकृती बिघडली व माघारी फिरताना इंग्लंडमधील ब्रिस्टल शहरात त्यांचे २७ सप्टेंबर १८३३ मध्ये निधन झाले. भारतीय प्रबोधनाचा त्यांनी वास्तविक विवेकी पाया रचला.

### १.२.१.१ राजा राममोहन रॉय यांचे प्रबोधन आणि समाज सुधारणाबाबतचे विचार–

राजा राममोहन रॉय हे तत्वज्ञ चिंतक व मूलतः धर्मसुधारक होते. त्याकाळात सर्वत्र सरंजामशाही व राजेशाही व्यवस्था शेवटच्या अवस्थेत पण रुढ होती. त्यामुळे स्वतःचे राजकीय विचार मांडण्या इतपत समाजव्यवस्था एकतर प्रगत नव्हती किंवा त्यांना त्याप्रकारचे तसे स्वातंत्र्यही नव्हते. यामुळेच त्यावेळच्या बहुतेक सर्वच कर्त्या सुधारकांनी साधारणतः धर्मसुधारणेत अधिक लक्ष घातले. या धर्मसुधारणेतून झालेल्या समाजसुधारणाही मर्यादित स्वरुपाच्या होत्या व त्यांना मानवतावादाचा स्पर्श होता.

मात्र ब्रिटिशांच्या आगमनानंतर इंग्रजी भाषा, शिक्षण संस्थांचा प्रसार, रेल्वे, टपाल, छापखाने व वृत्तपत्रांची सुरुवात यामुळे भारतात काही राजकीय जाणिवा तयार होऊ लागल्या. वरील सुधारणांमुळे इंग्रजी राजकीय विचारातून पुढे आलेला सुसंस्कृत उदारमतवाद हळूहळू भारतात मध्यमवर्गीय शिकलेल्या युवकांमध्ये प्रसारीत होऊ लागला. आपल्या धर्मसुधारणांमुळे भारतीय लोक सनातनपरंपरा, कर्मकांड व अंधश्रद्धेतून बाहेर पडतील व नंतर राजकीय सुधारणांसाठी ही सर्व शक्ती उपयोगाची ठरेल अशी रॉय यांची धारणा होती. भारतीय समाज हा धार्मिक आधारावर उभा आहे हे लक्षात घेऊन राजकीय सुधारणांसाठी त्यांनी धार्मिकतेचा मूळ पाया दुरुस्त करण्याचा प्रयत्न केला. धर्मसुधारणा, समाजसुधारणा व राजकीय सुधारणा या शिस्तबद्ध क्रमाने त्यांना भारतीय प्रबोधन पुढे न्यायचे होते.

सामाजिक सुधारणा या टप्प्या टप्प्यानी व संथ गतीने होतात. याचे वास्तविक भान राजा राममोहन रॉय यांच्याकडे होते, तसेच स्वतःच्या मर्यादाही त्यांना ज्ञात होत्या. ब्रिटिशांसारख्या बलाढ्य साम्राज्याविरुद्ध लढून अपयशी ठरण्यापेक्षा सबुरीने त्यांच्याशी मैत्री करत भारतात होईल तेवढ्या समाजसुधारणा करण्यावर त्यांनी भर दिला. त्या काळात भारतात ब्रिटिशांविरुद्ध प्रभावी लोकमत तयार झालेले नव्हते. मग स्वातंत्र्यवादी

राष्ट्रवादाचे नाव पण कोणाला माहित असणार? अशा प्रतिकूल परिस्थितीत रॉय यांनी सामाजिक परिवर्तनातच महत्वाचे योगदान दिले.

ब्रिटिश राजवटीपूर्वी या देशातील राजांनी लोकांना कधीच खात्रीशीर संरक्षण, नागरी हक्क, कायद्याचे अधिराज्य व वास्तविक न्यायाची खात्री दिली नाही. ब्रिटिशांमुळे या देशात पूर्वीपेक्षा अधिक स्थिर व समाधानाची स्थिती आहे याकडे रॉय यांनी सर्वांचे लक्ष वेधले होते. याच पद्धतीने ब्रिटिशांनी राज्यकारभार केला तर लोकांना त्याची सवय होईल. लोकांना राज्यकारभाराची माहिती होईल व लोक ब्रिटिशांना सहकार्य करायला लागतील. या सर्वाचा परिणाम म्हणजे ब्रिटिश लोक खुश होतील व भारतीयांना स्वातंत्र्य देतील असा त्यांचा विश्वास होता. रॉय यांचे हे विचार आज आश्चर्यकारक वाटत असले तरी त्यावेळची परिस्थिती आणि भारताला आवश्यक असणाऱ्या समाजसुधारणा या सर्वांचा विचार करता फार मोठा राजकीय विचार या काळात मांडणे केवळ अप्रस्तुत व काल्पनिक होते. कदाचित ब्रिटिशांनी या देशाला लगेच स्वातंत्र्य दिले तर पुन्हा एकदा जुलमी राजेशाही या देशात सुरु होऊन अराजक तयार होईल याची रास्त भिती त्यांना वाटत होती. म्हणूनच भारतीय विकृत राजांपेक्षा ब्रिटिश बरे असा तौलनिक व ब्रिटिशांचा अनुनय करणारा विचार त्यांनी मांडला होता.

भारतीय लोकांनी ब्रिटिश केंव्हा जाणार? यापेक्षा ते येथे का आले? याचा गांभीर्याने विचार करावा असे ते म्हणतात. भारतातील अंतस्थ संघर्ष, हिंदू मुस्लीम ताणतणाव, सार्वत्रिक मागासलेपण, निरर्थक धार्मिक उपासना व अंधश्रद्धांमध्ये अडकलेले लोक, गतिहिनता, निरक्षरता, दारिद्र्य व विज्ञान तंत्रज्ञानाचा अभाव यामुळे भारतातील कोणत्या राज्यकर्त्याला दोनचार अपवाद वगळता प्रभावी एकछत्री व लोक कल्याणकारी राज्य तयार करता आले नाही ही पात्रता व समर्थता आपणा समाजसुधारणेतून सिद्ध केली तर आपण आपले राज्य चालवू शकू असे ते म्हणतात. मात्र प्रयत्न केला तर आपण आपली पात्रता लवकरच दाखवून देऊ, असा सकारात्मक विश्वास ते समाजाला देतात. त्यांनी ब्रिटिशांबद्दल आदर व्यक्त केला असला तरी रॉय काही ब्रिटिशधार्जीणे नव्हते. मात्र त्यांच्याकडून भरभर सुधारणा करुन घ्याव्यात व आपण सक्षम व्हावे असा त्यांचा आग्रह होता.

भारतीय स्वातंत्र्याचा सर्वस्पर्शीव्यापक विचार करताना रॉय यांनी स्त्रीस्वातंत्र्याचे विचार मांडले. भारतीय प्रबोधनाच्या संदर्भात स्त्रीमुक्तीचा विचार मांडणारे ते पहिले समाजसुधारक होते. सतीच्या प्रथेला विरोध, करताना त्यांनी स्त्रीयांच्या समतोल विकासासाठी विधवा विवाहाचा जोरदार पुरस्कार केला. स्त्रीही कोणत्याच बाबतीत पुरुषापेक्षा पाठीमागे नाही, असे त्यांचे मत होते. हजारो वर्षाच्या भारतीय परंपरेमध्ये सतत स्त्रियांना दडपून टाकल्यामुळे त्या मागे राहिल्या आहेत. पण कर्तृत्व, बुद्धिमत्ता व सामंजस्य तथा संघटन कौशल्य याबाबतीत त्या मुळीच पाठीमागे नाहीत, असे रॉय यांचे मत होते. त्यांनी स्त्री स्वातंत्र्याबरोबर मानवी स्वातंत्र्याला पाठींबा दिला.

राजा राममोहन रॉय व्यक्तीवादी विचारवंत असले तरी मानवी स्वातंत्र्याचा ते समाजाच्या संदर्भात विचार करतात. माणसाला समूहापासून बाजुला करुन त्याला नागरी स्वातंत्र्य द्यावे; असे त्यांचे मत नव्हते. माणसाचे

कल्याण हे समाजसापेक्ष असल्याने प्रचलीत धर्म कायदे व परंपरा जर त्यात अडथळा आणत असतील तर अशा एकांगी स्वातंत्र्याला ते विरोध करतात. त्यांनी नागरी, राजकीय व नैसर्गिक स्वातंत्र्याला पाठिंबा दिला होता.

**१.२.१.२ ब्राह्मो समाज**

राजा राममोहन रॉय यांनी स्थापन केलेल्या ब्राह्मो समाजामध्ये आधुनिक युगाची लक्षणे होती. विश्वरुपदर्शन, अकलुषित विश्वास, अखंडीत उल्हास, सार्वत्रिक स्नेह, विवेकशिलता व स्वातंत्र्य या प्रमुख तत्वांवर उभा असणारा ब्राह्मो समाज हा समाज सुधारणेबरोबर राष्ट्रबांधणीसाठी पूरक वातावरण तयार करीत होता. म्हणूनच महर्षी शिंदे ब्राह्मो समाजाला 'प्रगतीची भावना' म्हणत. जगात जे आदर्श आहे त्याचा मोकळ्या मनाने स्वीकार करण्याची उदारदृष्टी ब्राह्मो समाजाकडे होती. म्हणूनच हा समाज स्वातंत्र्यवादी व प्रयोगशील होता. सर्वच धर्मांना मुक्त प्रवेश देणारा रॉय यांचा ब्राह्मो समाज खरा धर्मनिरपेक्षवादी विचार होता. ब्राह्मो समाजातील विश्वरुपदर्शन हा वैश्विक स्वातंत्र्याचा प्रयोग होता.

राजा राममोहन रॉय हे धार्मिक स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते होते. धर्म ही मानवी विकासाची मूलभूत प्रेरणा असून प्रत्येकाला आपल्या पद्धतीने धर्माचरण करण्याचे ते स्वातंत्र्य देतात. ख्रिश्चन मिशनरी ब्रिटिशांच्या जवळचे असल्याने ख्रिस्ती धर्माची तत्वे ते लोकांवर लादतात, असा रॉय यांचा आरोप होता. या दबावातून बाहेर पडण्यासाठी त्यांनी हिंदू कॉलेज व ब्राह्मो समाजाची स्थापना केली होती. ब्रिटिशांनी सुरू केलेल्या शाळा कॉलेजमधून दिले जाणारे पाश्चात्य स्वातंत्र्यवादी पुरोगामी लोकशाहीचे शिक्षण रॉय यांना महत्वाचे वाटत होते तरी भारतीय महाविद्यालयांनी हिंदूपरंपरा, साहित्य, धर्मरक्षण याचबरोबर विज्ञान, तंत्रज्ञान, गणित, रसायनशास्त्र, शरीरशास्त्र याचे शिक्षण दिले पाहिजे, असा त्यांचा आग्रह होता. स्वातंत्र्याच्या मूळाशी असणाऱ्या शिक्षणाचे व विवेकवादाचे महत्व त्यांच्या लक्षात आले होते.

राजा राममोहन रॉय यांनी केवळ भारतीय समाजप्रबोधनाचा पाया घातला नाही तर त्यांनी पारंपरिक संकुचित अंधश्रद्धा व धर्मसंकल्पनेला विरोध करताना बुद्धिप्रामाण्यवादी, स्वातंत्र्यवादी, समाजशील, मानवतावादी आदर्श धर्माची मांडणी केली. त्यांनी स्थापन केलेल्या ब्राह्मो समाजाने धार्मिक पारंपरिक कल्पनांमध्ये अडकलेल्या सर्वच सनातन धर्मांची मुक्तता केली. राजा राममोहन रॉय अधिक तत्त्वज्ञ, धर्मसुधारक व अध्यात्मवादी चिंतक असल्याने त्यांनी राजकीय प्रक्रियांवर फारसे भाष्य केले नाही परंतु ब्रिटिश सरकार, कायदा, न्याय यावर मत व्यक्त करताना रॉय मानवी स्वातंत्र्याला व मानवी कल्याणाला प्राधान्य देताना दिसतात. म्हणून ते उदार लोकसत्ताकवादी सुधारक होते.

राजा राममोहन रॉय यांना भारतीय प्रबोधनाचे अध्वर्यू मानले जाते. त्यांनी बंगालमधून समाजसुधारणेला सुरुवात केली. कर्मकांड आणि अंधश्रद्धेमध्ये अडकलेल्या गतीशून्य हिंदू धर्माला बाहेर काढायचे असेल तर या धर्मामध्ये अमूलाग्र सुधारणांची गरज आहे, हे रॉय यांच्या लक्षात आले व त्यांनी ब्राह्मो समाजाची स्थापना केली. बुद्धिप्रामाण्यवाद, स्वातंत्र्य, श्रद्धा, सेवा, प्रेम व त्याग याबरोबर अखंडीत उत्साह यावर ब्राह्मो समाज आधारीत होता. ब्राह्मो समाजाची स्थापना करताना राजा राममोहन रॉय म्हणतात, ''हिंदुनी आज

अंगीकारलेली धर्मव्यवस्था ही त्यांच्या राजकीय हिताच्या दृष्टीने मुळीच अनुकूल नाही. याचा मला विलक्षण खेद होतो. जातीबांधवांनी त्यांच्यात पृथक असंख्य समूह व उपसमूह निर्माण केले आहेत. जाणीवाच त्यांच्यापासून हिरावून घेतल्या आहेत. ते इतक्या अनंत धार्मिक विधीत व उपचारात अडकून बसले आहेत की, काहीही गंभीर विचार त्यांच्या डोक्यात उतरविणे अत्यंत अवघड होऊन बसले आहे. किमान त्यांच्या राजकीय फायद्याच्या आणि सामाजिक सौख्याच्या हेतूने तरी का होईना त्यांच्या धार्मिक कल्पनांमध्ये बदल होणे आवश्यक आहे.'' जातिभेद दूर करणे, कर्मकांडाला फाटा देणे व वैचारिक स्वातंत्र्याच्या आधारे नव समाजाची निर्मिती करणे हे ब्राह्मो समाजाचे ध्येय होते. या संदर्भात प्रसिद्ध विचारवंत दि. के. बेडेकर म्हणतात, ''कर्मबद्ध मानवाच्या जागी स्वतंत्र विचारक्षम मानवाची कल्पना ब्राह्मो समाजाने स्थिर केली.'' राजा राममोहन रॉय यांनी एकेश्वरवादी उदार धर्मतत्वांचा स्वीकार करुन सर्वच धर्माचे अंतरंग एकच आहे, हे दाखवून जगातील धर्मभेदांचा अंधकार नष्ट करताना सार्वत्रिक विश्वधर्माचा प्रकाश सर्वत्र प्रसारीत करण्याचा प्रयत्न केला. मोकळा विश्वास, वाढते ज्ञान, शुद्धप्रीती, सात्विक सेवा या तत्वांना महत्व दिले. सर्वच धर्मातील सत्वांश स्वीकारताना ब्राह्मो समाजाने भक्त व परमेश्वरातला अडथळा दूर केला. प्रार्थना व आत्मशुद्धीला महत्व दिले. धर्माचरणात, समाजकार्यात व राजकारणातही मूलभूत सत्याचा आणि सात्विकपणाचा, नीतीचा आणि न्यायाचा आग्रह धरणे त्यांना महत्वाचे वाटले. त्यांनी स्वीकारलेला अद्वैतवाद शंकराचार्याच्या पठडीतला नव्हता तर तो समाजपर होता. आणि धर्माच्या आध्यात्मिक व ऐहिक अंगाचा विचार केला. न्याय, नीती व सात्विकतेचा त्यांनी सतत आग्रह धरला. यातूनच अस्पृश्यता निवारण व सार्वत्रिक सामाजिक दोषांविरुद्ध त्यांनी सविनय सत्याग्रही संघर्ष केला. हिंदूधर्मातील सती, बालविवाह यासारख्या अनिष्ठ चालीरितींविरुद्ध त्यांनी संघर्ष करुन प्रबोधनाच्या मूलभूत प्रश्नांना हात घातला.

### १.२.२ स्वामी दयानंद सरस्वती

**अल्पपरिचय :** १९ व्या शतकामध्ये भारतीय प्रबोधन चळवळीला भारतीय व्यापक लोकसंग्रह मिळवून देण्यामध्ये स्वामी दयानंद सरस्वती यांचे योगदान महत्त्वाचे ठरते. त्यांनी स्थापन केलेल्या आर्य समाजाने समाजसुधारणेच्या संदर्भात काम करताना भारतीय राष्ट्रवादाची प्रभावी बांधणी केली. स्वामी दयानंद सरस्वती यांचा जन्म १८२४ मध्ये काठेवाड प्रांतात टंकारा गावात झाला. त्यांचे घर त्या काळात सनातन, कट्टर धार्मिक पण श्रीमंत ब्राह्मणी प्रकारचे होते. तरीसुद्धा स्वामी दयानंद सरस्वती यांनी स्वतःला अंधश्रद्धा, मूर्तीपूजा व संकुचित विचारापासून दूर ठेवले. सतत ज्ञानाचा शोध व समाजसेवेची तळमळ यातून त्यांनी स्वतःचा व्यापक धार्मिक दृष्टिकोन तयार केला. विवाहबंधनात न अडकता त्यांनी पंधरा वर्षे भारत भ्रमण केले. याच काळात ते भारतीय वेदांकडे आकर्षिले गेले. अंधश्रद्धा, दारिद्र्य व शैक्षणिक मागासलेपणामुळे भारतीय समाजाला आलेली अवकळा व त्याच वेळी ख्रिस्ती धर्माचा भारतात होणारा प्रसार बघून स्वामी दयानंद सरस्वती अस्वस्थ झाले. १८६० मध्ये स्वामी दयानंद सरस्वती हे स्वामी विराजानंद यांच्या संपर्कात आले. विराजानंद वेद शास्त्र संपन्न व हिंदुधर्माचे अभ्यासक होते. त्यांचा वेदांचा गाढा अभ्यास होता. वेद हेच मूळ धर्मग्रंथ असून बाकीची पुराणे व ग्रंथ दोषपूर्ण आहेत असे ते म्हणत. हाच प्रभाव स्वामी दयानंद सरस्वती यांच्यावर पडला व ते जीवनभर वेदप्रामाण्यवादी बनले. वेदप्रामाण्यता हे आर्य समाजाचे बलस्थान

होते. तशीच ती आर्य समाजाची प्रमुख मर्यादा होती. वेदांचे महत्त्व सांगताना समाजसुधारणा करीत स्वामी दयानंद सरस्वती भारतभर फिरले. विशेषतः पंजाबमध्ये आर्य समाजाला मोठा पाठिंबा मिळाला. अस्पृश्यता निवारण, सामाजिक समता, जातीवर आधारीत वर्ण व जातींना विरोध, स्त्रियांना स्वातंत्र्य यासाठी त्यांनी प्रयत्न केले. आर्य समाज हा समकालीन इतर समाजापेक्षा लोकसंग्रह करण्यात यशस्वी ठरला. या समाजाला अनेक संस्थानिक सरदार व राजांनी पाठिंबा दिला. त्यामुळे आर्य समाज प्रभावी काम करू शकला. स्वामी दयानंद सरस्वती यांनी १० एप्रिल १८७५ मध्ये मुंबई येथे आर्य समाजाची स्थापना केली. हिंदू धर्मातील अनिष्ठ प्रथांना विरोध व वेदातील मूलभूत तत्त्वांचा प्रसार यासाठी त्यांनी उत्तर भारत, पंजाब, राजस्थान, बिहार व बंगालमध्ये काम केले. स्वामी दयानंद सरस्वती यांचे ३० ऑक्टोबर १८८३ मध्ये निधन झाले. जीवनभर त्यांना परंपराप्रिय सनातन लोकांनी प्रचंड त्रास दिला.

### १.२.२.१ स्वामी दयानंद सरस्वती यांचे प्रबोधन आणि धर्म सुधारणाबाबतचे विचार :

१९ व्या शतकामध्ये जे समाजसुधारक तयार झाले त्यांनी मूलतः धर्मसुधारणा व त्याअनुषंगाने होणाऱ्या समाजसुधारणांवर आपले विचार मांडले. या काळात विचारांची प्रगल्भता तयार झालेली नव्हती. सार्वत्रिक मागासलेपण, दारिद्र्य, निरक्षरता व धर्मांधता यामुळे समाजात प्रचंड उदासिनता होती.

स्वामी दयानंद सरस्वती हे वेदप्रामाण्यवादी होते. त्यांच्यावर वेदांचा प्रचंड प्रभाव होता. त्यामुळे वेदांच्या पलीकडे समाजाच्या कल्याणासाठी राज्यसंस्था व राजकीय तत्त्वज्ञान काम करीत असतात. याचा त्यांनी कोणताही विचार केलेला नव्हता. मानवी सभ्यता, संस्कृती, मानवी कल्याण व समाजाची प्रगती ही केवळ वेदांमुळे होऊ शकते. यावर त्यांची प्रचंड श्रद्धा होती. वेदांचा प्रसार व वेदांचे महत्त्व सांगण्यासाठीच त्यांनी आर्य समाजाची स्थापना केली. मानवी विकासाचे तत्त्वज्ञान केवळ वेदात असल्याने भारतातील सहा दर्शने, वैशेषिक, न्याय, सांख्य, योग, वेदांत व पूर्वमीमांसा यांचा आधार वेद आहे. याशिवाय, संगीत, खगोल, वैद्यक, राज्यविद्या, गणित व इतर सर्वांचा आधार वेदच आहेत असे ते म्हणत. त्यामुळे समाजसुधारणा करताना वेदांना प्रमाण मानावे असे ते म्हणत. दंतकथा पुराणकथा याऐवजी ब्राह्मणे, उपनिषदे, आरण्यके व पाणिनीच्या व्याकरणाच्या आधारे वेदांचा शास्त्रीय व तर्कशुद्ध अर्थ शोधण्याचा त्यांनी प्रयत्न केला.

स्वामी दयानंद सरस्वती हे व्यवहारवादी अध्यात्मिक सुधारक होते. म्हणूनच 'ऋग्वेदादिभाष्य, भूमिका' 'सत्यार्थ प्रकाश', 'व्यवहारभानू' या ग्रंथात त्यांनी वेदातील ऋचांचा राजकीय अन्वयार्थ शोधण्याचा प्रयत्न केला. ऋग्वेदातील बृहस्पतीला ते राजाचा राजा म्हणतात. तर इंद्राला 'रथेष्ट्रा' म्हणजे रथ चालवणारा म्हणजे राज्य चालवणारा असे संबोधतात. त्यांनी केवळ वेदच नव्हे तर उपनिषदे, पुराणे यांचाही राजकीय बाजूने अर्थ शोधण्याचा प्रयत्न केला.

### १.२.२.२ स्वामी दयानंद सरस्वती व अध्यात्मिक राष्ट्रवाद :

स्वामी दयानंद सरस्वती यांच्या आर्य समाजाने जर सर्वात महत्त्वाचे कोणते काम केले असेल तर ते म्हणजे अफाट लोकसंग्रह. या लोकसंग्रहातून भारतात राष्ट्रवादाच्या प्रेरणा तयार झाल्या व पुढे त्याचा लो.

टिळक, महर्षी अरविंद, वीर सावरकर व विवेकानंद यांनी विकास केला. पाश्चिमात्त्य संस्कृतीला आर्य समाजाने प्रखर विरोध केला. त्याच बरोबर ब्रिटिशांनी सुरू केलेल्या ख्रिस्ती धर्मप्रसाराला रोखण्यासाठी भारतीय उदारमतवादी व उज्ज्वल हिंदू संस्कृतीची पूनर्मांडणी करण्याचा प्रयत्न केला. हिंदू संस्कृतीमधील श्रेष्ठ सामाजिक, मानवतावादी व सांस्कृतिक परंपरा पुन्हा नव्याने समाजासमोर मांडल्याशिवाय या देशाची सार्वत्रिक दास्यातून सुटका होणार नाही असे त्यांचे मत होते. धर्म व राजकारण या वेगळ्या व भिन्न संकल्पना नसून त्या एकच आहेत. असे त्यांचे प्रतिपादन होते म्हणूनच अस्पृश्यता निवारण व स्त्रीस्वातंत्र्यासाठी त्यांनी प्रयत्न केले व सर्व भारतीयांना एकत्र जोडण्यास हिंदी भाषेचा वापर केला. हिंदू धर्म व हिंदू संस्कृती यातून प्रभावी एकसंध लोकमत बनवताना त्यांनी कधीही हिंदू धर्म वा संस्कृतीमधील दोषांचे समर्थन केले नाही. उलट स्वधर्मातील दोषांवर त्यांनी कठोर टीका केली. तसेच ब्रिटिशांच्या पाश्चात्त्य संस्कृतीला विरोध करताना त्यांनी ब्रिटिशांच्या आदर्श राजकीय विचारांचा मात्र स्वीकार केला. स्वामी दयानंद सरस्वती यांनी प्रखर राष्ट्रभक्तीच्या प्रेरणेसाठी आध्यात्मिक राष्ट्रवादाचा पुरस्कार केला.

ब्रिटिशांचा राज्यकारभार जवळून पाहताना त्यांनी शासनावरील लोकांचे व मूल्यांचे नियंत्रण, कल्याणकारी उदारमतवादी व्यवस्था, मर्यादित राजेशाही आणि कायद्याचे न्यायाचे अधिराज्य या त्यांच्या पद्धतींना पाठिंबा दिला. हिंदू धर्म परंपरामधून तयार झालेले सहिष्णू राजकीय विचार सामान्य व्यक्तीपर्यंत पोहोचवण्याचे काम आर्य समाजाने केले. त्यामुळे समकालीन ब्राह्मो, प्रार्थना व परमहंस सभेपेक्षा आर्य समाज अधिक खोलवर व ग्रामीण भागापर्यंत रूजू शकला. भारतीय लोक संघटीत झाल्याशिवाय या देशात खऱ्या सामाजिक सुधारणा होऊ शकणार नाहीत, हे त्यांनी ओळखले होते. यासाठी त्यांनी विपुल असे राष्ट्रवादी स्वरूपाचे लेखन केले. यात त्यांनी –

१) भारतीय प्राचीन परंपरामधील उदात्त आदर्श विचारांवर भर दिला.

२) भारतीय स्वातंत्र्याबद्दल प्रखर आत्मीयता तयार करताना गुलामगिरीला विरोध आणि

३) राष्ट्रभक्ती, ऐक्य, संघटन, व प्राचीन वेदपरंपरेला प्रतिष्ठा देण्याचा त्यांनी प्रयत्न केला.

ख्रिस्ती वा मुस्लीम धर्मप्रसाराला केवळ प्रतिकार करण्यासाठी त्यांनी आर्य समाजाची स्थापना केली नाही, तर भारतीय प्रखर राष्ट्रवादातून भविष्यकालीन एकसंध, चैतन्यमय व प्रभावी तथा आदर्श भारत तयार करण्यावर आर्य समाजाचा भर होता. १८८५ नंतर भारतात जे संस्थात्मक व शिस्तबद्ध राजकारण सुरू झाले. त्याची मजबूत पूर्वपिठीका तयार करण्याचे श्रेय आर्य समाजाला द्यावे लागते.

ब्रिटिश शासनपद्धती व त्यांचे विचार कितीही आदर्श असले तरी आपल्या अस्मिता, आपला इतिहास, आपली परंपरा, आपले चैतन्य, आपली एकसंधता व आपला राष्ट्रवाद हा शेवटी आपणासाठी क्रियात्मक आनंददायी असतो, असे त्यांचे मत होते. ही स्वराष्ट्राभिमानाची प्रेरणा प्रभावीपणे समाजात रूजवून भारतीय राष्ट्रवाद तयार करण्याचे काम त्यांनी केले. हा राष्ट्रवाद तयार करण्यासाठी अस्पृश्यता निवारण व स्त्री स्वातंत्र्यावर भर देताना त्यांनी अंधश्रद्धा व सनातन संकुचित प्रथापरंपरांना विरोध केला. भारतीय गुलामगिरी व ब्रिटिशांची साम्राज्यशाही याबद्दल दयानंदांच्या मनात प्रचंड चिड होती पण या सर्वाला आपणच कारणीभूत

नाही का? याचा त्यांनी शोध घेतला. 'सत्यार्थ प्रकाश' या त्यांच्या ग्रंथात ते म्हणतात, ''अंतर्गत विषमता, जातीय भांडणे, निरक्षरता, शुद्ध मानवतावादी धर्माचा लोप, वेदाभ्यासाकडे दुर्लक्ष, संकुचित प्रथा, कर्मकांड व दारिद्र्य यामुळे येथे ब्रिटिशांचे राज्य आले. आपल्या चूकांमुळे ते इथे स्थिर झाले म्हणून उदात्त सामाजिक भान, ऐक्य व एकसंधता, प्रखर राष्ट्रभक्ती राष्ट्र व समाजासाठी आत्मसमर्पणाची भावना, वेदांचा अभ्यास व नवा मानवतावादी धर्म आपण स्वीकारत नाही. तोपर्यंत आपली या राजकीय गुलामगिरीतून मुक्तता होणार नाही. भारतीय समाज सर्वार्थाने आदर्श व सद्गुणी बनावा ही त्यांची खोल अपेक्षा होती. त्यांनी राष्ट्रीय चारित्र्य व राष्ट्रवादी संघटनेला भावी राजकारणाचा पाया संबोधले होते.

ब्रिटिश साम्राज्य बलशाली असले तरी कोणत्याही शक्तीचा अतिरेक व अनाठायी गर्व त्या सत्तेला रसातळाला नेतो असा त्यांचा विश्वास होता. म्हणूनच ब्रिटिशांची सत्ता त्यांच्यातील अतिरेकी सामर्थ्यामुळे अंतस्थ मत्सर व गर्वामुळे नष्ट होईल असे त्यांना वाटते. त्यासाठी जगातील अनेक नष्ट झालेल्या साम्राज्यांचे दाखले स्वामी दयानंद देतात. मात्र ब्रिटिश त्यांच्या दोषांमुळे सत्ता भ्रष्ट होणार असतील तरी आपण आपल्या भविष्यासाठी एकत्र येऊन आपले दोष दूर केलेच पाहिजेत, असे त्यांचे प्रतिपादन होते. आपण संघटीत झालो तरी ब्रिटिश साम्राज्यशाहीला आपण फेकून देऊ असा त्यांचा विश्वास होता. त्यांच्या जाज्वल्य अशा प्रखर राष्ट्रभक्तीबद्दल चिरोल असे म्हणतात, ''स्वामी दयानंद सरस्वती हे अंतर्यामी अनाकलनीय राजकारणी होते. ब्रिटिश साम्राज्य उलथून टाकणे हे त्यांचे ध्येय होते व त्यासाठी हिंदू धर्म संघटन व धर्मशुद्धीकरणाला त्यांनी महत्त्व दिले. धर्मसुधारणा, समाजसुधारणा व त्यातून राजकीय स्वातंत्र्य असा त्यांच्या एकंदर कार्याचा क्रम होता. धर्म, जाती, भाषा, संस्कृती व भिन्न प्रवृत्तीमुळे या देशाचे पृथक असे असंख्य तुकडे झाल्याची खंत त्यांना वाटत होती पण यावर वैदिक विचारांचे सार्वत्रीकरण हा उपाय त्यांना महत्त्वाचा वाटत होता. यासाठी वैदिक सक्तीच्या शिक्षणावर त्यांनी भर दिला. स्वराज्य व राष्ट्रीय स्वातंत्र्य ही एक सामूहिक सातत्यपूर्ण प्रक्रिया असून ती सेंद्रिय प्रकारची असल्याने राष्ट्रीय ऐक्य, सामाजिक समता, सलोखा व सामूहिक विवेकी प्रयत्न महत्त्वाचे असतात. असे स्वामी दयानंदांचे मत होते. त्यांच्या विचारामुळे भारतीय युवकात आत्मभानाबरोबर राष्ट्राभिमानाची नवी प्रेरणा अधिक विकसित झाली व गतिशून्य आत्मकेंद्री समाज अधिक संघटीत व गतीमान झाला.

समाज प्रबोधनात महत्वाची भूमिका बजावण्यात आर्य समाजाचे कार्य व्यापक स्वरुपाचे होते. विशेषतः उत्तर भारतात त्याचा समाजमनावर मोठा सकारात्मक परिणाम झाला. इ. स. १८७५ साली स्वामी दयानंद सरस्वती यांनी या धर्माची स्थापना केली. ईश्वर एक आहे. तो सर्वसाक्षी व शक्तीमान आहे. वेदांमुळे सत्यज्ञान होऊ शकते म्हणून प्रत्येकांने वेदांचा अभ्यास करावा. सामाजिक जीवनात भेदभाव मानू नये. असे आर्य समाजाचे म्हणणे होते. आर्य समाजात प्रागतिकता होती. त्यांचा लोकसंग्रह अफाट होता पण त्यांची वेद प्रामाण्यता ही त्यांची प्रमुख मर्यादा होती. स्वामी दयानंद एका बाजुला समतेचे विचार मांडत होते पण दुसऱ्या बाजुला वैयक्तिक जीवनात भेदाभेद पाळावेत की पाळू नयेत हे ठरविण्याचा अधिकार व्यक्तिला देत होते. ते पुराणांना मानत नव्हते कारण ते वेदानंतर तयार झाले, असे म्हणत पण ते वेद कोणी तयार केले हे मात्र सांगत नव्हते. वेद मानवनिर्मित असून मानवी बुद्धिच्या मर्यादा आर्य समाजाने लक्षात घेतल्या नाहीत. त्यामुळे

तो नविन प्रयोगापासून सतत दूर राहिला. तरीसुद्धा आर्य समाजाने स्त्री शिक्षणाचा पुरस्कार, बालविवाह व जरठकुमारी विवाहाचा निषेध तथा आंतरजातीय विवाहांना पाठिंबा दिला. या समाजाला बऱ्याच संस्थानिक राजांचा पाठिंबा असल्याने आर्य समाजाची शक्ती तशी मजबुत होती. लोकांनी आर्यसमाजाला मोठा पाठिंबा दिला. 'सतत कर्म करीत राहा', असा आर्य समाजाचा कर्तव्याला महत्व देणारा संदेश होता. मात्र आर्य समाज वेदांवर उभा असल्याने वैचारिकदृष्ट्या बंदिस्त समाज होता. त्यांना इतर धर्मसुधारणा चळवळींशी संवाद साधता आला नाही. आर्य समाजाने जातिव्यवस्थेवर प्रखर हल्ले केले. स्त्रीपुरुष समतेचा पुरस्कार केला. मागास जातीमध्ये नव्या जाणीवा तयार केल्या. आर्यसमाज हा ऐहिक झटापटीत अधिक धाडशी होता. त्यांनी आक्रमक सुधारणावादाचा प्रभावी पाठपुरावा केला. पोकळ आदर्शवाद व अहिंसेपेक्षा ते व्यवहाराला महत्त्व देतात. स्वामी दयानंद हे प्रखर अध्यात्मवादी, हिंदू परंपरातील चिरंतन मूल्ये शोधणारे धर्मपंडित, राष्ट्रवादी व समाज सुधारणेतून एकसंध मजबूत भारताचे स्वप्न बघणारे कर्ते सुधारक होते.

### १.२.३ महात्मा जोतिबा फुले

**अल्पपरिचय :** १९ व्या शतकामध्ये ज्या समाजसुधारकांनी समाजातील मूलभूत प्रश्नांना हात घालून ते विचारातून व क्रियाशील कृतीतून सोडवण्याचा प्रयत्न केला. त्यामध्ये म. फुल्यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागते. महात्मा फुल्यांचे मूळगाव सातारा जिल्ह्यातील कटगुण हे असून त्यांचे आडनाव गोरे होते. पण त्यांच्या अनेक पिढ्या पुण्यामध्ये फुलांचा व बागकाम व्यवसाय करीत असल्याने त्यांचे नाव फुले असे पडले. म. फुल्यांचा जन्म पुरंदर तालुक्यातील खानवडी या गावात १८२७ ला झाला. त्यांनी सप्टेंबर १८७३ मध्ये सत्यशोधक समाजाची स्थापना केली. या समाजाने अस्पृश्यता निर्मूलन, स्त्री स्वातंत्र्य या बरोबर शेतकरी, कष्टकरी समाजाचे प्रश्न सोडवताना धार्मिक कर्मकांड, अंधश्रद्धांना विरोध करून बुद्धिप्रामाण्यवादी विचारांचा पाठपुरावा केला. समाजात सत्यशोधनाची आवड निर्माण व्हावी, यासाठी महात्मा फुल्यांनी शिक्षण प्रसाराला सुरुवात केली.

त्यांचा सत्यशोधक समाज हा कृतीशील समाजसुधारणा करणारा पुरोगामी व परिवर्तनवादी समाज होता. आपल्या समाजाची तत्त्वे सांगताना ते म्हणतात. ''सत्यशोधक समाज हा सत्य शोधणारा समाज आहे.'' जगाच्या निर्मिकाचा शोध सत्याच्या आधारे लावावा अशी त्यांची श्रद्धा होती. महात्मा फुल्यांच्या या मांडणीमुळे सामाजिक, आर्थिक व मानसिक शोषणाला विकृत, संकुचित धर्म कसा कारणीभूत आहे हे स्पष्ट झाले. म. फुल्यांनी शोषणावर आधारीत धर्मव्यवस्थेवर हल्ला केला. पण त्यांच्या या वैचारिक संघर्षाची शास्त्रीय चिकित्सा न झाल्याने सत्यशोधकी सारखी वर्गीय संघर्षाला प्राधान्य देणारी चळवळ पुढे ब्राह्मण ब्राह्मणेतर सारख्या जातीय वादात अडकली. ज्याचे परिणाम महाराष्ट्रातील सुधारणावादी चळवळीच्या प्रगतीला भोगावे लागले.

#### १.२.३.१ महात्मा जोतिबा फुल्यांचा सत्यधर्म :

महात्मा फुल्यांनी प्रचलीत धर्म नाकारला पण ते स्वतः मात्र नास्तिक नव्हते. त्यांच्या मते, ''मानवांनी तयार केलेल्या सर्वच धर्मग्रंथात आरंभापासून शेवटपर्यंत सार्वजनिक सत्य नाही तर त्यात हे कोरडेपणा

आहे.'' महात्मा फुल्यांच्या मते सत्यशोधनही अनादी कालापासून चालत आलेली प्रक्रिया असल्याने ती सत्यशोधक समाजापुरती मर्यादित नाही. पण सर्वच सत्यशोधनाला काल परिस्थितीच्या मर्यादा असल्याने ते निर्णायक सत्य नसून तौलनिक असते असे ते म्हणतात. म्हणूनच महात्मा फुले म्हणतात की, सत्याचे निकष कोणते यावर सत्याची मदार अवलंबून असते. यासाठी ते बुद्धी, भावना, अंत:स्फूर्ती हे तीन निकष सांगतात या सर्व निकषात ते बुद्धीला महत्त्व देतात कारण महात्मा फुले हे विवेकवादाचे पुरस्कर्ते व बुद्धिप्रामाण्यवादी कर्ते सुधारक होते.

सत्यवर्तन केल्याशिवाय मनुष्य सुखी होणार नाही ही त्यांची धारणा होती. धर्माचा वापर करताना निर्मिकाचे अस्तित्व मान्य करूनही महात्मा फुल्यांनी पूजा, नामस्मरण, जप, अनुष्ठान या व अशा कर्मकांडाला महत्त्व दिले नाही. निर्मिकाचे म्हणजे ईश्वराचे अस्तित्व शोधण्यापेक्षा समाजासाठी काम करणाऱ्यांचा शोध घेऊन गौरव करावा असे ते सांगतात.

महात्मा फुल्यांच्या सार्वजनिक सत्यधर्माने नागरी अधिकारांचा पुरस्कार केला. मानवी नीतीतत्त्वांच्या आचरणा बरोबर तो मानवी हक्कांचा विचार करीत होता. सत्यवर्तन, बंधुभाव, स्त्रीपुरुष समानता, दगडमूर्तींना देव न मानणे, पोकळ नामस्मरणाला विरोध, इतरांना त्रास न देणे, एकमेकास कमी न लेखणे, अधिकार, जागा योग्यता व पात्रतेने मिळवणे, वडीलधाऱ्यांचा मान ठेवणे, सत्य बोलणे व वागणे, व्यभिचाराला विरोध करणे, द्वेष, चोरी, व्यसने न करणे, कष्टकऱ्यांचा आदर राखणे, कोणताही व्यवसाय तुच्छ न मानणे, दुर्बलांना मदत करणे, कर्मकांड न करणे, ईश्वर एक असून तो निर्गुण निराकार मानून सर्व मनुष्य व प्राण्यांना त्याची लेकरे मानणे आणि ईश्वर व भक्त यात मध्यस्त नसणे इत्यादी गुणवैशिष्ट्यांवर त्यांचा सत्यधर्म उभा होता. त्यात धर्माच्या ऐहिक आणि आध्यात्मिक बाजुंचा विचार करण्यात आला होता आणि नवा भारतीय समाज या तत्त्वांवर उभा करावा अशी महात्मा फुल्यांची इच्छा होती. ''त्यांचे 'सार्वजनिक सत्यधर्म' हे सत्यशोधक समाजाचे बायबल आहे'' अशा शब्दात महर्षी शिंद्यांनी सत्य धर्मातील मानवी नैतिक व नागरी हक्कांना मान्यता दिली होती. धर्मसाधनेतून मानवी नैतिक मूल्यांचा पाठपुरावा करावा. न्याय्य हक्क प्राप्त करण्यासाठी नैतिक आचरण हा धर्माचा गाभा असून त्याच्या आचरणातून व्यक्तीचा विकास होतो हे सत्यधर्माचे प्रमुख सूत्र होते.

महात्मा फुल्यांना ख्रिस्ती धर्मातील 'तुम्ही आपल्या वैऱ्यावरही प्रीती करा व त्याचे बरे करा' हे तत्त्व मान्य होते. कुराणातला बंधुभाव त्यांना आकर्षित करणारा होता. गौतमबुद्ध, चार्वाक यांचे कार्य त्यांनी लक्षात घेतले होते. ब्राह्मणांनी तयार केलेल्या रामायण, महाभारत पुराणादी ग्रंथामुळे दुर्बलांचे शोषण होते, असे फुल्यांचे मत होते. समाजसुधारणा या कृतीशील परिवर्तनवादी असाव्यात व त्यांचा समाजातील उपेक्षित वर्गाच्या समग्र प्रगतीशी संबंध असावा. असा महात्मा फुल्यांचा आग्रह होता. त्यामुळेच समकालीन प्रार्थना व ब्राह्मो समाजाबद्दल त्यांना शंका वाटत होत्या. या संदर्भात ते म्हणतात, ''अज्ञानी, अतिशूद्रांच्या परिश्रमाच्या करपट्टीतून धूर्त आर्यभट ब्राह्मणांची मुले जेंव्हा शाळांनी विद्वान झाली, तेंव्हा त्यांच्या पूर्वजांनी बाह्यात्कारी धर्मासंबंधी परंतु आतून शुद्ध राजकीय रचलेल्या ब्रह्मगारुडावर केवळ झाकण घालण्याकरिता कपटाने सध्या आपला बचाव करण्यास्तव आपल्या डोळ्यावर कातडी ओढून मोठ्या धांदलीने त्यांनी ब्राह्मो

समाज व प्रार्थनासमाज उभारले आहेत. त्यांनी त्या समाजात एकंदर सर्व ख्रिस्ती धर्माचे उष्टे माष्टे चोरून छपून गोळा केले आणि त्यांनी आपल्या कल्पित ब्रह्माजींच्या पुढे डोळे झाकून बाकीच्या अज्ञानी शूद्रादी अतिशूद्रांच्या मनात पुन्हा एका तऱ्हेचा ब्रह्मघोळ करण्याची खटपट सुरू केली आहे.'' महात्मा फुल्यांची ही टीका रास्त स्वरूपाची होती. कारण ब्राह्मो समाज शहरात काम करणारा, उच्चभ्रू लोकांपुरता बंदिस्त व सर्वसामान्य लोकांपासून दूर राहून काम करीत होता. त्यांचा कारभार इंग्रजी भाषेतून चालत असल्याने जसा आर्यसमाज व सत्यशोधक समाज सर्वसामान्यांपर्यंत जावून पोहोचला. तसे ब्राह्मो व प्रार्थना समाजाला जमले नाही. म. फुल्यांना श्रमिक कष्टकरी शेतकरी, अस्पृश्य व स्त्रियांच्या प्रगतीची काळजी होती. महात्मा फुले कर्ते सुधारक व मूलगामी परिवर्तनवादी विचारवंत होते. महात्मा फुल्यांनी धर्मातील विषमता, अंधश्रद्धा दूर करीत विज्ञानदृष्टी व निव्वळ बुद्धिप्रामाण्याच्या आधारे सामाजिक परिवर्तनाचे प्रयोग केले. अस्पृश्यता निर्मूलन, स्त्री स्वातंत्र्य व शेतकरी कष्टकऱ्यांना न्याय देताना सामाजिक समता व समग्र विकासासाठी शिक्षण प्रसाराला प्राधान्य दिले.

**१.२.३.२ महात्मा जोतिबा फुल्यांचे सामाजिक समतेबद्दलचे विचार :**

सत्यशोधक समाज हा धर्म नसून ती सामाजिक समतेसाठी आग्रह धरणारी क्रांतीकारी चळवळ होती. महात्मा फुल्यांनी आर्थिक व सामाजिक समतेवर आधारीत सत्यशोधक समाजाची स्थापना केली. स्वातंत्र्यापेक्षाही खरतर समता महत्त्वाची असते असे त्यांचे आग्रही प्रतिपादन होते. यासाठी त्यांनी वेगवेगळ्या पुस्तकांमधून प्रचलीत शोषणपद्धती, ब्राह्मणशाही, सावकारी व खोतीपद्धतीवर प्रहार केले. यात सार्वजनिक सत्यधर्म, ब्राह्मणांचे कसब, शेतकऱ्यांचा आसूड, इशारा, सत्सार (अंक १ व २), गुलामगिरी, अखंडादी काव्यरचना इ. यासारख्या ग्रंथातून त्यांनी प्रस्थापित शोषण पद्धतीवर कठोर टीका करताना सामाजिक समतेचा पुरस्कार केला. ब्राह्मणपुरोहित वर्ग लोकांना कर्मकांडात अडकवतो व अज्ञानी समाजाचे शोषण करतो असे ते म्हणतात तर सावकार असे काही विचित्र हिशेब करतो की गरीब शेतकऱ्याचे कर्ज कधीच संपत नाही. या सर्व शोषणाविरुद्ध सत्यशोधक समाजाने विशेषतः महाराष्ट्रात समताधिष्ठीत क्रांती केली.

सामाजिक समतेचे विचार मांडताना भारतात विषमता व जातियता का तयार झाली याचा ऐतिहासिक आढावा महात्मा फुल्यांनी घेतला होता. एका विशिष्ट काळातील श्रमविभागणीतून जातिव्यवस्था निर्माण झाली असे ते म्हणतात. बाहेरून आलेल्या इराणी, तूराणी, आर्यांविरुद्ध एतद्देशिय स्थानिक लोकांनी कठोर असा संघर्ष केला. यात भारतातील मूळ निवासी लोक पराभूत झाले व आर्यांच्या भितीमुळे गावाच्या पूर्वेकडे सरकले किंवा दक्षिण भारतात गेले. यांना अस्पृश्य, अनार्य अशी नावे मिळाली. या समाजाचा पराभव झाल्याने आर्य संस्कृती या देशात सुरू झाली व त्यांनी ब्राह्मण, वैश्य, क्षत्रिय व शूद्र या सुरुवातीला कर्मावर आधारीत असणाऱ्या वर्णांना जातीच्या व जन्माच्या आधारावर बंदिस्त केले. त्यामुळे कृत्रीम पद्धतीने पण गुणांचा विचार न करता जातीवर आधारीत जाती व्यवस्था व विषमता तयार झाली असे म. फुल्यांचे मत होते.

महात्मा फुल्यांनी समाजपरिवर्तनात वर्ण व जाती संस्था नष्ट झाल्याशिवाय सामाजिक न्याय व समताधिष्ठीत समाज तयार होणार नाही हे ओळखले होते. 'ब्राह्मणांचे कसब' व 'गुलामगिरी' या ग्रंथातून त्यांनी जातिविषयक प्रश्नांना हात घातला. पुरुषसुक्तातील व मनुस्मृतीतील वर्ण व जातिविषयक प्रश्नांना हात घातला. पुरुषसुक्तातील व मनुस्मृतीतील वर्ण व जातिव्यवस्था निर्मितीचा ईश्वरी सिद्धांत महात्मा फुल्यांनी नाकारला आणि ऐतिहासिक विकासक्रमात उच्चवर्णीय, जातीय लोकांनी आपले राजकीय, आर्थिक व सामाजिक हक्क सुरक्षित ठेवण्यास वर्ण व जातीव्यवस्थाही ब्राह्मणांच्या कसबातून कशी तयार झाली ते सांगितले. त्यांची पद्धती ऐतिहासिक, विश्लेषण करणारी व शास्त्रीय स्वरुपाची होती. महात्मा फुल्यांच्या मते या देशातील मूळ संस्कृती ही द्राविडी व दस्यूंची होती. त्यात परिपूर्ण समता होती. कारण या संस्कृतीमध्ये जाती नव्हत्या. हे द्राविडी लोक शेती करीत. त्यावेळचे राजे प्रजाहितदक्ष होते पण आर्यांच्या आक्रमणानंतर आर्यांनी द्रविडांना गुलाम केले. त्यांचे शिक्षण बंद केले व भराभर ग्रंथ लिहून ही सर्व व्यवस्था ईश्वरनिर्मित आहे असा खोटा प्रचार सुरू केला. अशा रितीने ब्राह्मणांचे वर्चस्व असणारी, जाती, उपजातीवर आधारीत विषमता भारतात सुरू झाली. यावर उपाय म्हणून श्रमाचे व गुणवत्तेचे महत्व लक्षात घेऊन त्या मोबदल्यात वस्तुंचे वितरण सामाजिक कलह मिटवण्यास उपयोगी पडेल असे म. फुल्यांचे मत होते. या साऱ्या सामाजिक दोषांना सत्याचा ऱ्हास, निरक्षरता, सोईस्कर ढोंगीपणा कारणीभूत आहे असे त्यांचे मत होते.

महात्मा फुल्यांनी शेतकरी व कष्टकरी वर्गाला समाज परिवर्तनात केंद्रस्थानी मानले होते. सामाजिक समता व स्वातंत्र्य या संकल्पनांची व्यावहारिकता ही केवळ शेतकऱ्यांच्या क्रांतीतून शक्य होईल असे महात्मा फुल्यांचे मत होते. यासाठी सावकारी संकट, दुष्काळी संकट, अज्ञान व शोषणातून मुक्त होण्यासाठी महात्मा फुल्यांनी पुढील काही उपाय सुचवले. यात ते म्हणतात, ''सरकारने सर्व शेतकऱ्यास युरोपियन शेतकऱ्यासारखे विद्यादान देऊन त्यांना यंत्राद्वारे शेती करता येईपर्यंत तरी गाई बैल कापून खावू नयेत, म्हणजे शेतकऱ्यांना मशागतीस व खतासाठी त्यांचा वापर करता येईल. सरकारने डोंगर पर्वतावर पडलेले पाऊसाचे पाणी जमीनीची धूप करून नदीनाल्यांना वाहून जावू नये म्हणून जागोजागी ताली, बंधारे घालावेत. लष्करी शिपायांच्या मदतीने बंधाऱ्यांची कामे केल्यास शेतीला उन्हाळ्यातही पाणी मिळेल. विहिरीस पाणी राहून बागायती वाढेल. सरकारने शेतीची पाहणी करून विहिरींच्या जागा निश्चित कराव्यात. सरकारने इमारतीसाठी लाकडे न तोडण्याचा कायदा करावा. सरकारने शेळ्या मेंढ्यांच्या नवीन जाती तयार कराव्या डुक्कर व इतर जनावरांपासून होणाऱ्या नुकसानीपासून शेतमालाचे रक्षण करण्यास शेतकऱ्यांना बंदुकी द्याव्यात अथवा हे काम पोलीसांनी करावे, पोलीसांनी नीट काम न केल्यास त्यांच्या पगारापासून नुकसान भरपाई करावी. उत्तम शेतकऱ्यास सरकारने बक्षिसे द्यावीत. शेतकऱ्यांच्या मुलांना लोहारी, सुतारी काम शिकवून परदेशात शेतकी शाळा पाहण्यास पाठवावे. मुरळ्या, कसबिणी, कोल्हाटिणी व तमासगीर यांनी गाणी गाऊ नयेत म्हणून सरकारने लक्ष घालावे म्हणजे शेतकऱ्याची नीतीमत्ता व प्रकृती व्यवस्थित राहिल. शेतकऱ्याकडून व समाजाकडून गोळा होणारा सारा व कराचा उपयोग शेतकऱ्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी व्हावा.''

महात्मा फुल्यांनी सामाजिक समतेचा व्यापक अर्थाने विचार केला. केवळ जाती विषमता दूर करून या देशात समता येणार नाही याचे भान त्यांना होते म्हणून श्रमजीवी शेतकऱ्यांना योग्य न्याय, अस्पृश्यता

निर्मूलन, विवेकवादाचा स्वीकार व यासाठी आधुनिक शेती, पारंपरिक संकुचित धर्माला विरोध आणि शिक्षणाचे सार्वत्रीकरण यावर त्यांनी भर दिला. हे सर्व प्रश्न एकमेकात अडकलेले असल्याने त्यांनी केवळ साम्यवादाप्रमाणे आर्थिक समतेचा पुरस्कार न करता व्यापक सामाजिक समतेचा विचार मांडला. श्रमाचे महत्व, सत्यशोधन, शिक्षण व नैतिक बुद्धिप्रामाण्यतेवर महात्मा फुल्यांचा समतेचा विचार उभा होता. ज्या समकाळात इतर समाजसुधारणा चळवळी धर्म चिकित्सेमध्ये गुंतल्या होत्या त्या काळात म. फुल्यांनी मूलगामी समाजसुधारणांना हात घालून भारतीय राजकीय सुधारणांचा रस्ता अधिक व्यापक व सूकर केला.

सर्वस्वी कंगाल झालेल्या शेतकऱ्याचे प्रश्न सोडवण्यासाठी ब्रिटिश सरकार पुढाकार घेत नसल्याचेही म. फुल्यांच्या लक्षात आले होते. त्यावेळी न्या. रानडेंच्या सार्वजनिक सभेच्या माध्यमातून त्यांनी शेतकऱ्यांच्या शोषणाचे दुष्काळ व सावकारीचे प्रश्न मांडण्यास सुरुवात केली होती. त्यांच्या चिकित्सक विचारामुळेच पुढे दीनबंधुकार भालेकर यांनी शेतकरी चळवळ तर रावबहादूर नारायण मेघाजी लोखंडे यांनी कामगार चळवळीची सुरुवात केली. भारतीय साम्यवादी व समाजवादाची काही पाळेमूळे आपणास फुल्यांच्या विचारात दिसून येतात.

**१.२.३.३ महात्मा जोतिबा फुल्यांचे प्रबोधनात्मक विचार–**

महात्मा फुले हे समकालीन समाजसुधारकांपेक्षा बरेच पुढे गेलेले समाजधुरिण होते. त्यांनी सत्यशोधक समाज चळवळीच्या माध्यमातून शेतकरी, कामगार, अस्पृश्य व स्त्रियांच्या संघटना बांधून सामाजिक क्रांती व परिवर्तनाचा विचार मांडला. या सर्वांना शिक्षण देताना त्यांनी अंधश्रद्धा व जुनाट परंपरांना विरोध करत आधुनिक महाराष्ट्राची समतोल व समताधिष्ठीत मांडणी केली.

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या नेतृत्वाखाली भारताला त्वरीत स्वातंत्र्य मिळाले तर ते स्वातंत्र्य व त्या स्वातंत्र्याचे प्रत्यक्ष फायदे कोणाला मिळतील, याबद्दलचे सखोल चिंतन महात्मा फुल्यांनी केले होते. त्यांच्या मते सर्वसामान्य माणूस हा अजूनही दारिद्र्य, निरक्षरता, अंधश्रद्धा, कर्मकांड व सार्वत्रिक स्वरुपाच्या मागासलेपणात अडकलेला आहे. त्याला लोकशाही, शासन व्यवस्था, स्वातंत्र्य याची कसलीही माहिती नाही. त्याच्या राजकीय जाणिवा पारंपरिक, संकुचित असून रोजचे जीवन कसे जगावे हा त्याचा प्रश्न असल्याने त्याला तूर्तास राजकीय स्वातंत्र्याची कसलीही गरज नाही. महात्मा फुल्यांनी राजकीय सुधारणेच्या अगोदर सामाजिक सुधारणेतून तयार होणाऱ्या संभाव्य सक्षम समाजाला महत्व दिले. महात्मा फुल्यांना असे वाटत होते की, जर भारताला त्वरीत राजकीय स्वातंत्र्य मिळाले तर ते फक्त वरिष्ठ, प्रस्थापित, मूठभर समाजापुरते असेल आणि पुन्हा हा उच्चभ्रूवर्ग सर्वसामान्य मागास समाजाचे शोषण करेल.

म्हणूनच महात्मा फुल्यांनी सामाजिक स्वातंत्र्य व सुधारणेला महत्व दिले. शोषण करणाऱ्या भारतीय प्रस्थापित वर्गापेक्षा मग तूर्तास ब्रिटिश बरे असे त्यांचे मत होते. किमान ब्रिटिशांच्या काळात कायदा सुव्यवस्था, न्याय व तांत्रिक संपर्क साधने व सुधारणा झाल्याने त्यांनी ब्रिटिश राजवटीला पाठिंबा दिला असला तरी म. फुले काही ब्रिटिशधार्जिणे नव्हते. विशेषतः हंटर कमिशनचा रिपोर्ट वाचताना ब्रिटिशांना

शिक्षणाच्या सार्वत्रिकरणाबद्दल त्यांनी ज्या सूचना केल्यात त्यात भारतीय समाजाच्या समग्र प्रगतीची काळजी महात्मा फुल्यांच्या प्रत्येक विचारात व कृतीमध्ये दिसून येते.

शेतकरी चळवळ, अस्पृश्यांच्या चळवळी, कामगार चळवळ व स्त्री स्वातंत्र्याचे विचार मांडून त्यांनी व्यापक स्वरुपात स्वतःच्या मूलभूत हक्कांसाठी लोकांमध्ये राजकीय जाणिवा तयार केल्या. धार्मिक सुधारणावादाच्या पुढे जावून बहुजन समाजात राजकीय सुधारणावादाची पार्श्वभूमी तयार करण्यात महात्मा फुल्यांचा वाटा महत्वाचा होता.

१८७३ मध्ये महात्मा फुल्यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. सत्यशोधक समाज हा सत्य शोधणारा समाज होता. जगाच्या निर्मिकाचा शोध सत्याच्या आधारे लावावा, अशी महात्मा फुल्यांची श्रद्धा होती. विकृत धर्म हा सामाजिक, आर्थिक व मानसिक शोषणास जबाबदार आहे असे त्यांचे मत होते. सत्यशोधक समाज पारलौकिकतेपेक्षा सामाजिक सुधारणेवर भर देत होता. महात्मा फुल्यांनी प्रचलित धर्म नाकारला तरी ते नास्तिक मात्र नव्हते. सत्यशोधन ही अनादीकाळापासून चालत आलेली प्रक्रिया आहे. असे त्यांचे मत होते. यासाठी सत्यशोधनाचे निकष कोणते यावर सत्य सापेक्ष वा निरपेक्ष आहे असे ठरते, असे ते म्हणत. महात्मा फुल्यांनी बुद्धी, भावना व अंतःस्फूर्ती या निकषात सत्यशोधनासाठी बुद्धिला महत्व दिले. धर्माचा वापर करताना निर्मिकाचे अस्तित्व मान्य करुनही महात्मा फुल्यांनी पूजा, नामस्मरण, जप, अनुष्ठान इत्यादी कर्मकांडाला विरोध केला. श्रमाचे महत्व लक्षात घेऊन निर्मिकाचा शोध घेण्यापेक्षा त्याने दिलेल्या वस्तुंचा वापर समतेच्या संदर्भात करावा व श्रमिकांना योग्य मोबदला मिळावा असे ते म्हणत. निर्मिकाने इतक्या प्रचंड स्वरुपात निसर्गसंपत्ती तयार केली असताना सामाजिक असंतोषाचे कारण सत्याच्या ऱ्हासात, मानवी स्वार्थात व आर्य भटांनी तयार केलेल्या सोईस्कर शोषण व्यवस्थेत आहे असे ते म्हणत. यासाठी त्यांनी संघर्ष केला. सर्व मानवाचे कल्याण करणारा धर्म कोणता? हे शोधताना त्यांनी 'सार्वजनिक सत्यधर्माची' कल्पना मांडली.

महात्मा फुल्यांच्या मूलगामी समाजसुधारणेबद्दल व त्यांच्या सेवाभावी तळमळीबद्दल लिहिताना महर्षी शिंदे म्हणतात, ''महात्मा फुले सत्याचा पालनवाला, पतितांचा पालनवाला, जनतेचा जागा शेर, कर्माची खडी तलवार, दीनदुबळ्यांचा कैवारी आणि कणखर चालीचा सत्यव्रती, असामान्य पुरुष होता.'' महात्मा फुल्यांना गरीबाबद्दल कळकळ, सद्धर्माबद्दल आपुलकी, विवेकनिष्ठ धर्मप्रेरणा व नैतिक सामाजिक व्यवहाराबद्दल जिव्हाळा होता. शिक्षणाचे सार्वत्रीकरण, अस्पृश्यता निवारण, स्त्री स्वातंत्र्य, सामाजिक समता, न्याय, शेतकरी कष्टकऱ्यांना योग्य मोबदला व विवेकी नैतिक मानवता धर्माचा पुरस्कार यामुळे महाराष्ट्रातील आद्य समाजसुधारक म्हणून महात्मा फुल्यांच्या प्रबोधन कार्याला अनन्यसाधारण महत्वआहे.

## १.३ सारांश

भारतीय प्रबोधनाची सुरुवात फार प्राचीन काळापासून झाली असली तरी शिस्तबद्ध व रचनात्मक प्रबोधन हे १९ व्या शतकाच्या सुरुवातीला सुरू झाल्याचे मानले जाते. राजा राममोहन रॉय यांनी ब्राह्मो समाजाच्या माध्यमातून धर्मसुधारणेबरोबर समाजसुधारणेला सुरुवात केली. त्यामुळे राजा राममोहन रॉय यांना

आद्य समाजसुधारक मानले जाते. ख्रिस्ती धर्माच्या वाढत्या प्रभावातून हिंदू धर्म व संस्कृतीचे रक्षण करण्यासाठी हिंदू धर्म शुद्धीकरणास त्यांनी सुरुवात केली. यासाठी हिंदू धर्मातील पारंपरिक, संकुचित प्रथा, परंपरा, अंधश्रद्धा व कर्मकांडाला त्यांनी विरोध केला व त्या ऐवजी श्रद्धा, सेवा, प्रेम, त्याग, स्वातंत्र्य, चैतन्य व बुद्धिप्रामाण्यतेच्या आधारावर ब्राह्मो समाजाची बंगालमध्ये स्थापना केली.

या काळात ब्रिटिशांनीही भारतीय प्रबोधनाला कळत नकळत सहकार्य केले. इंग्रजी शाळा, रेल्वे, टपाल सेवा, न्याय व्यवस्था, मजबूत कायदे यामुळे भारतीय समाज एकसंध होऊ लागला व त्यात नव्या जाणिवा तयार होऊ लागल्या. या समकाळात परमहंस सभा, सार्वजनिक सभा इत्यादींनी प्रबोधनाचे काम केले. दर्पण, प्रभाकर, सुबोधपत्रिका यासारख्या वृत्तपत्रांनी तर शेठ मलबारी सारख्या पारसी धनवान लोकांनी प्रबोधनाला हातभार लावला. राजा राममोहन रॉय यांनी धर्मसुधारणेबरोबर सतीच्या चालीला विरोध करताना विधवा विवाहाला चालना दिली. शिक्षणप्रसाराला महत्व देऊन प्रबोधनाचा पाया मजबूत केला.

या काळात स्वामी दयानंद सरस्वती यांनी आर्य समाजाची स्थापना करून समाजप्रबोधनाला व्यापक व्यासपीठ मिळवून दिले. वेदांचा अभ्यास, वेदांचा प्रसार यावर भर देताना वेदप्रामाण्यवादी असणाऱ्या आर्य समाजाने अस्पृश्यता निवारण, स्त्रीयांना स्वातंत्र्य व प्रभावी लोकसंग्रहाला प्राधान्य दिले. विशेषतः पंजाबमध्ये आर्य समाजाने मोठे काम केले. हिंदू राष्ट्रवादाची व प्रखर अध्यात्मतेची भारतात खऱ्या अर्थाने सुरुवात आर्य समाजाने केली. या समाजाला मोठ्या प्रमाणात राजाश्रय मिळाल्याने हा समाज सर्वसामान्य व्यक्तीपर्यंत वेगाने पसरला. 'सतत कर्म करीत राहा' हा दयानंदांचा संदेश होता. जगातील सर्व मूलभूत ज्ञान व मानवी जीवनातील प्रश्नांची उत्तरे वेदामध्ये आहेत, असे त्यांचे ठाम मत होते. स्वतःमधील धाडसी प्रवृत्तीमुळे आर्य समाजाला अधिक यश आले.

१९ व्या शतकातील प्रबोधन करणारी सर्वात महत्वाची चळवळ म्हणजे सत्यशोधक समाज होय. महात्मा फुल्यांनी या सत्यशोधक समाजातून अस्पृश्यता निर्मूलन, स्त्री स्वातंत्र्य, शेतकरी कामगारांना न्याय, शिक्षणप्रसार व धार्मिक अंधश्रद्धांना विरोध करताना बुद्धिप्रामाण्यवादी पुरोगामी समाज तयार करण्यावर भर दिला. गुलामगिरी, ब्राह्मणाचे कसब यासारख्या ग्रंथातून त्यांनी ब्राह्मणवर्गाच्या धार्मिक कर्मकांडाला व होणाऱ्या शोषणाला विरोध केला. जगामध्ये एकच धर्म महत्वाचा असून त्याला महात्मा फुल्यांनी 'सत्यधर्म' असे नाव दिले. सत्याचा शोध, नैतिकता, समाजसेवा, विवेकवाद, सामाजिक समता, शिक्षण श्रमाला महत्व देताना त्यांनी धर्मसुधारणेपेक्षा समाजसुधारणेला महत्व दिले. विशेषतः महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा पाया घालताना सर्व प्रकारच्या शोषणाविरुद्ध क्रांती करणारे महात्मा फुले परिवर्तनवादी कर्ते सुधारक होते

## १.४ महत्वाच्या पारिभाषिक संकल्पना

- **राष्ट्रवादी विचार** – राष्ट्राबद्दल आत्मीयता, प्रेम, आदर, निष्ठा असणारा विचार
- **वेदप्रामाण्यवाद** – वेदांना अंतिम, प्रमाण मानणे.
- **प्रबोधन** – सुधारणा, नवा विचार

- **बुद्धिप्रामाण्यता** – बुद्धिवर, विवेकावर भर देणारा
- **द्वैत** – परमेश्वर वेगळा व आपण वेगळे
- **अद्वैत** – परमेश्वर व आपण सर्व एकच आहोत.
- **एकेश्वरवाद** – ईश्वर एकच आहे.
- **केशवपन** – नवरा मेल्यावर पूर्वी स्त्रिया डोक्याचे सर्व केस कापत
- **सहिष्णुता** – उदारमतवादीव मानवतावादी तथा परस्परांना समजून घेणारा विचार
- **नेमस्त** – मवाळ, समन्वय साधणारे लोक
- **निर्मिक** – निर्माण करणारा म्हणजेच परमेश्वर देव निर्माता
- **सनातनी** – जुनाट, कर्मठ, पारंपरिक
- **ऐहिक** – संसारात वस्तुरुप असणारे सांसारिक, भौतिक
- **अनुनय** – पाठराखण, भलावण
- **सेंद्रिय विचार** – सर्व घटक एकमेकाशी संलग्न आहेत असे मानणे.
- **अखंड** – अभंगासारखा काव्यप्रकार म. फुल्यांनी तो लिहिला.
- **दस्यू** – गुलाम, दास
- **दीनबंधू** – वृत्तपत्राचे नाव / दीन म्हणजे गरीब

## १.५ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न व त्याची वस्तुनिष्ठ उत्तरे

१. भारतीय प्रबोधनाची सुरुवात केंव्हा झाली? असे मानतात.

२. ब्राह्मोसमाजाची प्रमुख तत्वे कोणती?

३. परमहंस सभा बंद का झाली?

४. आर्य समाजाची प्रमुख तत्वे कोणती?

५. आर्य समाजाची प्रमुख मर्यादा कोणती?

६. एकोणिसाव्या शतकात कोणत्या प्रमुख वृत्तपत्रांनी प्रबोधनाचे काम केले?

८. भारतीय प्रबोधनातील अडथळे कोणते? सांगा.

९. ब्रिटिशांनी कोणत्या सुधारणा केल्या? स्पष्ट करा.

१०. म. फुल्यांचा जन्म कोठे झाला?

११. आर्य समाजाचा प्रमुख ग्रंथ कोणता?

१२. म. फुल्यांच्या ग्रंथाची नावे सांगा.

१३. म. फुल्यांच्या सत्यशोधक समाजाची तत्वे कोणती?

१४. म. फुल्यांनी कोणत्या वर्गासाठी काम केले.

**प्रश्नांची उत्तरे**

१. भारतीय प्रबोधनाची सुरुवात ब्राह्मो समाजापासून म्हणजे राजा राममोहन रॉय यांच्यापासून झाली.

२. श्रद्धा, सेवा, प्रेम, त्याग, स्वातंत्र्य, बुद्धिप्रामाण्यता ही ब्राह्मो समाजाची प्रमुख तत्वे होती.

३. परमहंस सभेत समाजसुधारणेवर गुप्त चर्चा होई. लोकांना या गुप्तपणाचा संशय आल्याने लोकांनी परमहंस सभेचे कामकाज बंद पाडले.

४. वेदप्रामाण्यता, अस्पृश्यता निवारण, स्त्री स्वातंत्र्य व लोकसंग्रह यावर आर्य समाज उभा होता. तो हिंदुत्ववादी होता. पण प्रबोधनकारी होता.

५. वेदांच्या पलीकडे सत्य शोधण्याचा आर्य समाजाने प्रयत्न केला नाही. त्यामुळे तो त्या कोषातच अडकला ही त्याची मर्यादा होती.

६. दर्पण, प्रभाकर, सुबोधपत्रिका, बडोदावत्सल, दीनबंधु या वृत्तपत्रांनी प्रबोधन केले.

८. भारतीय प्रबोधनापुढील प्रमुख समस्या म्हणजे धार्मिक अंधश्रद्धा, कर्मकांड व उपासनेत अडकलेला मागास, निरक्षर, दरिद्री, जातीय समाज, शिक्षणाचा, तंत्रज्ञानाचा, संपर्काचा अभाव

९. ब्रिटिशांनी भारतात रेल्वे, इंग्रजी संपर्क भाषा, शाळा, टपाल सेवा छापखाने, न्याय, कायदा व सुव्यवस्था यातून प्रबोधन केले.

१०. म. फुल्यांचा जन्म पुणे जिल्ह्यातील पुरंदर तालुक्यात खानवडी येथे झाला.

११. आर्य समाजाचा प्रमुख ग्रंथ 'सत्यार्थ प्रकाश' होता.

१२. म. फुल्यांनी 'गुलामगिरी', 'ब्राह्मणाचे कसब', 'सत्सार', 'सार्वजनिक' सत्यधर्म इ. ग्रंथ अखंड हा काव्य प्रकार व शिवाजीचा पोवाडा लिहिला.

१३. निर्मिक एकच असून आपण त्याची लेकरे आहोत. सदाचार, सदवर्तन नैतिकता, विवेक, समाजसेवा, शुद्ध आचरण ही त्यांची तत्वे होती असे म. फुले म्हणतात.

१४. म. फुल्यांनी बहुजन समाज, शुद्रातिशूद्र, शेतकरी कामगार व स्त्रियांसाठी काम केले.

## १.६ सरावासाठी स्वाध्याय

१. भारतीय प्रबोधनात ब्राह्मो समाजाचे योगदान स्पष्ट करा.

२. आर्य समाजाला भारतभर लोकमान्यता मिळाली यामागील कारणांचा परामर्श घ्या.

३. सत्यशोधक समाजावर निबंध लिहा.

४. सत्य धर्मातील फुल्यांनी सांगितलेली तत्त्वे भारतीय लोकशाही व मूलभूत हक्कांना प्रेरक होती, स्पष्ट करा.

५. भारतीय प्रबोधनाचा आढावा घेऊन भारतीय प्रबोधनाच्या मर्यादा सांगा.

## १.७ संदर्भ ग्रंथ


१. भास्कर लक्ष्मण भोळे - आधुनिक भारतीय राजकीय विचार

२. नलिनी पंडित - महाराष्ट्रातील राष्ट्रवादाचा विकास

३. पाध्ये, टिकेकर - आजकालचा महाराष्ट्र

४. गोवर्धन पारिख - भारतीय राष्ट्रवादाचे शिल्पकार

५. पाटील बी. बी. - भारतीय राजकीय विचार


❑❑❑

## घटक २
# उदारमतवादी राजकीय विचार
(Liberal Political Ideas)

२.० उदिदष्टे

२.१ प्रस्तावना

२.२ विषय विवेचन

२.२.१ दादाभाई नौरोजी

२.२.१.१ जीवनपरिचय

२.२.१.२ राजकीय उदारमतवाद

२.२.१.३ दादाभाई नौरोजी यांचे आर्थिक विचार

२.२.१.४ आर्थिक निःसरणाचा सिद्धांत/लुटीचा सिद्धांत (Drain Theory)

२.२.१.५ दादाभाई नौरोजी यांचे समाजवादी विचार

२.२.१.६ दादाभाईचे स्वातंत्र्य आंदोलनातील योगदान

२.२.१.७ दादाभाई नौरोजी यांच्या विचारांचे मूल्यमापन

२.२.१.८ सारांश

२.२.२ न्यायमुर्ती एम.जी. रानडे

२.२.२.१ जीवनपरिचय

२.२.२.२ न्या. रानडे यांचे राजकीय विचार

२.२.२.३ न्या. रानडे यांचे सामाजिक विचार

२.२.२.४ न्या. रानडे यांचा राजकीय उदारमतवाद

२.२.२.५ न्या. रानडे यांचे आर्थिक विचार

२.२.२.६ न्या. रानडे यांचे हिंदी राष्ट्रवादविषयक विचार

२.२.२.७ न्या. रानडे यांच्या विचारांचे मूल्यमापन

२.२.२.८ सारांश

२.२.३ जी. के. गोखले

२.२.३.१ जीवनपरिचय

२.२.३.२ ना. गोखलेंचे राजकीय विचार

२.२.३.३ ना. गोखलेंचे स्वदेशीसंबंधी विचार

२.२.३.४ ना. गोखलेंचे आर्थिक विचार

२.२.३.५ ना. गोखलेंचे शासनविषयक विचार

२.२.३.६ ना. गोखलेंचे शिक्षणविषयक विचार

२.२.३.७ ना. गोखले यांच्या विचारांचे मूल्यमापन

२.२.३.८ सारांश

२.३ सारांश

२.४ पारिभाषिक शब्द

२.५ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

२.६ सरावासाठी प्रश्न

२.७ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके

## २.० उद्दिष्टे :

सदर घटकांच्या अभ्यासानंतर आपणास खालील गोष्टींची माहिती होईल.

- दादाभाई नौरोजी यांच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण कशी झाली हे समजून घेता येईल.
- दादाभाई नौरोजी यांचे राजकीय विचार व उदारमतवादी दृष्टिकोन समजून घेता येईल.
- दादाभाई नौरोजी यांचे आर्थिक विचार समजून घेता येतील.
- दादाभाई नौरोजी यांचे स्वातंत्र्य आंदोलनातील योगदान व भूमिका समजून घेता येईल.
- दादाभाई नौरोजींची ब्रिटिश शासनसंबंधीची भूमिका समजावून घेता येईल.
- न्या. रानडे यांच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण कशी झाली हे समजून घेता येईल.
- न्या. रानडे यांचे सामाजिक विचार समजून घेता येईल.
- न्या. रानडे यांचे राजकीय विचार समजून घेता येईल.
- न्या. रानडे यांचा राजकीय उदारमतवाद जाणून घेता येईल.
- न्या. रानडे यांचे आर्थिक विचार समजून घेता येईल.

- न्या. रानडे यांचा हिंदी राष्ट्रवाद समजून घेता येईल.
- जी. के. गोखले यांच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण समजून घेता येईल.
- जी. के. गोखले यांचे राजकीय विचार समजून घेता येतील.
- जी. के. गोखले यांचे आर्थिक विचार समजून घेता येतील.
- जी. के. गोखले यांची शासनविषयक भूमिका समजून घेता येतील.
- जी. के. गोखले यांचे शिक्षणविषयक विचार समजून घेता येतील.

## २.१ प्रस्तावना :-

इ.स. १६०० साली भारतात ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना झाली. कंपनीची सत्ता काहीकाळ चालली. १८५७ च्या उठावानंतर कंपनीचे राज्य बरखास्त झाले. कंपनीची सत्ता संपुष्टात येऊन भारतात ब्रिटिश राज्य आले. ब्रिटिश राजवटीचे अनेक चांगले वाईट परिणाम देशावर घडून आले. यामध्ये प्रामुख्याने राजकीय, सामाजिक परिणामांचा समावेश होतो.

ब्रिटिश भारतात आले तेव्हा देशात लहान-लहान संस्थाने, राज्ये देशभर विखुरलेली होती. त्यांच्यात परस्परांमध्ये सत्तासंघर्ष सुरू होता. ब्रिटिशांच्या आगमनानंतर देश प्रथमच एका मध्यवर्ती सत्तेच्या प्रभावाखाली आला. ब्रिटिशांनी संपूर्ण देशभर एक समान अशी प्रशासन यंत्रणा उभी केल्याने तसेच प्रांतांना जोडणाऱ्या रस्ते व रेल्वे या दळणवळणाच्या जाळ्यामुळे देश एका एकछत्री अंमलाखाली आला.

ब्रिटिश साम्राज्यशाहीचे आर्थिक परिणाम अभ्यासताना असे लक्षात येते की, ब्रिटिशांचे आर्थिक धोरण या देशाच्या अर्थव्यवस्थेचे उध्वस्तीकरण करणारे ठरले. त्यांच्या आर्थिक धोरणामुळे भारतातील व्यापार व उदयोगधंदे बुडाले. ग्रामीण अर्थव्यवस्था मोडीत निघाली. नव्या महसुल पध्दतीमुळे शेतसाऱ्याच्या ओझ्याखाली शेतकरी भरडले जाऊ लागले. व्यापारी मक्तेदारीमुळे भारतातील उदयोग ठप्प होऊन कारागीर देशोधडीला लागले.

मात्र पाश्चात्य शिक्षणाने देशात सामाजिक-राजकीय सुधारणांचे वारे वाहू लागले. पाश्चात्य शिक्षणाने जागृत झालेला वर्ग आत्मशोधन करू लागला. हिंदू धर्मात आणि समाजात असणारी वैगुण्ये तसेच गुलामगिरीचे अनुभव यांची तो मीमांसा करू लागला. त्यातून इंग्रजी राजवटीत मोठया प्रमाणावर सामाजिक स्थित्यंतरे घडून आली. अंधश्रध्दा, शब्दप्रामाण्य, रूढी, परंपरा या गोष्टी मागे पडून बुद्धीप्रामाण्याच्या कसोटीवर प्रत्येक गोष्ट तपासली जाऊ लागली. ब्राम्होसमाज, आर्यसमाज, प्रार्थना समाज, सत्यशोधक समाज इ. संस्थांची स्थापना होऊन त्यांनी नवी मूल्ये समाजात रूजविण्याचा संघटित प्रयत्न केला. तो कालखंड प्रबोधनाचा कालखंड म्हणून ओळखला जाऊ लागला.

प्रामुख्याने १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात सामाजिक प्रबोधनाची चळवळ विकसित झाली. त्यातील एक प्रवाह सामाजिक-धार्मिक क्षेत्रात बदल घडवू इच्छित होता तर दुसरा प्रवाह राजकीय क्षेत्रांशी संबंधित

होता. राजकीय क्षेत्रातील एका प्रवाहातून जहाल राष्ट्रवाद व सांस्कृतिक राष्ट्रवादाची निर्मिती झाली तर दुसरा प्रवाह हा नेमस्त व उदारमतवादी विचारांचा पुरस्कार करणारा होता. या दुसऱ्या प्रवाहातील विचारांमध्ये दादाभाई नौरोजी, न्या. रानडे, जी. के. गोखले यांचा समावेश होतो.

थोडक्यात ब्रिटिश राज्यकर्त्यांचा सहवास, इंग्रजी शिक्षण, वर्तमानपत्रे इ. द्वारे पाश्चात्य इतिहास व संस्कृतीचा परिचय येथील लोकांना झाला. यातून भारतामध्ये आधुनिक राजकीय विचारांचा जन्म झाला. राजा राममोहन रॉय, दादाभाई नौरोजी, न्या. रानडे, महात्मा फुले, जी.के. गोखले इ. पासून लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, पंडित नेहरू, डॉ. आंबेडकर पर्यंत अनेक विचारवंतांनी आधुनिक भारतीय राजकीय विचारात मोलाची भर घातली आहे.

### २.२.१ दादाभाई नौरोजी :–

दादाभाई नौरोजी हे नेमस्त व उदारमतवादी नेते म्हणून प्रामुख्याने ओळखले जातात. सनदशीर राजकारणाचे ते खंदे पुरस्कर्ते होते. 'भारताचे पितामह' म्हणून ही त्यांना ओळखले जाते. आपले संपूर्ण जीवन त्यांनी मानवता व देशसेवेसाठी अर्पण केले. चारित्र्य संपन्नता, कुशलता, क्रियाशीलता, असामान्य ज्ञान इ. वैशिष्टयांनी युक्त असे त्यांचे व्यक्तिमत्व होते.

#### २.२.१.१ जीवनपरिचय :–

दादाभाई नौरोजी यांचा जन्म मुंबईच्या बहारकोट भागात ४ सप्टेंबर १८२५ रोजी झाला. त्यांचे वडील उपाध्येगिरी करत. त्यामुळे त्यांच्या घरची परिस्थिती बेताचीच होती. दादाभाई चार वर्षांचे असताना त्यांच्या वडीलांचे निधन झाले. त्यामुळे दादाभाईंची संपूर्ण जबाबदारी त्यांच्या मातोश्री माणकाबाई यांच्यावर पडली व त्यांनी अतिशय सक्षमपणे ती जबाबदारी पार पाडली. दादाभाईंच्या कार्यात आणि व्यक्तिमत्वाच्या जडणघडणीत त्यांच्या आईंचा फार मोठा वाटा होता. परिस्थिती अत्यंत हालाखीची असतानाही त्यांच्या आईने त्यांना शाळेत पाठविण्याचा निर्णय घेतला. सुरुवातीला दादाभाईंना मुंबईच्या नेटिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या शाळेत दाखल केले. शाळेतील मोफत शिक्षणाचा दादाभाईंना फायदा झाला. या काळात शैक्षणिक संधी व शैक्षणिक कार्याचे महत्व त्यांना पटले. त्यामुळे भावी आयुष्यात त्यांनी मोफत शिक्षणाचा पुरस्कार केला. शालेय शिक्षण सुरू असतानाच बाळ गंगाधर शास्त्रींनी एकदा त्यांच्या शाळेत भेट दिली. त्यांना एल्फिन्स्टन इन्स्टिट्युटसाठी काही हुशार विद्यार्थ्यांची गरज होती. दादाभाईंची कुशाग्रता पाहून त्यांनी त्यांची निवड केली. तिथूनच पुढे त्यांच्या सर्वागींण व्यक्तित्वाला बहर आला. क्रमिक पुस्तकांबरोबर अनेक ग्रंथांचे अध्ययनही त्यांनी केले होते. त्यामुळेच त्यांच्या एकुणच मन, बुध्दिचा सर्वांगिण विकास साधला गेला.

सन १८४५ साली दादाभाईंचे महाविद्यालयीन शिक्षण सुरू असताना त्यांच्या बुद्धी वैभवामुळे त्यांच्यावर जे अनेक लोक लोभ करीत, त्यांच्यापैकी अर्स्किन पेरी नावाचे एक गृहस्थ होत. ते बोर्ड ऑफ डायरेक्टरर्सचे अध्यक्ष होते. एवढा हुशार विद्यार्थी परंतु आत्यंतिक गरिबीमुळे योग्य संधी मिळणार नाही; म्हणून बॅरिस्टरच्या परिक्षेसाठी जर विलायतेला जाण्याची तयारी दादाभाईंनी दाखविली तर स्वत: यासाठीचा निम्मा खर्च

करण्याची तयारी त्यांनी दाखविली होती परंतु ही योजना मध्येच बारगळली. कारण परदेशी जाणे म्हणजे अभक्ष्यभक्षण, मदिरापान करणे, धर्म-नीती सोडून अनितीने वागणे असे पारशी समाजातील पुढाऱ्यांचे म्हणणे पडले.

१८४७ साली त्यांनी नेटिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या शाळेत शिक्षकाची नोकरी स्वीकारली शाळेच्या कामाव्यतिरिक्त काही प्रमाणात समाजकार्य करताना त्यांनी स्त्री शिक्षणासाठी ही प्रयत्न केले. तसेच वाङ्मय व विज्ञान यावर चर्चा करणाऱ्या मंडळाचीही स्थापना केली. गणित हा त्यांचा अत्यंत आवडीचा विषय होता. त्यामुळे लवकरच त्यांची गणिताचे प्राध्यापक म्हणुन नियुक्ती झाली. त्यानंतर दोनच वर्षानी ते गणिताचे प्रोफेसर झाले. गणित हा त्यांच्या व्यक्तित्वाचा एक अविभाज्य भाग होता. त्यांचे एकंदरीत वर्तन, युक्तीवाद, निष्कर्ष व विवेचन पध्दती राजकीय शैली व राजकीय चळवळ यातून त्याचा प्रत्यय येतो. आपला आर्थिक शोषणाचा सिध्दांत मांडताना त्यांनी याच पध्दतीचा अवलंब केला होता.

१९ व्या शतकात मुंबईमध्ये स्त्री शिक्षणाचे कार्य करणारी गुजराती समाजाची 'ज्ञान प्रसारक मंडळ' ही संस्था होती. दादाभाई या संस्थेचे अध्यक्ष होते. या संस्थेमुळे ठिकठिकाणी मुलींच्या शाळा निघाल्या. सरकारी नोकरी करताना दादाभाईच्या मनामध्ये राजकारणाविषयी आकर्षण निर्माण झाले. ईस्ट इंडिया कंपनीच्या कारभाराचे वास्तव दर्शन भारतीय जनतेला करून देणे व आपली बाजू ब्रिटिश सरकार समोर मांडण्यासाठी १८५२ साली त्यांनी 'बॉम्बे असोसिएशन' नावाची संस्था स्थापन केली. १८५५ साली त्यांनी आपली नोकरी सोडली एका कंपनीत भागीदार बनून व्यवसायनिमित्त ते इंग्लंडला रवाना झाले. त्यानंतर परदेशातील तीन वर्षाच्या वास्तव्यानंतर ते भारतात परत आले. त्यानंतर स्वत:च्या व्यवसायानिमित्त काही काळ ते इंग्लंडमध्ये वास्तव्यास होते. त्यावेळी संधी प्राप्त होताच वेळोवेळी त्यांनी ब्रिटिश शासन व ब्रिटिश जनतेसमोर भारतीयांची बाजू मांडली. १८७६ मध्ये भारताच्या आर्थिक परिस्थितीबाबत त्यांनी ब्रिटिश पार्लमेंट समोर साक्ष दिली. इंग्लंडमध्ये त्यांनी ईस्ट इंडिया असोसिएशनची स्थापना केली होती.

१८७५ मध्ये मुंबई महानगरपालिकेचे सदस्य म्हणून ते निवडून आले. पालिकेचा सदस्य या नात्याने पालिकेतील आर्थिक व्यवहारांचा अभ्यास करून त्यांनी अनेक सुधारणा सुचविल्या. त्यानंतर १८८३ च्या पालिका निवडणुकीतही ते निवडून आले. १८८६ साली ते इंग्लडला गेले. तेथे पार्लमेंटची निवडणूक त्यांनी लढविली. त्यामध्ये त्यांना यश संपादन करता आले नाही. त्यानंतर १८९२ साली फिन्सबरी मतदार संघातून ते निवडून आले. सन १८९२ ते १८९५ या काळात ते इंग्लडमधील कॉमन्सगृहाचे सदस्य होते. याकाळात त्यांनी भारतासंबंधीचे अनेक प्रश्न सभागृहात उपस्थित केले होते.

१८८५ साली स्थापन झालेल्या राष्ट्रीय सभेच्या स्थापनेत दादाभाई नौरोजी यांचा सिंहाचा वाटा होता. राष्ट्रीय सभेचा पहिल्याच बैठकीत त्यांनी तीन विषयावर ठराव मांडले होते. त्यामध्ये भारताच्या राज्यव्यवस्थेची चौकशी करण्यासाठी बादशाही आयोग नियुक्त करावा, कायदे कौन्सिलमध्ये सुधारणा तसेच अधिकारात वाढ करावी आणि इंग्लड व भारतामध्ये एकच वेळी आय.सी.एस परिक्षा घेण्यात याव्यात. अशा पध्दतीचे ठराव मांडले होते. १८८६, १८९३, १९०६ यावर्षी ते राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष होते. ब्रिटिशांच्या

शोषण प्रवृत्तीला विरोध करून त्यासंदर्भातील भूमिका त्यांनी वेळोवेळी राष्ट्रीय सभेच्या व्यासपीठावरून मांडली. शिवाय राष्ट्रीय काँग्रेसच्या व्यासपीठावरून त्यांनी 'स्वराज्याची' मागणी केली होती.

आयुष्याच्या शेवटच्या टप्यात १९०८ नंतर ते वरसोवा येथे वास्तव्यास होते. या काळात सक्रीय समाजकारण व राजकारणापासून त्यांनी निवृत्ती स्वीकारली. १९१४ ला पहिले महायुध्द सुरू झाले. त्यावेळी ब्रिटिश साम्राज्याचे नागरीक या नात्याने प्रत्येक भारतीयाने सर्व शक्तीनिशी इंग्लडला मदत करणे हे प्रत्येक भारतीयाचे आद्यकर्तव्य आहे अशी स्पष्ट भूमिका त्यांनी घेतली होती. साहजिकच ब्रिटनमधील अनेकांनी दादाभाईंच्या या भूमिकेचे स्वागत केले होते. पुढे ३० जून १९१७ ला दादाभाई नौरोजी यांचे देहावसान झाले.

● **दादाभाई नौरोजी यांचे राजकीय विचार** – दादाभाई नौरोजी यांचे राजकीय विचार अभ्यासताना प्रामुख्याने एक गोष्ट लक्षात येते की, राजाराम मोहन रॉय व न्या. रानडे यांच्यापेक्षा दादाभाई नौरोजी यांचे विचार काही बाबतीत वेगळे आहेत. दादाभाईंनी आपल्या सार्वजनिक कार्याची सुरवात वरील दोघांप्रमाणेच सामाजिक कार्यापासूनच केली होती. मात्र राजाराममोहन रॉय व न्या. रानडे यांना सामाजिक व राजकीय प्रश्न परस्परांपासून विभक्त आहेत अशी भूमिका मांडता आली नाही. मात्र दादाभाईंनी राजकीय प्रश्नांचा सामाजिक, धार्मिक प्रश्नापासून वेगळा व स्वतंत्र विचार झाला पाहिजे अशी भूमिका घेतली. तसेच राष्ट्रीय सभा राजकीय प्रश्नांचा विचार करणारी स्वतंत्र यंत्रणा म्हणून असावी तर सामाजिक व धार्मिक प्रश्नांसाठी स्वतंत्र व्यासपीठ उभे करण्यास त्यांनी भाग पाडले. आपल्या आयुष्याची साठ वर्षे त्यांनी विविध राजकीय प्रश्नांच्या सोडवणूकीसाठी खर्ची केले होते. दादाभाईंचे राजकीय विचार व राष्ट्रीय सभेचे कार्य एका समांतर रेषेवरून चालले होते. त्यामुळे राष्ट्रीय सभेच्या व्यासपीठावरून अध्यक्ष म्हणून त्यांनी मांडलेली मते, विविध परिषदांमधून प्रकट केलेले विचार, ब्रिटनच्या कॉमन्स सभागृहातील भाषणे, वृत्तपत्रीय लेख यातून दादाभाईंचे राजकीय विचार स्पष्ट होतात.

### २.२.१.२ राजकीय उदारमतवाद

दादाभाई राजकीय उदारमतवादाचे अध्वर्यू समजले जातात. त्यांच्या राजकीय विचारांचे वर्णन 'राजकीय उदारमतवाद' म्हणून करता येईल. ते इंग्रज राजवटीला धन्यवाद देताना कारण त्याच्यामुळे भारतीय जनतेवर उदारमतवादाचे संस्कार झाले असे त्यांचे म्हणणे होते. स्वातंत्र्य, समता, हक्क इ. ची त्यांना ओळख झाली. संसदेचा १८३३ चा कायदा व १८५७ च्या राणीच्या जाहीरनाम्याने जी आश्वासने भारतीयांना दिली होती. दादाभाईंच्या विचार विश्वात या आश्वासनांना अत्यंत महत्वाचे व मध्यवर्ती स्थान होते. त्यामुळे यासंबंधी ब्रिटिशांना या आश्वासनाची आठवण करून देताना दादाभाईंनी आपल्या लेखनात व व्याख्यानात त्यासंबंधीचा पाठपुरावा केल्याचे दिसून येते. भारतातील शासकीय सेवेतील उच्च पदे ब्रिटिश लोकांच्या मक्तेदारीची राहिली आहेत. शिवाय भारतीयांच्या नेमणूका अशा उच्च पदावर न करण्याचे ब्रिटिशांचे धोरण यावर दादाभाईंनी तीव्र नाराजी व्यक्त केली होती. ब्रिटिश साम्राज्याचे नागरीक म्हणून भारतीयांना योग्य वागणूक मिळावी, सनदी सेवाप्रवेश मिळावा, आर्थिक विकासाची व आर्थिक उन्नतीची संधी प्राप्त व्हावी यासाठी त्यांनी पाठपुरावा केला. यासंदर्भातील आपली मते त्यांनी 'अनब्रिटिश रूल इन इंडिया' या ग्रंथात

नमूद केली आहेत.  दादाभाईंच्या उदारमतवादी विचारात माणसाला चांगले जीवन जगता यावे. यासाठी व्यक्तीस्वातंत्र्य व व्यक्तीचे हक्क यांना स्पष्ट मान्यता देण्यात आली होती. ब्रिटिश जनतेप्रमाणेच भारतीयांना व्यक्तीस्वातंत्र्य आवश्यक आहे अशी त्यांनी मांडणी केली होती. त्याच्यामते, शासन हे शक्तीवर आधारित न राहता नैतिक बळावर आधारित असले पाहिजे. साम्राज्य हे शक्ती व पाशवी बळांनी प्रस्थापित करता येते, मात्र ते स्थायी बनवायचे असेल तर ते शाश्वत व चिरंतन नैतिक बळावर आधारित असावे. नैतिक बळ हेच शाश्वत व अमर आहे अशी त्यांची स्पष्ट भूमिका होती.

भारतीय लोकप्रतिनिधींना कायदेमंडळात प्रवेश ही व्यक्ती स्वातंत्र्याच्या दृष्टीने दुसरी आवश्यक गोष्ट ते मानत होते. हा देखील त्यांच्या राजकीय उदारमतवादी विचारांचा भाग होता. १९०९ चा मोर्ले-मिंटो सुधारणा कायदा अंमलात येण्यापुर्वी भारतात लोकप्रतिनिंधीना कायदेमंडळात स्थान नव्हते. त्यासाठीचा दादाभाईंनी सतत पाठपुरावा केला होता. यासंबंधीची जाणीव ब्रिटिशांना करून देताना दादाभाईं म्हणाले होते. ''कायदेमंडळ हे जनतेच्या प्रतिनिधींनी बनलेले असावे. या गोष्टींचे महत्व ब्रिटिशांना समजून देण्याची गरज नाही कारण हि गोष्ट आम्ही त्यांच्याकडूनच शिकलो आहोत. त्यांनी स्वत:च्या देशात याच तंत्राचा अवलंब केला आहे. तेंव्हा तेच तंत्र त्यांनी भारतात अंमलात आणावे. ज्यांच्यावर कर लादले जातात त्यांना करविषयक धोरण ठरविण्याच्या प्रक्रियेत स्थान असावे अशी आमची मागणी आहे.'' यामधून दादाभाईंच्या राजकीय उदारमतवादाच्या वैचारिक प्रगल्भतेचा परिचय येतो.

लोकांची अधिमान्यता राजकीय स्थैयांसाठी आवश्यक असते. हे पटवून देताना दादाभाई म्हणतात, 'बलप्रयोग' हा जरी राज्याचा भाग असला तरी तो तिचा आधार होऊ शकत नाही. तिचा मुळ आधार न्याय आणि नीती आहे.  त्यामुळे प्रजेस नैतिक अधिष्ठान प्राप्त होते. राज्यावर निष्ठा ठेवली जाते.''

पुढे ते म्हणतात, शासन हे शक्तीवर आधारित न राहता ते नैतिक बळावर आधारित असले पाहिजे. साम्राज्ये हे शक्ती व पाशवी बळांनी स्थापित करता येते, परंतु ते स्थायी बनवायचे असेल तर ते शाश्वत व चिरंतन नैतिक बळावर आधारित असावे. नैतिक बळ हेच शाश्वत व अमर आहे.''

१९०६ साली दादाभाईंनी स्वराज्याची मागणी केली होती. त्यांच्यामते, राष्ट्राचे सामर्थ्य आणि भवितव्य जर सुरक्षित राखायचे असेल तर त्या राष्ट्रातील नागरिकांना स्वयंशासनाचा अधिकार दिला पाहिजे. दादाभाईंचा राष्ट्रवाद हा सर्व जाती-धर्माच्या पलिकडे जाणारा धर्मनिरपेक्ष राष्ट्रवाद होता. त्यांच्यामते, सर्व जाती-धर्मांच्या व वंशाच्या लोकांनी एकत्र येऊन राजकारण केले तर देशाला स्वराज्य प्राप्त होईल. सर्वसमावेशक व उदारमतवादी राष्ट्रवाद मांडल्यामुळेच दादाभाई सर्व प्रांतांच्या व धर्माच्या लोकांच्या आदरास पात्र ठरले.

### २.२.१.३ दादाभाई नौरोजी यांचे आर्थिक विचार

दादाभाई नौरोजी यांनी मांडलेला आर्थिक शोषणाचा सिध्दांत हा आधुनिक भारतीय विचारविश्वाला दिलेली अमूल्य देणगी आहे. त्यामुळे भारतातील आर्थिक राष्ट्रवादाचा पाया घालण्याचे श्रेय खऱ्या अर्थाने

दादाभाईंना जाते. दादाभाईंच्या मते, ब्रिटीशांचे आर्थिक धोरण हेच भारतीयांच्या आर्थिक दुरावस्थेचे प्रमुख कारण आहे. ब्रिटीशांनी भारतीयांचे जे मोठया प्रमाणात आर्थिक शोषण केले. त्यामुळे भारताची अर्थव्यवस्था मोडकळीस आली असे ते म्हणतात.

दादाभाई सनदशीर राजकीय चळवळीबरोबरच आर्थिक राष्ट्रवादाचे प्रणेते मानले जातात. त्यांच्या आर्थिक विचारांमुळेच भारतीय राष्ट्रवादाला आर्थिक परिमाण लाभले. ब्रिटीश राजवटीत भारतावर घडून आलेल्या सामाजिक, नैतिक, राजकीय, आर्थिक परिणामांची मीमांसा त्यांनी आपल्या Poverty and Un British Rule in India या ग्रंथात करून भारताच्या दारिद्र्याची कारणे स्पष्ट केली. दुष्काळ, रोगराई व उपासमारी या बरोबरच देशाच्या आर्थिक शोषणाला ब्रिटिशांचे धोरणच जबाबदार असल्याचे सांगून हे धोरण आर्थिक विषमतेला खऱ्या अर्थाने जबाबदार असल्याचे दादाभाईंचे ठाम मत होते.

दादाभाईंच्या मते, ब्रिटिशांना त्यांचा उत्पादीत माल भारतीय बाजारपेठेत खपविणे फायद्याचे असल्याने त्यांनी भारतातील औदयोगिकीकरण रोखून धरले. परिणामत: येथील कुटीरउदयोग बुडाले परदेशी माल देशी मालापेक्षा अधिक दर्जेदार असल्याने देशी मालाला बाजारपेठेत उठाव मिळाला नाही, मागणी घटत गेली. त्यामुळे देशात बेकारी वाढून दारिद्रयात दिवसेंदिवस भर पडत गेली. त्याबरोबर ब्रिटिशांच्या आर्थिक धोरणामुळे देशातील वस्तुंच्या किंमती वाढतच गेल्या. वाढत्या किंमतीमुळे जनता हवालदिल झाली. ब्रिटीश नोकरांचे भरमसाठ पगार, निवृत्तीवेतन भारतातून इंग्लडमध्ये जाऊ लागले व भांडवलात रूपांतरीत होऊ लागले. त्या भांडवलावर ब्रिटिशांच्या मक्तेदारीमुळे भारतीय जनतेचे आर्थिक शोषण होऊन दारिद्रयात भर पडत गेली. याखेरीज दादाभाईंनी भारतीय दारिद्र्याची पुढील कारणे सांगितली आहेत. भारतातील ब्रिटीश नोकरवर्ग चैनीचे जीवन जगतो, पगाराव्यक्तिरिक्त इतर अनेक सुखसोईंचा तो उपभोग घेतो, राज्यकारभारावर प्रचंड पैसा खर्च होतो. त्यामुळे भारतीय राजकीय व्यवस्थेवर आर्थिक ताण मोठया प्रमाणावर वाढतो. परिणामत: भारतीय गरिबीत मोठ्या प्रमाणावर वाढच होत गेली. यावरून दादाभाई असा निष्कर्ष काढतात की, ब्रिटिशांच्या विचित्र अशा आर्थिक नितीमुळे भारतातील व्यक्ती तर कर्जबाजारी होतात पण संपुर्ण देश कर्जाच्या खाईत लोटला जातो, हि अत्यंत गंभीर बाब आहे असे ते म्हणतात.

### २.२.१.४ आर्थिक नि:सरणाचा सिध्दांत / लुटीचा सिध्दांत (Drain Theory)

दादाभाई नौरोजी यांना 'भारतीय आर्थिक राष्ट्रवादाचे जनक' म्हणून ओळखले जाते. त्यांनी भारतीय राष्ट्रवादाची उभारणी आर्थिक सिध्दांतावर केली. भारतातील दारिद्र्याचे सुक्ष्म निरिक्षण करून, त्यासंबंधी संशोधन करून आपला आर्थिक लुटीचा सिध्दांत मांडला.

दादाभाईंनी Poverty in India आणि Poverty and Un British Rule in India या ग्रंथाच्या माध्यमातून भारतातील लोकांच्या आर्थिक उत्पन्नावर भाष्य करताना भारतातील लोकांचे वार्षिक उत्पन्न अतिशय कमी म्हणजे दरडोई फक्त २० रु. इतके अत्यंत कमी असल्याची धक्कादायक बाब समोर आणली. भारतीय लोकांचे जीवनमान हे कैद्यापेक्षाही कनिष्ठ दर्जाचे आहे. ही गोष्ट त्यांनी सप्रमाण सिध्द करून दाखविली कारण भारत सरकार त्यावेळी कैद्यांवर दरवर्षी ३० रूपये खर्च करीत होते. सरकार जनतेकडून

मोठ्या प्रमाणावर कर वसुल करीत होते. मात्र येथील लोकांसाठी कृषी, सिंचन, दळणवळण इ. बाबत कसल्याही सोयी सुविधा पुरवत नव्हते. दादाभाईंचे दुसरे पुस्तक Poverty in India इ.स. १९०२ साली इंग्लडमध्ये प्रकाशित झाले. या पुस्तकात त्यांनी भारताच्या आर्थिक व राजकीय स्थितीची चर्चा केली आहे. भारतीय अर्थव्यवस्था ही लुटीच्या सिध्दांताने प्रभावित झाली आहे अशी मांडणी त्यांनी त्यामध्ये केली आहे. ब्रिटिश शासन दरवर्षी जवळपास ३ ते ४ कोटी पौंडची लूट करते त्यामुळे भारतीय दारिद्र्यात दिवसेंदिवस भरच पडत आहे. दादाभाईंच्या मते ही लूट दोन प्रकारे होते.

१. युरोपियन अधिकाऱ्याकडून आपली शिल्लक इंग्लडला पाठविण्यात येते. हा पैसा इंग्लडमधील खर्चावर उधळला जातो. तसेच कर्मचाऱ्यांना देण्यात येणारे वेतन व निवृत्तीवेतन हा सुध्दा लुटीचाच भाग आहे.

२. ब्रिटिश शासनात सनदी सेवेत नसलेल्या परंतु भारतात उद्योग, व्यापार करुन मिळवलेला पैसा भारताच्या बाहेर पाठवण्यामुळे, युरोपियन व्यक्तीद्वारे अफाट पैसा भारताबाहेर जात असल्याने भारतातील संपत्तीची निर्मिती होऊ शकत नाही अशी मांडणी त्यांनी केली. संपत्ती आपली मात्र त्यावर आधारित उद्योगांची मालकी मात्र त्यांची या प्रवृत्तीमुळे भारतीयांचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक शोषण होते अशी मांडणी त्यांनी केली आहे.

दादाभाईंच्या मते, सरकार कराच्या रुपातही भारतीयांचे शोषण करते. शासन चालविण्यासाठी कर आकारणी करावी लागते. इंग्लडमधील प्रत्येक व्यक्ती ५० शिलिंग कर भरते. तर त्याच्या तुलनेत भारतीय व्यक्ती ३ ते ४ शिलिंग कर भरते. भारतीयांकडून वसूल केला जाणारा कराचा वाटा जरा कमी असला तरी त्या तुलनेत त्यांना कोणत्याही प्रकारची सुविधा मात्र प्राप्त होत नाहीत. ब्रिटिश जनतेचे जीवन सुखी असून त्या तुलनेत भारतीयांना मात्र फार हालाखीत दिवस काढावे लागत आहेत. या संकटाबरोबर आता आणखी नविन संकट भारतीयांसमोर उभे आहे असे ते म्हणतात, भूमिच्या अंगात असणारी संपत्तीसुध्दा इंग्लडला पाठविली जात आहे.

अशाप्रकारे दादाभाईंनी अर्थशास्त्रीय सिद्धांताद्वारे भारतीयांना त्यांच्यावर होणाऱ्या शोषणाची जाणीव करुन दिली. तसेच ब्रिटिशांनी भारतीयांचे शोषण थांबवावे व भारताची आर्थिक स्थिती सुधारण्याचा प्रयत्न करावा अशी सुचनाही केली. अन्यथा ब्रिटिश मालावरच नव्हे तर ब्रिटिश शासनावरही भारतीय जनता बहिष्कार टाकेल असा गंभीर इशाराही दिला. दादाभाईंच्या मते, भारताचा औदयोगिक विकास करण्यासाठी परदेशातील भांडवलदारांना प्रोत्साहन देण्यात यावे. परंतु या भांडवलाचा उददेश आर्थिक लुटीचा नसावा तर तो विकासाचा असावा. अशाप्रकारे दादाभाईंनी लुटीचा सिध्दांत मांडून भारतीय जनतेवर होणाऱ्या आर्थिक शोषणाविरुद्ध जागृती केली. त्यांचा हा सिध्दांत राजकीयदृष्ट्या क्रांतीकारक ठरला. तसेच राजकीय सत्तेचा प्रमुख प्रश्न बनला. भारतात ब्रिटीशांविषयी असंतोष निर्माण होण्यास त्यामुळे मदत झाली.

दादाभाईंनी आपल्या आर्थिक विचारातून व शोषणांच्या सिध्दांतातून भारताच्या दारिद्र्याची कारणे स्पष्ट केली. दादाभाईंनी शोषणाचे मार्ग व प्रकाराबरोबरच भारतीयांच्या होणाऱ्या नैतिक शोषणाचे पैलूही उघड

करून दाखविले. त्यांनी केवळ आर्थिक शोषण कसे होते हे उघड केले नाही तर त्यांनी आर्थिक प्रशासकीय परिस्थितीत बदल करुन दारिद्र्य कसे कमी करता येईल यावर उपायही सुचविले आहेत.

१. ब्रिटिशांनी भारतीय सैन्यावरील खर्च व राज्यकारभारावर होणारी पैशांची उधळपट्टी त्वरीत थांबवावी.

२. भारतातून इंग्लडमध्ये जाणारा अमर्याद पैशांचा ओघ थांबवावा. त्यासाठी भारतीयांना प्रशिक्षित करण्यात यावे.

३. ब्रिटीशांनी भारतात भांडवल निर्माण करण्यासाठी नवीन योजना आखाव्यात जेणेकरुन भांडवल येथेच वापरता येईल.

४. भारतीयांवर लादले जाणारे कर कमी करण्यात यावेत.

५. भारतीय प्रशासकीय सेवेचे हिंदीकरण करावे इ.

दादाभाई नौरोजी दूरदृष्टीचे राजकीय नेते होते. त्यांनी आंतरराष्ट्रीय समाजवादाच्या वाढणाऱ्या राजकीय व आर्थिक शक्तीला ओळखले होते. त्यांनी इंग्लडमधील समाजवादाचा सहयोग मिळवण्यासाठीचे प्रयत्न ही केले होते. कामगार, श्रमिक अणि मालक यांच्यातील संघर्ष कमी व्हावेत. श्रमिकांच्या अधिकारांची जपणूक व्हावी. यासाठी Industrial Commissioner's courts स्थापन करण्याच्या सूचना त्यांनी १९०४ च्या 'ॲम्स्टरडॅम' येथील आंतरराष्ट्रीय समाजवादी संमेलनात केली होती. यामागे श्रमिकांचे शोषण होऊ नये हाच प्रमुख उद्देश होता.

**२.२.१.५ दादाभाई नौरोजी यांचे समाजवादी विचार :–**

दादाभाई नौरोजी यांच्या विचारात रुढ समाजवादी विचार दिसत नाही. मात्र समाजवादी विचारांशी साधर्म्य असणाऱ्या आर्थिक, पुरोगामी विचारांच्या छटा दिसतात. कष्टकरी श्रमिक वर्गाबददल त्यांना विशेष आपुलकी, आत्मीयता होती. त्यांच्यामते, कामगारांचे श्रम ही एक उत्पादनाची संपत्ती समजून कामगारांना योग्य मोबदला दिला गेला पाहिजे अशी त्यांची आग्रही भूमिका होती.

दादाभाईंचे मित्र व सहकारी 'विल्यम एडरबर्न' यांनी दादाभाईंच्या संदर्भात असे म्हटले होते की, संसद सदस्य असताना जर कोणता सदस्य गटाबददल दादाभाईंच्या मनात सहानुभूती असेल तरी ती मजूर वर्गाचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या समुहाबददल होती. तसेच वार्धक्यात कामगारांना निवृत्ती वेतन देण्यात यावे. यासंबंधीच दादाभाईंनी पाठपुरावा केला होता. इंग्लडमधील औदयोगिक विश्वाचे दादाभाईंना चांगलेच ज्ञान होते. त्याधर्तीवर कामगारांची गाऱ्हाणी ऐकणारी स्वतंत्र औदयोगिक कमिशनरांची न्यायालये असावीत. कामगार संघटना असाव्यात यासाठी १४ ते २० ऑगस्ट दरम्यान 'ॲम्स्टरडॅम' येथे भरलेल्या सोशॅलिट काँग्रेसच्या अधिवेशनात त्यांनी मागणी केली. तसेच भारतीयांचे होणारे आर्थिक शोषण व त्यांचे गरिबीत होणारे रुपांतर यावरही त्यांनी प्रकाशझोत टाकला होता.

### २.२.१.६ दादाभाईंचे स्वातंत्र्य आंदोलनातील योगदान :–

दादाभाई नौरोजी हे भारतीय देशभक्तीचे एक ज्वलंत उदाहरण होते. आपल्या विचार व कार्याचा माध्यमातून त्यांनी आधुनिक भारताच्या जडणघडणीत मोलाचे योगदान दिले आहे. १८८५ च्या राष्ट्रीय सभेच्या स्थापनेत त्यांचा सिंहाचा वाटा होता. सुमारे ४० वर्षे त्यांनी सार्वजनिक चळवळीचे प्रणेते, सामाजिक, धार्मिक सुधारक, अर्थतज्ञ अशा विविध भुमिका अत्यंत कार्यक्षमपणे पार पाडल्या. भारतीय जनतेच्या विविध समस्या त्यांनी ब्रिटिश संसदेत मांडल्या. १८८६ ला राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनात त्यांनी ब्रिटिश शासनाप्रती आपली पूर्ण निष्ठा व्यक्त केली होती. परंतु ब्रिटिश शासनाकडून ज्या अपेक्षा केल्या होत्या त्या पूर्णत्वास न गेल्यासंबंधी त्यासंदर्भातील खंतही त्यांनी व्यक्त केली होती. त्यातून पुढील काळात ते आक्रमक बनत गेले व पुढे १९०६ च्या राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनातील स्पष्ट भूमिकेत त्यांनी असे जाहीर केले होते की, ''आता आम्हाला स्वराज्याची मागणी करण्यावाचून कोणताही पर्याय नाही. हि अन्यायी राजवट लवकरात लवकर या देशातून नष्ट झाली पाहीजे'' त्यासाठी त्यांनी सर्वप्रथम स्वराज्याची मागणी केली. त्याच्यामते, आता अर्ज विनंत्या करुन उपयोग नाही तर सरकार विरुध्द चळवळ उभी केली पाहिजे. मात्र ती सनदशीर असावी. त्यामध्ये सुशिक्षित, उच्च व तळागळातील लोकांचा सहभाग असावा त्यांनी राष्ट्रीय चळवळीला व्यापक रुप देताना जहाल व मवाळ यांचा सुवर्णमध्य साधला.

दादाभाई नौरोजी जनतेच्या प्रश्नाशी एकरुप झाले होते. त्यामुळे ब्रिटनमध्ये वास्तव्यास असताना देखील ते सतत भारतीयांचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करत होते. ब्रिटिश पार्लमेंटचे सदस्य असताना त्यांनी सातत्याने ब्रिटीश सरकारसमोर भारतीयांचे प्रश्न मांडले होते. तसेच ब्रिटिश साम्राज्याच्या शोषणाचे स्वरुप स्पष्ट करताना आर्थिक निःसारणाचा सिद्धांत मांडला. या सिध्दांताचा प्रभाव पुढे न्या. रानडे, ना. गोखले, लो. टिळक यासारख्या प्रभूतींवर पडला. तसेच नंतर जे समाजवादी किंवा साम्यवादी नेतृत्व उदयास आले त्यांनी या सिध्दांताने समर्थन केल्याचे दिसते. दादाभाई नेमस्तवादीय होते. मात्र त्यांचा नेमस्तवाद इतर नेमस्तवाद्यांपेक्षा वेगळा होता. त्याच्यामते, लो. टिळकांचा स्वदेशी व बहिष्कार चळवळीचा मार्ग हा देखील नेमस्तवादीच होता. ब्रिटिशांच्या न्यायबुध्दीवरील विश्वासामुळेच त्यांनी भारतात स्वयंशासन स्वराज्य प्राप्त झाले पाहिजे. त्याशिवाय भारताचे प्रश्न सुटणार नाहीत अशी भूमिका घेतली. त्यामुळेच साम्राज्यांतर्गत स्वराज्य हे त्यांचे ध्येय होते. ब्रिटीश साम्राज्याचे नागरीक या नात्याने भारतीयांना स्वयंशासनाचे अधिकार मिळावेत अशी भुमिका त्यांनी घेतली.

### २.२.१.७ दादाभाई नौरोजी यांच्या विचारांचे मूल्यमापन :–

आधुनिक भारतात राष्ट्र उभारणीचे कार्य ज्या धुरिणांनी केले त्यांचे मुकुटमणी म्हणून दादाभाई नौरोजी ओळखले जातात. तत्कालीन नेत्यांना गुरुस्थानी असलेल्या दादाभाईंनी राष्ट्रीय सभेच्या स्थापनेनंतर जवळपास ४० वर्षे भारतीय राष्ट्रवादाचे अग्रदूत म्हणून भूमिका पार पाडली. दादाभाईंनी मांडलेला आर्थिक शोषणाचा सिध्दांत हा तत्कालीन ब्रिटिश अर्थव्यवस्थेची निती समजावून सांगणारा अत्यंत महत्वाचा दस्तऐवज आहे.

भारतीय राजकारणांचे विवेचन त्यांनी अत्यंत शास्त्रशुध्द व वस्तुनिष्ठ पध्दतीने केले आहे. त्यामुळे भावनिक होवून त्यांनी विचारांची मांडणी न करता वास्तववादी दृष्टीकोनातुन सामाजिक, आर्थिक, राजकीय विचारांची मांडणी केली. राजकीय व अर्थविषयक विचारात हक्क हि संज्ञा त्यांनी अभ्यासपूर्ण अर्थाने मांडली. ते एक थोर मानवतावादी विचारवंत होते. चरित्रकार मिनू मसानी म्हणतात, लंडनमध्ये दादाभाईंचे वास्तव्य असताना सर्व भारतीय विदयार्थ्यांना त्यांचे घर सदैव खुले असे व त्यांना शक्य ती मदत ते करीत असत. त्यांच्या राजकीय कृतींना एक उच्च असा नैतिक मुल्यांचा आधार होता. त्यांचे संपूर्ण आयुष्य निष्कलंक राहिले होते म्हणून त्यांचे परममित्र वेडरबर्न म्हणतात, दादाभाई सारखी नि:स्वार्थी व स्वत:चे आयुष्य सामाजिक कार्याला वाहून घेणारी व्यक्ती मी अजून पाहिलेली नाही. यातच त्यांच्या कार्याचे व विचारांचे मोठेपण दिसून यते.

### २.२.१.८ सारांश :–

दादाभाई नौरोजी यांच्या विचार व कार्यातून एक गोष्ट सिध्द होते की, राष्ट्रभावना जतन करुन ती वाढविण्याचे प्रमुख कार्य दादाभाईंनी केले. त्यांच्या राजकीय विचारांचे वर्णन 'राजकीय उदारमतवाद' असे करता येईल. त्यांच्या उदारमतवादात माणसाला माणूस म्हणून चांगले जीवन जगता यावे ही तळमळ प्रतिबिंबीत होते. त्यासाठी व्यक्तीस्वातंत्र्य ही आवश्यक गोष्ट त्यांनी मानली होती.

दादाभाई नौरोजींनी मांडलेला आर्थिक शोषणाचा सिध्दांत हा आधुनिक भारतीय विचारविश्वाला दिलेली अमुल्य देणगी आहे. ब्रिटीशांनी भारताचे जे आर्थिक शोषण केले. त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्था डबघाईला आली. त्यातून भारतात दारिद्रय निर्माण झाले असा निष्कर्ष त्यांनी मांडला. दादाभाईंनी भारतीय दारिद्रयाची केवळ मीमांसा केली असे नाही तर त्यासंबंधी उपाय योजनाही सुचविली हे त्यांच्या विचारांचे वेगळेपण आहे.

तसेच दादाभाई नौरोजी यांचा समाजवादी विचार हा रुढ समाजवादी विचाराहून वेगळा होता. समाजवादी विचारांशी साधर्म्य असणाऱ्या आर्थिक, पुरोगामी विचारांच्या छटा त्यामध्ये दिसून येतात. त्यांना श्रमिकाबददल विशेष आपुलकी होती. श्रमिकांना त्यांच्या कामाचा योग्य मोबदला मिळाला पाहिजे अशी आग्रही भूमिका ते घेतात. एकूणच दादाभाई नौरोजी हे श्रेष्ठ देशभक्तींचे अत्यंत ज्वलंत उदाहरण होते. त्यांच्या विचार व कार्यातून आधुनिक भारताची जडणघडण होण्यास हातभार लागला. जवळपास ४० वर्षे ते सार्वजनिक चळवळीचे प्रणेत राहिले होते.

### २.२.२ न्यायमूर्ती एम.जी. रानडे :–

न्या. रानडे हे भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील एक थोर राजकारणी, समाजसुधारक, अर्थशास्त्रज्ञ म्हणून सर्वांना सुपरिचित आहेत. शिवाय 'आधुनिक महाराष्ट्राचे जनक' या शब्दात अरविंदांनी त्यांचा गौरव करून भारताच्या आधुनिक राजकीय इतिहासाचे प्रवर्तक ठरविले आहे.

### २.२.२.१ जीवनपरिचय :

न्यायमूर्ती एम.जी. रानडे तथा महादेव गोविंद रानडे हे एक थोर विचारवंत, समाजसुधारक, श्रेष्ठ इतिहासकार, अर्थतज्ञ म्हणून सुपरिचित आहेत. त्यांचा जन्म १८ जानेवारी १८४२ रोजी नाशिक जिल्ह्यातील 'निफाड' या गावी एका सनातनी कुटुंबात झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण कोल्हापूर येथे तर उच्च शिक्षण मुंबई येथे झाले. विदयार्थी दशेतच त्यांना मराठ्यांच्या इतिहासाबद्दल उत्कट व जाज्वल अभिमान होता. १८६६ साली एम.ए. उत्तीर्ण झाल्यानंतर त्यांनी दोन वर्षे ओरिएंटल ट्रान्सलेटरचे काम केले. त्यानंतर १८६८ साली त्यांची मुंबईच्या एलफिल्टन कॉलेजमध्ये इतिहासाचे प्राध्यापक म्हणून नेमणूक झाली. १८६८ ते १८७१ या काळात त्यांनी प्राध्यापक म्हणून काम केले. १८७१ मध्ये ब्रिटिश शासनाने त्यांची पुणे येथे उपन्यायाधीश म्हणून नेमणूक केली. सरकारी सेवा करीत असताना रानडे सामाजिक कार्यातही सक्रिय होते. या त्यांच्या कृतीमुळे ब्रिटीश सरकारने त्यांची बदली केली.

सन १८७० ते १८८० पर्यंतच्या काळात महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनावर रानडयांच्या विचारांचे वर्चस्व होते. १८८४ मध्ये रानडयांनी 'डेक्कन एज्युकेशन सोसायटी'ची स्थापना केली. प्रार्थना समाजाच्या स्थापनेत न्या. रानडे यांचा मोठा वाटा होता. या समाजाच्या मतांचे समर्थन करण्यासाठी तसेच तत्संबंधी उदभवणाऱ्या प्रश्नांचे निराकरण करण्यासाठी रानडेंनी 'एकेश्वरनिष्ठांची कैफियत' हा उत्कृष्ट निबंध लिहा. १८८५ मध्ये मुंबई प्रांताच्या गव्हर्नरने त्यांची विधान परिषदेवर सदस्य म्हणून नेमणूक केली. १८९३ पर्यंत ते मुंबई विधान परिषदेचे सदस्य होते. १८९३ मध्ये मुंबईच्या उच्च न्यायालयाचे न्यायाधिश होते. १८८० ते १८९५ च्या विचार मंथनाच्या काळात महाराष्ट्राच्या राजकारणात रानडे पक्ष व टिळक पक्ष असे दोन पक्ष निर्माण झाले होते.

न्या. रानडे यांचे लेखन व वाचन प्रचंड होते. भारतीय ग्रंथ, धार्मिक परंपरा आणि तत्वज्ञान यांचा त्यांनी सखोल अभ्यास केला होता. त्याच्यावर हेन्री मन, ॲडम स्मिथ, फेडरिक लिप्टर, कोल्बर्ट इ. च्या विचारांचा विशेष प्रभाव होता. रानडे सरकारी नोकरीत असूनही त्यांनी सामाजिक, राजकीय कार्यात सक्रिय सहभागी असत. न्या. रानडे या न्यायप्रिय, विद्याव्यासंगी, कल्पक देशभक्तांचे १६ जानेवारी १९०१ रोजी 'मुंबई' येथे देहावसान झाले.

### २.२.२.२ न्या. रानडे यांचे राजकीय विचार :-

न्या. रानडे यांना रुढ अर्थाने राजकीय विचारवंत म्हणता येणार नाही. कारण इतर राजकीय विचारवंताप्रमाणे त्यांनी कोणतेही राजकीय तत्वज्ञान मांडलेले नाही. तरीही त्यांची ख्याती सामाजिक व राजकीय विचारवंत म्हणूनच असलेली दिसते. व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी राज्यसंस्थेचे अस्तित्व व उपयुक्तता त्यांना मान्य होती. ते सक्रिय राजकारणात नसले तरी ते काँग्रेस नेत्यांना सातत्याने मार्गदर्शन करीत होते. त्यामुळे त्याच्याबददल जेन्स क्लॉक हा ब्रिटिश लेखक म्हणतो, ''१९ व्या शतकाच्या अखेरच्या कालखंडात भारतीय लोकांनी ज्या राजकीय चळवळी केल्या त्यापैकी बहुतेक चळवळीमागे न्या. रानडे यांची

प्रेरणा व बुध्दी होती.'' नेमस्तपणा, राजकीय उदारमतवाद, व्यक्तिस्वातंत्र्य, सनदशीर मार्ग आणि विकासाचा एकात्म दृष्टीकोन ही रानडेंच्या विचारांची प्रमुख वैशिष्ट्ये होती.

**१. मानवी स्वभाव :–**

मानवी स्वभावाबाबत न्या. रानडे म्हणतात की, मनुष्य हा इतर प्राण्यांप्रमाणे असून त्यालाही वासना व गरजा असतात. तसेच त्याच्याजवळ उदारता व कर्तव्याची जाणीवदेखील असते. परंतु त्याची भावना प्रधानता आणि मर्यादित निर्णय क्षमता हे त्याचे दुबळेपण म्हणावे लागेल. त्यांच्यामते माणसातील विवेक जागवून त्यांच्यातील या दोषांचे निराकरण शक्य आहे. त्याच्याकडील नैतिक जाणीव त्यांच्या विवेक बुध्दीस पूरक ठरू शकते. माणसातील सदगुण जागृत करुन संतुलित आणि सुसंवादी व्यक्तिमत्व निर्माण करण्याची गरज ते प्रतिपादित करतात.

**२. व्यक्ती आणि समाज :–**

न्या. रानडे समाजाला एकमेव सेंद्रीय अस्तित्व मानतात. त्याच्यामते, समाजातील ही सेंद्रीय एकता असून ती व्यक्तीचा शारीरिक आणि जाणीवजन्य पृथकता नाकारते. समाज हा व्यक्तीचाच बनलेला असतो त्यामुळे व्यक्तीचा समुह म्हणजे समाज नव्हे. अशा व्यक्तीच्या समुहास त्यातील पृथक पृथक व्यक्तीपेक्षा निराळे असे स्वतंत्र अस्तित्व प्राप्त झाल्यास त्यास आपण समाज म्हणतो. समाजविषयक अशा सेंद्रीय भूमिका घेऊन सुध्दा रानडे व्यक्ती आणि समाज यातील परस्पर संबंधामध्ये व्यक्तीच्या हितास प्राधान्य देतात.

**३. ब्रिटिश शासन हि ईश्वरीय देणगी :–**

ब्रिटिश शासनला न्या. रानडे ईश्वरी देणगी मानत असत. त्यांच्यामते, भारतावर झालेली आक्रमणे ही परमेश्वराच्या इच्छेने झाली असून त्या आक्रमणांचा तत्कालीन परिणाम जरी भयानक होता तरी शेवटी त्याचा फायदाच भारतीयांना झाला. त्यांच्यामते, भारतामध्ये विविध संस्कृतींचा जो संगम आढळतो तो या विविध आक्रमणामुळे. त्यामुळेच ब्रिटिश शासन म्हणजे भारतीयांसाठी ईश्वराने दिलेली एक देणगी आहे असे त्यांचे मत होते. रानडयांच्या मते, ब्रिटिशांच्या उदारमतवादी धोरणामुळे तसेच येथील शिक्षण प्रसारामुळे हा समाज रुढी, प्रथा, परंपराच्या जाचक कचाट्यातून मुक्त झाला. त्यांना आत्मविश्वास व निर्भरता प्राप्त झाली. या संदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, रानड्यांना दोन गोष्टी अभिप्रेत होत्या एक म्हणजे ब्रिटनने भारताला जिंकल्यामुळे या देशाला स्वत:च्या आर्थिक, सामाजिक रचनांची डागडुजी करण्यासाठी अवधी मिळाला आणि जर देशावर परचक्र आले तर ते पेलण्यास देश सक्षम झाला. दुसरी म्हणजे विचार, भावना आणि समान भवितव्याच्या जाणीवेने एकल झालेले राष्ट्र म्हणून समाधानकारकपणे व संघटितपणे हिंदुस्थान जोपर्यंत उभा राहत नाही तोपर्यंत त्याने ब्रिटिश साम्राज्यातून बाहेर पडणे म्हणजे स्वातंत्र्याच्या नावाखाली अराजकाला व फाटाफुटीला निमंत्रण देणे ठरेल. कारण गुलामगिरीतील राष्ट्राला स्वातंत्र्य मिळविण्याची व समाधानी राष्ट्रापासून फुटून निघण्याची घाई नेहमीच असते.

**४. राज्यसंस्था :–**

न्या. रानडेंच्या मते, व्यक्ती आणि समाजाच्या उत्कर्षासाठी राज्यसंस्था आवश्यक आहे. व्यक्तीच्या विकासासाठी राज्यसंस्थेचा उदय झाला असून व्यक्ती व समाजविकास हे तिचे ध्येय असावे. त्यांच्यामते, राज्यसंस्था ही एखाद्या सजीवाप्रमाणे चैतन्ययुक्त असते. व्यक्तीचे अस्तित्व तसेच व्यक्तीविकास राज्यसंस्थेशिवाय शक्य नाही असे त्यांचे म्हणणे होते. रानडें उदारमतवादी विचारवंत असल्याने व्यक्ती त्यांच्यादृष्टीने प्रथमस्थानी आहे. त्यांच्यामते, राज्यसंस्था साध्य नसून व्यक्ती विकासाचे ते एक साधन आहे. त्यांच्यामते, भारतासारख्या सर्वच बाबतीत मागास असलेल्या राष्ट्रास व्यक्तीविकासाची संपूर्ण जबाबदारी राज्यसंस्थेने घेणे अभिप्रेत आहे.

**५. राज्याचा आधार**

राज्याचा आधार स्पष्ट करताना न्या. रानडे म्हणतात, शक्ती किंवा बळ राज्याचा आधार असू शकत नाही तर लोकसंमती किंवा लोकेच्छा हाच तिचा प्रमुख आधार असू शकतो. बळाचा वापर करणारी राज्यसंस्था फारकाळ टिकू शकत नाही. व्यक्तीच्या विकासासाठी राज्यसंस्था आवश्यक असल्याने राज्याचे कार्यक्षेत्र व्यापक असावे. व्यक्तीविकास व समाजहिताच्या दृष्टीने त्या गोष्टी करणे आवश्यक आहे. त्या राज्यसंस्थेने कराव्यात. प्रगत ब्रिटिशांच्या सहवासातच भारतीयांचा विकास होईल असे त्यांना वाटते म्हणून हे राज्य परके असले तरी भारतीय लोकांनी तिला मान्यता दिली आहे. केवळ ब्रिटिश परकीय आहेत म्हणून राज्यसंस्था वाईट असे मात्र म्हणता येणार नाही.

**६. राज्यसंस्थेची कार्ये :–**

न्या. रानडेंनी प्रामुख्याने पुढीलप्रमाणे राज्यसंस्थेची प्रमुख कार्ये सांगितली आहेत.

**अ. समाजकार्य :–**

रानडेंच्या मते भारतासारख्या मागास देशात तत्कालीन समाजात अनेक अंध्दश्रध्दा, वाईट चालीरीती, रुढी, परंपरा यामुळे भारतीय समाज अप्रगत अवस्थेत होता. या सर्व गोष्टी व्यक्ती, व्यक्ती व समाज विकासासाठी अत्यंत हानीकारक आहेत. त्यामुळे जातीयता, अंधश्रध्दा, जाचक रुढी, प्रथा, परंपरा, स्त्रियांचे दुय्यमत्त्व यात गुरफटून गेलेल्या भारतीय समाजाला बाहेर काढण्याचे काम राज्यसंस्थेने करावे आणि समाजात सुधारणा घडवून आणाव्यात असे न्या. रानडेंचे मत होते.

**ब. आर्थिक कार्य :–**

न्या. रानडेंच्या मते, भारत हा कृषीप्रधान देश असल्याने व्यक्ती व समाज यांच्या उन्नतीसाठी शेती विकासावर भर दिला जावा. देशातील आर्थिक विषमता व दारिद्र्य निमूर्लन करण्यासाठी शेतीचे आधुनिकीकरण करावे. शेतीबरोबरच कारखानदारीवरही भर द्यावा. तसेच जीवनावश्यक वस्तुंच्या उत्पादनांची व वाटपाची जबाबदारी राज्यसंस्थेने घ्यावी. देशाचे आर्थिक नियोजन करून विकास साधावा असे त्यांचे मत होते.

**क. राजकीय कार्य :–**

रानडेंच्या मते राज्यात सुरक्षितता व सुव्यवस्था याबरोबरच शांतता व स्थैर्य यासाठी राज्यसंस्थेने कार्य करावे. राज्यातील जनतेला जलदगतीने न्याय मिळवून दिला पाहिजे. राज्यसंस्थेने व्यक्तीगत बाबींबरोबर व्यक्तीला पूर्ण स्वातंत्र्य प्राप्त करून द्यावे. सर्व प्रकारच्या दास्यातून व्यक्तीची मुक्तता करावी व समाजात शांतता, सुव्यवस्था, निकोप व समानतेचे वातावरण निर्मितीसाठी प्रयत्न करावेत.

**७. धार्मिक व सांस्कृतिक कार्ये :–**

न्या. रानडे यांच्या मते, समाजपरिवर्तनाचे कार्य करणारी राज्यसंस्था हि एक मुलभूत संस्था आहे. सध्याच्या परिस्थितीत समाजपरिवर्तन घडवून आणणे ही काळाची गरज आहे. ती राज्यसंस्थेने पार पाडली पाहिजे. सामाजिक परिवर्तनासाठी शिक्षणाचा सर्वत्र प्रसार केला पाहिजे. शिक्षणाच्या माध्यमातूनच इतर धर्मियाबददल आदर बाळगणे शक्य होईल. लोकशाही व स्वातंत्र्य यांचे धडे लोकांना दिले पाहिजेत. एकूणच लोकांच्या संस्कृतीबरोबरच जनकल्याणाचे उदि‌दष्ट साध्य व्हावे. अशी न्या. रानडे यांचे अपेक्षा होती. तसेच नागरिकांना सर्वप्रकारच्या सुखसोई, दळणवळणाची साधने राज्यसंस्थेने पुरविली पाहिजे. राज्यातील मजूरवर्गाची स्थिती सुधारण्यासाठी राज्यसंस्थेने कार्यरत असले पाहिजे असे न्या. रानडे यांचे मत होते.

**८. व्यक्तीस्वातंत्र्य व व्यक्तीगत हक्क :–**

न्या. रानडे हे व्यक्ती स्वातंत्र्याचे कट्टर पुरस्कर्ते होते. 'स्वातंत्र्य' म्हणजे स्वैराचार ही संकल्पनाही त्यांना मान्य नव्हती. त्यांच्या मते, समाज किंवा राज्याच्याबाहेर व्यक्ती स्वातंत्र्य टिकाव धरू शकत नाही. त्यामुळे दुसऱ्याचे शोषण होईल. त्यांची पिळवणूक होईल अशा स्वातंत्र्यालाही न्या. रानडे विरोध करतात. व्यक्तीगत हक्कात रानडे पुढील हक्काचा समावेश करतात.

**अ) समानतेचा हक्क :–**

समानतेचा हक्क विशद करताना न्या. रानडेंनी हिंदू समाजातील विषमतावादी जातीव्यवस्थेला विरोध केला. या हक्काचे महत्व प्रतिपादन करताना त्यांनी जातीय व धार्मिक भेदावर टिका केली. तसेच समतेच्या हक्काचे विवेचन करताना स्त्री–पुरुष समानतेवर विशेष भर दिला.

**ब) व्यक्ती स्वातंत्र्याचे हक्क :–**

व्यक्ती स्वातंत्र्याच्या हक्कामध्ये न्या. रानडे यांनी धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क, विचार व उच्चार स्वातंत्र्य, वृत्तपत्रांचे स्वातंत्र्य, मतदान व प्रतिनिधीत्व इ.चा समावेश केला. हक्क मानवी जीवनासाठी आवश्यक असतात असे त्यांचे मत होते. यासाठी ब्रिटिशांचे उदाहरण देताना न्या. रानडे म्हणतात. ब्रिटिशांनी गुलामी राजवटीविरुध्द झुंज देताना स्वत:साठी हक्काची निर्मिती केली. त्यांनी मॅग्नाचार्टा बिल ऑफ राईटस, पिटिशन ऑफ राईटस इ. सनदा निर्माण केल्या. निरंकूश अशा राज्यसत्तेला नियंत्रित करताना लोकांचे राज्य प्रस्थापित केले.

**२.२.२.३ न्या. रानडे यांचे सामाजिक विचार :–**

राजकीय विचारवंत किंवा अर्थशास्त्रज्ञ म्हणून न्या. रानडेंनी केलेल्या कार्यापेक्षा समाजसुधारक या नात्याने त्यांनी केलेले सामाजिक कार्य अत्यंत दुरगामी स्वरुपाचे होते. आधी राजकीय सुधारणा कि सामाजिक सुधारणा हा वाद त्यांना पसंत नव्हता. व्यापक अशा सामाजिक सुधारणा झाल्याशिवाय राजकीय किंवा धार्मिक सुधारणा यशस्वी होणार नाहीत असे न्या. रानडेंचे ठाम मत होते. त्यांच्यामते, राजकीय व सामाजिक सुधारणांची गरज समाज जीवनास सारख्याच प्रमाणात असते. सामाजिक स्वातंत्र्य हा राजकीय स्वातंत्र्याचा पाया असतो असे त्यांचे ठाम मत होते. तसेच सामाजिक लोकशाहीच्या प्रस्थापनेशिवाय राजकीय व आर्थिक लोकशाही प्रस्थापित होऊ शकणार नाही यावर रानडयांचा दृढ विश्वास होता.

राष्ट्र सुधारकाने विधायक सुधारणा करणे कसे आवश्यक आहे हे समजवून सांगताना न्या. रानडे म्हणतात. ‘‘तुमची समाजपध्दती विशेष व न्याय यावर आधारलेली असल्याशिवाय तुम्ही राजकीय अधिकारांचा उपभोग घेण्यास लायक ठरणार नाही. तसेच तुमची समाजव्यवस्था चांगली असल्याखेरीज तुमची आर्थिक परिस्थिती चांगली असणे शक्य नाही तुमची धर्मविषयक ध्येये जनहित व निकृष्ट असतील तर सामाजिक, आर्थिक किंवा राजकीय क्षेत्रात तुम्हाला यश मिळणे शक्य नाही. हे परंपरापासून योगायोगाने चालत आले नसून हा निसर्ग नियमच आहे.’’

न्या. रानडेंच्या मते, जे भूतकालीन चांगले विचार व परंपरा आहेत त्यांचा स्वीकार करावा. जे विवेक बुध्दीला पटत नाही, व ज्या परंपरा सामाजिक परिस्थितीशी मेळ बसत नाही. त्या टाकून देणे गरजेचे आहे आणि टाकून दिलेल्या परंपरा आणि विचारांच्या जागी नवे विचार आणि परंपरा निर्माण करणे म्हणजे सामाजिक सुधारणा होय असे रानडे म्हणत.

**तत्कालीन सामाजिक परिस्थितीची निरिक्षणे :–**

न्या. रानडे यांनी तत्कालीन समाजाचे सुक्ष्म निरिक्षण व अध्ययन केले होते. त्यातून त्यांनी पुढील निरिक्षणे नोंदविली आहेत.

१) समाजव्यवस्थेवर जातीव्यवस्थेचा प्रभाव असल्याने समाजजीवन एकसंघ नव्हते. त्यामुळे सामाजिक ऐक्य नष्ट झाले.

२) अमानवी, विकृत अशा सामाजिक रचनेमुळे आर्थिक विषमता निर्माण झाली. शिक्षण विशिष्ट वर्गाची मक्तेदारी बनून शिक्षणाचे दरवाजे इतरांसाठी बंद झाले.

३) समाज जाचक रुढी, प्रथा, परंपरा, चालीरिती यामध्ये गुरफटला गेला होता. ज्यामध्ये बालविवाह, जरठ–कुमारी विवाह, सती, केशवपन, विधवा पुनर्विवाहास बंदी यासारख्या गोष्टींचा समावेश होतो.

४) धर्मावर उच्चवर्णियांचे प्राबल्य वाढले. त्यामुळे धर्माच्या नावांवर कनिष्ठ वर्गीयांची मोठ्या प्रमाणावर लुबाडणूक झाली.

५) समाजात स्त्रियांची स्थिती अत्यंत हालाखीची होती. बालविधवांचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर होते. स्त्रिया आर्थिकदृष्ट्या पुरुषांवर अवलंबून होत्या. पशूहीन जीवन स्त्रियांच्या वाट्याला आले होते.

अशारितीने तत्कालीन समाजाचे चित्र अत्यंत निराशाजनक होते. यामध्ये दुष्ट परंपरा, धर्माचे प्राबल्य, सामाजिक मागासलेपण, चौकसबुध्दीचा अभाव, जातीव्यवस्था, केशवपन, बहुपत्नीत्व, स्त्री शिक्षणावर बंदी इ. बाबीं न्या. रानडे कुटुंब व्यवस्थेतील दोष तसेच समाजव्यवस्थेतील दोष या परिप्रेक्ष्यातून पाहत होते.

न्या. रानडेंच्या काळात राष्ट्रीय सभेच्या जहाल गटाचे म्हणणे असे होते की, स्वातंत्र्य प्राप्तीनंतर सामाजिक आणि आर्थिक सुधारणा आपोआप घडून येतील. न्या. रानडे यांना हि गोष्ट मान्य नव्हती. त्यांच्यामते, सामाजिक सुधारणा करुन भारतातील लोकांची मनोभुमिका तयार केली तर स्वातंत्र्य प्राप्तीला वेळ लागणार नाही.

न्या. रानडे यांच्यामते, भारताची सर्वांगीण उन्नती घडवून आणण्यासाठी भारतीय समाजाचे स्थितीप्रिय स्वरुप बदलले पाहिजे. भारतीय समाजाची स्थितीप्रिय मानसिकता त्याच्या प्रगतीमधील सर्वांत मोठा अडथळा आहे असे त्यांचे मत होते. सामाजिक सुधारणाच्या पध्दती विशद करताना ते म्हणतात, सामाजिक सुधारणा मंद गतीने होत असतात. परिवर्तन हे कधीच तात्काळ घडवून येत नाही. त्यासाठी न्या. रानडे यांनी पुढील तीन मार्ग सुचविले आहेत.

**१) पारंपारिक पध्दती :–** रानडेंच्या मते, भारतीय समाज मनावर धर्माचा व दैववादाचा मोठा पगडा आहे. त्यामुळे अपेक्षित सामाजिक सुधारणा या धर्मविरोधी नसून धर्मशास्त्रसंमत अशा प्राचीन ग्रंथाच्या आधारे आहेत हे पटवून देणे होय. जून्या चालिरिती, रुढींचा अर्थ बदलत्या परिस्थितीनुसार बदलणे होय. मात्र बालहत्या, सतीची चाल या रुढींना रानडेंचा विरोध होता.

**२) विवेक पध्दती :–** या पध्दतीमध्ये समाजामध्ये ज्या अनिष्ट प्रथा, परंपरा आहेत त्यांचे वाईट परिणाम लोकांच्या लक्षात आणून देवून त्याऐवजी ज्या पद्धती विवेक बुध्दीला पटतील त्या स्वीकारण्यास लोकांना भाग पाडणे.

**३) कायदा पध्दती :–** न्या. रानडे यांच्यामते, जर पारंपारिक आणि विवेक पध्दतीने सुधारणा घडवून आणणे शक्य नसल्यास कायद्याचा आधार घेऊन सुधारणा घडवून आणाव्यात. थोडक्यात ज्या त्रुटी समाजविघातक आहेत त्या बंद करण्यासाठी सरकारला कायदा करण्यास भाग पाडून समाजपरिवर्तन घडवून आणावे. या संदर्भातील क्रियाशील कृती करताना न्या. रानडे यांनी ब्रिटिश सरकारला कायदा करण्यास सांगून पुढील गोष्टी अंमलात आणण्याची सुचना केली होती.

१) मुलांच्या लग्नाचे वय १६ किंवा १८ वर्षे असावे तर मुलींच्या लग्नाचे वय १० किंवा १२ वर्षे असावे. हे काम लोकल बोर्ड किंवा नगर पालिकेकडे द्यावे.

२) वयोवृद्ध पुरुषांनी कुमारिकेशी किंवा अल्पवयीन मुलांनी अधिक वयाच्या मुलीशी विवाह करू नयेत.

३) अविवाहित राहणाऱ्या विद्यार्थ्यांना विश्वविद्यापीठाने पदव्या द्याव्यात.

अशाप्रकारे न्या. रानडे यांनी सामाजिक सुधारणेच्या पध्दती स्पष्ट करून हिंदू समाजातील दोष दूर करण्याचा प्रयत्न केला.

**२.२.२.४ न्या. रानडे यांचा राजकीय उदारमतवाद :–**

न्या. रानडेंची राजकीय विचारसरणी उदारमतवादावर आधारलेली होती. तत्कालीन महाराष्ट्रात वाढू लागलेल्या सुधारणांना तात्विक अधिष्ठान मिळवून देण्याचा पहिला प्रयोग न्या. रानडेंनी केला होता. न्या. रानडे यांचे सामाजिक तत्वज्ञान पाश्चात्य विचाराने प्रेरित होते. त्यांच्या सामाजिक तत्वज्ञानात बुध्दिप्रामाण्य, व्यक्तीस्वातंत्र्य, परधर्मसहिष्णूता, कर्तव्यबुध्दी यांना महत्वाचे स्थान होते. त्यांनी भारत व पश्चिमात्य या भिन्न विचारसरणीमध्ये ज्या बाबी स्वीकारण्यायोग्य आहेत त्यांचा समन्वय साधताना भारतात राजकीय उदारमतवादाची परंपरा सुरू केली. इंग्लडमधील ॲडम स्मिथ व बेन्थॅम या विचारवंताचे समकालीन न्या. रानडे होते त्यामुळे या दोघांनी मांडलेल्या उदारमतवादी विचारसरणीला साजेशी अशी उदारमतवादी विचारसरणी रानडेंनी मांडली होती.

पाश्चात्य उदारमतवादी विचारसरणी स्वीकारल्याशिवाय भारताची प्रगती होणार नाही अशी न्या. रानडे यांची खात्री होती. व्यक्तीस्वातंत्र्य, विवेकप्रधान कार्याचे श्रेष्ठत्व, सनदशीर शासन आणि स्वातंत्र्य प्राप्तीसाठी राजकीय सहभाग यांस अनुसरुन रानडेंनी आपले राजकीय तत्वज्ञान भारतीयांपुढे ठेवले.

न्या. रानडे यांच्यामते, व्यक्तीने आपल्या सद्सद्विवेकबुध्दीनुसार वागावे. त्यांच्यामते, सर्वांगीण प्रगतीचे मूळ नैतिक प्रगतीत असते. वाईटातून नेहमी चांगले निर्माण होते. यावर रानडे यांची श्रध्दा होती. त्यांच्यामते, परकीय आक्रमणांमुळे देशाचे पुनरुज्जीवन झाले. देशाची नैतिक पातळी उंचावली. सध्या ब्रिटिशांचे राज्य भारतावर आहे तेंव्हा येथील लोकांनी ब्रिटिशांकडून चांगले गुण, कला, शास्त्र अवगत करून आपली प्रगती घडवून आणावी. देशाने जर उदारमतवादी विचारांचा स्वीकार केला तरच देशाची प्रगती होईल असे त्यांचे मत होते.

प्रागतिकत्वाची व्याख्या करताना न्या. रानडे म्हणतात, वंशभेद किंवा जातीभेद न मानता समाजात समानता व न्याय प्रस्थापित करणे होय. त्यांच्यामते, जातीपाती, वंशभेद या दुराभिमानापासून मुक्त होऊन मनुष्य मनुष्यात न्याय प्रस्थापित करण्याच्या मार्गांना पाठिंबा देणे म्हणजे उदारमतवाद होय. तसेच अशक्य व दुरस्थ ध्येयाच्या मागे न लागता तडजोड व समन्वय वृत्ती धारण करून पावला पुरताच विचार करणे म्हणजे नेमस्तपणा होय.

इंग्लडमधील लिबरल पक्षाच्या धर्तीवर भारतामध्येही लिबरल पक्ष निर्माण व्हावे अशी न्या. रानडे यांची धारणा होती. त्याकाळी इंग्लडमधील लिबरल पक्षात जहाल व मवाळ असे दोन गट होते. परंतु न्या. रानडे यांना जहाल मार्ग पसंद नव्हता. रानडेंच्या मते, कायद्याचे राज्य हि ब्रिटिशांनी भारतीयांना दिलेली मोठी देणगी आहे. त्यामुळे ब्रिटिशांविरोधात भुमिका घ्यायची नाही. न्या. रानडे हे धार्मिक व अध्यात्मवादी वृत्तीचे विचारवंत होते. त्यामुळे देशामध्ये घडणाऱ्या राजकीय व ऐतिहासिक घडामोडींकडे ते ईश्वरी संकेत या दृष्टीकोनातून पाहत होते. भारतामध्ये कायद्याचे राज्य प्रस्थापित करून शांतता व सुव्यवस्था निर्माण व्हावी.

या हेतूने परमेश्वरानेच ब्रिटिशांना या देशात पाठविले होते अशी त्यांची धारणा होती. तसेच ब्रिटिशांनी भारतीयांना समानतेची वागणूक द्यावी व हिंदी जनतेने ब्रिटिश राज्यांशी एकनिष्ठ रहावे आणि कायद्याचे पालन करावे अशी त्यांची इच्छा होती. रानडेंना त्याकाळी प्रचलित असणाऱ्या रुढी, धार्मिक कल्पना यावर टिका करणे पसंत नव्हते. त्यामुळेच त्यांनी धर्मकल्पना व परंपरा यांना न डिवचता हळुवारपणे ब्रिटिशांच्या संपर्काने राजकीय व सामाजिक सुधारणा घडवून आणण्याचे उदारमतवादी धोरण स्विकारले.

थोडक्यात उदारमतवादी राज्याच्या प्रस्थापनेसाठी कायद्याचे राज्य, व्यक्तीस्वातंत्र्य, धार्मिक सहिष्णूता, राज्यसंस्थेची कर्तव्ये व प्रतिनिधीक संस्था असे न्या. रानडे यांच्या उदारमतवादाचे स्वरुप होते.

न्या. रानडे यांच्या उदारमतवादात काही दोषही आढळून येतात.

१) न्या. रानडे एकीकडे ब्रिटिश राज्यसंस्थेचे अस्तित्व देशावर मान्य करतात. व्यक्तीस्वातंत्र्याचा पुरस्कार करतात तर दुसरीकडे ब्रिटिशांची हुकुमशाही सत्ता देशावर मान्य करतात. हा विरोधाभास त्यांच्यात आढळतो.

२) न्या. रानडे उदारमतवादी होते. रूढी परंपरांना विरोध करीत होते. मात्र रूढी, परंपरांना सोडू शकले नाहीत.

३) न्या. रानडे यांनी व्यक्तीस्वांतत्र्य, व्यक्तीविकासाचा विचार मांडला. तसेच समाजजीवनात राज्याचा हस्तक्षेप मान्य केला. जेथे राज्याचा हस्तक्षेप तेथे व्यक्ती स्वातत्र्यांचा संकोच होतो.

न्या. रानडे हे उदारमतवादी स्वातंत्र्याचा पुरस्कार करणारे राजकीय विचारवंत होते. उद्योग, शेती, आर्थिक विकास यासाठी राज्याने पुढाकार घ्यावा असे त्यांचे मत होते. यावरुन त्यांच्या उदारमतवादी विचारांची प्रामुख्यांने ओळख होते.

### २.२.२.५ न्या. रानडे यांचे आर्थिक विचार :–

न्या. रानडे हे एक थोर अर्थशास्त्रज्ञ देखील होते. त्यांनी तत्कालीन आर्थिक स्थितीचा सखोल अभ्यास केला. त्यांच्यामते, कोणत्याही प्रश्नाला सामाजिक, आर्थिक, राजकीय असे तीन पैलू असतात. त्या आधारावर त्यांनीं आपल्या आर्थिक विचारांची मांडणी केल्याची दिसते.

न्या. रानडे यांनी पाश्चात्य विचारवंत ॲडम स्मिथ, रिकार्डो यांच्या आर्थिक विचारांवर टिका केली आहे. त्यांच्यामते, या विचारवंतांनी मांडलेले आर्थिक विचार अमूर्त स्वरुपाचे असून ते जगातील कोणत्याही देशाच्या प्रगत आर्थिक व्यवहारांशी मेळ बसत नाहीत. या सिध्दांताच्या सर्वांगीण प्रभावाचा दावा कसा चुकीचा आहे हे स्पष्ट करताना रानडे म्हणतात, हे सिध्दांत कोणत्याही देशाच्या आर्थिक जीवनास लागू होत नाहीत. त्यांनी गृहित धरलेली तत्वे विकसित देशांना लागू पडत नाहीतच. शिवाय भारतासारख्या अविकसित देशाला या गृहितकांचा केवळ अभावच नाही. तर त्याच्या अगदी विरोधी स्थिती तेथे आहे. त्यांच्यामते भारतासारख्या देशात कुटुंब आणि जात हे घटक व्यक्तींच्या स्वयंविकासावर मर्यादा घालतात. ज्या मानवी प्रवृत्तींना स्थिर व सार्वत्रिक मानून आर्थिक सिद्धांताची मांडणी केली गेली त्या प्रवृत्तीच या ठिकाणी उपलब्ध

नाहीत त्यामुळे हा सिध्दांत कसा लागू पडेल? असा प्रश्न न्या. रानडे उपस्थित करतात. या शिवाय ते म्हणतात, या आर्थिक पंथाचा जन्म ज्या भूमित झाला ती अर्थव्यवस्थाच या सिध्दांताला गंभीर आव्हान देत असल्याचे दिसून येत आहे.

अशारितीने न्या. रानडेंनी पाश्चात्य आर्थिक विचारवंतांच्या मुलभूत गृहितकांनाच आव्हानित केले आहे.

न्या. रानडे यांच्यामते, भारताला शतकानुशतके दारिद्र्याचा शाप आहे. यासाठी ते ब्रिटिशपूर्व कालखंडातील स्थानिक राज्यकर्ते, सावकार, जमीनदार यांना जबाबदार धरतात. भारताच्या दैन्यावस्थेसाठी त्यांना दादाभाई नौरोजी यांनी मांडलेला प्रवाह शोषणाचा सिद्धांतदेखील मान्य नव्हता. ते म्हणतात, ''ब्रिटिश राज्यकर्त्यांनी आपल्या देशाची आर्थिक लूट करताना देशातून पैसा नेला आणि त्यामुळे देशाला दरिद्री अवस्था प्राप्त झाली असे असले तरी पैशाची खरी लुट भारतातील सावकारी पध्दतीने झाली आहे असे त्यांचे ठाम मत होते. त्यांनी भारताच्या आर्थिक दारिद्र्याची खरी कारणे पुढील प्रमाणे सांगितली आहेत.''

१) देशाची अर्थव्यवस्था शेतीवर पुर्णतः आधारित आहे.

२) भारतीयांमध्ये उद्योग, व्यापारासाठीची धाडसी प्रवृत्ती नाही.

३) उद्योगधंद्यासाठीचा भांडवल तुटवडा या ठिकाणी आहे.

४) वाढत्या लोकसंख्येच्या प्रमाणात उद्योगधंद्याची वाढ देशात झाली नाही.

५) पिढीजात परंपराप्रिय समाजव्यवस्थेमुळे खेडी सुधारली नाहीत.

६) भारतातील जनता सावकारी पाशात पुर्णतः अडकली होती. त्यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती अधिकच खालावली.

७) तंत्रज्ञानाचा अभाव इथे दिसून येतो इ.

न्या. रानडे यांनी केवळ आर्थिक दैन्यावस्थेची कारणे सांगितली असे नाही तर आर्थिक प्रगतीसाठी विधायक स्वरुपाचे कार्यही केले. १८९० साली रानडेंनी पश्चिम हिंदुस्थानात औद्योगिक परिषद भरविली होती. त्यामुळे औद्योगिक प्रगतीला चालना मिळाली. तसेच १८९२ साली हिंदी अर्थशास्त्रावर लेख लिहून त्या माध्यमातून ब्रिटिश सरकारने भारतातील आर्थिक प्रश्नाकडे कोणत्या दृष्टीकोनातून पहावे. यासंदर्भात मार्गदर्शक सुचनाही केल्या होत्या.

न्या. रानडे यानी हिंदी अर्थशास्त्राचा पाया घालताना फ्रेडरिक लिस्टे या अर्थशास्त्रज्ञांच्या विचारांचा आधार घेतला होता. त्यांना व्यक्तीवादी खुल्या स्पर्धेचे अर्थशास्त्र मान्य नव्हते. त्यांच्यामते, भारत हा कृषीप्रधान देश आहे. तसेच तो मागासही असल्याने खुल्या स्पर्धेचे तत्वज्ञान येथे उपयुक्त ठरणार नाही. त्यासाठी सामाजिक व वास्तववादी दृष्टीकोनातून भारताच्या आर्थिक विकासाकडे पाहिले पाहिजे असे त्यांचे मत होते.

न्या. रानडे यांनी भारतातील दारिद्र्याची सखोल मीमांसा केली. इतकेच नव्हे तर या देशातून दारिद्र्य कसे दूर करता येईल यावर उपाय ही सुचविल आहेत.

**दारिद्र्य निमूर्लनाचे उपाय :–**

१) आर्थिक विकासासाठी शेती बरोबरच उद्योग, व्यवसाय इ. बाबींचे नियोजन केले पाहिजे कारण औद्योगिकीकरणामुळे रोजगार निर्मिती होऊन शेतीवरील लोकसंख्येचा भार कमी होईल.

२) रानडेंच्या मते, सरकारने देशात अवजड व मोठमोठे उद्योगधंदे सुरू करावेत म्हणजे त्याआधारे देशी लघुउद्योगांना चालना मिळण्यास मदत होईल. तसेच त्यांनी मुक्त अर्थव्यवस्थेला विरोध केला.

३) त्यांच्यामते, उद्योगधंद्यासाठी जे भांडवल आवश्यक आहे. त्याची उभारणी भारतातच झाली पाहिजे.

४) भारतात तयार होणाऱ्या मालाला आंतरराष्ट्रीय बाजारपेठ उपलब्ध झाली पाहिजे. तसेच आंतरराष्ट्रीय व्यापारही वाढविला पाहिजे.

५) न्या. रानडेंच्या मते, खेड्यातील अज्ञान, अंधश्रध्दा, मागासलेपण, निष्क्रियता इ. वाईट प्रवृत्ती समूळ नष्ट झाल्या पाहिजेत. आधुनिक दृष्टीकोनाचा लोकांनी स्वीकार केला पाहिजे. शिवाय देशात शहरीकरणाची प्रक्रिया झपाट्याने झाली पाहिजे असे त्यांचे मत होते.

६) भारत हा प्रामुख्याने शेतीप्रधान देश आहे. तेंव्हा शेतीचे आधुनिकीकरण झाले पाहिजे. उत्पादन वाढीसाठी शेतकऱ्यांना आधुनिक अवजारे, बी–बियाणे, खते यांचा भांडवल पुरवठा केला पाहिजे. बँकांची स्थापना केली पाहिजे. शेती उत्पन्न वाढीसाठी आवश्यक असे प्रगत तंत्रज्ञान शेतकऱ्यास पुरविले पाहिजे.

७) अशारितीने न्या. रानडे यांनी भारतातील दारिद्र्यावर विविध उपाय सुचवून देशातील आर्थिक प्रगतीला चालना दिली म्हणूनच त्यांना 'भारताच्या अर्थशास्त्राचे जनक' असे संबोधले जाते.

**२.२.२.६ न्या. रानडे यांचे हिंदी राष्ट्रवादविषयक विचार :–**

न्या. रानडे हे नेमस्त राष्ट्रवादी विचारवंत म्हणून प्रसिध्द होते. जहाल–मवाळ संघर्षात त्यांच्या राजकीय भूमिकेशी एकनिष्ठ होते. देशातील लोकांना राजकीयदृष्ट्या जागृत करून त्यांना एकत्रित आणण्याचे वैचारिक कार्य न्या. रानडे यांनी आपल्या कार्य व भुमिकेच्या माध्यमातून सातत्याने सुरू ठेवले होते.

न्या. रानडे यांच्यामते, ब्रिटिशांनी भारतावर आक्रमण केले. या ठिकाणी आपली सत्ता स्थिर केली. त्यामुळे भारतीय जनतेला त्यांच्या कर्तृत्वाचा विसर पडला. त्यांच्यामध्ये शैक्षणिक, नैतिक, सांस्कृतिक दुर्बलता निर्माण झाली. तेंव्हा भारतीयांना त्यांच्या भूतकाळातील त्यांच्या मोठेपणाची व पराक्रमाची आठवण करून देणे हे आपले राष्ट्रीय कर्तव्य आहे. शिवाय तेच आपल्या हिताचे आहे असे न्या. रानडे यांचे मत होते.

न्या. रानडे यांच्यामते, ब्रिटिश राजवटीपूर्वी भारतीय जनतेत राष्ट्रीय भावनेचा अभाव होता. परकीय आक्रमण, अस्थिर शासनपध्दती, लोकशाहीचा अभाव, राजकीय जागृतीचा अभाव यामुळे देशात राष्ट्रीयत्वाची भावना जोपासली गेली नाही. ब्रिटिशांची सत्ता देशावर प्रस्थापित झाल्यानंतर सर्व भूप्रदेश प्रथमच एका सार्वभौम सत्तेच्या नियंत्रणाखाली आला. त्यामुळे देशातील जनतेलाही प्रथमच एकत्रीकरणाचा अनुभव घेता आला. हा अनुभव राष्ट्रवादाची भावना जागृत करण्यासाठी अधिक उपयुक्त ठरला. त्यातुनच देशात देशाभिमानाची वृत्ती वाढीस लागली. त्यामुळे असे म्हणता येईल की, पारंतत्र्यामुळे देशात राष्ट्रीयत्वाची भावना वाढीस लागण्यास मदत झाली. ब्रिटिश अंमलापुर्वी काही राजवटीत देशात एकराष्ट्राची कल्पना अस्तित्वात होती. परंतू देशातील अगदी सामान्य जनतेपर्यंत एकराष्ट्रीयत्वाची भावना निर्माण करण्याचे काम प्रामुख्याने ब्रिटिशांच्या आगमनानंतरच झाले असे न्या. रानडे यांचे मत होते. ब्रिटिशांमुळे भारतीयांना पाश्चात्य शिक्षण घेता आले. त्यामुळे स्वातंत्र्य, समता, बंधुभाव या मानवी मुल्यांची लोकांना नव्याने जाणीव झाली. त्यातुन राष्ट्रीय भावना वृध्दीगंत करण्यास मदत झाली.

न्या. रानडे यांच्यामते, आपणांस जर स्वातंत्र्य मिळवायचे असेल तर प्रथम आपण राष्ट्रीय सुधारणेकडे लक्ष दिले पाहिजे. पण त्यासाठी आपण आपल्यातील दोष दूर करणे आवश्यक आहे. जसे आपण धार्मिक गोष्टीत अडकून राहिलो. त्यामुळे आपली सर्व पातळीवर प्रगती खुंटली जाईल. आपल्यातील मतभेदामुळे बंडखोरवृत्ती व राष्ट्रद्रोह याला व्यापक अधिष्ठान प्राप्त होईल. देशाची एकता, एकात्मता नष्ट होऊन परकीय लोक आपल्यावर वर्चस्व गाजवतील. त्यामुळे या सर्व घातक प्रवृत्तींचे समूळ निर्मूलन करावयास पाहिजे. त्याखेरीज आपण स्वतंत्र होऊ शकणार नाही असे न्या. रानडे यांचे मत होते.

राष्ट्रीय चळवळीला कायमस्वरुपी तसेच व्यापक अधिष्ठान प्राप्त व्हावे यासाठी नेत्यांनी राष्ट्राच्या सर्वांगीण विकासाच्या योजनांची आखणी करावी असे न्या. रानडे यांचे मत होते. या योजनेमध्ये जातीभेद, धर्मभेद, वंशभेद यासारख्या अडथळ्यांना बाजूला केले पाहिजे. तसेच आधुनिक विज्ञान-तंत्रज्ञान व शास्त्रीय संशोधनाचा फायदा औद्योगिक क्षेत्रात करून द्यावा असेही त्यांचे मत होते. सरकारी नोकरीत असल्यामुळे न्या. रानडे यांच्या कार्यावर बऱ्याचशा मर्यादा येत होत्या. त्यामुळे राष्ट्रीय जनजागृती यापलिकडे त्यांना फारशी कृती करता आली नाही. त्यांनी सर्व जाती धर्माच्या लोकांच्या मनात एकराष्ट्रीयत्वाच्या भावनेला जागृत करुन राष्ट्रीय पुनर्घटनेच्या कार्यक्रमाचा पाया घातला. थोडक्यात देशातील सर्व समाजघटकांची प्रगती म्हणजे संपूर्ण देशाची प्रगती असे ''हिंदी राष्ट्रवादाचे ध्येय'' त्यांनी मांडले. तसेच राष्ट्रीय सभेशी त्यांचा निकटचा संबंध होता त्यामुळे तिचे ध्येय धोरण ठरविण्यामध्ये त्यांनी भाग घेतला.

### २.२.२.७ न्या. रानडे यांच्या विचारांचे मूल्यमापन :-

न्या. रानडे हे १९ व्या शतकातील एक श्रेष्ठ सामाजिक, राजकीय, आर्थिक विचारवंत म्हणून ओळखले जातात. त्यांनी भावनिक होऊन कोणतेही विधान केले नाही. त्यामुळे त्यांचे विचार चिरकालीन टिकणारे आहेत. आधुनिक भारताच्या निर्मितीत त्यांचा सिंहाचा वाटा आहे. भारतीय संस्कृतीची परंपरा आणि आधुनिक पाश्चात्य संस्कृती यांचा सुरेख मेळ या गोष्टींचे महत्व त्यांनी अचुकतेने ओळखले होते.

त्यामुळे भारतीय व पाश्चात्य संस्कृतीतील चांगल्या गोष्टी जर एकत्रित केल्या तर एका सुंदर संस्कृतीचा अविष्कार होईल असे त्यांचे मत होते.

१) लोकमान्य टिळक, न्या. रानडे यांचा उल्लेख करताना म्हणतात "महाराष्ट्र देश हा त्यावेळी एक थंडगोळा होऊन पडला होता. त्याला सजीव करण्याचे दुर्धर काम न्या. रानडे यांनी केले."

न्या. रानडे यांनी महाराष्ट्राच्या जडणघडणीत मोलाची भर घातली व एक नव चैतन्य निर्माण केले.

२) न्या. रानडे यांनी सामाजिक सुधारणेबरोबर धार्मिक सुधारणांनाही महत्वाचे स्थान दिले होते.

### २.२.२.८ सारांश :–

न्या. रानडे यांचा राष्ट्रीय सभेच्या स्थापनेत मोठा वाटा होता. त्यांचा पिंड राजकीय नसला तरी ते प्रागतिक, नेमस्त व उदारमतवादी राजकीय विचारांचा पुरस्कार करणारे नेते होते. त्यांना समाजसुधारणेची आत्यंतिक तळमळ होती. त्यांनी प्रार्थना समाज, सार्वजनिक सभा यासारख्या सामाजिक संघटनांच्या माध्यमातून समाजजागृतीचे कार्य केले. तसेच त्यांनी भारताच्या प्रागतिक राजकारणाचा व हिंदी अर्थशास्त्राचा पाया घालण्याचे महत्वपूर्ण कार्य केले म्हणून त्यांना 'आधुनिक भारताचे जनक' असे संबोधले जाते.

## २.२.३ जी.के. गोखले (१८६६–१९१५)

भारतीय स्वातंत्र्य चळवळीत प्रामुख्याने दोन मतप्रवाह होते. जहाल व मवाळ यातील मवाळ किंवा नेमस्त प्रवाहाचे एक महत्वाचे नेते म्हणून गोपाळ कृष्ण गोखले ओळखले जातात. राष्ट्रवादी, धर्मनिरपेक्ष व उदारमतवादी व्यक्तीत्व म्हणून त्यांची प्रामुख्याने ओळख होती. गोखले विचाराने क्रांतीकारक पण प्रत्यक्ष कृतीकार्यात मवाळ धोरण अवलंबणारे होते. परिवर्तन हिंसेच्या मार्गाने त्यांना नको होते. आपल्या जीवनात नैतिक मुल्यांना त्यांनी प्राधान्यक्रम दिला होता. राजकारणात सक्रिय असूनही त्यांना सत्तेची अभिलाषा नव्हती. गोखलेंनी म.गांधी यांना आपले राजकीय गुरु मानले होते. संविधानिक व मवाळ मार्गावर त्यांचा विश्वास होता. आपल्या कार्य व विचारांच्या माध्यमातून त्यांनी भारतीय सामाजिक व राजकीय व्यवस्थेत नवविचारांचा पाया घातला. त्यामुळे भारताला स्वातंत्र्य मिळण्याचा मार्ग सुकर झाला.

### २.२.३.१ जीवनपरिचय :–

भारतीय स्वातंत्र्य लढयातील एक महान नेते गोपाळ कृष्ण गोखले यांचा जन्म ९ मे १८६६ रोजी रत्नागिरी जिल्ह्यातील 'कोतलूक' या गावी झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण कागल येथे तर उच्चशिक्षण कोल्हापूर व मुंबई येथे पार पडले. बी.ए. उत्तीर्ण झाल्यानंतर त्यांनी पुण्याच्या डेक्कन एज्युकेशन सोसायटीत शिक्षकाची नोकरी पत्करली. त्यानंतर १८८४ ला पुण्यातील फर्ग्युसन कॉलेजमध्ये इतिहास व अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून रुजू झाले. तसेच त्यांनी सार्वजनिक सभेच्या चिटणीस व सभेच्या त्रैमासिकाचे संपादक म्हणून कार्य केले.

१९०५ च्या बनारस येथे पार पडलेल्या काँगेस अधिवेशनाचे ते अध्यक्ष होते. त्याचवर्षी त्यांनी 'भारत सेवक समाजाची' स्थापना केली. देशसेवेसाठी संपूर्ण आयुष्य खर्ची घालणारे एक आदर्श सेवक म्हणजे गोपाळ कृष्ण गोखले होत. कायदेमंडळाचे सदस्य असताना त्यांनी भारतीयांना आवश्यक असे कायदे मिळवून देण्याचा प्रयत्न केला. गोखलेंनी न्या. रानडे यांना आपले गुरु मानले होते. राजकीय कार्याबरोबरच अस्पृश्यता निमूर्लन, जाती निर्मूलन, स्त्रीस्वातंत्र्य, स्त्री-शिक्षण इ. बाबीसंबंधी त्यांनी भरीव असे कार्य केले आहे. हायलँड यांनी गोखले यांची तुलना काव्हूरांशी केली होती. कारण काव्हूरांप्रमाणेच गोखलेंची कार्यपध्दती होती जसे प्रस्थापित यंत्रणेतील दोष काय आहेत. ते कसे दूर करता येतील. तसेच शक्य कोटीतील गोष्ट कोणती आहे ती साध्य करण्यासाठी कसे प्रयत्न करता येतील यादृष्टीने ते प्रयत्न करीत असत.

### २.२.३.२ गोखलेंचे राजकीय विचार :-

नामदार गोखले एक प्रसिध्द राजनितिज्ञ म्हणून ओळखले जातात. राजकारणाविषयी त्यांचा एकंदरीत दृष्टीकोन उदारमतवादी आणि नैतिक होता. देशसेवा करण्यासाठी सार्वजनिक कार्य व राजकीय कार्य असे दोन मार्ग आहेत असे त्यांचे ठाम मत होते. त्यामुळेच त्यांनी आपले संपुर्ण आयुष्य देशसेवा आणि समाजसेवेसाठी समर्पित केले. त्यामुळे त्यांच्या विचारात पारंपारिक तत्वज्ञानाची छटा जाणवत नाही.

त्यांच्या लेखनाचा बराचसा भाग तत्कालीन गरजा, सार्वजनिक जीवनातील मागण्या, शासकीय धोरणे, लोकशिक्षण या संदर्भात आहे. शिवाय त्यांच्या लेखनातून शासनाची भुमिका व कार्ये प्रकट होते. ना. गोखले उदारमतवादी नेते होते. मात्र त्यांचा उदारमतवादी दृष्टीकोन पाश्चात्यांचे अंधानुकरण करत नाही. त्यामुळे देशातील दैनंदिन समस्येकडे देखील ते उदारमतवादी दृष्टीने पाहतात.

ना. गोखलेंच्या मते, शासन संस्थेची निर्मिती मानवाकडून व मानवासाठीच झाली आहे. त्यामुळे मानवाला आपल्या इच्छेप्रमाणे ती बदलण्याचा अधिकार आहे. हे गोखलेंच्या राजकीय विचाराचे मूळ सुत्र आहे. त्याच्यामते राजकीयदृष्ट्या सर्व व्यक्ती समान आहे. त्यामुळे शासनही विविध गटासाठी, वर्गासाठी नसून संपूर्ण समाजासाठी आहे. त्यामुळे नि:पक्षपातीपणे विभिन्न गटातील, वर्गातील संघर्ष मिटवणे हि शासनाची जबाबदारी आहे. ना. गोखले घटनात्मक मार्गावर विश्वास असणारे उदारमतवादी विचारवंत होते. कोणत्याही गोष्टीला तीव्र व सरळ प्रतिकार करणे त्यांना मान्य नव्हते. त्यामुळेच प्रत्येक गोष्ट ते अत्यंत सावधगिरीने आणि विवेकानुसार करीत असत. ब्रिटिशांच्या उदारता, न्यायबुध्दी आणि नि:पक्षपातीपणावर त्यांचा विश्वास होता. त्यामुळे देशात ब्रिटिश शासनाची आणखी काही काळ गरज आहे. हे त्यांनी पुढील काही मुद्यांच्या आधारे पटवून दिले आहे.

१) राष्ट्रनिर्मितीसाठी लोकांच्या मनात ऐक्याची भावना निर्माण झाली पाहिजे. तसेच समाजस्वातंत्र्य, सुशिक्षित बनने आवश्यक आहे. भारतीयांचा नैतिक व बौद्धिक विकास साधनेही गरजेच आहे.

२) भारतीयांना स्वत:चा राज्यकारभार स्वत: चालविता येण्यासाठी स्वातंत्र्य मिळविण्यासाठी तसेच मिळविलेले स्वातंत्र्य टिकविण्यासाठी सुशिक्षित, शहाणे करणे गरजेचे आहे. त्यासाठी ब्रिटिश सत्ता या देशात काही काळ आवश्यक आहे असे गोखलेंचे मत होते.

३) गोखलेंचा सनदशीर मार्गावर विश्वास होता. त्यामुळे ब्रिटिशांना उघड-उघड विरोध करणारा जहाल, क्रांतीकारक मार्गाला त्यांनी विरोध केला. त्याच्यामते, देशात शांतता, सुव्यवस्था निर्माण करून सनदशीर मार्गाने स्वातंत्र्य प्राप्त केले पाहिजे.

गोखलेंच्या मते, ब्रिटिशांनी देशात कायदयाचे राज्य निर्माण केले. देशात ब्रिटीशांमुळे एकछत्री अंमल सुरु होऊन देशात शांतता व सुव्यवस्था निर्माण झाली. कायद्यापुढे समानता हे ब्रिटिशांचे तत्व होते. त्यामुळे देशात सुव्यवस्था निर्माण होऊन भारतीयांची बौध्दिक, भौतिक, राजकीय प्रगती होऊ शकली. त्यामुळे हिंसात्मक मार्गाने आपणच आपले नुकसान करुन घेणार. त्यामुळे ब्रिटीश राजवटीच्या साहयाने देशात शांतता, सुव्यवस्था निर्माण करुन सनदशीर मार्गाने स्वातंत्र्य मिळवावे असा सल्ला त्यांनी दिला.

ना. गोखले यांचा जरी ब्रिटीशांच्या उदारमतवादी व न्यायबुध्दीवर विश्वास होता. तरी १५ नोव्हेंबर १९०५ रोजी 'न्यु रिफॉर्म क्लब लंडन' येथे ब्रिटीश राज्यकारभारातील दोष दाखवून ते दोष दूर करण्याचे काही उपाय त्यांनी सुचविले आहेत.

१) ब्रिटीशांनी भारतीयांना सर्वच क्षेत्रात समानतेची वागणूक दयावी.

२) प्रशासनात वरिष्ठ अधिकाऱ्यांची कायमस्वरुपी नेमणूका करुन त्यामधील काही पदे भारतीयांना दयावीत.

३) कायदा, न्याय, राज्यशासन याबाबतीत भारतीय व ब्रिटीश यांच्यात भेद करु नये.

४) देशाची आर्थिक घडी बसविण्यासाठी सनदी नोकर व लष्कर यावरील खर्च कमी करावा इ.

**मध्यमवर्गाची भूमिका :-**

नामदार गोखलेंच्या मते, पश्चिमी शिक्षणाच्या माध्यमातून देशामध्ये सुशिक्षित मध्यमवर्गाची एक शक्ती निर्माण झाली आहे. तिने देशाच्या राजकारणात महत्वाची भुमिका बजावली आहे. या वर्गाच्या एका बाजूला सुस्त अशी सामान्य जनता आहे. तर दुसऱ्या बाजूला नोकरशाही आहे. तेंव्हा अशी परिस्थिती असताना जनकल्याणाच्या योजना हाती घेऊन समाजपरिवर्तन होणार नाही. तर या वर्गाने पुढे आल्याखेरीज खऱ्या अर्थाने देशात समाजजीवन सुखी होणार नाही अशी गोखलेंची धारणा होती. भारतातील मध्यमवर्गीय सुशिक्षितांनी पाश्चात्य देशातील लोकांप्रमाणे सार्वजनिक जीवन संघटीत करावे असा सल्ला ते देतात.

सुशिक्षित वर्गाने केवळ सरकारी नोकरीत गुंतून न राहता त्यांनी स्वत:ला सार्वजनिक कार्यात झोकून दयावे. 'शासकिय सेवा' असा जो 'पब्लिक सर्व्हिसचा' रुढ अर्थ आहे तो बदलून 'जनसेवा' असा अर्थ समजून घेणे तरुणांनी आवश्यक आहे. उच्च विद्या विभूषित अशा विद्यापीठातून बाहेर पडणाऱ्या तरुणांनी केवळ आत्मउन्नती हे ध्येय न ठेवता स्वार्थत्याग करून देशसेवेला वाहून घेणे गरजेचे आहे. या मार्गावर जर अपयश आले तर खचून न जाता कार्यरत रहावे असा उपदेश ते करतात.

देशामध्ये असणाऱ्या पिढयान पिढ्या चालत आलेल्या अज्ञान, अंधश्रध्दा, रुढी, परंपरा, दारिद्र्य यासारख्या अनिष्ट गोष्टी संघटित लोकजीवन निर्माण करण्यास अडथळा निर्माण करतात. त्यासाठी गोखलेंनी पुढील मार्ग सुचविले आहेत.

१) हिंदु धर्मातील अंतर्गत विविध गटात सौदाहर्य निर्माण करावे. तसेच हिंदू-मुस्लिम यांची ऐकी साधावी.

२) व्यक्तीने आपल्या जीवनात उच्च चारित्र्य, उद्दिष्टांसंबंधी दृढ धारणा आणि कृतीत शिस्त निर्माण करावी.

३) जनमाणसात शिक्षणाचा प्रसार करणे. तसेच राष्ट्रभूमीसाठी जीवन समर्पित करण्याची वृत्ती लोकांत निर्माण करावी.

ना. गोखलेंनी सांगितलेली ध्येये जरी उदात्त असली तरी त्यांच्या राष्ट्रीय चळवळीस लोकमताचा अपेक्षित पाठिंबा किंवा यश मिळाले नाही. याची काही कारणे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) ना. गोखले यांनी सामान्य माणसाला केंद्रस्थानी ठेवून जरी कार्य केले असले तरी प्रत्यक्ष या लोकांमध्ये जाऊन कार्य केले नाही. त्यामूळे मूठभर सुशिक्षित वर्गापूरतेच ते मर्यादित राहिले.

२) ना. गोखलेंचे बहुतेक भाषणे व लेखन इंग्रजीत असल्याने ते सामान्यपर्यंत पोहचू शकले नाहीत.

३) ना. गोखलेंचा 'भारत सेवक समाज' प्रादेशिक प्रश्न, प्रवाह व परंपरा यांच्याशी समरस होऊ शकला नाही.

४) सामाजिक सुधारणांबाबत गोखलेंनी पाश्चात्य मुल्यांचा स्वीकार केल्याने त्यांच्यावर इंग्रज धार्जिणेपणाचा आरोप झाला.

गोखलेंनी धर्म व सामाजिक कार्यात भाग घेण्याचे आवाहन केले परंतु प्रत्यक्षात त्यांचा भर राजकारणावरच राहिला. त्यामुळे भारत सेवक समाजाचे ध्येय जरी व्यापक असले तरी त्यांना मोठया प्रमाणात पाठिंबा मिळाला नाही. लोकसंग्रहाच्या अभावी त्यांचे कार्य शेवटी पोरके ठरले. थोडक्यात त्यांच्या लोकमताला आवाहन करण्याच्या प्रयत्नांना मर्यादा पडल्या.

**२.२.३.३ ना. गोखलेंचे स्वदेशी संबंधी विचार :–**

ना. गोखले यांना स्वदेशीची चळवळ मान्य होती. म्हणूनच त्यांनी बंगालमधील स्वदेशी चळवळीला आपला पाठिंबा देताना समाधान व्यक्त केले होते. त्यांच्यामते, स्वदेशी चळवळीला दोन बाजू असतात. त्यापैकी एक शुद्ध देशभक्तीची आणि दुसरी बाजू आहे आर्थिक व्यवहारांची असे त्यांचे मत होते.

**१) शुद्ध देशभक्ती :–**

ना. गोखले यांच्यामते, स्वदेशीमध्ये देशभक्तीचा आंतरभाव असतो देशभक्ती ही अत्यंत उत्कष्ट भावना आहे. जिच्यामुळे देशाभिमान जागृत होत असतो. जेव्हा देशभक्ती जागृत होते. तेंव्हा तेंव्हा त्यामध्ये

उच्चनीच, गरिब-श्रीमंत, शेतकरी-सावकार, राव-रंक अशा कोणत्याही प्रकारचा भेद नसतो. देशभक्तीत देशसेवेला सर्वोच्च प्राधान्य असते.

**२) व्यावहारीक व आर्थिक स्वरुपाची बाजू :-**

ना. गोखलेंच्या मते आपल्या देशात तयार होणाऱ्या वस्तु जर आपण वापरु लागलो तर त्या वस्तुंना बाजार पेठ उपलब्ध होईल. देशी वस्तुंचा खप वाढेल, उत्पादित मालाला गती मिळून देशातील पैसा देशातच राहिल. स्वदेशी वस्तुंचा वापर करुन देशासाठी त्याग करण्याची प्रवृत्ती लोकांत वाढेल. स्वदेशीमालाच्या उत्पादनासाठी आवश्यक असे भांडवल व कौशल्य देशातच उपलब्ध होईल.

ना. गोखले यांचे स्वदेशीबाबत असे मत होते की, जो-जो या कार्यात हात पुढे करील त्याला या चळवळीला सहभागी करुन घ्या. प्रत्येकाच्या आवडीनुसार स्वदेशीचे कार्य करता आले पाहिजे. सर्वांना एकसारखेच काम करण्याची सक्ती नसावी. हातमाग, कापडउद्योगाला अधिक चांगल्याप्रकारे गती मिळायला हवी असे गोखलेंचे मत होते. त्यासाठी भांडवलदार वर्गाने भांडवल पुरवठा करुन उत्तम दर्जाची कापसाची लागवड करण्यासाठी लोकांना प्रोत्साहित केले पाहिजे तरच परदेशी कापडाच्या तोडीचे कापड तयार होईल व स्वदेशी मालाला उठाव मिळेल अशा पध्दतीचे आवाहन ना. गोखले यांनी केले होते.

**३) बहिष्कार :-**

स्वदेशी व बहिष्कार चळवळीबाबत ना. गोखले व लो. टिळक यांचे विचार व मार्ग भिन्न दिसतात. लोकमान्य टिळकांनी स्वदेशीबरोबर बहिष्कार हि दुसरी बाजू म्हणून स्वीकारली होती तर ना. गोखले यांनी स्वदेशीचा स्वीकार केला तर बहिष्कार नाकारला आहे. त्यांच्यामते बहिष्काराचा मार्ग केवळ अनिष्टच नव्हे तर धोकादायकदेखील आहे. ते म्हणतात, देशसेवेसाठी स्वच्छेने स्वार्थत्याग करायचा आणि स्वत: झीज सोसने त्यामध्ये अभिप्रेत आहे. तेंव्हा त्यासाठी बहिष्कार या शब्दाचा वापर करणे अत्यंत चुकीचे आहे असे गोखलेंचे मत होते. बहिष्कार या शब्दाच्या मुळाशी इतरांना हानी पोहचविण्याची द्वेष मूलक प्रवृत्ती असते असे त्यांचे मत होते.

ना. गोखलेंना सार्वत्रिक व राजकीय बहिष्कार मान्य नव्हता. तसेच राष्ट्रीय शिक्षणाच्या अजेंडयाखाली सरकारी शिक्षण संस्थावर बहिष्कार घालणे ही त्यांना योग्य वाटत नव्हते. त्यांच्यामते, नवीन खाजगी शाळा, महाविद्यालय स्थापन होईपर्यंत शिक्षण थांबविणे त्यांना मान्य नव्हते. मात्र गोखलेंनी सरकारी नोकरीवर बहिष्कार घालण्याच्या तत्वाचे स्वागत केले होते. कारण शिक्षित तरुण सरकारी नोकरीवर बहिष्कार टाकतील व ती मिळविण्याची धडपड थांबवतील आणि असे तरुण स्वतंत्र क्षेत्रात उतरुन देशसेवेसाठी नवीन विविध मार्ग उपलब्ध करतील असे त्यांचे मत होते. मात्र त्याचवेळी गोखले सार्वत्रिक बहिष्कार अमान्य करत होते. कारण त्यांच्यामते, त्याकाळात शासनाला मुबलक प्रमाणात माणसे उपलब्ध होत होती व त्यामुळे शासनाला बहिष्काराची फारशी झळ पोहचत नव्हती. त्यामुळे बहिष्काराचा मूळ उद्देश साध्य होऊ शकत नव्हता. त्याचबरोबर विधिमंडळ व स्थानिक स्वराज्य संस्था यावरही बहिष्कार टाकणे, गोखलेंना मान्य नव्हते याबाबत त्यांचे असे मत होते की, आज त्या जागावर जे आहेत त्यांनी राजीनामे दिले तर दुसरे दुप्पट लोक

त्या जागांसाठी उपलब्ध होतील. त्यानंतर त्यांनी राजीनामा दिला त्यांना आपण लोकसेवेची संधी गमावल्याचा पश्चाताप होईल. त्यामुळे आपल्याकडे असणाऱ्या अधिकारांचा वापर करुन प्रशासनावर नियंत्रण प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करणे गरजेचे आहे असे त्यांचे मत होते. सार्वजनिक जीवनाचा पाया खिळखिळा करणाऱ्या अशा चळवळी लोकांनी स्वत:च हाणून पाडायला पाहिजेत असे गोंखलेंचे मत होते.

**२.२.३.४ ना. गोखलेंचे आर्थिक विचार :–**

ना. गोखलेंनी राजकीय जागृतीबरोबरच देशाची आर्थिक प्रगती, औद्योगिक विकास, दारिद्र्य निर्मूलन, शेतकऱ्यांचे प्रश्न इ. संदर्भात आपल्या लिखाणातून व भाषणातून विविध विचार प्रकट केले आहेत. भारतीय जनतेला राज्यकारभारासाठी लायक व कार्यक्षम बनविण्याबरोबरच त्यांचा आर्थिक विकास साधणे महत्वाचे आहे असे ना. गोखलेंचे मत होते.

भारतीयांच्या दारिद्र्याची त्यांनी प्रामुख्याने तीन कारणे सांगितली आहेत. –

१) ना. गोखलेंच्या मते एकूण महसूलाच्या ३५% खर्च हा लष्करावर केला जातो तो इतर देशांच्या तुलनेत भारतात खूपच अधिक आहे.

२) भारतात राज्यप्रशासनावरही खूप मोठया प्रमाणावर खर्च केला जातो.

३) गोखलेंच्या मते, विनाकारण मोठया पगाराच्या नोकऱ्या गोऱ्या लोकांसाठी निर्माण केल्या जातात. त्यावर मोठया प्रमाणात खर्च होतो. हा खर्चाचा बोजा भारतीयांना सहन करावा लागतो. त्यामुळे भारतीयांच्या जनकल्याणाकडे दुर्लक्ष होते. त्यामुळे प्रशासन खर्चात कपात करण्याच्या सुचना गोखले करताना दिसतात.

सरकारचा शिलकी अंदाजपत्रकावर टिका करताना, गोखलेंनी आपल्या कायदेमंडळातील भाषणात आर्थिक व प्रशासकीय सुधारणांचा पुरस्कार केला होता. यासंदर्भात गोखले म्हणतात, देशात दुष्काळ, प्लेग अशा नैसर्गिक आपत्तींनी थैमान घातले असता सरकार खजिन्यात पैसा शिल्लक ठेवते हा अन्याय आहे. तसेच हा शिल्लक राहिलेला पैसा सरकार लष्कर, रेल्वे व सनदी नोकरावर खर्च करते हा दुहेरी अन्याय आहे. गोखलेंच्या मते असा शिल्लक राहिलेला पैसा शिक्षण, आरोग्य, पाटबंधारे यावर खर्च करावा. सैन्य, टपाल, मुलकी, कायदा, न्याय यावर होणारा खर्च केवळ ब्रिटीशांवर होणारा अनाठायी खर्च आहे असे गोखलेंचे मत होते. मोठ्या अधिकाराच्या व पगाराच्या जागा ब्रिटीश अधिकारी बळकावतात. पण ते स्वत: काम न करता आपल्या हाताखालच्या कनिष्ठ भारतीय माणंसाकडून करवून घेतात आणि पगार मात्र स्वत:च्या खिशात टाकतात. त्यामुळे भारतीय जनतेच्या दारिद्र्यात वाढ झाली आहे. या गरिबीच्या दृष्ट चक्रात ती भरडली जात आहे असे त्यांचे मत होते यावर पुढील उपाय ना. गोखले यांनी सुचविले आहेत.

१) पार्लमेंटमध्ये भारतीयांना सदस्यत्व द्यावे. तसेच खर्चाची तपासणी करणारी स्वतंत्र यंत्रणा उभारावी. अंदाजपत्रकीय बजेटमध्ये काटकसर व बदल करण्याचा अधिकार संसद सदस्यांना असावा.

२) देशातील उद्योगधंद्यांच्या विकासाची हमी द्यावी.

३) भारतीयांना शिक्षण, राष्ट्रीय उद्योग व व्यापार यांचे ज्ञान द्यावे.

४) तांत्रिक शिक्षणाची सोय सरकारने करावी.

५) देशात औद्योगिक क्षेत्रात सुधारणा करताना कच्चा माल परदेशी पाठविण्याऐवजी देशातच त्यावर प्रक्रिया करण्यासाठीची व्यवस्था करावी.

**शेतीप्रश्न :–**

भारत हा कृषीप्रधान देश आहे. त्यामुळे शेतीविकासावर देशाचा औद्योगिक व अन्य क्षेत्रातील विकास अवलंबून आहे. त्यामुळे शेती विकासासाठी त्यांनी पुढील कार्यक्रम दिला.

१) शेतीचे न्याय वाटप व्हावे कारण देशात स्वत: शेती करणारा समाज कमी असल्याने शेतीचे उत्पादन घटत आहे.

२) सावकार व जमीनदार यांच्या कर्जातून शेतकऱ्याची मुक्तता करावी. तसेच शेतीसाठी कर्ज उपलब्ध करुन द्यावे.

३) शेतकी बँकाची स्थापना देशात करावी.

४) आधुनिक साधनांच्या साह्याने शेती करून शेती विकास साधावा.

५) सरकारने जलसिंचनाच्या सुविधा शेतकऱ्यांना उपलब्ध करून द्याव्या.

६) आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर शेतकऱ्याना करता यावा यासाठी शेतकऱ्यांना प्रशिक्षणाची सोय उपलब्ध करून द्यावी.

७) अशा पध्दतीने ना. गोखलेंनी आपल्या आर्थिक विचारांच्या माध्यमातून भारतीय जनतेच्या दारिद्र्याची कारणे व त्यावरील उपाय सूचविले आहेत.

**२.२.३.५ ना. गोखलेंचे शासनविषयक विचार :–**

१९०६ मध्ये लंडनच्या ईस्ट इंडिया असोसिएशनपुढे 'हिंदवी स्वराज्य' या विषयावर निबंध वाचून आपले शासनविषयक विचार मांडले आहेत. शिवाय कायदेमंडळातील त्यांच्या विविध भाषणातूनही त्यांची शासनविषयक भूमिका स्पष्ट होते. ना. गोखले यांना सुरुवातीला संपुर्ण स्वराज्य अभिप्रेत नव्हते. तर साम्राज्यांतर्गत स्वराज त्यांना हवे होते असे असले तरी त्यांनी ब्रिटिशांच्या चुकीच्या धोरणाकडे दुर्लक्ष केले नाही. तर ब्रिटिश शासन भारतात प्रागतिक स्वरुपाचे बनविण्यासाठी त्यांनी प्रमुख चार उपाय सुचविले आहेत.

**१) भारतीयांची भौतिक, नैतिक, शैक्षणिक प्रगती साधणे :–**

गोखलेंच्या मते, ब्रिटीश शासनाने सुरुवातीच्या काळात अनेक सोयी सुविधा निर्माण केल्या. उदा. रेल्वे, पोस्ट, तार, विदयापीठे इ. त्यामुळे ब्रिटीशांविषयी भारतीयांच्या मनात आस्था निर्माण झाली. पण ती दीर्घकाळ टिकली नाही. कारण या सर्व सुविधा ब्रिटीशांनी स्वत:साठी केल्याची जाणीव त्यांना लवकरच

झाली. त्यामुळे ब्रिटिशांनी आता जनतेसाठी आरोग्य, शेती, औदयोगिक विकास यासाठी पुढाकार घ्यावा जेणेकरुन त्यामाध्यमातून जनतेचा खऱ्या अर्थाने विकास होईल.

ना. गोखलेंच्या मते, शिक्षणामुळे जनतेची भौतिक आणि नैतिक प्रगती होते. त्यासाठी त्यांनी शैक्षणिक विकासाला अग्रक्रम दिला होता. शिक्षण हि सर्व सुधारणांची गुरुकिल्ली आहे. त्यामाध्यमातून देशाच्या मुक्तीचे साधनही शिक्षण बनू शकते. शिवाय शासनावर निष्ठा ठेवण्यास भाग पाडणारा एक भक्कम आधार या भुमिकेतूनही गोखले शिक्षणाकडे पाहत होते.

**२) स्थानिक प्रशासनात जनतेचा अधिकधिक सहभाग वाढविणे :-**

ना. गोखलेंच्या मते, सनदी सेवेमध्ये सत्तेचे केंद्रीकरण झाले आहे. त्यामुळे ब्रिटीश अधिकारी जुलमी आणि अन्यायी पध्दतीने वागतात. त्यासाठी स्थानिक शासन संस्थेत भारतीय जनतेला सहभागी करुन घेण्याची संधी उपलब्ध करून द्यावी. लॉर्ड रिपन या उदारमतवादी ब्रिटिश अधिकाऱ्याने सुमारे २५ वर्षापुर्वी स्थानिक स्वराज संस्थाचा पाया या देशात घातला. मात्र त्यामध्ये सुधारणा झाल्या नाहीत.

ब्रिटिशांच्या जुलमी राज्यकारभारामुळे प्रशासनाबाबत भारतीयांच्या मनात दिवसेंदिवस कटुता वाढत आहे. ती कमी करण्यासाठी भारतीयांचे प्रतिनिधी म्हणजेच करदात्यांना प्रांतिक घडामोंडीमध्ये खराखुरा वाव व अधिकार दिला जावा. तसेच जिल्हाधिकाऱ्यांच्या मार्फत जिल्हा पातळीवर भारतीयांच्या सार्वजनिक हितसंबंधीच्या बाबींची चर्चा करणे सोयीचे ठरेल.

**३) कायदेमंडळात भारतीय जनतेचे प्रतिनिधी अधिक प्रमाणात घेणे :-**

ना. गोखलेंनी जे.एस.मिल यांच्या प्रतिनिधिक शासन पध्दतीचे अनुकरण करताना असे सुचविले होते की, भारत मंत्र्याच्या व व्हाईसरॉयच्या कायदे कौन्सिलमध्ये योग्य व लायक अशा भारतीय प्रतिनिधींची नेमणूक करावी. कायदेमंडळात हिंदी सभासदांची संख्या वाढवावी. जमा खर्चाचे अंदाजपत्रक मंजूर करताना त्यासंबंधी सूचना, उपसूचना मांडण्याचा अधिकार भारतीय प्रतिनिधींना दयावा. अंदाजपत्रकाबाबत खरीखुरी चर्चा होऊनच त्याला मंजूरी दयावी.

गोखलेंना भारतात भारतीय प्रतिनिधींचेच सरकार निर्माण व्हावे असे वाटत होते. भविष्यात जेंव्हा ब्रिटीश या देशातून जातील आणि भारतीयांना खऱ्या अर्थाने स्वातंत्र प्राप्त होईल तेव्हा भारतीय लोक हे सरकार चालविण्यासाठी सक्षम असले पाहिजेत अशी गोंखलेची मनोभूमिका होती. ब्रिटीशांनी आपली शासनपध्दती लोकमतानुसार चालवावी. तसेच भारतीयांना कायदेमंडळात व स्थानिक स्वराज संस्थेत प्रतिनिधीत्व दयावे.

**४) सार्वजनिक सेवात जास्तीतजास्त भारतीयांना प्रवेश दयावा :-**

गोखलेंच्या मते, ब्रिटिशांनी भारतीयांना सार्वजनिक सेवांत प्रवेश देण्यासाठी विविध कायदे केले. मात्र त्यांची अंमलबजावणी कार्यक्षमपणे केली नाही. उदा. देशाच्या सेवेत नियुक्ती करताना वंशभेद केला जाणार नाही, १८३५ च्या कायदयानुसार युरोपियांप्रमाणे भारतीय लोकांना स्पर्धा परिक्षा खुल्या करण्यात आल्या.

१८५४ च्या कायदयानुसार भारतीयांचे हक्क, १८५८ च्या कायदयानुसार भारतीयांना वरिष्ठ पदावर नेमण्याची तरतूद इ. अनेक कायदे करुनही त्यांची योग्य अंमलबजावणी ब्रिटीशांकडून झाली नाही. त्यामुळे भारतीयांना सरकारी नोकऱ्यात संधी मिळाली नाही. शिवाय आता शिक्षित लोकांचा मोठा वर्ग निर्माण झाला आहे. त्यांना सरकारी सेवेत सामावून घेतले जात नाही. त्यामुळे त्यांच्या असंतोषात दिवसेंदिवस भर पडत आहे. त्यासाठी ब्रिटीशांनी शिक्षित तरुणांना सनदी सेवेत सामावून घेवून त्यांचा असंतोष कमी करावा. भारतीयांना सनदी सेवेत अधिकाधिक संधी देण्याचा प्रयत्न करावा.

थोडक्यात ना. गोखलेंनी ब्रिटिश सरकारने कशा पध्दतीने शासन चालविले पाहिजे याचे मार्गदर्शन केले. जनतेच्या हिताकडे लक्ष दिले तरच ब्रिटीशांना आपली सत्ता भारतात टिकवता येईल हा सल्लाही यातून प्रतिबिंबीत होतो.

**५) राज्य हे साध्य नसून साधन आहे :–**

ना. गोखले यांच्या मते, राज्य हे जनतेच्या कल्याणाचे साधन आहे. त्यामुळे या राज्यात ब्रिटींश आणि भारतीयांची भूमिका कशापध्दतीची असावी याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले आहे.

ब्रिटिशांचे भारतीय सत्ता आणि शासन साध्य होते. त्यासाठी सत्ता उपभोगताना त्यांनी जनहिताकडे दुर्लक्ष केले. गोखले ब्रिटींशाना जनकल्याणाची आठवण करुन देताना म्हणतात, शासन हे जनकल्याणाचे प्रमुख साधन आहे. त्यामुळे सरकारने उद्योगधंदे, शिक्षण अशा क्षेत्रात विशेष लक्ष दिले पाहिजे शिवाय भारतीयांना कालांतराने स्वातंत्र्याची जाणीव झाल्यानंतर हे शासन त्यांच्याच हातात जाणार आहे.

**६) सनदशीर चळवळ व नेमस्त राजकारण :–**

ना. गोखले हे नेमस्तवादी राजकीय विचारवंत होते. तसेच त्यांचा सनदशीर मार्गावर विश्वास होता. सनदशीर चळवळीचा भाग अवलंबताना आपण दोन गोष्टी पाळल्या पाहिजेत असे त्यांचे मत होते. एक म्हणजे चळवळ हि कायदेशीर मार्गानेच झाली पाहिजे. दुसरी अट म्हणजे जो बदल घडून येईल तो लोकमताने प्रभावित संघटित अशा अधिसत्तेकडून घडून यावा. थोडक्यात ब्रिटीश सत्तेकडून जे प्राप्त करुन घ्यावयचे आहे ते विनंती, मागण्या, विचार विनिमय, आवाहन, चर्चा इ. माध्यमातून प्राप्त करुन घेणे म्हणजे सनदशीर मार्ग होय. ना. गोखलेंना जहाल मार्ग पसंत नव्हता.

भारतीय शासन व्यवस्थेची सुत्रे अशिक्षित लोकांच्या हातात जाणे गोखलेंना धोकादायक वाटत होते. त्यामुळे त्यांनी तात्काळ स्वातंत्र्याची मागणी केली नाही. सुसंस्कृत जीवनाचे सुत्रधार म्हणून ते कायदा आणि सुव्यवस्थेकडे पाहत होते. त्यामुळे भारतीयांनी या दोन तत्वांचा स्वीकार करुन अपेक्षित बदल ब्रिटिशांकडून करवून घ्यावेत अशी गोखलेंची भुमिका होती.

ना. गोखलेंनी शांततेचा सनदशीर मार्ग जरी स्वीकारला असला तरी त्यांनी बंगालच्या फाळणीस विरोध करण्याला पाठिंबा दिला होता. बंगालमध्ये मोठया प्रमाणावर अन्याय, अत्याचार, जुलुम यांना मोठया

प्रमाणावर ऊत आला होता. जनता प्रक्षुब्ध बनली होती. तेंव्हा अशा परिस्थितीत बहिष्काराचा मार्ग स्वीकारणे हाच एकमेव पर्याय उरला होता.

**२.२.३.६ ना. गोखलेंचे शिक्षणविषयक विचार :–**

ना. गोखले राष्ट्रीय ऐक्य व प्रगती साधण्याचे एक महत्वाचे साधन म्हणून शिक्षणाकडे पाहत होते. देशाला राजकीय स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी शिक्षणाचा प्रसार, प्रचार होणे आवश्यक आहे असे त्यांचे मत होते. मुंबई विधानपरिषदेचे सदस्य असताना त्यांनी सरकारचे या प्रश्नाकडे लक्ष वेधले होते. १९०२ च्या आपल्या भाषणात ते म्हणतात, भारतात १० पैकी ९ व्यक्ती अशिक्षित आहेत. तसेच ५ गावांपैकी ४ गावांत प्राथमिक शाळाही नाहीत. ब्रिटिश सरकार इंग्लडमध्ये दरवर्षी शिक्षणावर ११ दक्षलक्ष खर्च करते तरीही तेथील जनतेला सरकारने शिक्षणावर अधिक खर्च करावा असे वाटते. मात्र भारतात सरकार शिक्षणाकडे दुर्लक्ष करते लॉर्ड कर्झन यांनी सर्वप्रथम भारतात शिक्षणविषयक धोरण निश्चित केले.

त्यांनी १९१० मध्ये प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करावे अशी मागणी करताना त्या निवेदनामध्ये खालील बाबीं नमुद केल्या.

१) शैक्षणिक धोरण निश्चित करण्याचे अधिकार स्थानिक स्वराज्य संस्थाकडे दयावेत. त्यांनी प्राथमिक शिक्षण सक्तीचे करावे.

२) मुलांबरोबर मुलींनाही शिक्षण दिले जावे ते सक्तीचे करावे.

३) शिक्षणाचे वय ६ ते १० वर्षे ठेवावे व ते नि:शुल्क असावे.

४) शिक्षण हा विषय प्रांताकडे न देता केंद्राकडे असावा.

५) शिक्षणाचा अहवाल दरवर्षी प्रकाशित करावा इ.

भारतीय जनता जोपर्यंत सुशिक्षित होत नाही तोपर्यंत तिने सरकारकडे स्वशासनाची मागणी करणे त्यांना योग्य वाटत नव्हते. सरकारने महाविदयालयीन शिक्षणाचा प्रसार करावा, नि:शुल्क प्राथमिक शिक्षण, उच्च शिक्षणासाठी सरकारने प्रसारयंत्रणा राबवावी. यासाठी गोखलेंनी सतत पाठपुरावा केला. इंग्रजी शिक्षणामुळे भारतीयांना स्वातंत्र्य आणि प्रतिनिधीक संस्थांची माहिती मिळते असे त्यांचे मत होते.

ना. गोखलेंनी ज्ञानबुध्दी आणि संस्कृती विकास हे प्रमुख दोन शिक्षणाचे उद्देश सांगितले आहेत. त्यांच्या मते घोकंपट्टीने घेतलेले ज्ञान हे संस्कृती विकासाला उपयुक्त नसते. तसेच त्यांनी शिक्षण पध्दती आणि परीक्षा यातील दोष दाखवून दिले होते. तसेच विद्यापीठात शिक्षणात देशी भाषेचा वापर केला जावा असे त्यांचे मत होते. १८९६ मध्ये उच्च शिक्षण देण्याऱ्या विद्यापीठांनी देशी भाषेचा वापर करावा हे गोखलेंनी जे मत मांडले होते, ती कल्पना आज भारतातील सर्व विद्यापीठात स्वीकारलेली दिसते.

ना. गोखलेंच्या मते, शिक्षणामुळेच भारतातील जनता सुजाण व सुसंस्कृत बनेल. सुशिक्षितांची संख्या वाढल्याने राजकीय समाजाची निर्मिती होईल. अडाणी लोकांच्या हातात राज्य कारभाराची सुत्रे देण्याऐवजी

शहाण्या व सुशिक्षित लोकांच्या हातात राज्यकारभार देणे हिताचे होईल असे त्यांचे मत होते. १९०६ साली त्यांनी प्राथमिक शिक्षण मोफत करण्याची मागणी केली होती.

**१) भारतीय स्त्री–शिक्षण :–**

ना. गोखले यांनी स्त्री-शिक्षण, दलितांचे शिक्षण, औद्योगिक व तांत्रिक शिक्षण याला आपल्या विचारात प्राथमिकता दिली होती. त्यांनी स्थापन केलेल्या भारत सेवक समाजात शैक्षणिक चळवळीला अग्रक्रम दिला होता. त्यांच्या मते, एकेकाळी जो देश उदात्त धर्मांचे तत्वज्ञानाचे सर्व प्रकारच्या शाळांचे व कलांचे माहेरघर होता. तोच आज अज्ञान, लोकभ्रम यांनी घेरला गेला आहे. नैतिकदृष्ट्या दुबळा बनला आहे असे उदगार त्यांनी १८९७ साली लंडन येथे काढले होते.

ना. गोखले यांनी आपल्या विचारात स्त्री-शिक्षणाला देखील महत्व दिले होते. त्याच्यामते, आपल्यातील जातीभेद व सामाजिक रुढी, प्रथा, परंपरा, धर्मभेद यामुळे स्त्रियांना आपण शिक्षणापासून वंचित ठेवले. सक्तीचे अज्ञान आणि निःस्सीम धार्मिकता यामुळे भारतीय स्त्रियांना अवनत अवस्था प्राप्त झाली.

**१) विदयार्थी आणि राजकारण :–**

ना. गोखलेंच्या मते विद्यार्थ्यामधील राजकीय जागृती हा एक महत्वाचा प्रश्न आहे. विदयार्थ्यांना शहाणपण आणि देशभक्तीबाबत मार्गदर्शन करणे गरजेचे आहे. त्यांच्यामते, विद्यार्थ्यांची चळवळ हा तितकासा गंभीर विषय नाही. मात्र विद्यार्थ्यांनी प्रचलित राजकारणाचा नीट अर्थ समजून घेतला पाहिजे. सध्या ब्रिटिश अधिकारी व भारतीय देशभक्त यांच्यातील संघर्ष म्हणजेच राजकारण अशी विद्यार्थ्यांची धारणा बनली आहे. तेंव्हा विद्यार्थ्यांना महाविद्यालयातून शिक्षण देऊन याबाबत मार्गदर्शन करणे गरजेचे आहे असे त्यांचे मत होते.

**२.२.३.७ ना. गोखले यांच्या विचारांचे मूल्यमापन (सारांश) :–**

ना. गोखलेंचे राजकीय विचार परिस्थिती सापेक्ष होते. ब्रिटीश साम्राजाच्या अंतर्गत भारतीयांना स्वशासनाचा दर्जा मिळावा असे त्यांचे मत होते. १९३० पर्यंत स्वराज्य म्हणजे वसाहतीचे स्वातंत्र्य इतकाच अर्थ म. गांधीना देखील अभिप्रेत होता. नंतरच्या कालखंडात बदलत्या परिस्थितीनुसार गांधीजींनी नागपूर अधिवेशनामध्ये संपूर्ण स्वराज्य म्हणजेच स्वातंत्र्य असे घोषित केले. ना. गोखले यांनी वसाहतीच्या स्वातंत्र्यापासून ते संपूर्ण स्वातंत्र्याची मागणी करणारे लोकमत घडविण्यापर्यंत महत्वाचे कार्य केले आहे. महमंद अली जीना ना. गोखलेंच्या संदर्भात म्हणतात, ''ते सरकारी बिलाचे व प्रशासन व्यवस्थेचे निर्भिड टिकाकार आणि विरोधक होते. परंतु अन्यायी राज्यपध्दती विरुध्द भाषण किंवा कृती करताना ते बुध्दीवादी आणि संयमी होते.'' तसेच लॉर्ड कर्झन यांनी ना. गोखले विषयी गौरवोद्गार काढताना असे म्हटले होते. ''खरे म्हणजे गोखले विरोधी पक्षाचे पुढारी होते आणि या नात्याने त्यांचे अनेक फटके मला बसलेले आहेत. त्यांच्यात आणि माझ्यात मतभेद होते पण त्यांची दानत आणि त्यांचे गुण मी कधीही अमान्य केलेले नाहीत.''

**पारिभाषिक शब्द :–**

नेमस्त, सनदशीर, मवाळ :- सौम्य विचारांचा पुरस्कार, सुधारणावादी आग्रह, इ. बाबत वरील शब्द वापरले जातात. १९ व्या शतकाच्या प्रारंभी सुधारकांना नेमस्त, सनदशीर म्हणून ओळखले जाई. उदा. गोखले.

आर्थिक उत्सारण :- (लुट सिध्दांत) :- नोकरी, उदयोग, व्यापार यातुन भारतात मिळणारा पैसा इंग्लडमध्ये पाठवला जाई. संपत्ती आपली, उद्योग व मालकी ब्रिटीशांची यातून भारतीयांची एकप्रकारे आर्थिक लूट होई. भारताच्या आर्थिक शोषणाचा दादाभाई नौरोजींचा सिध्दांत.

बुध्दिप्रामाण्यवाद :- बुध्दीच्या निकषावर एखादी बाब तपासून पाहणे.

एकेश्वरवाद :- ईश्वर एकच आहे या विचाराचा पुरस्कार करणे.

मॅग्नाचार्ट :- ब्रिटिश सरदारांनी राजाकडून मिळवलेली हक्काची सनद.

वासाहतिक स्वराज्य :- ब्रिटीश साम्राज्याच्या अंतर्गत असणारे स्वराज्य.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न व उत्तरे**

एका वाक्यात उत्तरे दया.

प्रश्न १) भारतीय आर्थिक राष्ट्रवादाचे जनक कोणाला म्हटले जाते ?

उत्तर – दादाभाई नौरोजी यांना आर्थिक राष्ट्रवादाचे जनक असे म्हटले जाते.

प्रश्न २) दादाभाईंनी आपल्या कोणत्या ग्रंथात आर्थिक विचार मांडून भारताच्या दारिद्र्याची कारणे स्पष्ट केली?

उत्तर – दादाभाई नौरोजी यांनी आपल्या Poverty and un British rule in India या ग्रंथात आर्थिक विचार आणि भारताच्या दारिद्र्याची कारणे स्पष्ट केली.

प्रश्न ३) दादाभाईंनी भारतातील लोकांचे आर्थिक वार्षिक उत्पन्न किती सांगितले आहे?

उत्तर – दादाभाईंनी भारतातील लोकांचे आर्थिक वार्षिक उत्पन्न दरडोई फक्त २० रुपये आहे असे सांगितले.

प्रश्न ४) न्या. रानडे यांनी कोणत्या संस्थेची स्थापना केली?

उत्तर – १८८४ मध्ये न्या. रानडे यांनी डेक्कन एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली.

प्रश्न ५) न्या. रानडे यांनी भारताच्या आर्थिक दारिद्र्याची सांगितलेली दोन कारणे स्पष्ट करा?

उत्तर – १) देशाची अर्थव्यवस्था पुर्णपणे शेतीवर आधारित आहे.

२) उद्योगधंद्यासाठी लागणाऱ्या भांडवलाचा तुटवडा ही प्रमुख दोन कारणे न्या. रानडे यांनी भारताच्या आर्थिक दारिद्र्याची सांगितलेली आहेत.

प्रश्न ६) न्या. रानडे यांची प्रमुख ओळख काय?

उत्तर – न्या. रानडे हे नेमस्त राष्ट्रवादी विचारवंत होते.

प्रश्न ७) गोपाळ कृष्ण गोखले यांचा जन्म कोठे झाला?

उत्तर – गोपाळ कृष्ण गोखले यांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यातील कोतलूक या गावी झाला.

प्रश्न ८) ना. गोखले यांच्या राजकीय विचाराचे मूळ सूत्र कोणते?

उत्तर – शासन हे मानवाकरिता असून मानवाला आपल्या इच्छेप्रमाणे ते बदलण्याचा पूर्ण अधिकार आहे हे ना. गोखले यांच्या राजकीय विचारांचे मूळ सुत्र आहे.

प्रश्न ९) ना. गोखले यांनी देशातील शिक्षित तरुणांकडून कोणती अपेक्षा व्यक्त केली आहे?

उत्तर – विद्यापीठातून बाहेर पडणाऱ्या तरुणांनी केवळ आत्मोन्नती हे ध्येय न ठेवता स्वार्थत्यागाच्या भावनेने देशसेवेला वाहून घेतले पाहिजे. देशसेवेत अपयश आले तरी खचून न जाता कार्यरत रहावे अशी अपेक्षा ना. गोखले देशातील शिक्षित तरुणांकडून व्यक्त करतात.

**सरावासाठी प्रश्न (स्वाध्याय)**

सविस्तर उत्तरे लिहा.

१) दादाभाई नौरोजी यांचे राजकीय विचार स्पष्ट करा.

२) दादाभाई नौरोजी यांचे स्वातंत्र्य आंदोलनातील योगदान स्पष्ट करा.

३) न्या. रानडे यांचे राजकीय विचार स्पष्ट करा.

४) न्या. रानडे यांचे सामाजिक सुधारणांविषयक विचार स्पष्ट करा.

५) ना. गोखले यांचे राजकीय विचार स्पष्ट करा.

६) ना. गोखले यांची शासनविषयक भूमिका स्पष्ट करा.

७) ना. गोखले यांची स्वदेशीसंबंधीची भूमिका स्पष्ट करा.

टिपा लिहा.

१) राष्ट्रीय सभा.

२) दादाभाई नौरोजी यांचे आर्थिक विचार.

३) दादाभाई नौरोजी यांचे समाजवादी विचार.

४) न्या. रानडे यांचा राजकीय उदारमतवाद.

५) न्या. रानडे यांचे आर्थिक विचार.

६) न्या. रानडे आणि राष्ट्रवाद.

७) ना. गोखले यांचे स्वदेशी संबंधीचे विचार.

८) ना. गोखलेंचे शासनविषयक विचार

९) ना. गोखलेंचे आर्थिक विचार

**अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके :-**


१) भोले भास्कर लक्ष्मण :- आधुनिक भारतीय राजकीय विचार, पिंपळापुरे अँन्ड पब्लिशर्स, नागपूर-२००३.

२) मुठाळ राम :- भारतीय आणि पाश्चिमात्य राजकीय विचार, अंधुल पब्लिकेशन्स, नागपूर १९९७.

३) पाटील बी. बी. :- भारतीय राजकीय विचारवंत, फडके बुक हाऊस, कोल्हापूर १९९७.

४) अरविंद शृंगारपूरे :- निवडक भारतीय राजकीय विचारवंत, विद्या प्रकाशन नागपूर २००३.

५) वराडकर र. हा. :- भारतीय राजकीय विचारवंत, विद्या प्रकाशन नागपूर.

६) अरविंद शृंगारपूरे :- भारतीय तथा पाश्चिमात्य राजकीय विचार, श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर-१०.

७) साबळे आर.डी. :- भारतीय राजकीय विचार, हिमालय पब्लिशिंग हाऊस, गिरगांव मुंबई - ४.

8) Varma V.P. :- Modern Political Thought, Lakshmi Nardin Agarwal Agra – 1978.

९) पाटील वा. भा. :- प्राचीन व आधुनिक भारतीय राजकीय विचारवंत प्रशांत पब्लिकेशन, जळगांव - २००९.

१०) गर्दे दि. का. :- आधुनिक भारतीय राज्यविचार, परिमल प्रकाशन औरंगाबाद १९७५.

११) पाटील बी. बी. आणि चव्हाण उर्मिला :- भारतीय राजकीय विचार, फडके प्रकाशन, कोल्हापूर १९७५.

१२) पाटील वा. भा. :- भारतीय राजकीय विचारवंत, श्री. मंगेश प्रकाशन नागपूर - १९९८.


❑❑❑

## घटक ३

# राष्ट्रवादी राजकीय विचार

(Nationalist Political Thought)

**अनुक्रमणिका**


अ) श्री अरविंद

३.० उद्दिष्टे

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय विवेचन

३.२.१ श्री अरविंद

३.२.१.१ श्री अरविंद यांचा अल्पपरिचय

३.२.१.२ श्री अरविंद यांचे राजकीय विचार

३.२.१.३ श्री अरविंद यांचे स्वातंत्र्य विषयक विचार

३.२.१.४ श्री अरविंद यांचे राष्ट्रवादासंबंधी विचार

३.२.१.५ श्री अरविंद यांचे स्वराज्य विषयक विचार

३.२.१.६ श्री अरविंद यांचे सविनय प्रतिकारासंबंधी विचार

३.२.२ लोकमान्य टिळक

३.२.२.१ लोकमान्य टिळकांचा अल्पपरिचय

३.२.२.२ लोकमान्य टिळकांचे राजकीय विचार

३.२.२.३ लोकमान्य टिळकांचे राष्ट्रवादावरील विचार

३.२.२.४ लोकमान्य टिळकांची चतु:सूत्री

३.२.२.५ लोकमान्य टिळकांचे स्वराज्य विषयक विचार

३.३ सारांश

३.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

३.५ स्वयंअध्यनासाठी प्रश्न

३.६ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.७ सरावासाठी स्वाध्याय

३.८ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके

## ३.० उद्दिष्टे

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपल्याला

- श्री अरविंद यांचे राजकीय विचार समजून घेता येतील.
- श्री अरविंद यांचे स्वातंत्र्यासंबंधीचे विचार अभ्यासता येतील.
- श्री अरविंद यांचे राष्ट्रवादासंबंधीचे विचार अभ्यासता येतील.
- श्री अरविंद यांचे स्वराज्यासंबंधीचे विचार अभ्यासता येतील.
- श्री अरविंद यांचे सविनय प्रतिकारासंबंधीचे विचार समजून घेता येईल.
- लोकमान्य टिळक यांचे राजकीय विचार समजून घेता येतील.
- लोकमान्य टिळक यांचे राष्ट्रवादासंबंधीचे विचार अभ्यासता येतील.
- लोकमान्य टिळक यांचे स्वराज्यासंबंधीचे विचार अभ्यासता येतील.
- लोकमान्य टिळक यांच्या विचारांचे मूल्यमापन करता येईल.

## ३.१ प्रास्ताविक

भारतीय तत्वज्ञानात महर्षी अरविंद यांचे स्थान अतिशय महत्वपूर्ण आहे. वेदातील अद्वैतवादाचा प्रभाव त्यांच्यावर असल्याने त्यांनी राष्ट्रवाद - आंतरराष्ट्रवादात समन्वय निर्माण करणारा विचार सांगितला. मॅझिनी आणि गॅरिबाल्डी यांचा प्रभाव होता. तसेच योगसाधना आणि भारतीय धर्म यांच्या अध्ययनामुळे त्यांचे राजकीय धार्मिक विचार, एकरूप होतात. त्यांचे देशप्रेम व त्यागाची सिद्धता ही त्यांची अंगभूत वैशिष्ट्चे अप्रतिम होती.

श्री अरविंद घोष यांनी मानवी जीवनाच्या राजकीय आणि अध्यात्मिक बाजू या दोन्ही क्षेत्रांमध्ये महत्त्वपूर्ण कार्य केले. भारतीय राष्ट्रीय स्वातंत्र्य चळवळीमध्ये ब्रिटिशांविरोधात त्यांचा सक्रिय सहभाग होता. तसेच पाँडेचरी येथील आश्रमातील वास्तव्यातून त्यांनी योगाभ्यासामध्ये आंतरराष्ट्रीय ख्याती प्राप्त केली होती. श्री अरविंद यांच्या विचारांमध्ये 'पौर्वात्य आणि पाश्चात्त्य तत्त्वज्ञान' आणि नागरी समाज यांच्यामधील आंतरसंवादाचा प्रभाव दिसून येतो.

पश्चिम बंगालमधील कोन्नागर या गावामध्ये श्री अरविंद यांचा १५ ऑगस्ट १८७२ रोजी एका सधन कुटुंबामध्ये जन्म झाला. त्यांचे वडील डॉ. कृष्णधन घोष यांच्यावर पाश्चात्त्य मूल्यांचा प्रचंड प्रभाव होता, त्यांच्या दृष्टीने वैज्ञानिक दृष्टिकोन हाच एक धर्म झाला होता. डॉ. कृष्णधन घोष हे कट्टर आंग्लवृत्तीचे होते. ते पेशाने सिव्हील सर्जन होते. त्यांचे वैद्यकीय शिक्षण इंग्लंडमध्ये झाल्याने आपल्या मुलांचेही शिक्षण इंग्रजीत व्हावे असे त्यांना वाटत होते. श्री अरविंद हे सात वर्षांचे वय असतानाच त्यांनी अरविंद यांना इंग्लंडला नेले. शालेय जीवनात अरविंद एक अतिशय हुशार विद्यार्थी होते, त्यामुळे किंग्ज कॉलेज, केंब्रिज

शैक्षणिक संस्थांकडून श्री अरविंद यांना उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती प्राप्त झाली होती. उच्च शिक्षण प्राप्त श्री अरविंद यांनी सन १८९३ साली भारतात परतून सन १८९३ ते १९०६ या दरम्यान त्यांनी बडोदा संस्थानामध्ये नोकरी केली, प्रथम महसूल विभागात आणि नंतर बडोदा महाविद्यालयामध्ये प्राध्यापक म्हणून नोकरी केली. या दरम्यान श्री अरविंद यांनी भारतीय तत्त्वज्ञान, संस्कृत, संस्कृती आणि धर्म आदि विषयांचा सखोल अभ्यास केला. सन १९०६ मध्ये बडोदा सोडून ते कलकत्ता येथे नॅशनल कॉलेजमध्ये प्राचार्य या पदावर रुजू झाले.

बडोदा संस्थानात नोकरी करीत असताना श्री अरविंद यांना उघडपणे ब्रिटिशांविरोधात राजकारणात भाग घेणे शक्य नसल्यामुळे त्यांनी आपले राजकीय विचार वृत्तपत्राच्या माध्यमातून निनावी मांडायला सुरुवात केली. त्या काळात मुंबईमधून प्रसिद्ध होणाऱ्या 'इंदूप्रकाश' या वृत्तपत्रातून त्यांनी हे लिखानाचे कार्य केले. त्यांनी लिहिलेले लेख म्हणजे प्रखर ब्रिटिश विरोधातून देशकार्यासाठी एकत्र येण्याचे आवाहन होते. त्यांनी आपल्या लिखाणातून सर्व देशबांधवांना आपल्या मातृभूमिच्या स्वातंत्र्यासाठी रक्षणासाठी जागरूक होऊन कृतिशील बनण्याचे आपल्या देशबांधवांना आवाहन केले होते. १९०२ ला अहमदाबाद व १९०५ मध्ये ते बनारस येथे भरलेल्या राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनात सहभागी झाले होते त्यांनी संपूर्ण स्वराज्य हे आपले उद्दिष्ट असले पाहिजे हे राष्ट्रीय कॉंग्रेसच्या नेत्यांना पटवून दिले. १९०६ साली बडोद्यातील नोकरी सोडून ते बंगालला निघून आले. बंगालमध्ये त्यांनी राष्ट्रवादी विचारांच्या व्यक्तींना संघटित करुन मातृभूमीचे सेवाकार्य अगदी जोमाने सुरु ठेवले. या काळात त्यांनी 'वंदे मातरम्' या वृत्तपत्राचे सहसंपादक म्हणून कार्य केले. सन १९०५ ते १९१० हा काळ अरविंदाच्या राजकीय कार्याच्या दृष्टीने फार महत्त्वाचा होता. कारण या काळात बंगालच्या आंदोलनाचे नेतृत्व त्यांनी केले आणि राजकीय कार्य मोठ्या नेटाने चालविले. पण अरविंदामध्ये एकाएकी बदल झाला. सन १९१० साली ते पॉंडेचरीला गेले व अध्यात्मिक शक्तीच्या बळावर त्यांनी भारताला स्वतंत्र करण्याकरीता आपले जीवन योग साधनेत व्यतीत केले.

लोकमान्य टिळक हे भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील एक अतुलनीय असे व्यक्तिमत्त्व होय. सन १८८५ ते १९२० या कालखंडात स्वातंत्र्य चळवळीचे राष्ट्रीय नेते म्हणून त्यांच्या राजकीय विचारांची जडणघडण झाली. त्यांनी मराठा हे इंग्रजीतून आणि मराठीतून केसरी ही साप्ताहिके देखील सुरू केली. या दोन्ही नियतकालिकांचे संपादक म्हणून काम करत असताना महाराष्ट्रातल्या तसेच पश्चिम भारतातल्या सामाजिक आणि राजकीय घडामोडींमध्ये त्यांचा सहभाग वाढला. टिळकांनी केसरीतून विचार लोकांपर्यंत पोहोचवण्याची विशिष्ट शैली विकसित केली, ती प्रभावी आणि त्याचबरोबर लोकांना आपलीशी वाटेल अशी साधी, सुटसुटीत तरीदेखील संस्कृत प्रादेशिक लोककथांमधील दाखल्यांनी परिपूर्ण होती.

हिंदुस्थानातील टिळकांच्या गैरहजेरीच्या काळात गांधी हे लोकनेते म्हणून नावारूपाला आले. या काळात जालियानवाला बाग हत्याकांड आणि पंजाब प्रांतातील चालू असलेल्या दडपशाही विरुद्ध जनक्षोभ उसळला होता. सन १९१९ च्या कॉंग्रेसच्या अमृतसर येथील अधिवेशनात सुधारणा कायद्याच्या संदर्भात 'सकारात्मक सहकार्याच्या' बाजूने धुरीणांचे मन वळवून तसा ठराव पारित करून घेण्यात टिळकांना यश आले. ब्रिटिश नोकरशाहीचे अधिकार क्षीण करण्यासाठी टिळकांनी गांधींच्या असहकार चळवळीला सुद्धा

पाठिंबा दिला. ब्रिटनच्या आर्थिक वर्चस्वाला शह देणाऱ्या स्वदेशी चळवळीचा टिळकांनी पुरस्कार केला. १ ऑगस्ट १९२० रोजी त्यांच्या मृत्यूने भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या एका पर्वाचा अंत झाला.

टिळकांच्या पुराणमतवादी आणि जहाल राजकीय विचारांमुळे त्यांच्या व गोखले, रानडे या नेमस्त नेत्यांमध्ये टोकाचे मतभेद होते. परदेशी वस्तू, न्यायालये आणि शैक्षणिक संस्था यांच्यावर बहिष्कार टाकणे, कर बंदीची चळवळ अशा असनदशीर मार्गांचा अवलंब भारतीयांनी करू नये, असे नेमस्तांचे मत होते. तर या मार्गांचा अवलंब करणे हे असनदशीर नाही, असे लोकमान्य टिळकांचे ठाम मत होते. लोकमान्य टिळकांनी राजकीय क्षेत्रात जे मोलाचे कार्य केले त्यामुळे भारताच्या स्वातंत्र्य चळवळीला अधिक गती प्राप्त झाली होती. स्वराज्य प्राप्तीचे ध्येय हे टिळकांच्या हयातीत पूर्ण होऊ शकले नाही. हे जरी खरे असले तरी ब्रिटिशांच्या विरोधात भारतीय जनमानसात प्रचंड क्षोभ निर्माण करण्याचे कार्य त्यांनी केले आणि भारताच्या स्वातंत्र्य चळवळीला एक नवी दिशा दिली. परकीय राजवटी विरोधात लोकांना जागृत करवून जनतेला त्यासाठी परकीय गुलामीविरुद्ध क्रांती करण्यास भाग पाडणे हे अतिशय जिकारीचे कार्य लोकमान्य टिळकांनी केल्यामुळेच त्यांना चिरोल यांनी 'भारतीय असंतोषाचे जनक' या नावाने संबोधले होते.

अशाप्रकारे श्री अरविंद व लोकमान्य टिळक हे भारताच्या राजकीय व अध्यात्मिक तत्वज्ञानाचा उपयोग हा भारत देश स्वतंत्र करुन स्वराज्य स्थापन करण्यासाठी करीत होते हे स्पष्ट होते. तसेच त्यांनी भारताच्या राजकीय व अध्यात्मिक तत्वज्ञानाच्या क्षेत्रात भरीव योगदान देऊन भारतीय जनमानसामध्ये जाज्वल्य देशाभिमान रुजविण्यात मोठ्या प्रमाणात यश प्राप्त केले होते. श्री अरविंद आणि लोकमान्य टिळकांचे राजकीय व अध्यात्मिक विचारविश्व समजावून घेण्यासाठी त्यांच्या राजकीय कारकिर्दीचा आणि त्यांच्यावरील वैचारिक व अध्यात्मिक प्रभावांचा आढावा घेऊन राष्ट्र उभारणीसाठी त्यांनी दिलेल्या योगदानाला समजून घेणे आवश्यक ठरते.

## ३.२ विषय विवेचन

### ३.२.१ श्री अरविंद

#### ३.२.१.१ श्री अरविंद यांचा अल्पपरिचय

श्री अरविंद (१५ ऑगस्ट १८७२–५ डिसेंबर १९५०) यांचे भारतीय तत्वज्ञानातील स्थान अतिशय महत्वपूर्ण आहे. श्री अरविंद यांनी मानवी जीवनाच्या राजकीय आणि आध्यात्मिक बाजू या दोन्ही क्षेत्रांमध्ये महत्वपूर्ण योगदान दिले आहे. भारतीय राष्ट्रीय स्वातंत्र्य चळवळीमध्ये ब्रिटिशांविरोधात त्यांचा सक्रिय सहभाग होता. तसेच पाँडेचरी येथील आश्रमातील वास्तव्यातून त्यांनी योगाभ्यासामध्ये आंतरराष्ट्रीय ख्याती प्राप्त केली होती.

आधुनिक भारतातील प्रख्यात तत्त्वचिंतक, स्वातंत्र्यवीर, योगी व कवी अशी ओळख असणारे श्री अरविंद यांचा जन्म पश्चिम बंगालमधील कोन्नागर या गावामध्ये १५ ऑगस्ट १८७२ रोजी एका सधन व सुसंस्कृत कुटुंबात झाला. आईचे नाव स्वर्णलतादेवी तर वडील कृष्णधनबाबू हे प्रख्यात सर्जन होते. मुलांना

संपूर्णपणे पाश्चात्त्य धर्तीवर शिक्षण द्यावे, म्हणून त्यांनी अरविंद यांना वयाच्या अवघ्या पाचव्या वर्षी दार्जिलिंगच्या यूरोपियन शाळेत व सातव्या वर्षी थेट इंग्लंडला पाठविले. अरविंद हे असामान्य बुद्धीचे विद्यार्थी होते. तेथे त्यांनी आपल्या बुद्धीच्या बळावर अनेक बक्षिसे व पुरस्कार प्राप्त केले. शालेय जीवनात अरविंद एक अतिशय हुशार विद्यार्थी होते, त्यामुळे किंग्ज कॉलेज, केंब्रिज शैक्षणिक संस्थांकडून श्री अरविंद यांना उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती प्राप्त झाली होती. लंडनच्या सेंट पॉल शाळेतून १८९० मध्ये आपले शालेय शिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण करून अठराव्या वर्षी त्यांनी केंब्रिजच्या किंग्ज कॉलेजमध्ये प्रवेश मिळविला. लॅटिन, ग्रीक, इंग्रजी ह्या भाषांवर प्रभुत्व संपादन केले होते. फ्रेंच, जर्मन, स्पॅनिश, इटालियन ह्या भाषाही ते तेथे शिकले. भारतात आल्यावर त्यांनी बंगाली, गुजराती, मराठी व संस्कृत भाषांचा अभ्यास केला.

केंब्रिजला शिक्षण घेत असताना तेथील 'इंडियन मजलिस'चे ते सचिव होते आणि त्यांनी मजलिसमध्ये आपल्या क्रांतिकारी भाषणांद्वारे भारताने सशस्त्र उठाव करूनच स्वातंत्र्य मिळवावे असे परखडपणे सांगत होते. इंग्लंडमध्ये त्यांची बडोद्याच्या सयाजीराव गायकवाड महाराजांशी भेट झाली, तेव्हा झालेल्या बोलण्यानुसार उच्च शिक्षण घेऊन भारतात सन १८९३ साली परतल्यानंतर १८९३ ते १९०७ या दरम्यान त्यांनी बडोदा संस्थानामध्ये प्रथम महसूल विभागात तसेच सचिवालयात रुजू होऊन नंतर बडोदा महाविद्यालयामध्ये प्राध्यापक म्हणून नोकरी केली. बडोदा महाविद्यालयात प्रथम ते फ्रेंच आणि इंग्रजीचे प्राध्यापक, नंतर महाविद्यालयाचे उपप्राचार्य व नंतर प्राचार्य म्हणून आपली सेवा दिली.

बडोदा संस्थानात नोकरी करीत असताना श्री अरविंद यांना उघडपणे ब्रिटिशांविरोधात राजकारणात सक्रिय होणे शक्य नसल्यामुळे त्यांनी आपले राजकीय विचार वृत्तपत्राच्या माध्यमातून निनावी मांडायला सुरुवात केली. त्या काळात मुंबईमधून प्रसिद्ध होणाऱ्या इंदूप्रकाश या वृत्तपत्रातून त्यांनी हे लिखान केले. बंगालमधील क्रांतिकारक चळवळीचे अरविंदबाबू एक प्रवर्तक होते. ते जहालमतवादी होते. टिळकांना ते नेते मानीत. १००६ मध्ये कलकत्ता काँग्रेसच्या अधिवेशनात त्यांनी 'भारताचे संपूर्ण स्वातंत्र्य' ह्या ध्येयाची घोषणा केली. १९०२ ला अहमदाबाद व १९०५ मध्ये ते बनारस येथे भरलेल्या राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनात सहभागी झाले होते  त्यांनी संपूर्ण स्वराज्य हे आपले उद्दिष्ट असले पाहिजे हे राष्ट्रीय काँग्रेसच्या नेत्यांना पटवून देण्याचा त्यांनी यशस्वी प्रयत्न केला. बंगालमध्ये त्यांनी राष्ट्रवादी विचारांच्या व्यक्तींना संघटित करुन मातृभूमीचे सेवाकार्य अगदी जोमाने सुरु ठेवले. या काळात त्यांनी 'वंदे मातरम्' या वृत्तपत्राचे सहसंपादक म्हणून कार्य केले. सन १९१० साली ते पाँडेचरीला गेले व अध्यात्मिक शक्तीच्या बळावर त्यांनी भारताला स्वतंत्र करण्याकरीता आपले जीवन योग साधनेत व्यतीत केले. श्री अरविंद यांनी श्री व सौ. पॉल यांच्या सहकार्याने 'आर्य' नावाचे मासिक सुरू केले. या मासिकामध्ये सामाजिक, आध्यात्मिक, तात्विक, धार्मिक अशा विविध विषयांवर अनेक महत्त्वपूर्ण लेख लिहिले. श्री अरविंदांचे सावित्री हे निर्यमक छंदातील २३,८१३ ओळींचे आध्यात्मिक स्वरूपाचे इंग्रजी महाकाव्य त्यांच्या प्रतिभेचा  अत्युच्च आविष्कार मनाला जातो. श्री अरविंद यांनी १९२६ पासून आपल्या जीवनाच्या अंतापर्यंत एकांतवास पत्करला आणि शेवटी ५ डिसेंबर १९५० रोजी महासमाधी घेतली.

### ३.२.१.२ श्री अरविंद यांचे राजकीय विचार

श्री अरविंद यांची राजकीय समस्येच्या संदर्भातील समज अतिशय प्रगल्भ होती. थेट राजकारणात कृतिशील सहभाग व राजकीय समस्येच्या वास्तविक चिंतनातून त्यांचे विचार विश्व केंद्रस्थानी विचार विश्व आकारला आले होते. ज्या काळात श्री अरविंदांनी राजकारणात सहभाग घ्यावयाला सुरुवात केली त्यावेळी ते काँग्रेसच्या जहाल गटाचे प्रमुख होते. तत्कालीन राष्ट्रीय काँग्रेस मधील मवाळांचे विनवणी, विनंत्यांचे धोरण त्यांना यत्किंचितही मान्य नव्हते. त्यामुळे श्री अरविंदांनी राष्ट्रीय काँग्रेसच्या धोरण शैलीवरच प्रखर टीका करून राष्ट्रीय काँग्रेसला आपल्या धोरणात बदल करण्यास बाध्य केले होते.

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसप्रमाणेच त्यांनी ब्रिटिश सत्तेवरदेखील कडक शब्दात टीका केली होती. श्री अरविंद हे एकीकडे ब्रिटिशांची राजकीय परंपरा व संस्था श्रेष्ठ आहेत व त्यातून भारतीयांना अनेक बाबी ह्या शिकण्यासारख्या आहेत हे मान्य करीत होते. परंतु दुसरीकडे मात्र पाश्चात्य संस्कृती आणि जीवनपद्धती यामध्ये जे जे सर्वोत्कृष्ट आहे ते सर्व ब्रिटिशांकडेच आहे हा दृष्टीकोन मात्र त्यांना मुळीच मान्य नव्हता. संसदीय शासन प्रणाली व संसदेसारख्या अन्य संस्थामुळे श्री अरविंद हे प्रभावित झाले होते परंतु ब्रिटिशांचे सर्वच बाबतीत अनुकरण करणे हाच केवळ सुधारणेचा मार्ग आहे हे मात्र त्यांना मुळीच मान्य नव्हते.

श्री अरविंद यांनी केलेली टीका ही समाजशास्त्रीय व ऐतिहासिक विश्लेषणाच्या दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाची मानली जाते. त्यांच्या मते, नेमस्तांनी ब्रिटीश राज्यकर्त्याबाबत विनाकारण ज्या उच्च व श्रेष्ठ कल्पना बाळगल्या आहेत त्या वसुस्थितीला धरुन नाहीत, कारण तेवढ्या उत्तुंग व्यक्तिमत्त्वाचे राज्यकर्ते नाहीत. त्यांची राज्यव्यवस्था आपण समजतो तेवढी परिपूर्ण व निर्दोष नाही. त्यामुळे राज्यकर्त्याविषयी भारावून न जाता आणि पाश्चात्यांचे अंधानुकरण नकरता पाश्चिमात्याकडून भारतीयांना जे आवश्यक व महत्वाचे शिकण्यासारखे आहे तेवढेच शिकणे व स्वीकारणे यावर श्री अरविंद यांचा भर होता. ब्रिटिश राज्यकर्त्यांची धोरणे आणि त्यांच्या अधिकाऱ्यांचे वर्तन यावर श्री अरविंद टीका करतात. कारण त्यांच्या धोरणाचे दुष्परिणाम भारतीयांवर झाले आहेत.

**भारतीय राष्ट्रीय चळवळ**

भारतीय राष्ट्रीय चळवळीमधील श्री अरविंद हे एक अतिशय लोकप्रिय नेते होते. एक प्रतिभाशाली व्यक्ती, राजकीय वक्ता आणि पत्रकार म्हणून भारतीय जनमानसात त्यांच्याबद्दल प्रचंड आदर होता. त्यांनी प्रतिपादित केलेला राष्ट्रवाद हा द्वेषमूलक किंवा आक्रमक स्वरूपाचा मुळीच नव्हता. त्यांच्या दृष्टीने अध्यात्मिक पायावर उभ्या असलेल्या 'आदर्श मानवी एकात्मते'ची प्रेरणाच सुरक्षितता पुरविते आणि स्वतःच्या अंतर्मनात उदात्त आणि मुक्त विचार निर्माण झाल्याशिवाय आपण राजकीयदृष्ट्या मोठे आणि मुक्त होऊ शकणार नाही यावर त्यांचा ठाम विश्वास होता. ब्रिटिश सत्ता भारतीयांचे कल्याण करेल अशी आशा ब्रिटिशांकडून बाळगणे कसे चुकीचे आहे याबद्दल श्री अरविंद यांची खात्री पटली होती. ब्रिटिश राज्यकर्ते हे अतिशय संकुचित मनोवृत्तीचे आणि पूर्णपणे व्यावसायिक असून ते उदात्त विचारांचे तसेच 'प्रामाणिक' नाहीत याची श्री अरविंद यांना जाणीव झाली होती. हाच दृष्टिकोन डोळ्यांसमोर ठेवून अरविंद यांनी बंगाल

काँग्रेसच्या धोरणांमध्ये आणि उपक्रमांमध्ये आमूलाग्र बदल करण्याचा प्रयत्न केला. परकीय वस्तू, इंग्रजी शाळा आणि एकूणच संपूर्ण साम्राज्यशाही व्यवस्थेवर बहिष्कार घालण्याचा त्यांची सल्ला दिला. स्वराज्य हवे असेल तर त्यासाठी कष्ट आणि त्याग करायची तयारी हवी. श्री अरविंदंच्या कार्यामुळे त्यांनी ब्रिटिश शासनाचा रोष ओढवून घेतला. तत्कालीन व्हाइसरॉय लॉर्ड मिंटो हे तर त्यांना ब्रिटिश सत्तेसाठी सर्वांत धोकादायक मानत होते. १९०८ हे वर्ष श्री अरविंद यांच्या राजकीय कारकिर्दीमध्ये वादळी वर्ष ठरले. अलिपूर बॉम्ब कटाच्या घटनेमुळे ब्रिटिश शासनाने क्रांतीकारी चळवळीमध्ये सहभागींविरुद्ध दडपशाहीचे धोरण अवलंबिले. यामध्ये श्री अरविंद यांचासुद्धा समावेश होता, मे १९१० रोजी ब्रिटिश शासनाने त्यांना अटक केली. खटला सुरू असेपर्यंत श्री अरविंद यांना अलिपूर कारागृहात एक वर्ष काढावे लागले. कारागृहातील वास्तव्यादरम्यान श्री अरविंद यांना त्यांच्या म्हणण्याप्रमाणे काही गूढ अनुभव आले. हे अनुभव म्हणजे मानवी- अमानवी श्रेष्ठतेचा आविष्कार होता असे त्यांचे मत होते. नंतर खटल्यामध्ये पुराव्याअभावी त्यांची सुटका झाली. परंतु या घटनेचा त्यांच्यावर खोल असा परिणाम झाला. या घटनेनंतर श्री अरविंद यांनी राजकारणाचा त्याग केला व ते योगाचार्य झाले. नंतर ते पाँडेचरी या फ्रेंच वसाहतीमध्ये वास्तव्यास गेले. तेथे त्यांनी स्वतःचा आश्रम स्थापन केला. या आश्रमात ते त्यांच्या आयुष्याच्या शेवटपर्यंत म्हणजेच ५ डिसेंबर १९५० रोजी त्यांचा मृत्यू होईपर्यंत राहिले. या कालावधीसाठी ते योगाभ्यास शिकले आणि त्यांनी 'द आर्य' या नावाचे तत्त्वज्ञानावर आधारित मासिक प्रकाशनाचे कार्य सुरु केले. या मासिकामध्ये त्यांनी त्यांचे द आयडियल ऑफ ह्यूमन युनिटी, द लाईफ डिव्हाईन आणि द सिंथेसिस ऑफ योगा हे अतिशय प्रसिद्ध असे लेख प्रसिद्ध केले. अशाप्रकारे आश्रमातील वास्तव्याने त्यांच्यातील तत्वज्ञानी व योगाचार्याला जगासमोर आणले.

**भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व वैचारिक द्वंद्व**

श्री अरविंद भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या राजकीय कार्याने व तत्कालीन राजकीय परिस्थितीमुळे काँग्रेसची असणारी निकड यांमुळे ते प्रचंड प्रभावित झाले होते. १८८५ ला स्थापन झालेली काँग्रेस भारतीय राष्ट्रवादाला लाभलेला एक राष्ट्रव्यापी स्वरुपाचा अविष्कार होता. राष्ट्रीय काँग्रेसच्या अस्तित्वामुळे श्री अरविंद यांना अत्यंत उत्साह होता. शुष्क आणि ओसाड वाळवंटातील पाण्याचा एक निर्झर असे त्यांनी काँग्रेसचे वर्णन केले होते. परंतु हळूहळू राष्ट्रीय काँग्रेसच्या नेतृत्त्वाच्या काही न पटणाऱ्या भूमिकांमुळे त्यांचा भ्रमनिराश व्हायला सुरुवात झाली होती. विशेष म्हणजे नेमस्तांनी ब्रिटिश सत्तेला ईश्वरी इच्छा आणि वरदान मानने हे श्री अरविंद यांना न पटणारे होते. काँग्रेसने जनतेमधील सुप्त सामर्थ्य जागृत करण्याऐवजी केवळ ब्रिटीश राज्यकर्त्यांना खूष करण्याचे धोरण काँग्रेसने स्वीकारणे हे आत्मघातकी आहे. असे धोरण काँग्रेसचा नैतिक दरारा संपुष्टात आणत असल्याची परखड टीका त्यांनी राष्ट्रीय काँग्रेसवर केली.

नेमस्तांकडून अनेकदा ब्रिटिश शासन सत्तेकडे बघण्याचा औदार्यपूर्ण दृष्टिकोन त्यांना मुळीच न पटणारा होता. श्री अरविंद यांच्या मते, ''देशात ब्रिटिशांनी निर्माण केलेली पद्धती भारताला मानवणारी नाही.'' त्यांच्या मते, ब्रिटिशांच्या दयाशिलतेला साकडे घालण्यापेक्षा राष्ट्रातील स्वतःला आणि स्वाभिमानाला जागृत करुन स्वातंत्र्य, समता व विश्वबंधुत्वासाठी ब्रिटिश सता झुगारून दिली पाहिजे. सध्याच्या परिस्थितीला

शांतता आणि सनदशीर मार्ग निरर्थक आहेत. कुणालाही संकोच वाटावा इतक्या नेमस्तांच्या मागण्या क्षुल्लक स्वरूपाच्या असल्याचे ते नमूद करतात. नेमस्तांचे ध्येये अर्थशून्य असून मार्ग देखील भरकटलेले आहेत. त्यांच्याजवळ राष्ट्रासाठी आवश्यक असणारी जिद्द नाही. अशा स्थितीत काँग्रेसच्या नेतृत्वाखाली देशाची आगेकूच होणार नाही. या देशाला सद्यस्थितीत आवश्यक असलेले प्रगतशील आणि गतीमान नेतृत्व काँग्रेस देऊ शकत नाही. काँग्रेस ही विशिष्ट अभिजन, सुशिक्षीत व मध्यम वर्गीयापुरतीच मर्यादित असल्याची टीका श्री अरविंद करीत असत. राष्ट्रीय काँग्रेस सर्वसमावेशक व सर्वव्यापी असती तरच संपूर्ण जनता तिला स्वतःकडे आकर्षित करू शकली असती. या देशात शेतकरी, कष्टकरी आणि पिडीत वर्ग हा काँग्रेसपासून दूर राहिला व राष्ट्रीय काँग्रेसने देखील या समाज घटकांना कधीच स्वतःमध्ये समाविष्ट करून घेण्याचा प्रयत्न केला नसल्याची परखड टीका त्यांनी राष्ट्रीय काँग्रेसवर केली.

श्री अरविंद यांचा नेमस्त नेत्यांच्या एकुणच कार्यपद्धतीवर विश्वास नव्हता. नेमस्तांकडून ब्रिटिश सत्तेकडे केल्या जाणाऱ्या अर्ज, विनंत्या मार्फत ब्रिटिश या देशाला स्वातंत्र्य देणार नाहीत. त्यामुळे घटनात्मक मार्गाचा अवलंब करणे शक्य होणार नसल्याची श्री अरविंद यांची ठाम धारणा होती. ब्रिटिशांकडून स्वातंत्र्य प्राप्त करून घ्यावयाचे असेल तर शक्तीस, शक्तीनेच उत्तर द्यावे लागेल असे त्यांचे स्पष्ट मत होते. तसेच भारतीयांना संघटित करून व प्रसंगी बाहेरील देशांची मदत घेऊन एक व्यापक उठाव करण्याचा जहाल मार्ग त्यांनी व्यक्त केला होता.

### ३.२.१.३ श्री अरविंद यांचे स्वातंत्र्य विषयक विचार

श्री अरविंद यांचे स्वातंत्र्य विषयक विचार हे भारतीय जनमानसाला चिरंतन प्रेरणा देणारे आहेत. त्यांचे मातृभूमीवरील प्रेम हे अतिशय विचारपूर्वक व चिंतनशीलतेतून आलेले होते. भारताला अध्यात्मिक आणि भौगोलिक दृष्ट्या वेगळी ओळख प्राप्त झाली असून यामुळे मानवतेला अध्यात्मिक परिपूर्णतेचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी मार्गदर्शन मिळत असल्याची त्यांची ठाम धारणा होती. भारत हा पारतंत्र्याच्या बंधनात बंदिस्त झाला असल्यामुळे राष्ट्रप्रेम म्हणजे त्यांच्या दृष्टीने आध्यात्मिक साधना होती. श्री अरविंद मते, स्वातंत्र्य ही वैयक्तिक, बौद्धिक, औद्योगिक आणि राजकीय विकासाची पूर्वअट आहे. स्वातंत्र्याशिवाय विकास शक्य नाही. व्यक्तीच्या सर्वांगीण व स्वाभाविक विकासासाठी स्वातंत्र्याची नितांत आवश्यकता असते. स्वातंत्र्यामुळे समाजाचा नैतिक, बौद्धीक, व औद्योगिक विकास होत असतो. त्याचबरोबर स्वातंत्र्यामुळे व्यक्तीचा आंतरिक विकास देखील होत असतो. स्वातंत्र्य जर आत्मिक स्वातंत्र्याकडे नेणारे नसेल तर ते व्यक्तीवादाकडे जाते आणि व्यक्तीवादाचे पर्यवसान हे अराजकामध्ये होते. श्री अरविंद यांच्या मते, राष्ट्रभक्ती म्हणजे केवळ एक राजकीय उपक्रम नाही, तर ती एक ईश्वरनिर्मित धर्म आहे. श्री अरविंद यांच्या दृष्टीने मानवतेचा अध्यात्मिक मार्गदर्शक अशी ओळख निर्माण करण्याच्या दृष्टीने भारताने स्वातंत्र्य प्राप्त करणे आवश्यक होते. मानवतेच्या आध्यात्मिक पुनरुत्थानाच्या प्रक्रियेमध्ये भारताने प्रभावशाली भूमिका पार पाडली पाहिजे. आपले उद्दिष्ट गाठायचे असेल तर भारताने आधी स्वातंत्र्य मिळवून स्वराज्य स्थापन करणे अत्यंत आवश्यक आहे. राष्ट्रीय चळवळीने राजकीय चळवळ आणि आध्यात्मिक चळवळ अशा दोन्ही स्वरूपात यश मिळवणे ही केवळ

भारताचीच गरज नाही तर ती जगाची गरज बनली असून भारताने स्वातंत्र्य प्राप्त केलेले संपूर्ण जगाला पहावयाचे आहे.

### ३.२.१.४ श्री अरविंद यांचे राष्ट्रवादासंबंधी विचार

श्री अरविंद यांनी राष्ट्रवादी विचारांबद्दल प्रसार माध्यमातून विशेषत: 'वंदे मातरम्' मध्ये केलेल्या लिखाणातून झालेल्या ब्रिटिश विरोधामुळे त्यांना तुरुंगवास सोसावा लागला होता. तुरुंगवासादरम्यान त्यांना 'स्वराज' ही संकल्पना राजकीय किंवा आर्थिक परिघापुरती मर्यादित न ठेवता त्यापलीकडे 'स्वराज' चा विस्तार करणे आवश्यक असल्याबद्दल खात्री पटली होती. भारतीय समाजामध्ये आध्यात्मिक आणि राजकीय सुधारणा घडवून आणण्यासाठी श्री अरविंद स्वतः भारतीय राजकारणामधून बाजूला गेले आणि त्यांच्या मते, दैवी देणगी लाभलेल्या मानवी जीवनाविषयीची त्यांची विशेष दृष्टी जनसामाण्यांना समजावी म्हणून त्यांनी पाँडेचरी येथे जाऊन योगशास्त्राचे तंत्र विकसित केले. श्री अरविंद यांच्या तत्वज्ञानात राष्ट्रवादाची कल्पना केवळ देशभक्तीवर आधारलेली नव्हती तर ती एक गंभीर अध्यात्मिक साधना होती. राष्ट्रवाद म्हणजे काही केवळ राजकीय कार्यक्रम नसून राष्ट्रवाद हा एक धर्म आहे अशी त्यांची ठाम धारणा होती. राष्ट्रवाद हा ईश्वर निर्मित असून त्याचा स्वीकार करून आम्हाला जीवन व्यतीत केले पाहिजे यावर त्यांचा पूर्ण विश्वास होता. व्यक्ती ही ईश्वर शक्तीचे साधन असल्यामुळे आम्ही सर्व लोकांनी ईश्वर शक्तीला सत्य मानून धार्मिक दृष्टीकोनातून राष्ट्रवादाचे मूल्यमापन केले पाहिजे. राष्ट्रवाद हा धर्म दैवी तसाच सात्वीक आहे. राष्ट्रीयतेला आम्ही संपवू शकत नाही. राष्ट्रीयता ही आध्यात्मिक व दैवी साधना असल्यामुळे ईश्वरी शक्तीच्या सत्याने राष्ट्रीयत्वाची वृद्धी होत असते असा त्यांचा विश्वास होता. त्यांच्या मते, राष्ट्रीयता वस्तू नसून ती ईश्वराचा साक्षात्कार आहे. राष्ट्रीयता अजय व अक्षय असल्याबद्दलच्या विचारांवर श्री अरविंद ठाम होते. लोकमान्य टिळकांचा प्रभाव अरविंदांवर फार मोठ्या प्रमाणावर पडला होता व तो शेवटपर्यंत टिकून होता. परंतु टिळकांची राष्ट्रवादाची संकल्पना ही पूर्णपणे राजकीय स्वरुपाची होती. तर श्री अरविंद यांची राष्ट्रवादाची संकल्पना ही राष्ट्रवादाला अध्यात्मिक स्वरूप देणारी होती.

#### राष्ट्रवादाचा अर्थ

श्री अरविंद यांनी 'वंदे मातरम्' या साप्ताहिकातील लेखात राष्ट्रवादाचा अर्थ स्पष्ट केला आहे. त्यांच्या मते, ''राष्ट्रवाद म्हणजे देशात दैवी ऐक्य प्रस्थापित करण्याची अत्युच्च व प्रबळ महत्वाकांक्षा होय. हे दैवी ऐक्य किंवा एकतेमध्ये अनेक व्यक्ती ज्यांचे सामाजिक, राजकीय व आर्थिक कार्य, विचार व क्षेत्र भिन्न असून देखील ते सर्व मूलभूत रुपात एकच असतात. म्हणून अशा राष्ट्रीयतेसंबंधी जो आदर्श भारत जगासमोर प्रस्तुत करील त्यामध्ये व्यक्ती, जाती, पंथ आणि वर्ग यामध्ये स्वाभाविक समानता असेल.''

श्री अरविंद यांनी राष्ट्रवादासंबंधी काही मूलभूत तत्वे सांगितली आहेत. त्यांच्या मते, ब्रिटिशांकडून राष्ट्रवादाला आर्थिक आणि राजकीय स्वरूप देण्याचा प्रयत्न केला जात होता. कारण भारतीयांच्या आपल्या राष्ट्र मुक्तीच्या संघर्षाला ब्रिटिश शासनकर्ते स्वतःच्या हित सुरक्षित करण्याच्या दृष्टीने केवळ आर्थिक व राजकीय दृष्टिकोनातूनच बघत होते. परंतु श्री अरविंद याना ब्रिटिशांचा हा दृष्टीकोन मान्य नव्हता. त्यांच्या

मते, राजकीय व आर्थिक स्वरूपाच्या अतिशय तात्पुरत्या मागण्या स्वतःच्या पदरात पाडून घेण्यासाठी भारतीयांनी ही राष्ट्रीय चळवळ निर्माण केलेली नाही, तर या चळवळीस एक नैतिक व अध्यात्मिक अधिष्ठान आहे. राष्ट्रवाद हा केवळ राजकीय कार्यक्रम नाही, तर राष्ट्रवाद हा एक धर्म असून या सत्याचा स्वीकार करून आम्हाला पुढची वाटचाल करावयाची आहे. सर्व जनता ही ईश्वरी शक्तीचे साधन असल्यामुळे धार्मिक व अध्यात्मिक दृष्टीकोनातून राष्ट्रवादाकडे पाहिले पाहिजे. भारत देश मृतवत नसून अखंड चैतन्याचे ते केंद्रस्थान असून भारतीयांची अध्यात्मिक दृष्टीच जगाला महाविनाशापासून सुरक्षित करू शकेल असा श्री अरविंद यांचा ठाम विश्वास होता.

श्री अरविंद राष्ट्रवाद हा एक ईश्वरनिर्मित धर्म मानीत होते. त्यामुळे राष्ट्रवाद हा अजय व अक्षय आहे. भारतीयांनी यापुढच्या काळात भारतीय विचार, बुद्धीमत्ता, राष्ट्र आणि संस्कृती ही संपूर्ण विश्वातील मानव जातीच्या उद्धारासाठी कोणते कार्य करू शकेल याच्या सतत शोधात भारतीयांनी असले पाहिजे. तसेच राष्ट्रवाद ही एक तांत्रीक किंवा बौद्धिक कल्पना नाही तर ती अत्युच्च अशी महान भावनात्मक बाब असून व्यक्ती कितीही भिन्न असल्यातरी त्या सर्व व्यक्ती ह्या राष्ट्राच्या स्वरुपात एकच हे श्री अरविंद यांनी स्पष्ट केले सांगितले आहे. तत्कालीन भारतीयांवर पाश्चात्य रितीरिवाज व संस्कृतीचा फार मोठा प्रभाव निर्माण झाला होता. हा प्रकार थांबवियासाठी प्राचीन भारतीय धर्म संस्कृतीच्या पुनरुज्जीवन होणे गरजेचे आहे असे त्यांना वाटत होते. त्यामुळे श्री अरविंद भारतीयांना तुम्ही आधी भारतीय व्हा व आपल्या पूर्वजांशी नाते जोडा, आर्यांचा विचार, चारित्र्य पुनरुज्जीवित करा. योग, वेदांत आणि गीता यांचेही पुनरुज्जीवन करा असे आवाहन करीत होते. श्री अरविंद यांनी राजकीय स्वातंत्र्याला राष्ट्रवादाची पूर्व अट मानली आहे. त्यांच्या मते, देशाच्या पुनरुज्जीवन व राष्ट्राच्या कल्पनेपर्यंत पोहोचण्यासाठी राजकीय स्वातंत्र्य आवश्यक आहे. श्री अरविंद यांचा राष्ट्रवाद हा संकुचित नव्हता तर तो व्यापक स्वरूपाचा होता. त्यांच्या राष्ट्रवादाचे स्वरुप विश्वराज्यवादी होते. त्यांच्या मते, राष्ट्रवाद हा अखिल मानवाच्या सामाजिक आणि राजकीय विकासासाठी आवश्यक आहे.

श्री अरविंद यांच्या राष्ट्रवाद विषयक विचारांवर अनेक अभ्यासकांकडून टिका देखिल झालेली आहे. असे असले तरी श्री अरविंद प्रणित राष्ट्रवाद हा उदार व व्यापक स्वरूपाचा असून तो जातीय, धार्मिक, मूलतत्ववादी, संकुचित व आक्रमक नव्हता. तर श्री अरविंद त्यांच्या मते, त्यांनी सांगितलेला भारतीय अध्यात्मिक राष्ट्रवाद हा जगास समता प्रदान करुन त्यातून जागतीक एकता निर्माण होईल.

### ३.२.१.५ श्री अरविंद यांचे स्वराज्य विषयक विचार

श्री अरविंद यांची स्वराज्याची धारणा अतिशय मौलिक स्वरुपाची होती. त्यांच्या मते, केवळ राजकीय स्वातंत्र्य प्राप्त केल्याने स्वराज्य अस्तित्वात येणार नाही तर त्यासाठी भारताला संपूर्ण मानवजातीचा आध्यात्मिक मार्गदर्शक म्हणूनच आपली भूमिका पुन्हा स्वीकारणे क्रमप्राप्त आहे. 'स्वराज्य' म्हणजे प्राचीन भारतीय जीवनशैलीचा आधुनिक काळातील जीवनशैलीशी मेळ बसविणे, राष्ट्राच्या दृष्टीने अभिमानास्पद अशा सत्ययुगाची पुनर्स्थापना करणे, शिक्षक आणि मार्गदर्शक या महान भूमिका पुन्हा निभावणे आणि वैदिक

आदर्शानुसार राजकारणातील आचरण करण्याच्या दृष्टीने लोकांची स्वमुक्ती करणे होय. श्री अरविंद यांच्या दृष्टिकोनातून राष्ट्रभक्ती ही एक धार्मिक क्रिया आहे. चिंतनशील परंतु कृतिशून्य किंवा निष्क्रिय जीवनशैली या अर्थाने तो एक 'धर्म' नव्हे, तर उलटपक्षी क्रियाशील जीवनशैलीच्या प्रकारचा तो एक 'धर्म' आहे. राजकीय चळवळीशी बरेचदा साधर्म्य दर्शवणारी राष्ट्रीय चळवळ म्हणजे खरे तर एक धार्मिक चळवळ असते आणि या चळवळीची शस्त्रे आध्यात्मिकच असतात. परस्पर विश्वास, प्रेम आणि ज्ञान ही या चळवळीची महत्त्वाची तत्वे आहेत. अशी राष्ट्रीय चळवळ म्हणजे तीव्र धार्मिक इच्छा, आकांक्षा आणि नैतिक प्रवृत्ती होय. भारताने राजकीय स्वातंत्र्य प्रथम प्राप्त करणे अतिशय आवश्यक असून संपूर्ण जगात वेदांचा प्रसार करण्यासाठी ती पूर्व अट आहे, अशी श्री अरविंदांची ठाम समजूत होती. विश्वातील मानवी प्रगतीच्या पुढच्या अतिशय महत्त्वाच्या टप्प्यामध्ये राष्ट्रीयच नव्हे तर आध्यात्मिक, नैतिक आणि शारीरिक प्रगती होणे आवश्यक आहे. या महान कार्यासाठी स्वतंत्र आशिया आणि आशियामधील स्वतंत्र भारत असणे अनिवार्य आहे. कारण संपूर्ण जगभर वेद व वेदांचा प्रसार करण्यासाठी स्वतंत्र भारताचे नेतृत्व उभे करणे आणि त्यासाठी जगाचे नेतृत्व करण्यासाठी पुढाकार घेणे भारतासाठी आवश्यक आहे यावर त्यांचा ठाम विश्वास होता.

श्री अरविंद हे क्रांतिकारी व जहाल विचारांचे होते. त्यामुळे त्यांचे राष्ट्रीय चळवळीतील अनेक मवाळ राजकीय नेत्यांशी मतभेद होते. त्यांनी मवाळांप्रमाणे ब्रिटिशांच्या न्यायबुद्धीवर विश्वास न ठेवता पूर्ण स्वराज्याची मागणी केली. जगातील प्रतेक राष्ट्राला स्वतःचे जीवन स्वतःच्या अनुभव, आदर्श व शक्तीनुसार जगण्याचा व आपल्या राज्य व्यवस्थेच्या व्यवस्थापनाचा अधिकार आहे. त्यामुळे पारतंत्र्यातील प्रत्येक राष्ट्राची प्रथम मागणी 'स्वराज्य' ही असते. राष्ट्रीय काँग्रेसमधील मवाळ नेते व कार्यकर्त्यांनी केवळ अर्ज व विनंत्या करून स्वराज्य प्राप्ती होणार नाही असे श्री अरविंद यांचे स्पष्ट मत होते. श्री अरविंद यांनी स्वराज्यासाठी काही महत्त्वपूर्ण मार्गाचा अवलंब करण्यास सांगितले. यामध्ये ते अग्रक्रमाने प्रथम, राष्ट्राचे सुप्त चैतन्य जागृत करण्याला अधिक महत्त्व देतात. श्री अरविंद हे पारतंत्र्यातील जनभावनेची मानसिक स्थिती समजून होते. जनतेतील उदासिनता, मरगळ आणि निष्क्रियता दूर करण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. भारतीयांना आपल्या भव्य-दिव्य अशा उज्वल, ऐतिहासिक, सांस्कृतिक वारश्याची ओळख आणि विविध क्षेत्रात केलेल्या उज्वल कामगिरीची माहिती जनतेला करुन देऊन भारतीयांमधील सुप्त चैतन्य जागृत केले पाहिजे असे त्यांना मनोमन वाटत होते. प्रबोधन काळात अध्यात्मिक आणि बौद्धिक पुनरुज्जीवनाचा उपयोग राष्ट्रकार्यासाठी करुन घेणे त्यांना आवश्यक होते. स्वातंत्र्याच्या राष्ट्रीय चळवळीत जनतेचा सहभाग वाढविणे व धर्माचे महत्व जनतेला पटवून देऊन त्यांच्यामध्ये जागरूकता निर्माण करण्यावर ते भर देत होते. सरकारच्या दडपशाहीला न जुमानता विशेषत: तरुणांनी प्राचीन भारताच्या वारशावर विश्वास ठेवून आपले देशकार्य करावे असे ते सांगत असत. द्वितीय, सशस्त्र क्रांती हा स्वराज्य प्राप्तीचा अत्यंत महत्वाचा मार्ग मानत होते. जगात अनेक गुलामांनी व शोषितांनी याच मार्गाचा अवलंब केला. सशस्त्र क्रांती हा मार्ग वेगवान, तात्काळ निष्पत्ती व प्रभावी मार्ग असून यात यशाची निश्चित खात्री असते. जर एखादे राष्ट्र जाणीवपूर्वक दुसऱ्या राष्ट्रावर अन्याय करीत असेल व त्या राष्ट्राल गुलाम म्हणून वागणूक देत असेल, त्या राष्ट्राचे शोषण करीत

असेल तर अशा राष्ट्राविरुद्ध सशस्त्र क्रांती ही नैतिक असते. आणि देशसेवेसाठी प्राणत्याग हा सर्वश्रेष्ठ त्याग असून हा मार्ग सर्व दृष्टीने नैतिक असतो असे श्री अरविंद यांचे ठाम मत होते. तिसरा महत्त्वाचा मार्ग म्हणजे सविनय प्रतिकार होय. श्री अरविंद यांच्या मते, भारतमातेच्या मुक्ततेसाठी सविनय प्रतिकार हा मार्ग अधिक प्रभावी ठरणार आहे. कारण या मार्गाच्या अवलंबणामुळे राज्यकर्त्यांची कोंडी करता येते. सरकार कोणतेही असो जनतेच्या सहकार्याशिवाय ते राज्यकारभार करू शकत नाही. सविनय प्रतिकार हा शांततेचा मार्ग असल्याने सर्वसामान्य जनता मोठ्या संख्येने या मार्गाचा अवलंब करून त्यामध्ये सहभागी होऊ शकते. सविनय प्रतिकार म्हणजे एका अर्थाने असहकार होय. शासनास कसल्याही प्रकारचे सहकार्य करावयाचे नाही. श्री अरविंद अशा सविनय प्रतिकाराचे पुढील दोन प्रकार सांगतात.

**१) आक्रमक प्रतिकार :** सविनय प्रतिकाराच्या या प्रकारामध्ये शासनाला त्याच्या दैनंदिन कामकाजामध्ये क्षणोक्षणी व प्रत्येक ठिकाणी अडथळे निर्माण करण्यात येतात. हा मार्ग क्रांतिकारक स्वरूपाचा आहे.

**२) बचावात्मक प्रतिकार :** सविनय प्रतिकाराच्या या प्रकारामध्ये लोकांनी शासनाच्या कामकाजात कोणत्याही प्रकारे सक्रिय सहभाग न घेता सर्व कार्यावर बहिष्कार टाकावयाचा असतो.

या दोन्ही प्रकारांचा उद्देश समान आहे. मात्र आक्रमक प्रतिकारामुळे शासनाला जास्त नुकसान सहन करावे लागते. श्री अरविंद यांच्या मते, जोपर्यंत आपल्याला हवे असलेले बदल शासन करीत नाही तोपर्यंत सविनय प्रतिकारच लढा असंच चालू ठेवणे. यालाच त्यांनी बहिष्कार असे नाव दिले आहे. आर्थिक बहिष्कार, शैक्षणिक बहिष्कार, न्यायालयावर बहिष्कार, कार्यपालिकेवर बहिष्कार, सामाजिक बहिष्कार या मार्गांचा अवलंब करण्यावर त्यांनी भर दिला.

### ३.२.१.६ श्री अरविंद यांचे संघटित प्रतिकारासंबंधी विचार

श्री अरविंद यांचेवर क्रांतीकारी विचारसरणीचा प्रभाव असलेला दिसून येतो. उदारवाद्यांची कार्य करण्याची पद्धती त्यांना मान्य नव्हती. या पद्धतीने स्वातंत्र्य मिळणे अशक्य आहे असे ते म्हणत. श्री अरविंद स्वातंत्र्यासाठी कोणत्याही साधनाचा वापर करण्यास तयार असले तरी तत्कालिन परिस्थितीत त्यांनी जनतेला संघटित प्रतिकाराचा मार्ग स्वीकारण्यास सांगितले. त्यांनी संघटित प्रतिकारचे दोन प्रमुख प्रकार सांगितले आहेत.

**१) आक्रमक प्रतिकार :** आक्रमक प्रतिकार म्हणजे शासन व्यवस्थेच्या विरोधात केलेली अशी जाणीवपूर्वक कृती की ज्याद्वारे शासनाचे प्रत्यक्षात नुकसान करणे होय. यामध्ये क्रांतीकारी कृतींचाही समावेश आहे.

**२) बचावात्मक किंवा प्रतिकार :** बचावात्मक किंवा निष्क्रीय प्रतिकार म्हणजे सरकारला शासन व प्रशासन कार्यामध्ये कोणत्याच प्रकारचे सहकार्य न करणे. तत्कालिन परिस्थितीचा विचार करता श्री अरविंद यांनी बचावात्मक किंवा निष्क्रीय प्रतिकाराचा मार्गच श्रेयस्कर असून तो स्वीकारण्याचे आवाहन केले.

निष्क्रीय प्रतिकाराचा उद्देश, त्याची पद्धती, व आवश्यकता या संबंधी श्री अरविंद यांचे विचार 'वंदे मातरम्' या साप्ताहिकात प्रकाशित झाले आहेत. बिपीनचंद्र यांच्या विनंतीवरून श्री अरविंद यांनी 'वंदे मातरम' या इंग्रजी साप्ताहिकात लिहायला सुरुवात केली होती. निष्क्रीय प्रतिकारा संबंधी ते म्हणतात की, जोपर्यंत सामान्य जनतेच्या इच्छेनुसार परिस्थितीत बदल होत नाही तोपर्यंत ब्रिटिश व्यापार, ब्रिटिश शासन व प्रशासनास सहकार्य करणारे प्रत्येक कार्य करण्यास नकार देऊन वर्तमान परिस्थितीत प्रशासन चालविणे अशक्य करणे हा निष्क्रीय प्रतिकाराचा प्रथम मार्ग आहे.

ब्रिटिश शासनाचा मुख्य उद्देश हा भारताचे व्यापारी व अन्य मार्गांनी आर्थिक शोषण करण्याचा होता. तर श्री अरविंद प्रणीत निष्क्रीय प्रतिकाराचा उद्देश हा ब्रिटीश राजवटीकडून होणारे हे शोषण थांबविण्याचा होता. त्यामुळे निष्क्रिय प्रतिकाराच्या यशस्वीतेसाठी बहिष्कार या साधनाला प्रथम स्थान देण्यात आले होते. त्यासाठी श्री अरविंद यांनी 'स्वदेशी'ला महत्त्व दिले. भारतीयांनी आपल्या दैनंदिन जीवनात उपयोगी सर्वच क्षेत्रामध्ये केवळ आणि केवळ भारतातच उत्पादीत वस्तू व मालाचाच वापर करण्याचे आवाहन केले. बहिष्कार ही स्वदेशीची दुसरी बाजू असून परदेशी माल वापरू नये असे आवाहन त्यांनी केले होते. स्वदेशीबरोबरच राष्ट्रीय शिक्षण हा प्रतिकाराचा दुसरा सिद्धात त्यांनी सांगितला. कारण इंग्रजी शिक्षणाचा उद्देश भारतीयांचा स्वाभिमान आणि संस्कृती नष्ट करण्याचा असल्यामुळे भारतीय जनतेने सरकारी शाळा व महाविद्यालयांवर बहिष्कार घालावा आणि आपली पाल्यांचे शिक्षण हे राष्ट्रीय शाळा व महाविद्यालयांतून करावे असे त्यांनी आवाहन केले. तसेच श्री अरविंद न्यायालयावर देखील बहिष्कार घालण्याचे आवाहन करतात. कारण त्यांच्या मते, सरकारी न्यायालयामुळे ब्रिटिश शासन व्यवस्था सुदृढ होते व ब्रिटिशांच्या न्यायी प्रयत्नाबद्दल जनतेच्या मनामध्ये ब्रिटीश शासन व्यवस्थेबाबत आस्था निर्माण होते. या बाबी भारताच्या स्वातंत्र्य प्राप्तीसाठी अतिशय घातक आहेत. त्यामुळे भारतीय जनतेने आपल्या तक्रारी, आपसी वाद हे परस्पर मिटविण्यासाठी पंच न्यायालयाचा अवलंब करण्याचे त्यांनी जनतेला आवाहन केले.

## ३.२.२ लोकमान्य टिळक

### ३.२.२.१ लोकमान्य टिळक यांचा अल्पपरिचय

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक (२३ जुलै १८५६ – १ ऑगस्ट १९२०) आधुनिक भारतातील थोर राजकीय विचारवंत, भगवद्गीतेचे भाष्यकार व प्राच्यविद्या पंडित म्हणून त्यांचा लौकिक आहे. भारतीय स्वातंत्र्याची चळवळ अधिक प्रखर बनविण्याचे कार्य ज्या राष्ट्रीय नेत्यांनी केले, त्यामध्ये लोकमान्य टिळकांचा समावेश करावा लागतो. राष्ट्रीय सभेच्या जहाल गटाचे सर्वात अग्रणी नेते म्हणून लोकमान्य टिळक ओळखले जातात. 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच' असे निर्भिडपणे ब्रिटिशांना ठासून सांगणाऱ्या या थोर पुरुषाचा जन्म २३ जुलै १८५६ ला महाराष्ट्रामध्ये ता. दापोली, जिल्हा रत्नागिरी मधील चिखलगांव या गावी झाला. त्यांचे जन्मनाव केशव असे होते परंतु बाळ हेच नाव पुढे रूढ झालेले दिसून येते. त्यांचे वडील गंगाधरपंत तर आईचे नाव पार्वतीबाई होते. त्यांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण हे पुणे येथे झाले. ते १८७२ मध्ये मॅट्रिक झाले. १८७१ मध्ये त्यांचा कोकणातील लाडघर गावच्या

बल्लाळ बाळ कुटुंबातील सत्यभामाबाई यांच्याशी विवाह झाला. १८७६ ला त्यांनी डेक्कन कॉलेजमध्ये प्रवेश मिळविला. १८७६ मध्ये ते बी. ए. केले व नंतर एलएल. बी. ही पदवी संपादन केली. येव्हाना उच्च शिक्षण संपादन केल्यानंतर तर टिळकांनी स्वतः:ला सार्वजनिक देशकऱ्यासाठी झोकून देऊन कार्य सुरू केले.

लोकमान्य टिळकांनी आपल्या सार्वजनिक जीवनाची सुरुवात शैक्षणिक कार्यापासून केली. चिपळूणकर, टिळक व आगरकर यांनी १८८१ मध्ये आर्यभूषण छापखाना काढला आणि 'केसरी' हे मराठी तर मराठा हे इंग्रजी अशी दोन वृत्तपत्रे सुरू केली. केवळ पत्रकारितेच्या क्षेत्रात उतरून टिळकांनी राष्ट्र जागृतीचे कार्य हाती घेतले असे नाही तर त्यांनी सन- १८८४ मध्ये वेडरबर्न, वर्ड्स्वर्थ, मंडलिक, तेलंग, दांडेकर, य.मो. केळकर, भांडारकर आदि प्रभृतींच्या सहकार्याने आगरकरांसमवेत डेक्कन एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. पुढे याच सोसायटीमार्फत सन- १८८५ मध्ये फर्ग्युसन महाविद्यालयाची देखील स्थापना केली.

राष्ट्रैक्य व राष्ट्रवादाची पायाभरणी करण्याच्या दृष्टीने लोकमान्य टिळकांनी जनजागृतीसाठी सार्वजनिक गणपती उत्सव व शिवजयंती उत्सव सुरू केले. हे उत्सव सुरु करण्यामागे त्यांचा राष्ट्रीय जनजागृती करणे, भारतीयांमध्ये स्वातंत्र्याची आकांक्षा निर्माण करणे, आपल्या महापुरुषांचे स्मरण करणे, आपला ऐतिहासिक वारसा आणि धर्म व संस्कृती यांचे ज्ञान जनसामान्यास करून देणे हा उद्देश असल्याचे स्पष्ट केले. ब्रिटिश राजवटीला भारतातून हद्दपार करण्यासाठी जाज्वल्य राष्ट्रभिमानाची गरज होती. त्यासाठी टिळकांनी राष्ट्र निर्मिती व राष्ट्रवादाच्या पायाभरणीसाठी स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण आणि स्वराज्य या चतुःसूत्रीचा पुरस्कार केला.

'ओरायन' हा एक त्यांनी संशोधनात्मक प्रबंध सन- १८९२ च्या लंडन येथील ओरिएंटल परिषदेसाठी लिहिला होता. सन- १८९८ साली टिळक येरवड्याच्या तुरुंगात असताना त्यांना सुचलेल्या कल्पनेनुसार त्यांनी 'आर्क्टिक होम इन द वेदाज' हा एक संशोधनपर प्रबंध लिहिला होता. गीतेवरचे भाष्य असणारा 'श्रीमद्भगवद्गीतारहस्य' अथवा 'कर्मयोगशास्त्र' हा ग्रंथ सन- १९१५ मध्ये प्रकाशित केला. १ मे १९१६ रोजी होमरूल लीग वा हिंदी स्वराज्यसंघ त्यांनी बेळगाव येथे स्थापन केला. तत्पूर्वी १९१५ मध्येच नी बेझंट यांनी मद्रासला होमरूल लीग ही संस्था स्थापन केली होती. होमरूलची चळवळ टिळकांनी व बेंझटबाईंनी संयुक्तपणे चालविली.

सर व्हॅलेंटाइन चिरोल यांच्या 'इंडियन अनरेस्ट' या १९१५ साली प्रसिद्ध केलेल्या ग्रंथात आपल्याविरुद्ध बदनामीकारक मजकूर छापल्याबद्दल टिळकांनी लंडनच्या कोर्टात अब्रुनुकसानीची फिर्याद केली होती. निकाल टिळकांच्या विरुद्ध लागला. याच ग्रंथाने 'फादर ऑफ इंडियन अनरेस्ट'- 'भारतीय असंतोषाचे जनक' हे टिळकांचे गौरवास्पद अभिधान रूढ केले. लोकमान्य टिळक आयुष्याच्या अंतिम क्षणापर्यंत परकीय सत्तेविरुद्ध अविश्रांत लढत होते. त्यांनी डेमॉक्रॅटिक स्वराज्य पक्षाची स्थापना करुन पक्षाचा जाहीरनामा २० एप्रिल १९२० रोजी प्रसिद्ध केला. डेमॉक्रॅटिक स्वराज्य पक्षाचा जाहीरनामा म्हणजे लोकमान्य टिळकांचा ब्रिटिशांना अंतिम इशारा व देश पारतंत्र्यातून मुक्त करण्याच्या दिशेने उचललेले अत्यंत महत्त्वाचे पाऊल होते, असे म्हटल्यास अतिशयोक्तीचे होणार नाही.

### ३.२.२.२ लोकमान्य टिळकांचे राजकीय विचार

भारतीय स्वातंत्र्याची चळवळ अधिक प्रभावी व प्रखर बनविण्याचे कार्य ज्या-ज्या राष्ट्रीय नेत्यांनी केले, त्यामध्ये लोकमान्य टिळकांचा अग्रक्रमाने समावेश होतो. राष्ट्रीय सभेच्या जहाल गटाचे सर्वात अग्रणी नेते म्हणून लोकमान्य टिळक हे ओळखले जात असत. लोकमान्य टिळकांचे विचार आणि राष्ट्रीय कार्य यांच्या प्रभावामुळे भारतीय जनमानसाने त्यांना 'लोकमान्य' ही पदवी बहाल केली. देश पारतंत्र्यात आहे, व आपण परकीयांचे गुलाम आहोत, आणि जर आपण ही गुलामी संपुष्टात आणली नाही तर आपल्या जीवनाला काहीही अर्थ राहणार नाही, असे ते देशवासियांना निक्षूण सांगत होते. एका अर्थाने परकीय राजवटी विरोधात सामान्य जनतेचे एकूणच भावविश्व निर्माण करण्याची अतिशय जिकरीचे कार्य त्यांनी केल्यामुळेच चिरोल यांनी लोकमान्य टिळकांना भारतीय असंतोषाचे जनक या नावाने संबोधले.

स्वातंत्र्य चळवळीचे राष्ट्रीय नेते म्हणून राजकीय कारकिर्दीची वाटचाल करत असताना टिळकांच्या राजकीय विचारांची जडणघडण झाली. टिळकांचे राजकीय विचारविश्व समजून घेण्यासाठी त्यांच्या राजकीय कारकिर्दीचा आढावा आणि त्यांच्यावरील वैचारिक प्रभावांचा आढावा घेणे आवश्यक ठरते. लोकमान्य टिळकांच्या राजकीय विचारात राजकीय सुधारणा आणि निःशस्त्र क्रांतिवाद हे महत्त्वाचे दोन भाग होते. लोकमान्य टिळकांच्या राजकीय विचारांवर उदारमतवाद, परंपरावाद आणि बुद्धीप्रामाण्यवादाचा प्रभाव होता. लोकमान्य टिळकांच्या राजकीय विचारांचा आढावा घेताना आधी राजकीय सुधारणा की सामाजिक सुधारणा, यावर तत्काळामध्ये सुरू असणारा वाद विचारात घेणे आवश्यक आहे. त्याचबरोबर इंग्रजी राजवटीपासून होणारा जुलूम, टिळकांनी स्वातंत्र्यलढ्यासाठी अवलंबलेल्या राजकीय आंदोलनाची चतु:सूत्री, राष्ट्रवाद आदि त्यांच्या राजकीय विचार व कार्यक्रमांचा विचार करणे क्रमप्राप्त ठरते. सकारात्मक व आपल्या राष्ट्रहिताच्या दृष्टीने उपकारक होईल असे राजकारण करणे हा टिळकांच्या व्यक्तिमत्त्वाचा एक अनन्यसाधारण पैलू होता. भारत हे एक राष्ट्र आहे, आणि हे राष्ट्र सध्या ब्रिटिशांच्या गुलामीत खिचपत पडले असून ते स्वतंत्र करण्याची जाणीव लोकांमध्ये निर्माण केली. राष्ट्राच्या स्वातंत्र्यासाठी त्यांनी सतत जवळपास तीस वर्षे एवढा दीर्घकाळ लढा दिला. जगातील एका बलाढ्य साम्राज्यशाहीला टक्कर देत भारतीय जनतेला भारतीय स्वातंत्र्याची का आवश्यकता आहे हे पटवून दिले. कारण स्वातंत्र्यप्राप्तीशिवाय सुराज्य निर्माण होणार नाही, यावर त्यांचा ठाम विश्वास होता. त्यांच्या मते, सामाजिक सुधारणांचा समावेश हा राजकीय सुधारणे अंतर्गत होतो. म्हणून सर्व भारतीयांनी राजकीय स्वातंत्र्याची मागणी केली पाहिजे. कारण राजकीय स्वातंत्र्य प्राप्त झाले की आपोआप पुढे सामाजिक सुधारणा घडून येतील असे त्यांचे स्पष्ट मत होते. सन-१९०२ मध्ये लोकमान्य टिळकांनी ब्रिटिशांच्या साम्राज्यवादी धोरणावर प्रखर टीका करणारा 'पाश्चातीपणा की गुलामगिरी' या नावाचा लेख लिहून ब्रिटिश राजवटीच्या दुटप्पीपणावर कोरडे ओढले. टिळकांच्या मते घरात लोकशाही आणि बाहेर साम्राज्यशाही अशा कुटील नितीने वागणारे इंग्रज होते याबाबत त्यांचे मते स्पष्ट होते. ब्रिटिश नोकरशाहीचे अधिकार क्षीण करण्यासाठी टिळकांनी गांधींच्या असहकार चळवळीला सुद्धा पाठिंबा दिला. ब्रिटनच्या आर्थिक वर्चस्वाला शह देणाऱ्या स्वदेशी चळवळीचा टिळकांनी पुरस्कार केला. जनतेत जाज्वल्य

राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण होणे गरजेचे असून असे झाले तरच भारतीयांची गुलामगिरीची शृंखला तुटून पडेल यावर त्यांचा ठाम विश्वास होता.

### ३.२.२.३ लोकमान्य टिळकांचे राष्ट्रवादावरील विचार

लोकमान्य टिळकांनी भारतीय जनमानसात स्वराज्याचा मूलमंत्र देताना राष्ट्रवादाचा पाया घातला. त्यांनी राष्ट्रवादी विचारांचे राजकीय आंदोलन लोकाभिमुख केले. जाज्वल्य राष्ट्रभिमान, राष्ट्रभक्ती व राष्ट्रप्रेम हे लोकमान्य टिळकांच्या विचारांच्या केंद्रस्थानी होते. त्यांनी जात, पात, धर्म, वंश असे भेद न मानता सर्व भारतीयांनी राष्ट्रीयत्वाच्या भावनेखाली एकत्र येण्यासाठी प्रयत्न केले. या काळात संपूर्ण जगभरच प्रखर राष्ट्रवादाचे वारे वहात होते. भारतामध्ये लोकमान्य टिळकांनी राष्ट्रवादी भावनांना मोकळा अवकाश प्राप्त करुन दिला. भारतामध्ये राष्ट्रवाद आणि लोकशाही या दोन विचारसरणीची सुरुवात न्यायमूर्ती रानडे व दादाभाई नौरोजी यांनी केलेली दिसते. त्यानंतर लोकमान्य टिळकांनी मात्र खऱ्या अर्थाने प्रखर राष्ट्रवादाचा विचार हा अगदी जनसामान्यांपर्यंत नेऊन पोहोचविण्याचे कार्य केले.

ब्रिटिशांनी भारतात शिक्षणाचे दालन खुले करून नकळतपणे भारतीयांना एक राष्ट्रीयत्वाची भावनेच्या जवळ आणून दिले होते. ब्रिटिश व्यवस्था असल्यामुळे राष्ट्रवादाच्या भावनेचा विकास होण्यासाठी मर्यादा होत्या. त्यामुळे देशातील लोकांमध्ये देशप्रेम, देशाविषयी अभिमान, ऐक्य, देशाबद्दल आत्मीयतेची भावना असली पाहिजे, या भावना मोकळेपणाने निर्माण होण्यास वाव नव्हता. लोकमान्य टिळकांनी ही परिस्थिती समजून घेतल्यामुळे त्यांनी यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न सुरू केले. वेगवेगळ्या क्लुप्त्या व माध्यमांचा उपयोग करुन लोकमान्य टिळकांनी भारतीयांमध्ये राष्ट्रप्रेमाची भावना जागृत करण्याचे कार्य केले. प्रत्येक भारतीयांच्या मनात राष्ट्रप्रेम, राष्ट्रसेवा, राष्ट्राची प्रगती आदि बद्दलच्या भावना निर्माण होणे, यालाच ते राष्ट्रीयत्वाची भावना असे म्हणतात. विशेषतः पारतंत्र्यात राष्ट्रीयत्वाची भावना प्रखर बनते . त्यासाठी भारतातील सर्व सामान्य जनतेने ऐक्याच्या भावनेने एकत्र आले पाहिजे व स्वराज्य प्राप्तीसाठी प्रयत्न केले पाहिजेत असा त्यांचा आग्रह होता.

'फोडा व राज्य करा' या ब्रिटिश कुटिल नीतीमुळे हिंदू - मुस्लिम ऐक्याला बाधा निर्माण झाली आहे याबद्दल लोकमान्य टिळकांना खात्री पटली होती. त्यामुळे हिंदू - मुस्लिम ऐक्य- हिंदुस्थानातील लोकांत एकत्वाची भावना वाढवून राजकीय आकांक्षा निर्माण करणे हा स्वराज्यप्राप्तीचा पहिला टप्पा असल्याचे ते मानत होते. तसेच देशातील जाती, धर्म, पंथ यांतील मतभेद मिटवून त्यांच्यामध्ये ऐक्य निर्माण करता येईल याबाबत त्याना विश्वास होता. म्हणून त्यांनी हिंदू - मुस्लिम ऐक्य भावना वाढीस लावण्याचा प्रयत्न केला. हिंदू मुसलमानांची एकी झाल्याखेरीज स्वराज्याची चळवळ गतिमान बनणार नाही. या विश्वासानेच त्यांनी राजकीय पातळीवर ऐक्य घडवून आणण्याचा प्रयत्न केला.

लोकमान्य टिळकांनी शिवजयंती व गणेशोत्सवाद्वारे राष्ट्रीयतेची भावना भारतीय जनमानसात रुजविण्याचा प्रयत्न केला. हे कार्यक्रम त्यांनी महाराष्ट्रात जरी सुरु केले असले तरी हळूहळू त्यांनी सुरु केलेल्या या कार्यक्रमांमुळे संपूर्ण देशभर राष्ट्रभावनेचा एक संदेश पोहोचून राष्ट्रीयत्वाच्या वातावरणाची निर्मिती होण्यास

मोठी मदत झाली. परंतु त्यांच्या या पद्धतीच्या कार्यक्रमांमुळे हिंदू धर्माचा अभिमान हा राष्ट्रवादाचा प्रमुख आधार मानल्याने मुस्लिम समाज राष्ट्रीय चळवळीपासून दूर जाऊ लागल्याची त्यांच्यावर टीका देखील झाली. परंतु सभोवतालच्या परिस्थितीचा त्यांच्यावर प्रभाव होता आणि त्यावेळी धर्म व संस्कृती हे घटक लोकांना संघटीत करण्यासाठी त्यांना योग्य वाटले असावेत. लोकमान्य टिळकांना राष्ट्रवादी विचारातून भारतीयांना संघटीत करावयाचे होते, ब्रिटिशांकडे अर्ज व विनंत्या करून नव्हे. ब्रिटीशांची गुलामी झुगारून स्वराज्याची मागणी करण्यासाठी टिळकांपुढे राष्ट्रवाद जागृतीचा एकमेव महत्त्वाचा पर्याय होता. त्यासाठीच त्यांनी राष्ट्रवादाचे राजकीय आंदोलन उभे केले. जनसामान्यांच्या सहभागानेच राष्ट्रीयत्वाच्या भावनेने एकदा का समाज जागृत झाला की स्वराज्य प्राप्तीला वेळ लागणार नाही असे त्यांना मनोमन वाटत होते.

अशाप्रकारे लोकमान्य टिळकांनी जी राष्ट्रीयत्वाची रुजवण भारतीयांमध्ये केली तिने भारतीय राष्ट्रवादाची भावना विकसित केली. शेवटी अशाच राष्ट्रवादाच्या आधारे देश स्वतंत्र झाला व टिळकांना अपेक्षित स्वराज्याची स्थापना झाली.

### ३.२.२.४ लोकमान्य टिळकांची चतु:सूत्री

ब्रिटिश कालखंडात 'स्वराज्य' अर्थात भारतीयांचे स्वत:चे राज्य हे भारतीय जनतेचे ध्येय होते. परंतु हे ध्येय साध्य करण्यासाठी ज्या मार्गाचा अवलंब करावयाचा होता, त्या मार्गाबाबत भारतीय राष्ट्रीय काँग्रेसमध्ये तीव्र मतभेद होते. 'स्वराज्य' हे लोकमान्य टिळकांचे साध्य होते विविध साधनांच्या द्वारा ते प्राप्त करणे हे त्यांच्या कार्यपद्धतीचे सूत्र होते. सर्वसामान्य जनतेला राजकीय चळवळीत सहभागी करणारे कार्यक्रम स्वराज्याच्या चळवळीला व्यापक करतील यावर त्यांचा विश्वास होता. अर्ज व विनंत्या करून मवाळांच्या धोरणाने ब्रिटिश सत्तेकडून प्रगती साधने अशक्य होते आणि निव्वळ क्रांतिचा मार्ग अवलंबिणे हे देखील त्याकाळी धोकादायक होते. त्यामुळे लोकमान्य टिळकांनी जाणीवपूर्वक स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण व स्वराज्य या चतुःसूत्रीचा मार्ग स्वीकारला.

**१) स्वदेशी :**

आर्थिक शोषण हा ब्रिटिश राजवटीचा मूलाधार होता. दादाभाई नौरोजी यांच्यासारख्या काही मोजक्या व्यक्तींनी ब्रिटिश आमदानीतील भारताच्या आर्थिक शोषणावर प्रकाश टाकला होता. लोकमान्य टिळकांनी देखील आर्थिक शोषणाचे तेच सूत्र घेऊन भारताच्या आर्थिक प्रश्नावर लेखन केले होते. त्यांनी जनतेला आवाहन करुन स्वदेशी वस्तू वापर करणे व स्वदेशीचा स्वाभिमान बाळगण्याबाबतचा ठोस असा कार्यक्रम दिला होता. आपल्या देशातील मालावर हे ब्रिटिश सरकार जास्त कर आकारत असल्यामुळे त्यातून इंग्लंडला प्रचंड आर्थिक नफा हा फायद्याच्या स्वरूपात मिळतो. कोणत्याही इतर देशातील लोक असे होणारे आर्थिक शोषण व असा अन्याय सहन करणार नाहीत. त्यामुळे असा होणारा अन्याय दूर करून अन्यायाचा प्रतिकार करावयाचा झाल्यास त्यासाठी प्रभावी मार्ग म्हणजे स्वदेशीचा अवलंब करणे होय. लोकमान्य टिळकांनी स्वदेशीच्या चळवळीला स्वातंत्र्य प्राप्तीचे एक प्रभावी साधन म्हणून महत्व प्राप्त करून दिले होते. कारण

स्वदेशी वस्तूच्या वापरामुळे भारतीय वस्तु आणि उद्योगाला प्रोत्साहन मिळून कामगारांच्या हाताला काम मिळून त्यांना स्वंयपूर्ण होण्याचा मार्ग मोकळा होतो.

लोकमान्य टिळकांनी 'स्वदेशी' विचाराला केवळ आर्थिक आणि राजकीय महत्वच प्राप्त करून दिले नाही तर 'स्वदेशी हा एक धार्मिक, नैतिक आणि राजकीय कार्यक्रम' म्हणून त्याला महत्व प्राप्त करून दिले. स्वदेशीचा अवलंब केला तर परदेशी व्यापाऱ्यांवर आपोआपच लगाम कसला जाईल व देशातील लोकांच्या उद्योगधंदयांना गती मिळेल. लोकमान्य टिळकांनी स्वदेशीच्या संदर्भात सुशिक्षितांची मोठी जबाबदारी असल्याचे म्हटले होते. कारण देशातील सामान्य जनता ही गरीब असल्यामुळे परदेशी कपडे ते खरेदी करू शकणार नाहीत. त्यांनी १९०३ मध्ये पैसा फंड उभारून, मुंबई सहकारी भांडार, व स्वदेशी वस्तुची प्रदर्शने आयोजित केली होती. स्वदेशी चळवळीला मूर्त स्वरुप प्राप्त होऊ शकले तर देशाची आर्थिक उन्नती झाल्याशिवाय राहणार नाही यावर त्यांचा ठाम विश्वास होता. अशाप्रकारे देशप्रेमाने भारून जाऊन जनजागृतीचे कार्य केल्यामुळे विद्यार्थी व युवा वर्गामध्ये राष्ट्रीय भावना जागृत करण्यासाठी 'स्वदेशी' चळवळ अत्यंत महत्त्वाची ठरली होती.

२) **बहिष्कार :**

'बहिष्कार' हे सुत्र प्रामुख्याने आर्थिक घटकावर आधारलेले आहे. बहिष्काराचा मार्ग हा स्वदेशीहून थोडा भिन्न आहे. वास्तविक 'स्वदेशी' व 'बहिष्कार' हे दोन्ही मार्ग आर्थिक विचारसरणीवर आधारित आहेत. बहिष्कार याचा अर्थ परदेशी वस्तूंचा त्याग करणे होय. लोकमान्य टिळकांच्या मते, जेव्हा जनता आणि विदेशी शासक यांच्यात संघर्ष सुरू असतो तेंव्हा जनतेने परदेशी मालावर बहिष्कार टाकणे आवश्यक असते. आम्ही सशस्त्र क्रांतीचा पुरस्कार करीत नाही तेवढी आमच्यात शक्तीही नाही परंतु अशा स्थितीत आम्ही बहिष्काराद्वारे परदेशात जाणारे करोडो रुपये वाचवू शकतो. बहिष्कारामुळे एक तर परकियांची अर्थव्यवस्था खिळखिळी होते व दुसरे म्हणजे स्वदेशी वस्तूंचे उत्पादन वाढते. त्यामुळे अंतर्गत अर्थव्यवस्थेला बळकटी प्राप्त होते. परंतु टिळकांनी सांगितलेल्या बहिष्काराचे महत्व आर्थिकतेबरोबरच राजकीय दृष्ट्या जास्त महत्त्वाचे होते. त्यांच्या मते, आम्हा भारतीयांजवळ बहिष्कारासारखे एक प्रभावी अस्त्र आहे, मूठभर इंग्रज आमच्यावर राज्य करू शकतात कारण आमच्यातील काही लोक त्यांना सहाय्य करतात. त्यामुळे आम्ही स्वतःच आमच्या अधोगतिला जबाबदार आहोत. टिळक म्हणतात की अशा परिस्थितीत सर्व शक्तींनी युक्त असलेल्या ब्रिटिश सत्तेच्या विरोधात तुमच्याकडे सशस्त्र क्रांती करण्याची ताकद नाही म्हणून काही बिघडत नाही, जर तुमच्यामध्ये आत्मत्याग आणि आत्मसंचयाची शक्ती असेल तर ब्रिटिश सरकारला तुमच्यावर शासन करण्यास सहकार्य मिळणार नाही. टिळकांच्या मते यालाच 'बहिष्कार' म्हणतात. त्यांच्या मते, 'बहिष्कार' हा शब्द केवळ विदेशी वस्तूंचा त्याग करणे एवढाच मर्यादीत त्याचा अर्थ नसून या बहिष्काराच्या व्याप्तीमध्ये सरकारच्या शासन, न्याय, कर वसूली आदि सर्व कार्यावर बहिष्काराचाही समावेश होतो.

### ३) राष्ट्रीय शिक्षण :

लोकमान्य टिळकांचा सार्वजनिक जीवनात प्रवेश होण्यापूर्वी देशातील तत्कालिन शिक्षणसंस्था ह्या सरकारी होत्या. त्यापैकी काही थोड्या शाळा व महाविद्यालये मिशनरीकडून चालविले जात होते. या शिक्षणसंस्थातून दिले जाणारे शिक्षण हे ब्रिटिशांसाठी कारकून तयार करणारे होते. त्या शिक्षणातून केवळ पाश्चात्यांचे अंधानुकरण करणाऱ्या देशाभिमान शून्य पदवीधरांच्या संख्येत भर पडत होती. विजयी राज्यकर्त्यांनी पराभूत जनतेला कधीच राष्ट्रधर्म शिकवला नाही. त्यांच्या मते हा इतिहास आहे. राष्ट्रभावना, राष्ट्रहित, राष्ट्राची उन्नती यांची प्रेरणा न देता सरकारी शाळा व महाविद्यालयांमधुन केवळ लाचार सरकारी नोकरांची निर्मिती होऊ शकते. अशा सरकारी संस्थांमधून दिले जाणारे शिक्षण हे विद्यार्थ्यांना राष्ट्रीय आंदोलनापासून दूर राहायला शिकवते. म्हणून अशा शिक्षणा व्यवस्थेचा टिळकांनी धिक्कार केला. ब्रिटिश राजवटीच्या नियंत्रणाखाली असलेल्या शिक्षणाचा उपयोग हा सामान्य जनतेला गुलामगिरीत ठेवण्यासाठी होतो हे त्यांचे निरीक्षण होते.

पूर्वजांच्या अनुभवाविषयी जे ज्ञान दिले जाते त्याला शिक्षण म्हणतात आणि विद्यार्थ्यांच्या, तरुण पिढीच्या मनात देशाविषयी विचार जागृत करणे म्हणजे 'राष्ट्रीय शिक्षण' होय अशी लोकमान्य टिळकांनी राष्ट्रीय शिक्षणाची व्याख्या करताना म्हटले आहे. टिळकांनी तत्कालीन शैक्षणिक परिस्थिती व त्यावरील उपाय याबाबत केसरी मध्ये अनेक लेख लिहिले होते. टिळकांनी देशातील शिक्षणाचा दर्जा कसा खालावलेला आहे हे राज्यकर्त्याच्या नजरेस आणून दिले. त्यांच्या मते त्यावेळच्या शाळा, महाविद्यालयामधील शिक्षक, प्राध्यापक हे कर्झनशाहीच्या हातातील कळसूत्री खेळणी बनले होते तर विद्यापीठे सरकारी हमालखाने बनली असल्याची टीका त्यांनी केली. त्यांच्या मते, राष्ट्रहित आणि प्रगतीची तत्वे शिकवण्यास ब्रिटिश शिक्षण पद्धती निरुपयोगी आहे. शिक्षण व्यवस्थेतील अनेक दोष दाखवून सकस राष्ट्रीय वृत्तीचे व स्वावलंबनाचे धडे देणाऱ्या राष्ट्रीय शिक्षण संस्था निर्माण केल्या पाहिजेत यावर टिळकांचा भर होता.

### ४) स्वराज्य :

लोकमान्य टिळकांच्या राजकीय आंदोलनाचे मुख्य ध्येय स्वराज्यप्राप्ती हे होते. त्यांनी सांगितलेल्या चतुःसूत्री कार्यक्रमात स्वराज्य या मार्गाला विशेष महत्व होते. कारण स्वराज्य प्राप्ती हे लोकमान्य टिळकांचे साध्य होते. त्यामुळे टिळकांनी चतुःसूत्रीतील स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण ही साधने आपल्या राजकीय आंदोलनात स्वीकारलेली दिसतात. त्यांनी स्वराज्याच्या चळवळीला व्यापक अधिष्ठान देण्यासाठी या तीन साधनांचा उपयोग केला. ब्रिटिशांच्या अंकित राहून भारतीयांची प्रगती होणार नाही याची जाणीव टिळकांना झाली होती. पारतंत्र्य हे भारतीय समाजाच्या अवनतीचे प्रमुख कारण आहे असे त्याचे स्पष्ट मत होते. म्हणूनच त्यांनी देशाची राजकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक प्रगती होण्यासाठी स्वराज्याच्या आंदोलनाची सुरुवात केली. आपल्या स्वराज्याच्या प्राप्तिसाठी त्यांनी सनदशीर मार्गाऐवजी जहाल मार्गाचा अवलंब केला. लोकमान्य टिळकांनी स्वराज्य प्राप्तीसाठी मवाळ किंवा क्रांतिकारी मार्ग न स्वीकारता स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षणाचा मार्ग अनुसरून ब्रिटिशांशी संघर्ष केला.

### ३.२.२.५ लोकमान्य टिळकांचे स्वराज्य विषयक विचार

लोकमान्य टिळक हे ब्रिटिश सत्तेला उघड विरोध करणारे, ब्रिटिशांच्या जुलमी राजवटीच्या कारभाराचे वाभाडे काढणारे, क्रांतिकारी विचाराद्वारे राष्ट्राचे चैतन्य निर्माण करणारे, जहालमतवादी विचारांचे पुरस्कर्ते होते. त्यांच्या एकूणच कार्यभागाचे 'स्वराज्य' संपादन हे साध्य होते. लोकमान्य टिळक हे एक प्रभावी भारतीय राष्ट्रवादी, समाजसुधारक आणि स्वातंत्र्यसैनिक होते. भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या सुरुवातीच्या टप्प्यात त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. भारतीय लोकांच्या प्रगतीसाठी आणि कल्याणासाठी राजकीय स्वातंत्र्य आणि स्वराज्य आवश्यक असल्याचे टिळकांचे मत होते. स्वदेशी चळवळीतील त्यांचे योगदान आणि स्वराज्यावर त्यांनी दिलेला भर यांचा भारताच्या स्वातंत्र्याच्या लढ्यावर प्रचंड प्रभाव पडला होता.

**स्वराज्याची संकल्पना :**

लोकमान्य टिळकांची 'स्वराज्य' ही संकल्पना अनेक घटकांवर उभी होती. या संकल्पनेला राजकीय, सामाजिक, अध्यात्मिक व व्यावहारिक पाया आहे. 'स्वराज्य' हा शब्द वेदातील शब्दापासून घेतलेला आहे. या शब्दाचा वापर उच्च प्रतीचे अध्यात्मिक राज्य या अर्थाने वापरला जात होता. टिळकांना राजकीय स्वातंत्र्यासाठी स्वराज्याची गरज होती. राजकीय दृष्टीकोनातून स्वराज्य म्हणजे सत्ताधीश व नागरिक एकाच देशाचे असणे, स्वराज्य म्हणजे चांगले शासन, कायदयाचे राज्य, स्वराज्य म्हणजे जनतेच्या हितासाठी काम करणारे, त्यांच्या कल्याणासाठी काम करणारे शासन, स्वराज्य म्हणजे जनतेने निर्वाचित केलेले व जनतेस जबाबदार असणारे शासन. सन १९०६ मध्ये कलकत्ता येथील अधिवेशनात दादाभाई नौरोजी यांनी सुराज्य हे स्वराज्याची जागा घेऊ शकत नाही असे म्हटले होते. टिळक नौरोजींच्या या विचाराशी सहमत होते. या अर्थाने त्यांची स्वराज्याची संकल्पना अध्यात्मिक होती. धर्मरक्षण व धार्मिक प्रगतीसाठी स्वराज्य आवश्यक आहे असे देखील टिळकांचे मत होते.

लोकमान्य टिळकांनी १९१६ साली होमरुल चळवळ सुरू केली. स्वराज्याची मागणी करणे, स्वराज्याच्या मागणीला जनतेचा पाठिंबा मिळविणे, हा होमरुल चळवळीचा मुख्य उद्देश होता. त्यांच्या मते, स्वराज्य हे सामाजिक विकासाचे व प्रगतीचे मूळ होय. स्वराज्य प्राप्ती शिवाय शिक्षणप्रसार, सामाजिक सुधारणा या बाबी घडून येणार नाहीत त्यासाठी स्वराज्य मागणीसाठी ते आग्रही होते. १९१६ मध्येच लखनऊ येथे ॲनी बेझंट यांच्या अध्यक्षतेखाली स्वराज्य संघाची स्थापना झाली. बेझंट यांच्या विनंतीवरून टिळकांनी जे भाषण केले त्यातील ऐतिहासिक वाक्य स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे, आणि तो मी मिळविणारच हे त्यांच्या तोंडून बाहेर पडले. टिळकांनी स्वराज्याचे महत्व स्पष्ट करताना म्हटले आहे की, परमेश्वराच्या नावाप्रमाणे स्वराज्याची घोषणा झाली पाहिजे. शरीरास जसे चैतन्य तसे राष्ट्रास स्वातंत्र्य, पारतंत्र्य म्हणजे विष तर स्वातंत्र्य म्हणजे अमृत, राजकीय गुलामगिरी म्हणजे नर्क तर राजकीय स्वातंत्र्य म्हणजे स्वर्ग होय. आपण प्रभू श्रीरामाप्रमाणे वनवास, अज्ञातवास सोसल्याशिवाय आपणास स्वराज्याची प्राप्ती होऊ शकणार नाही, पारतंत्र्यातील आपले जीवन म्हणजे पाय असुनसुद्धा कुबड्या घेऊन चालण्याचा प्रकार आहे. त्यामुळे

आपल्यातील राष्ट्रीयत्वाची भावना जागृत करुन राजकीय स्वातंत्र्यासाठी संघर्षशील बनणे व स्वराज्याचे ध्येय प्राप्त करणे हेच टिळकांचे जीवन साध्य बनले होते.

अशाप्रकारे लोकमान्य टिळकांनी भारतीयांना शासन, अर्थव्यवस्था आणि संस्कृती यासह सर्व पैलूंमध्ये स्वावलंबी होण्याच्या गरजेवर भर दिला. जेव्हा भारतीय स्वावलंबी असतील आणि परकीय शक्तींवर अवलंबून नसतील तेव्हाच खरे स्वातंत्र्य मिळू शकेल असा त्यांचा विश्वास होता. टिळकांनी भारतीय संस्कृती आणि वारसा यांच्या जतन आणि संवर्धनाच्या महत्त्वावर भर दिला. त्यांनी शिवजयंती, गणेश चतुर्थी सारखे सण लोकांमध्ये एकतेची भावना आणि सांस्कृतिक अभिमान वाढवण्याचे साधन म्हणून साजरे करण्यास प्रोत्साहन दिले व सांस्कृतिक राष्ट्रवाद बळकट करण्याचा प्रयत्न केला. व्यक्ती आणि राष्ट्राला सक्षम बनवण्यासाठी शिक्षणाच्या सामर्थ्यावर टिळकांचा विश्वास होता. त्यांनी स्थानिक भाषांमध्ये शिक्षणाच्या प्रचार व प्रसारावर भर दिला आणि ते लोकांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला. लोकमान्य टिळक हे जनसंघटनांचे पुरस्कर्ते होते आणि स्वातंत्र्याच्या लढ्यात सामान्य लोकांच्या सक्रिय सहभागावर त्यांचा विश्वास होता. स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे, आणि तो मी मिळवणारच, असे ब्रिटिश राजवटीला त्यांनी ठासून सांगितले होते. यावरून त्यांचा निश्चय आणि ध्येयनिष्ठा स्पष्ट होते. त्यांनी वसाहतवादी दडपशाहीविरुद्ध संयुक्त आघाडीची हाक दिली. लोकमान्य टिळकांच्या विचारांचा आणि तत्त्वांचा भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील नेत्यांवर लक्षणीय प्रभाव पडला आणि संपूर्ण स्वातंत्र्य लढ्यात स्वराज्याची संकल्पना मार्गदर्शक शक्ती बनली.

## ३.३ सारांश

श्री अरविंद हे एका सुविद्य कुटूंबात जन्माला आले होते. त्यांचे अगदी लहान वयातच शिक्षणासाठी विदेशात प्रयाण झाले होते. असे असले तरी त्यांच्या परदेशातील शिक्षणामुळे मायदेशीचे प्रेम मात्र कमी झाले नव्हते. उलट त्यांचे मायदेशाप्रतीचे प्रेम अधिकच प्रगाढ झाले होते. ते मातृभूमीच्या ओढीने भारतात परत आले. भारतात आल्यानंतर विभिन्न स्तरावर कार्य करीत असताना देशभक्ती, राष्ट्रवाद व भारताचे स्वातंत्र्य हेच ध्येय सर्व कार्याच्या केंद्रस्थानी होते. श्री अरविंद यांनी भारतीय जनतेला आपण पारतंत्र्यात आहोत व त्यामुळे आपल्यात नैतिक ऱ्हास होत असल्याबद्दलची जाणीव त्यांनी एत्तद्देशियांना करुन देऊन त्यांच्यामध्ये भारतीय राष्ट्रवादाचे बिजारोपण करण्याचे अतिशय जिकरीचे कार्य केले. श्री अरविंद हे आधुनिक भारतात भारतीय राष्ट्रवादी विचारांच्या उदगात्यांपैकी एक आहेत. त्यांनी भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसमध्ये सक्रिय योगदान दिले. भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसची कार्यशैली न पटल्यामुळे प्रसंगी त्यानी कॉंग्रेसवर कठोर शब्दात टीका देखील केली. त्यांनी राष्ट्रवादी चळवळीत महत्वपूर्ण योगदान दिले. राष्ट्रवाद ही भारतीयांसाठी एक अध्यात्मिक संकल्पन असल्याचे स्पष्ट करून त्यांनी राष्ट्रीय चळवळीस नैतिक व आध्यात्मिक अधिष्ठान प्राप्त करून देण्याचा प्रयत्न केला. अशाप्रकारे त्यांच्या तत्वज्ञातील एकुणच तत्त्व-विचार व कार्यशैलीचा विचार करता श्री अरविंद यांचे भारतीय तत्त्वज्ञान व भारतीय राजकीय विचार विश्वातील महत्त्वपूर्ण योगदान अधोरेखित होते.

लोकमान्य टिळकांनी राष्ट्रभक्तीने प्रेरित होऊन राजकीय क्षेत्रात जे अतुलनीय कार्य केले त्यामुळे राष्ट्रीय चळवळीला अधिक गती प्राप्त होऊ शकली. त्यांचे स्वराज्य प्राप्तीचे ध्येय हे त्यांच्या हयातीत पूर्ण होऊ

शकले नाही. हे जरी खरे असले तरी ब्रिटिशांच्या विरोधात भारतीयांमध्ये प्रचंड जनक्षोभ निर्माण करण्याचे कार्य टिळकांनी केले आणि भारताच्या स्वातंत्र्य चळवळीला एक नवी दिशा दिली. परकीय राजवटी विरोधात आपल्या पारतंत्र्याची जाणीव लोकांना करवून देणे व जनतेला त्यासाठी परकीय गुलामीविरुद्ध क्रांती करण्यास भाग पाडणाऱ्या लोकमान्य टिळकांना चिरोल यांनी मभारतीय असंतोषाचे जनकफ या नावाने संबोधले होते. लोकमान्य टिळकांच्या एकुणच कार्यशैलीवरून हे स्पष्ट होते की, लोकमान्य टिळक हे क्रांतिकारक व जहालवादाचा पुरस्कार करणारे होते. त्यांचे राष्ट्रीय आंदोलनातील कार्य हे स्वराज्य प्राप्तीच्या ध्येयाने प्रेरित झालेले व निश्चित दिशा असलेले आंदोलन होते. त्यांच्या आंदोलनाला विशिष्ट विचारसरणीचा भक्कम असा पाया होता. या विचारसरणीतून स्वराज्य, स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण अशी चतु:सूत्री निर्माण झालेले होती. यावरून ते खऱ्या अर्थाने स्वतंत्र भारताच्या स्वराज्यासाठी झटणारे कसे प्रखर देशभक्त होते ते स्पष्ट होते. अशाप्रकारे श्री अरविंद व लोकमान्य टिळक हे भारताच्या राजकीय व आध्यात्मिक तत्वज्ञानाचा उपयोग हा भारत देश स्वतंत्र करून स्वराज्य स्थापन करण्यासाठी करीत होते. तसेच त्यांनी भारताच्या राजकीय व आध्यात्मिक तत्वज्ञानाच्या क्षेत्रात भरीव योगदान देऊन भारतीय जनमानसामध्ये जाज्वल्य देशाभिमान रुजविण्यात मोठ्या प्रमाणात यश प्राप्त केले हे यावरून स्पष्ट होते.

## ३.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

**आक्रमक प्रतिकार :** आक्रमक प्रतिकार म्हणजे शासन व्यवस्थेच्या विरोधात केलेली अशी जाणीवपूर्वक कृती की ज्याद्वारे शासनाचे प्रत्यक्षात नुकसान करणे होय. यामध्ये क्रांतीकारी कृतींचाही समावेश आहे.

**बचावात्मक किंवा निष्क्रिय प्रतिकार :** बचावात्मक किंवा निष्क्रीय प्रतिकार म्हणजे सरकारला शासन व प्रशासन कार्यामध्ये कोणत्याच प्रकारचे सहकार्य न करणे. तत्कालिन परिस्थितीचा विचार करता श्री अरविंद यांनी बचावात्मक किंवा निष्क्रीय प्रतिकाराचा मार्गच श्रेयस्कर असून तो स्वीकारण्याचे आवाहन केले होते.

**स्वदेशी :** ब्रिटीश शासन भारतीय वस्तूंवर जबर कर आकारून भारतीयांचे आर्थिक शोषण करीत होते. या शोषणातून सुटण्याचा प्रभावी मार्ग लोकमान्य टिळकांनी शोधून काढला, व तो मार्ग म्हणजे 'स्वदेशी'. लोकमान्य टिळकांनी स्वदेशीच्या चळवळीला स्वातंत्र्य प्राप्तीचे एक प्रभावी साधन म्हणून महत्व प्राप्त करुन दिले होते. इतकेच नाही तर लोकमान्य टिळकांनी 'स्वदेशी' विचाराला केवळ आर्थिक आणि राजकीय महत्वच प्राप्त करून दिले असे नाही तर 'स्वदेशी हा एक धार्मिक, नैतिक आणि राजकीय कार्यक्रम' म्हणून त्याला महत्व प्राप्त करुन दिले.

**राष्ट्रीय शिक्षण :** लोकमान्य टिळकांनी राष्ट्रीय शिक्षणाची परिभाषा दिलेली आहे. त्यांच्या मते, पूर्वजांच्या अनुभवाविषयी ज्ञान देणे म्हणजे 'शिक्षण' होय. तर विद्यार्थ्यांच्या, तरुणाईच्या मनात देशाविषयी विचार जागृत करणे म्हणजे 'राष्ट्रीय शिक्षण' होय. प्रत्येक स्वतंत्र देशातील सरकार आपल्या प्रजेला राष्ट्रीय शिक्षणच देते. देशातील तरुण पिढी, देशाचे राजकीय, औद्योगिक आणि सामाजिक वैभव वाढविण्यास समर्थ होईल अशा प्रकारचे शिक्षण देणे, हे देशातील शिक्षण विभागाचे कर्तव्य आहे, यास 'राष्ट्रीय शिक्षण' असे म्हणतात.

**बहिष्कार :** 'बहिष्कार' याचा अर्थ परदेशी वस्तूंचा त्याग करणे होय. लोकमान्य टिळकांनी 'बहिष्कार' हा शब्द केवळ विदेशी वस्तूंचा त्याग करणे वा त्यांचा वापर न करणे एवढाच नसून त्यामध्ये शासन, न्याय, कर भरणा आदी कार्यावर बहिष्काराचाही समावेश केला आहे.

**स्वराज्य :** भारतीय स्वातंत्र्य चळवळीत कार्य करतांना लोकमान्य टिळकांच्या राजकीय आंदोलनाचे मुख्य ध्येय स्वराज्यप्राप्ती हे होते. त्यांनी सांगितलेल्या चतुःसूत्री कार्यक्रमात स्वराज्य या मार्गाला विशेष महत्व होते. कारण स्वराज्य प्राप्ती हे लोकमान्य टिळकांनी साध्य मानले होते. स्वराज्य म्हणजे सर्वसामान्य माणसांचे राज्य. लोकमान्य टिळकांनी देशाची राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक प्रगती होण्यासाठी स्वराज्याच्या आंदोलनाची सुरुवात केली. त्यासाठी सनदशीर मार्गाऐवजी जहाल मार्गाचा अवलंब त्यांनी केला.

## ३.५ स्वयंअध्यनासाठी प्रश्न

१) श्री अरविंद यांच्या मते स्वातंत्र्य म्हणजे काय?

२) श्री अरविंद यांनी सांगितलेला राष्ट्रवादाचा अर्थ सांगा?

३) श्री अरविंद यांच्या मते, स्वराज्य म्हणजे काय?

४) लोकमान्य टिळकांच्या चतुःसूत्री कार्यक्रमातील चार सूत्रे कोणती?

५) तुरुंगात असतांना लोकमान्य टिळक यांनी कोणता ग्रंथ लिहिला?

६) लोकमान्य टिळकांच्या दृष्टीकोनातून स्वराज्याचे काय महत्व आहे?

## ३.६ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

१) श्री अरविंद यांच्या मते, स्वातंत्र्य ही वैयक्तिक, बौद्धिक, औद्योगिक आणि राजकीय विकासाची पूर्वअट आहे. स्वातंत्र्याशिवाय विकास शक्य नाही. व्यक्तीच्या सर्वांगीण व स्वाभाविक विकासासाठी स्वातंत्र्याची नितांत आवश्यकता असते. स्वातंत्र्यामुळे समाजाचा नैतिक, बौद्धीक, व औद्योगिक विकास होत असतो. त्याचबरोबर स्वातंत्र्यामुळे व्यक्तीचा आंतरिक विकास देखील होत असतो.

२) श्री अरविंद यांनी 'वंदे मातरम्' या साप्ताहिकातील लेखात राष्ट्रवादाचा अर्थ स्पष्ट केला आहे. त्यांच्या मते, राष्ट्रवाद म्हणजे देशात दैवी ऐक्य प्रस्थापित करण्याची अत्युच्च व प्रबळ महत्वाकांक्षा होय. हे दैवी ऐक्य किंवा एकतेमध्ये अनेक व्यक्ती ज्यांचे सामाजिक, राजकीय व आर्थिक कार्य, विचार व क्षेत्र भिन्न असून देखील ते सर्व मूलभूत रुपात एकच असतात. म्हणून अशा राष्ट्रीयतेसंबंधी जो आदर्श भारत जगासमोर प्रस्तुत करील त्यामध्ये व्यक्ती, जाती, पंथ आणि वर्ग यामध्ये स्वाभाविक समानता असेल.

३) श्री अरविंद यांच्या मते, 'स्वराज्य' म्हणजे प्राचीन भारतीय जीवनशैलीचा आधुनिक काळातील जीवनशैलीशी मेळ बसविणे, राष्ट्राच्या दृष्टीने अभिमानास्पद अशा सत्ययुगाची पुनर्स्थापना करणे,

शिक्षक आणि मार्गदर्शक या महान भूमिका पुन्हा निभावणे आणि वैदिक आदर्शानुसार राजकारणातील आचरण करण्याच्या दृष्टीने लोकांची स्वमुक्ती करणे होय.

४) स्वराज्य, स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण हि लोकमान्य टिळकांच्या चतु:सूत्री कार्यक्रमातील चार सूत्रे आहेत.

५) तुरुंगात असतांना लोकमान्य टिळक यांनी मगीतारहस्यफ हा ग्रंथ लिहिला.

६) लोकमान्य टिळकांनी स्वराज्याचे महत्व विषद करतांना म्हटले आहे की, परमेश्वराच्या नावाप्रमाणे स्वराज्याची घोषणा होणे आवश्यक आहे. शरीरास जसे चैतन्य तसे राष्ट्रास स्वातंत्र्य, पारतंत्र्य म्हणजे विष तर स्वातंत्र्य म्हणजे अमृत आणि राजकीय गुलामी म्हणजे नर्क तर राजकीय स्वातंत्र्य म्हणजे स्वर्ग होय.

## ३.७ सरावासाठी स्वाध्याय

१) श्री अरविंद यांचे राजकीय विचार स्पष्ट करा.

२) श्री अरविंद यांचे स्वातंत्र्य विषयक विचार स्पष्ट करा.

३) श्री अरविंद यांचे राष्ट्रवाद विषयक विचार स्पष्ट करा.

४) 'श्री अरविंद आणि स्वराज्य' भाष्य करा.

५) श्री अरविंद यांनी सांगितलेल्या संघटित प्रतिकाराचे स्वरुप सांगा.

६) लोकमान्य टिळकांचे राजकीय विचार स्पष्ट करा.

७) लोकमान्य टिळकांच्या राजकीय आंदोलनाची चतु:सूत्री स्पष्ट करा.

८) लोकमान्य टिळकांच्या राष्ट्रवादावरील विचारांची प्रासंगिकता सांगा.

९) 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे', भाष्य करा.

१०) लोकमान्य टिळकांच्या स्वातंत्र्य चळवळीतील योगदानावर चर्चा करा.

## ३.८ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके


१) भोळे, भा. ल. : (२००३) : आधुनिक भारतातील राजकीय विचार : पिंपळापूरे ॲण्ड कं. पब्लिशर्स : नागपूर.

२) पाटील, वा. भा. : (२०१३) : प्राचीन व भारतीय आधुनिक राजकीय विचारवंत : प्रशांत पब्लिकेशन : जळगांव.

३) पाटील, बी. बी. : (१९९७) : भारतीय राजकीय विचारवंत : फडके प्रकाशन : कोल्हापूर.

४) गर्दे, दि. का. : आधुनिक भारतीय राज्यविचार : परिमल प्रकाशन : औरंगाबाद.

५) डोळे, ना. य. : (१९९९) : भारतीय राजकीय विचारवंत : विद्या बुक्स पब्लिशर्स : औरंगाबाद.

६) श्रृंगारपुरे, अरविंद : (२००३) : निवडक भारतीय राजकीय विचारवंत, विद्या प्रकाशन, नागपूर.

७) प्रधान, ग. प्र. : (२००४) : लोकमान्य टिळक : नॅशनल बुक ट्रस्ट : इंडिया.

८) मुठाळ, राम : (१९९७) : भारतीय आणि पाश्चमात्य राजकीय विचारवंत : अंशुल पब्लिकेशन्स : नागपूर.

❑❑❑

**घटक ४**

# धर्म आणि राष्ट्रवाद

**(Religion & Nationalism)**

**अनुक्रमणिका:**


४.० उद्दिष्टे

४.१ प्रास्ताविक

४.२ विषय विवेचन

४.२.१ वि. दा. सावरकर

१) वि. दा. सावरकर यांचा अल्प परिचय

२) वि. दा. सावरकर यांचे धर्मचिंतन

३) वि. दा. सावरकर यांची हिंदू राष्ट्रवादाची संकल्पना

४.२.२ महंमद अली जिना

१) महंमद अली जिना यांचा अल्पपरिचय

२) महंमद अली जिना यांच्या विचारांचे टप्पे

अ) जिना यांची उदारमतवादी दृष्टी

ब) महंमद अली जिना यांची द्विराष्ट्रवादी भूमिका

४.२.३ मौलाना अबुल कलाम आझाद

१) मौलाना आझाद यांचा अल्प परिचय

२) मौलाना आझाद यांची संमिश्र लोकसत्ताक राष्ट्रवादाची संकल्पना

४.३ सारांश

४.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

४.५ स्वयं अध्ययनातील प्रश्न व उत्तरे

४.६ सरावासाठी प्रश्न

४.७ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके

## ४.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला

- वि. दा. सावरकर यांची धर्मविषयक भूमिका जाणून घेता येईल.
- वि. दा. सावरकर यांच्या हिंदू राष्ट्रवादाच्या संकल्पनेचा अभ्यास करता येईल.
- वि. दा. सावरकर यांच्या हिंदू राष्ट्रवादाच्या संकल्पनेचे मूल्यमापन करता येईल.
- बॅ. जिना यांच्या वैचारिक स्थित्यंतराचा आढावा घेता येईल.
- बॅ. जिना यांच्या मुस्लिम राष्ट्रवादाची संकल्पना जाणून घेऊन त्याचे मूल्यमापन करता येईल.
- मौलाना अबुल कलाम आझाद यांच्या वैचारिक भूमिकेला जाणून घेता येईल.
- मौलाना आझाद यांची संमिश्र राष्ट्रवादाची संकल्पना जाणून घेता येईल.

## ४.१ प्रास्ताविक

राष्ट्रवादाने संपूर्ण जगामध्ये ऐतिहासिक व राजकीय निर्णायक वळणे आणि समीकरणे घडवून आणण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. सरंजामशाहीच्या अस्ताबरोबर भांडवलशाहीने जन्म घेतला आणि भांडवलशाहीच्या कुशीत राष्ट्रवादाची संकल्पना उदयास आली. या संकल्पनेने जगामध्ये राष्ट्र-राज्ये निर्माण केली. याशिवाय दोन महायुद्धे घडली त्यात असंख्य निरापराध लोकांचा बळी गेला. या राष्ट्रवादाचा उदय १८ व १९ व्या शतकात युरोपीय राष्ट्रांत झाला. ज्याचा भर हा एकजिनसी समाजातील एकात्मतेवर होता. युरोपीय राष्ट्रे ही बऱ्याच प्रमाणात धर्म, भाषा, संस्कृती, इतिहास याबाबतीत एकजिनसी असल्याने त्यांनी समान धर्म, समान भाषा, समान संस्कृती, समान वंश असे काही घटक राष्ट्रवादाला आधारभूत मानले. येथील सामाजिक एकजिनसित्वामुळे तिथला राष्ट्रवाद यशस्वी होऊ शकला. परंतु ज्याठिकाणी वरील सर्व बाबतींमध्ये समाज हा बहुजिनसी आहे. अशा समाजव्यवस्थेत युरोपीय एकजिनसी राष्ट्रवाद लागू करणे कठीण होते. पण साम्राज्यवाद्यांनी ही संकल्पना वरून लादली. ज्यात अल्पसंख्याक समाजघटकांचा विचार केला नाही. भारतासारख्या बहुविध भाषा बोलणाऱ्या, बहुधार्मिक, बहुसांस्कृतिक देशात हा राष्ट्रवाद अपुरा होता. म्हणून भारतात राष्ट्रवादाचे मुस्लिम द्विराष्ट्रवाद, हिंदूराष्ट्रवाद, संमिश्र धर्मनिरपेक्ष राष्ट्रवाद असे राष्ट्रवादाचे विभिन्न अविष्कार पहावयास मिळतात. ज्यामुळे भारतात स्वातंत्र्यपूर्व आणि त्यानंतरच्या काळात अनेक प्रश्न निर्माण झाले. त्यातून भारताचा खरा राष्ट्रवाद कोणता हा प्रश्न गंभीर बनत गेला. इथे प्रथम हे स्पष्ट करावे लागेल की, भारतीय स्वातंत्र्य चळवळीत विकसित झालेला, विविधतेमध्ये एकात्मता प्रस्थापित करणारा सर्वसमावेशक आणि संविधानातून स्पष्ट होणारा संमिश्र धर्मनिरपेक्ष भारतीय राष्ट्रवादच हा खऱ्या अर्थाने भारतीयांचा खरा राष्ट्रवाद आहे. भारताला एक राष्ट्र म्हणून ठेवायचे असेल तर या राष्ट्रवादाला पर्याय नाही. या राष्ट्रवादाशिवाय मांडल्या जाणाऱ्या राष्ट्रवादाच्या संकल्पना या निव्वळ एकांगी, फसव्या आणि भ्रामक परिकल्पना आहेत.

प्रस्तुत घटकामध्ये धर्म आणि राष्ट्रवाद या पार्श्वभूमीवर आपण विनायक दामोदर सावरकर, बॅरिस्टर महंमद अली जिना आणि मौलाना अबुल कलाम आझाद या तीन परंपरांचा राष्ट्रवादाच्या संदर्भात अभ्यास करणार आहोत.

## ४.२ विषय विवेचन

### ४.२.१ वि. दा. सावरकर

**१) वि. दा. सावरकर यांचा अल्प परिचय:**

विनायक दामोदर सावरकर यांचा जन्म २८ मे, १८८३ रोजी नाशिक जवळील भगूर या खेड्यात झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण त्यांच्या भगूर गावी तर माध्यमिक शिक्षण नाशिक येथे झाले. त्यांचे वडील दामोदरपंत यांच्या स्वाभिमानी व करड्या स्वभावाची छाप आणि देशभक्तीचा वारसा सावरकरांकडे आला त्यांच्या विचार व कार्यावरून दिसून येते. बालपणीच त्यांनी आपल्या मित्रांना एकत्र करून मित्रमेळा संघटित केला. त्यामधूनच त्यांच्या पुढील कार्याची जडण घडण झाली. त्यांचे महाविद्यालयीन शिक्षण पुणे येथे झाले. १९०५ साली बी. ए. पूर्ण झाल्यावर कायद्याची सनद मिळविण्याच्या हेतूने मुंबईला आले, तेथे त्यांनी 'मित्र मेळा' या त्यांच्या संघटनेलाच बृहत स्वरूप देऊन 'अभिनव भारत' ही संघटना स्थापन केली. १९०६ साली ते लंडनला गेले. त्यांनी सतत स्वातंत्र्यासाठी क्रांतिकारी प्रचार केला. 'अभिनव भारत' साठी नव सदस्य मिळविण्यासाठी त्यांनी 'फ्री इंडीया सोसायटीची' स्थापना त्याच वर्षी केली. लंडनला असताना १३ मार्च १९१० रोजी त्यांना अटक झाली. ही अटक १९०६ साली केलेल्या भाषणांबद्दल राजद्रोहाच्या आरोपाखाली करण्यात आली होती. १९३७ साली ते कारावासातून सुटले आणि लोकमान्य टिळकांच्या लोकशाही स्वराज्य पक्षाला ते मिळाले. त्याच वर्षी हिंदू महासभेच्या अध्यक्षपदावर त्यांची निवड झाली या पदावरून त्यांनी हिंदुराष्ट्रवाद हिंदूचे सैनिकीकरण, लष्करी शिक्षण इत्यादी विषयांसंबंधी विचार मांडले. राष्ट्राचे ऐक्य आणि अखंडत्व यावर त्यांचा विशेष भर होता. त्यांनी भारतीय स्वातंत्र्यचळवळीत भरीव योगदान दिले. २६ फेब्रुवारी १९६६ रोजी त्यांचा मृत्यू झाला.

**२) वि दा सावरकर यांचे धर्मचिंतन**

भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात उदयास आलेल्या अनेक विचार प्रवाहांपैकी एक अत्यंत ठळक आणि महत्त्वाच्या विचार प्रवाहाचे प्रतिनिधित्व विनायक दामोदर सावरकर यांनी केले. त्यांच्या राजकीय चिंतनाच्या प्रमुख पैलूंपैकी एक म्हणजे त्यांचे धर्मचिंतन. त्यांच्या विचारांमध्ये पूर्वजांविषयी अभिमान किंवा इतिहासात रममाण होण्याची वृत्ती असली तरी त्यांचे विचार हे पूर्णतः विज्ञानाधिष्ट, विवेकवादी आणि बुद्धिप्रामाण्यवादी होते. सावरकर यांच्या या मूलगामी भूमिकेचा प्रत्यय त्यांच्या एकूणच लेखन व भाषणांमधून पहावयास मिळतो.

सावरकरांच्या धर्मचिंतनात त्यांनी मांडलेला सप्तशृंखलांचा सिद्धांत महत्त्वाचा आहे. वेदोक्त बंदी, व्यवसायबंदी, स्पर्शबंदी, सिंधूबंदी, शुद्धीबंदी, रोटीबंदी व बेटीबंदी या त्या बेड्या होत आणि सावरकरांच्या

मते आपणच त्या बेड्या आपल्या पायात ठोकून घेतल्या आहेत. याचा अर्थ असा की हिंदूंच्या अधःपतनाला ते स्वतःच जबाबदार आहेत आणि स्वातंत्र्य मिळण्यासाठी या बेड्या तोडणे आवश्यक आहे. असे सावरकरांनी मांडले या पार्श्वभूमीवरच त्यांनी हिंदू राष्ट्रवादाची संकल्पना प्रतिपादित केली.

**३) वि.दा. सावरकर यांची हिंदू राष्ट्रवादाची संकल्पना :**

सावरकरांच्या राजकीय विचारांमधील महत्वाची व मध्यवर्ती संकल्पना म्हणजे हिंदूराष्ट्रवाद होय. हिंदू धर्म आणि संस्कृती हा सावरकरांच्या हिंदूराष्ट्रवादाच्या संकल्पनेतील महत्वाचा गाभा होता. या संकल्पनेचा विचार करत असताना राष्ट्रवाद, हिंदुत्व, हिंदू मुस्लिम परस्परसंबंध इत्यादी मुद्यांचा उहापोह करणे आवश्यक आहे. राजकीय व्यवहारात आणि विचारात सावरकर कट्टर राष्ट्रवादी होते. सावरकरांनी १९२३ रोजी 'हिंदुत्व' हा ग्रंथ लिहिला. सावरकरांच्या हिंदू राष्ट्राच्या संकल्पनेत हिंदू धर्मातील संस्कृती व श्रेष्ठतेवर भर दिला आहे.

राष्ट्रवादाला केवळ समान प्रादेशिकता हा आधार असू शकत नाही. राष्ट्रनिर्मितीच्या प्रक्रियेमध्ये प्रादेशिक एकतेपेक्षा तिथल्या लोकांमधील धार्मिक, वांशिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक दुवे अधिक परिणामकारक ठरतात. त्यांच्यामते या देशातील राष्ट्रवाद हा हिंदू राष्ट्रवाद आहे. त्याला भारतीय राष्ट्रवाद असे संबोधणे त्यांच्या मते योग्य नाही. कारण अशा प्रकारचा राष्ट्रवाद होण्याचे धेय्य असण्यास त्यांची हरकत नव्हती. तसेच खऱ्या निधर्मी, समान तत्वावर आधारलेल्या संयुक्त हिंदी राष्ट्राच्या कल्पनेला त्यांनी कधीच विरोध केला नव्हता. परंतु त्यांचा विरोध हा हे ध्येय सफल झाले आहे असे गृहीत धरणे याला होता. भारतात राजकीय आकांक्षा जीवंत असलेला, संस्कृतीने समरस झालेला, स्वतःच्या अलगपणाच्या आधारावर स्वतंत्र राष्ट्रीयत्वाची घोषणा करणारा मुसलमान समाज आणि हिंदू राष्ट्र यांचा संघर्ष चालूच आहे. दोन राष्ट्रवादी भावनांचा हा संघर्ष आहे असा सावरकरांचा सिद्धांत होता. एकराष्ट्र म्हणून रहाण्याच्या भावनिक ऐक्याशिवाय केवळ प्रादेशिकतेच्या कमकूवत आधारावर उभे राहिलेले राष्ट्र दिर्घकाळ टिकू शकत नाही असा त्यांचा कयास होता. राष्ट्रनिर्मितीच्या प्रक्रियेमध्ये प्रादेशिक एकतेपेक्षा लोकांमधील, धार्मिक, वांशिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक दुवे अधिक परिणामकारक ठरतात.

सावरकरांच्यामते हिंदू-मुस्लिम समस्येचा तीन महत्त्वाच्या अंगांनी विचार करणे आवश्यक आहे. त्यामध्ये सांस्कृतिक, सामाजिक आणि राजकीय या तीन अंगांचा ते समावेश करतात. सांस्कृतिक दृष्ट्या हिंदू-मुस्लिम यांच्यात वेगळेपण आहे. त्यांच्या मते मुसलमानांना धर्म व संस्कृती यांचे अलगीकरण करता न आल्याने सांस्कृतिकदृष्ट्या त्यांना भारतीय होता आले नाही. तसेच त्या दोघांमधील सामाजिक अंतरही कमी होऊ शकले नाही. संघर्ष नसला तरी एकजिनसीपणाही त्यांच्यात आला नाही. राजकीयदृष्टया हिंदू आपल्या संख्याबळाद्वारे आपल्यावर स्वामित्व गाजवतील अशी भीती मुसलमानांना वाटत आली आहे. राजकीयदृष्टया मुस्लिमांना भारतात मुस्लिमांची सत्ता प्रस्थापित करायची आहे. आपण पुन्हा राज्यकर्ते बनू शकतो अशी मुसलमानांची धारणा आहे. यामुळे हिंदूंनी गाफिल राहून चालणार नाही. हा धोका लक्षात घेऊन हिंदूंचे संघटीकरण आणि लष्करीकरण करण्याची गरज सावरकर प्रतिपादित करतात. हिंदू मुस्लिमांमधील शतकानुशतके चालत आलेल्या सांस्कृतिक, धार्मिक व राष्ट्रीय वैमनस्यात तथाकथित जातीय समस्येचे मूळ

आहे. हे कटू सत्य नाकारून ते नाहिसे होणार नाही. तेव्हा दोन राष्ट्रके येथे आहेत हे गृहित धरूनच पुढील उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी इतर राष्ट्रांमध्ये अशा परिस्थितीत जे घडले तेच येथेही घडले पाहिजे असा सावरकरांचा आग्रह होता. म्हणजेच भारताचे असे राज्य निर्माण करावे की ज्यात कुणालाच अधिक अधिकार प्राप्त होणार नाही, खास प्रतिनिधित्व मिळणार नाही. एक राष्ट्र या नात्याने हिंदू यासाठी तयार होतील परंतु मुस्लिम देशबांधव त्यांच्यावर जातीय संघर्ष लादतात तसेच हिंदूविरोधी भावना जोपासतात. येथे मुस्लिम साम्राज्य उभारण्याची स्वप्ने पाहतात त्यामुळे हिंदूंना त्यांच्या स्वतःच्या पायावर उभे राहून स्वातंत्र्यासाठी एकाकी लढा देण्याशिवाय गत्यंतर नाही असे सावरकरांचे मत होते.

सावरकरांनी जिनां प्रमाणेच द्विराष्ट्रवाद मांडला अशा आशयाची टीका केली जाते. परंतु यामध्ये किती तथ्यांश आहे हे शोधण्यापूर्वी सावरकरांची हिंदू राष्ट्रवादा विषयीची संकल्पना तपासणे आवश्यक आहे.

सावरकरांनी हिंदुत्व या ग्रंथात हिंदुत्वाची व्याख्या केली आहे. त्यांच्या मते हिंदू हा शब्द ऋग्वेदकालीन सप्तसिंधू या शब्दाला असणाऱ्या राष्ट्रीय संदर्भास अनुसरून आहे. त्यामुळेच हिंदू या शब्दाचाही संदर्भ मुलतः दैशिक व राष्ट्रीय असाच राहतो. यामधून कोणत्याही विशिष्ट धर्ममताचा निर्देश होत नाही. हिंदू शब्दाची व्याख्या कोणत्याही धर्मग्रंथाशी किंवा धर्ममताशीच मर्यादित करण्याचे प्रयत्न हे दिशाभूल करणारे ठरतील. हिंदू शब्दाच्या व्याख्येचा मूळ ऐतिहासिक पाया आसिंधूसिंधू भारतभूमी हाच असला पाहिजे. तो देश आणि त्यात निर्माण झालेल्या धर्मांच्या आणि संस्कृतींच्या बंधनांनी अनुप्राणिक झालेले राष्ट्र हेच हिंदुत्वाचे दोन प्रमुख घटक आहेत असे सावरकरांचे मत होते. म्हणूनच 'आसिंधूसिंधू ही भारतभूमी ही ज्याची पितृभू: नि पुण्यभू: आहे तो हिंदू' अशी हिंदुत्वाची व्याख्या सावरकर करतात.

अशाप्रकारे हिंदुत्व या शब्दास सामाजिक, राजकीय व धार्मिक असा तिहेरी संदर्भ आहे. हिंदू धर्म हा हिंदुत्वाचा फार तर एक घटक मानता येईल. परंतु हिंदुत्व व हिंदू धर्म हे शब्द समानार्थी वापरण्यात आल्यामुळे जैन, शीख आदी अनेक पंथ हिंदुत्वापासून दुरावले. परंतु वरील प्रमाणे व्याख्या केली गेली असती तर असे कधीच घडले नसते. वरील व्याख्येमधील पितृभू आणि पुण्यभू या शब्दांचे पारिभाषिक अर्थ सावरकरांनी स्पष्ट केले आहेत. पितृभू म्हणजे प्राचीन काळापासून ज्या भूमीत परंपरेने आपले जातीय व राष्ट्रीय पूर्वज निवास करत आले आहेत ती भूमी आणि पुण्यभू म्हणजे होली लँड किंवा पुण्यभूमी ज्या भूमीत एखाद्या धर्माचा संस्थापक ऋषी, अवतार व प्रेषित प्रकटला, त्या धर्मास उपदेश झाला, त्याच्या निवासाने त्या भूमी धर्मक्षेत्राचे पुण्यत्व आले ती त्या धर्माची पुण्यभू. ही व्याख्या ऐतिहासिक वस्तुस्थितीला धरून तसेच व्यापक आहे असे सावरकरांचे मत होते.

हिंदुत्वाची अशी व्याख्या केल्यानंतर पुढे हिंदू हे एक राष्ट्र असल्याचे प्रतिपादन सावरकरांनी केले आहे. एक राष्ट्रत्व निर्माण होण्यासाठी परंपरा, हित व ध्येयवाद या तिन्ही गोष्टी आवश्यक असतात. परंपरा ही राष्ट्राला भूतकाळाशी जोडते, समानहितत्व वर्तमान काळाचा विसर पडू देत नाही आणि ध्येयवाद हा भविष्य काळात घेऊन जातो. सावरकरांच्या मते एक देश हे हिंदूंच्या राष्ट्रवादाचे पहिले लक्षण आहे. संस्कृती हे दुसरे लक्षण आहे. संस्कृत भाषेचा दुवा हे तिसरे लक्षण आहे. तर समान इतिहास परंपरा हे चौथे लक्षण

आहे. अशाप्रकारे सावरकरांनी शास्त्रशुद्ध आधारावर त्यांची राष्ट्रकल्पना मांडलेली दिसून येते. सावरकरांचा राष्ट्रवाद हा संकुचित किंवा जीर्णोद्धारवादी नव्हता असे दिसून येते. त्यांनी हिंदी राष्ट्रवादाला कधीही विरोध केला नाही. मात्र ते संयुक्त हिंदी राष्ट्र न्यायतेच्या आणि समानतेच्या पायांवरच उभारलेले असले पाहिजे असा त्यांचा आग्रह होता. हिंदुस्थानातील सर्व अल्पसंख्यांक समाजांना विधिमंडळे, नोकऱ्या, सामाजिक आणि राजकीय अधिकार इत्यादी संबंधात लोकसंख्या आणि गुणां नुसार व योग्यता यांच्या प्रमाणात मताधिकार आणि प्रतिनिधित्व देण्यास हिंदुराष्ट्र केव्हाही तयार असेल असे त्यांचे मत होते. तसेच हिंदू समाज देशात बहुसंख्य असतानाही त्यांना कोणत्याही स्वतंत्र सवलती किंवा खास अधिकार नसतील असे त्यांचे मत होते. मात्र अल्पसंख्यांकांच्या अवाजवी मागण्या, त्यांचा विशेष मताधिकार सावरकरांना मान्य नव्हता. अल्पसंख्याकांना इतरांच्या धर्मभाषा संस्कृतीवर अतिक्रमण न करता आपापले धर्म भाषा व संस्कृती आचरण्याचे स्वातंत्र्य असेल. सार्वजनिक शांततेचा आणि नितीमत्तेचा भंग त्यांनी होऊ देऊ नये. अशा काही अटी घालून त्यांच्यासह मुसलमानांनी हिंदूंना मिळावे, हिंदी राष्ट्रावर अविभक्त निष्ठा ठेवण्यास तयार असावे, असे सावरकर म्हणतात.

हिंदू बहुसंख्य असले तरी अल्पसंख्याकांबद्दल सहिष्णू हिंदुस्तान हे सर्वांचे संयुक्त राष्ट्र बनवण्याची उदाहरणे हिंदूंच्या अंगी आहे असे सावरकरांचे मत होते. हिंदू हिंदुस्थानचा आत्मा होत.परंतु विविध रंगांनी इंद्रधनुचे सौंदर्य जसे कमी न होता वाढतेच, त्याचप्रमाणे मुस्लिम, पारशी, ज्यू, आणि इतर शब्दांना सामावून घेणारे हिंदुस्थानचे इंद्रधनुष्य भविष्यकाळात आपल्या सौंदर्याने खुलत राहीले असे सावरकरांनी लंडन येथे होऊन गेलेल्या एका बातमीपत्रात म्हटले होते त्याचप्रमाणे अनेक व्याख्यानांमधूनही धर्मदृष्टीच्या व धर्मनिरपेक्षतेच्या तत्त्वावर त्यांनी भर दिला होता. त्यांच्या मते हिंदी राज्य हे निर्भेळ हिंदी राज्य रहावे. मताधिकार, नोकऱ्या, अधिकार पदे, कर इत्यादी संबंधित धर्माच्या जातीच्या तत्त्वावर कोणत्याही भेदभावाला जागा असू नये. कोणतीही गोष्ट संख्येच्या टक्केवारीने न दिली जाता गुणांवर आधारित दिली जावी, इतर देशांप्रमाणे येथेही बहुसंख्य लोकांची भाषा व लिपी ही राष्ट्रभाषा व राष्ट्र लिपी व्हावी असे त्यांचे मत होते. अशाप्रकारे आदर्श हिंदी राज्यसंबंधी सावरकरांनी आपले विचार मांडले आहेत.

सावरकरांच्या राष्ट्रवादावर अनेक आक्षेप घेण्यात येतात. काही टीकाकारांनी सावरकरांचा राष्ट्रवाद जातीय व धर्मनिष्ठ आहे असे मत व्यक्त केले आहे. १९३७ नंतर सावरकरांनी हिंदू महासभेच्या व्यासपीठावरून जे हिंदुत्वनिष्ठ राजकारण केले त्यामुळे मुख्यत्वे अशी टीका करण्यात येते. मुसलमानांशी तडजोड करीत असताना काँग्रेस नेत्यांनी घेतलेल्या भूमिका असतील किंवा राष्ट्रीय सभेने सिंध प्रांत मुंबई इलाख्यातून फोडून स्वतंत्र प्रांत करण्याविषयीचे प्रकट केले होते त्याला सावरकरांनी कडाडून विरोध केला. सिंध प्रांत स्वतंत्र करण्यात काँग्रेसचे मुस्लिम अनुनयाचे राजकारण होते असे सावरकरांचे मत होते. अशाप्रकारे तत्कालीन मुस्लिम राजकारणाची ही दिशा व मुसलमानी मनोवृत्ती संबंधीच्या त्यांच्या धारणा सावरकरांना हिंदुत्वनिष्ठ राजकारणाकडे घेऊन गेल्या असे दिसते.

सावरकरांच्या राष्ट्रवादावर दुसरा आक्षेप म्हणजे, त्यांनी या देशात मी राष्ट्रवादाचा पाया घातला असे काही टीकाकार मुद्दा मांडतात. परंतु जिना ज्या अर्थाने द्विराष्ट्रवादाचे पुरस्कर्ते होते त्या अर्थाने सावरकर

नव्हते. हिंदुस्थानातील मुसलमान हे वेगळे राष्ट्र (नेशन) आहे असे जिनांचे मत होते तर सावरकर त्यांना एक राष्ट्रक मानत होते. एकजीव होऊ न शकलेल्या या दोन संस्कृती आहेत. त्यांच्यामधील संघर्ष अजूनही सुरू आहे आणि तो संपला या भ्रमात राहणे हा धोका आहे असे सावरकरांचे मत होते. सावरकरांनी एक व्यक्ति एक मत या तत्त्वाचा पुरस्कार केला, हिंदू बहुसंख्यांक असूनही त्यांना विशेष अधिकार मागितले नाहीत, संयुक्त हिंदी राज्याचा आदर्श डोळ्यासमोर ठेवला आणि तसेच फाळणीचा कधीही पुरस्कार केला नाही उलट त्याचा त्यांनी प्रतिकारच केला. त्यामुळेच त्यांचा राष्ट्रवाद जीनांच्या द्विराष्ट्र पातळीवर आणून ठेवता येणार नाही.

सावरकरांच्या हिंदू राष्ट्रावादावरील तिसरी टीका ही महत्त्वाची आणि रास्त आहे. किंबहुना या तिसऱ्या टिके मुळेच त्यांच्या राष्ट्रवादीच्या धर्मनिरपेक्ष पणावर प्रश्नचिन्ह निर्माण होते. याचे मूळ त्यांनी केलेल्या हिंदुत्वाच्या व्याख्येतच आहे. त्यांच्या व्याख्येत वापरलेल्या पुण्यभू: या शब्दाच्या अर्थानुसार हा शब्द हिंदू नसलेल्या व्यक्तींना लागू पडेल की नाही याची शंका राहते. सावरकरांनी या शब्दाच्या केलेल्या अर्थाप्रमाणे एखाद्या धर्माचा संस्थापक प्रेषित ज्या भूमीत प्रकटला त्याने उपदेश केला आणि त्याच्या निवासाने त्या क्षेत्राला पुण्यत्व प्राप्त झाले अशी भूमी. परंतु या अर्थाने मुसलमानांची पवित्र स्थाने मक्का मदिना येथे आहेत. ते हिंदुस्थानचे नागरिक असले तरी हिंदुस्थान धार्मिक बुद्धीने त्यांना पवित्र वाटत नाही. म्हणून मुसलमान तसेच ख्रिश्चन यांना त्यांनी हिंदुत्वातून वगळले. जैन, शीख, आर्य समाजीक, भारतीय बौद्ध, लिंगायत, राधास्वामीय, भिल्ल, संताळ प्रभुतींचा हिंदुत्वात समावेश सावरकर प्रणित व्याख्येनुसार होऊ शकतो. परंतु मुसलमान, ख्रिस्ती, ज्यू इत्यादींचा त्यात समावेश होऊ शकत नाही. कारण त्यांच्या कितीही पिढ्या भारतात वाढल्या तरीही त्यांची पुण्यभूमी कधीच होऊ शकत नाही. म्हणजे त्यांना या राष्ट्रात त्यांच्या धर्मामुळे दुय्यम नागरिकत्व प्राप्त करावे लागणार. याचाच अर्थ सावरकरांची हिंदुत्वाची व्याख्या आणि संयुक्त राष्ट्राची कल्पना यामध्ये आंतर विसंगती दिसून येते. तसेच हे धर्मनिरपेक्षतेच्या तत्त्वाशी विसंगत आहे.

सावरकरांनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीला भरीव योगदान दिले. परंतु धर्म आणि राष्ट्रवाद या पार्श्वभूमीवर त्यांनी मांडलेला हिंदू राष्ट्रवाद हा सर्वसमावेशक असण्याला मर्यादा दिसून येतात. त्यामुळेच भारतासारख्या बहुसंस्कृतिक समाजासाठी अशा पद्धतीची मांडणी समर्पक ठरत नाही.

### ४.२.२ महंमद अली जिना

**१) अल्पपरिचय:**

महंमद अली जिना यांचा जन्म २३ डिसेंबर १८७६ रोजी कराची येथे झाला. त्यांचे वडील गुजरात मधील मुस्लिम खोजा पंथातील होते. वयाच्या सोळाव्या वर्षी जिना इंग्लंड येथे शिक्षणासाठी गेले. तेथे त्यांनी कायद्याचे शिक्षण घेतले. १८९६ रोजी ते मायदेशी परतले. त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर पाश्चात्य शिक्षणाचा प्रभाव होता. भारतातील विदेशी शिक्षण घेतलेल्या पहिल्या भारतीय पिढीचे प्रतिनिधित्व ते करीत होते. कॉम्ते, स्पेन्सर, बेंथम, मिल यांच्या तत्त्वज्ञानाचा त्यांच्यावर प्रभाव होता. तसेच ब्रिटिश व भारतीय उदारमतवादी नेत्यांचा देखील प्रभाव त्यांच्यावर पडला होता. लंडनला शिकत असताना लॉर्ड मोर्ले यांचा उदारमतवाद

अत्यंत लोकप्रिय होता त्यानेही जिना आकर्षित झाले होते. दादाभाई नौरोजींच्या उदारमतवादी विचारांनी देखील ते प्रभावित झाले होते. गोपाळकृष्ण गोखले यांचे देखील ते मित्र होते. 'मुस्लिमांमधील गोखले' होण्याची त्यांची महत्त्वाकांक्षा होती. गोखलेंप्रमाणे सुरेंद्रनाथ बॅनर्जी आणि चित्तरंजन दास यांच्या उदारमतवादी विचारांचा त्यांच्यावर प्रभाव होता. सुरुवातीला त्यांना हिंदू मुस्लिम ऐक्याचे दूत म्हटले जात होते. प्रथम जिनांना मुस्लिम लीगचा जमातवादी दृष्टिकोन मान्य नव्हता. जिना यांनी सुरत अधिवेशनानंतर काँग्रेसमध्ये प्रवेश केला ते १९२० पर्यंत काँग्रेसमध्ये होते. १९१३ साली जिनांनी मुस्लिम लीगमध्ये प्रवेश केला परंतु या अटीवर की लीगने आपल्या घटनेत व कार्यक्रमात आवश्यक ते फेरफार करून काँग्रेसचीच उद्दिष्टे आपल्यासमोर ठेवावीत तसेच त्यांनी आपले आयुष्य ज्याला अर्पण केले त्या व्यापक राष्ट्रीय कार्याच्या आड लीग चे सदस्यत्व येता कामा नये. प्रथम त्यांनी हिंदू मुस्लिम ऐक्याचे कार्य हाती घेतले. १९१६ रोजी काँग्रेस आणि मुस्लिम लीग यांच्यात लखनऊ करार त्यांनी घडवून आणला या करारामुळे मुसलमानांच्या स्वतंत्र मतदारसंघांना काँग्रेसने मान्यता दिली होती. जिनांच्या भूमिकेत प्रसंगानुरूप बदल घडत गेले. सुरुवातीला हिंदू मुस्लिम ऐक्याने भारावलेले जिना सरते शेवटी राष्ट्रवादापासून फारकत घेत द्विराष्ट्रवादी सिद्धांताचे पुरस्कर्ते बनले. त्यांच्यामधील हे स्थित्यंतर नाट्यमयरीत्या होत गेले. जीनांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण आणि त्यांची बदलती भूमिका ही भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या विविध घटना आपला संबंध दर्शवणारी दिसून येते. किंबहुना देशाच्या राजकीय इतिहासात जिनांचे नेतृत्व कधी काळी हिंदू मुस्लिम ऐक्याचे दूत तर सरते शेवटी द्विराष्ट्रवादी फाळणीचे मुख्य सूत्रधार म्हणून ओळखले जाते. १४ ऑगस्ट १९४७ रोजी पाकिस्तानची निर्मिती झाली. जिना हे सहाजिकच त्या राष्ट्राचे पहिले गव्हर्नर जनरल बनले. राष्ट्र उभारण्याच्या जबाबदाऱ्या कौशल्याने पार पाडत असतानाच १० सप्टेंबर १९४८ रोजी त्यांचे निधन झाले.

### २) महंमद अली जिना यांच्या विचारांचे दोन टप्पे

जीनांच्या वैचारिक भूमिकेचे दोन टप्पे दिसून येतात. प्रथम त्यांनी उदारमतवादी भूमिका घेतली ज्यामुळे ते लीगच्या स्थापनेनंतरही काही काळ प्रखर भारतीय राष्ट्रवादाचे पुरस्कार होते. परंतु दुसऱ्या टप्प्यात ते जमात वादी राजकारण करताना दिसतात शेवटी हिंदू मुस्लिम हे परस्परांपासून वेगळे आहेत त्यामुळे मुस्लिमांसाठी वेगळे राष्ट्र हवे अशी भूमिका घेऊन द्विराष्ट्रवादाची भूमिका मांडताना दिसतात.

### अ) जिना यांची उदारमतवादी दृष्टी:

जिना यांच्यावर पश्चिमी उदारमतवादी आणि बुद्धी प्रामण्यवादी विचारांचा प्रभाव होता. पाश्चात्य शिक्षण व विचारवंत, तसेच लॉर्ड मोर्ले यांच्यासारखे इंग्रजी अधिकारी आणि दादाभाई नौरोजी, गोपाळकृष्ण गोखले, सुरेंद्रनाथ बॅनर्जी, चित्तरंजन दास यांच्यासारखे भारतीय उदारमतवादी विचारवंत यांचा प्रभाव त्यांच्यावर होता. सुरुवातीच्या काळात ते प्रखर राष्ट्रवादी होते. भारतीय राष्ट्रवाद आणि हिंदू मुस्लिम ऐक्याने प्रेरित झाले होते.

जिनांनी भारतातील उदारमतवादी विचारसरणीच्या परंपरेला अनुसरून ब्रिटिश शासनाबद्दल कृतज्ञतेची भावना बाळवली होती. त्यांच्या मते भारतातील राष्ट्रभावनेची जागृती, भिन्न धर्मीय समाज घटकात जबाबदार

शासनाची निर्मिती हे या ब्रिटिश शासनामुळेच घडून आले आहे. भारतामध्ये स्वयंशासन करण्याची भावना आणि तयारी ब्रिटिश राज्याचा परिणाम आहे असे त्यांचे मत बनले होते.

ब्रिटिशांनी भारतात जी धोरणे राबवली त्यापैकी इंग्रजी आधुनिक शिक्षण हा घटक महत्त्वाचा होता. यामुळे भारतीय समाज घटकात राष्ट्रभावना उद्भवल्या इंग्रजी भाषेतून व इतिहासाच्या अध्ययनातून भारतीयांना राष्ट्रभक्तीचे प्रेरणा मिळाली. असहकार किंवा कायदेभंग जिनांना अमान्य होते. इंग्रजी राजवटीत भारतात संसदीय लोकशाहीचा विकास होईल असा जिनांचा विश्वास होता. परिवर्तनासाठी इंग्रजांच्या सद्सद विवेकाला आवाहन करणाऱ्या नेमस्त मार्गाचे आकर्षण त्यांना होते. १९१६ रोजी लीगच्या लखनऊ अधिवेशनात जिनांनी भारतासाठी स्वयंशासनाची आग्रही मागणी केली. ते म्हणाले भारत देश स्वयंशासन करण्यास पात्र नाही असा चुकीचा प्रचार केला जात आहे. पूर्वेकडील वातावरणात लोकशाही संस्था का वाढू शकणार नाहीत? भूतकाळात हिंदू आणि मुसलमान लोकशाही संस्थांची परिचित नव्हते असे थोडेच आहे? पूर्वी काय ग्रामपंचायत नव्हती? इस्लामचा इतिहास, परंपरा, साहित्य आणि सिद्धांत यावरून काय आढळते? असे मूलभूत प्रश्न उपस्थित करून भारतीय लोक स्वयंशासनास पात्र आहेत असे ठाम मत जिनांनी मांडलेले दिसते.

शिक्षण, संघर्ष आणि संघटन ही जिनांच्या उदारमत्ववादी दृष्टिकोनाची त्रिसूत्री होती. त्रिसूत्री शिवाय स्वराज्याच्या दिशेने मार्गक्रमण करणाऱ्या कोणत्याही राष्ट्रीय कार्यक्रमांची परिपूर्ती होणे अशक्य आहे असे त्यांचे मत होते. समाजासमोरील समस्यांकडे पाहण्याचा जिनांचा दृष्टिकोन पूर्णपणे धर्मनिरपेक्ष होता. राजकारणाकडे ते धर्मनिरपेक्ष दृष्टीने पाहत असत धर्म आणि राजकारण यांची सरमिसळ त्यांना मंजूर नव्हती. हिंदू मुसलमानांत सदैव सख्य आणि सहकार्याची भावना असावी, दोघांनीही भ्रातृभाव व सदिच्छा वाढविण्याचे प्रयत्न करावेत. त्यांच्या मते असे होणे ही सर्वश्रेष्ठ राजकीय गरज आहेच परंतु धर्माच्या तत्वांशीही ती मुळीच विसंगत नाही. भिन्न धर्मांच्या उपासकांशी शांततापूर्ण सलोख्याचे वर्तन ठेवण्याचा संदेश इस्लामने दिला आहे. धर्म ही व्यक्तींची वैयक्तिक बाब आहे. त्यामुळे बहुधर्मीय भारतीयांचे भारत हे एक राष्ट्र होण्यास त्यांच्या मते मुळीच अडचण नव्हती. उदारमतवादी मग ते कोणत्याही धर्माचे असोत जिना त्यांना सहकार्य करीत. धर्माकडे ते तटस्थपणे पाहत. व त्यांचा पिंड धर्मनिरपेक्ष, विज्ञाननिष्ठ होता. त्यामुळे कोणत्याही राजकीय चळवळीला ते धर्माला सोपवण्यास तयार नव्हते. म्हणूनच अलिगड चळवळीप्रमाणेच खिलाफत चळवळीपासून जिना वैचारिक दृष्ट्या दूर होते. राजकारणातील मुस्लिम धार्मिक नेतृत्वाचा शिरकाव त्यांना मान्य होता. धर्मांधता आणि सांप्रदायिकता हे नेतृत्वाचे आधार त्यांना मान्य नव्हते. धर्मनिरपेक्षता आणि उदारमतवादी राष्ट्रभावनाच भारतीयांना एकत्र बांधून शकतात असे जिनांना वाटत होते. त्यामुळे जिनांनी हिंदूंचा जहाल हिंदू राष्ट्रवाद आणि मुस्लिमांचा जमातवादी राष्ट्रवाद या दोघांचा धिक्कार केलेला दिसतो. राष्ट्रभावानेला धर्माशी जोडणे व राजकारणात धर्म आणणे जिनांना अमान्य होते. कारण धर्म व राजकारण यात जिनांनी द्वैत आहे असे मानले होते. त्यामुळे राष्ट्रभावानेला धर्माशी जोडू नये कारण राष्ट्रभावना ही भारताच्या संदर्भात धर्मनिरपेक्ष उदारमतवादी अशीच असली पाहिजे.

### ब) महंमद अली जिना यांची द्विराष्ट्रवादी भूमिका:

जिना यांचे प्रारंभिक भूमिका ही भारतीय राष्ट्रवादाने प्रेरित झालेली होती. त्याकाळी काँग्रेसमध्ये जे पुढारलेले नेते होते त्यापैकी जिना हे एक होते. परंतु हा काळ महात्मा गांधींच्या सक्रिय राजकारणात प्रवेश होण्यापूर्वीचा होता. सुरुवातीला राष्ट्रवादी, हिंदू मुस्लिम ऐक्याची उदारमतवादी भूमिका घेणाऱ्या जिनांच्या वैचारिक भूमिकेत प्रसंगानुरूप बदल झालेले दिसून येतात. त्यांची बदलणाऱ्या भूमिकेची उत्तरे ही स्वातंत्र्यपूर्व काळातील विविध राजकीय स्थित्यंतरे आणि राजकीय प्रक्रियेमध्ये सापडतात. या राजकीय प्रक्रियेने स्वातंत्र्यपूर्व काळात बराच मोठा काळ व्यापलेला आहे. किंबहुना तो एक स्वतंत्र संशोधनाचा विषय आहे. परंतु या ठिकाणी तो राजकीय इतिहास जाणून घेण्यापेक्षा जिनांच्या द्वि राष्ट्रवादी भूमिकेबद्दल त्यांची वैयक्तिक मांडणी जाणून घेण्याचा प्रयत्न केला गेला आहे. राष्ट्रीय एकात्मतेचे जोरकस समर्थन करणारे जिना पुढील काळात मात्र भारतीय परिस्थितीत राष्ट्रीय विचार धार्मिक विचारापासून निराळा संभवत नाही असे मत मांडताना दिसतात. हा देश सांस्कृतिक दृष्ट्या एकात्म नाही व तो होऊ शकत नाही. येथे दोन राष्ट्रांचे अस्तित्व दिसून येते एक म्हणजे हिंदूंचे आणि दुसरे म्हणजे मुसलमानांचे अशी मांडणी ते करतात.

जिनांनी मांडलेला द्विराष्ट्रवाद हा संपूर्ण भारतीय मुस्लिमांचा राष्ट्रवाद असे बऱ्याच वेळा धरले जाते. परंतु हे बरोबर नाही. कारण महमद अली जिना हे भारतात राहणाऱ्या सर्व मुस्लिमांचे नेते नव्हते जिनांना पाठींबा देणारे मुस्लिम पाकिस्तानात गेले. भारतात भारत हे आपले राष्ट्र आहे. म्हणून भारतात राहणाऱ्या लोकांची संख्याही पाकिस्तानमध्ये जाणाऱ्या मुस्लिमांच्या लाखोपटीने अधिक होती. भारतात १९०९ चा कायदा, १९१९ चा सुधारणा, १९३५ चा कायदा या प्रत्येक सुधारणा कायद्यामध्ये दुहिची बीजे ब्रिटिशांनी रितसर पेरली. ब्रिटिशांनी मुस्लिम समाजाला समातवादी आवाहन करणाऱ्या जिनांसारख्या नेतृत्वाचा मोठ्या खुबीने वापर केला. अगदी १९३०-३२ पर्यंतच्या जिनांनी हिंदू-मुस्लिम समाजात समझोत्याचे महत्व पटवून दिल्याचे दिसते. १९३० नंतर जिनांनी लंडनला परिषदेत १४ मागण्या मांडल्या. यामध्ये भारतात संघराज्य शासन पद्धत, अल्पसंख्यांकांना जास्त हक्क, केंद्रीय कायदेमंडळात १/३ प्रतिनिधीत्व, सिंध व मुंबईला जोडण्याचा प्रश्न अशा अनेक घटकांचा जिनांनी समावेश केला होता. नेहरू रिपोर्टमध्ये दुरूस्त्या जिनांनी सुचविल्या होत्या त्याही मान्य झाल्या नाहीत. अशाप्रकारे जिनांची राजकीय महत्वाकांक्षाच संपत गेली. दरम्यान जिना १९३० ते ३५ च्या काळात लंडनला निघून गेले. परंतु १९३५ नंतर परत आले. १९३७ च्या निवडणुकांत काँग्रेसचा विजय झाला. काँग्रेसच्या विजयासमोर लीगचा मोठा पराभव झाला. या काळात जिनांनी मुस्लिमांच्या धार्मिक भावनांना आवाहन द्यायला सुरुवात केली. मुस्लिम समाजाच्या मागण्या भारतात मान्य होत नाहीत. हिंदू बहुसंख्येने असलेल्या भारतात अल्पसंख्य मुस्लिमांचे अस्तित्व धोक्यात राहिल हिंदू व मुस्लिम यांच्यात काहीच साम्य नाही. त्यामुळे मुस्लिमांच्या हितसंबंध जपण्यासाठी मुस्लिम बहुल प्रांताचे मिळून नवीन वेगळे राष्ट्र निर्माण झाले पाहिजे, अशी जिनांनी द्विराष्ट्रवादी जमातवादी मांडणी केली. त्या मागणीत समाजाचे हित मुळीच नव्हते. किंबहुना मुठभर मुस्लिमांच्या मागणीला संपूर्ण मुस्लिमांची मागणी म्हणून जमातवादी राजकारण केले जावू लागते.

१९४० मध्ये मुस्लिम लीगच्या लाहोर अधिवेशनात जिनांनी स्वतंत्र पाकिस्तानचा ठराव संमत केला व द्विराष्ट्रवादी भूमिका घेतली. हिंदू मुसलमान यांच्यातील मतभेद नाहीसे होऊन भारत हे एक राष्ट्र निर्माण होईल हे मानणे चूक आहे असे त्यांचे मत होते. त्यांच्या मधील मतभेद हे अत्यंत मूलभूत आणि खोलवर रुजलेले आहेत. त्यांना केवळ धार्मिक पैलू नसून आर्थिक, सांस्कृतिक, सामाजिक आणि राजकीय स्वरूप देखील आहे. इस्लाम आणि हिंदू धर्म हे धर्म शब्दाच्या काटेकोर अर्थाप्रमाणे धर्म नाहीत तर त्या वेगवेगळ्या समाजव्यवस्था आहेत. हिंदू मुस्लिमांची धार्मिक तत्त्वज्ञाने त्यांच्या रूढी आणि वांङ्मये भिन्न आहेत. त्यांच्यात रोटी बेटी व्यवहार नाही तसेच त्यांच्या सभ्यतांचे आधार परस्परविरुद्ध आहेत.हजारो वर्षे परस्परांच्या सहवासात असलेली ही दोन राष्ट्रके आजही पूर्वी इतकीच परस्परांपासून दूर आहेत. त्यामुळे केवळ त्यांना लोकशाही घटनेखाली वा ब्रिटिश संसदीय कायद्यांच्या नैसर्गिक व कृत्रिम नियंत्रणाखाली बळजबरीने ठेवून त्यांचे कदापिही एक विलीनीकृत राष्ट्र निर्माण करता येणार नाही. आणि असे करणे हे वाढत्या असंतोषाकडे आणि तिथून त्या संपूर्ण राज्यव्यवस्थेच्या उध्वस्ततेकडे नेणारे ठरेल.

जिनांच्या मते राष्ट्र संज्ञेच्या कोणत्याही व्याख्यानुसार मुसलमान हे एक राष्ट्र आहेत आणि त्यांना त्यांची मायभूमी त्यांचा भूभाग व त्यांचे राज्य हे प्राप्त होणे आवश्यक आहे. राष्ट्र म्हणून निर्माण झाल्यावर ते शेजाऱ्यांशी शांततापूर्ण संयोगाने राहतील आणि आपल्या आध्यात्मिक, सांस्कृतिक, आर्थिक, सामाजिक आणि राजकीय जीवनाला आपल्या इच्छेनुसार आकार देऊ शकतील.त्यासाठी त्यांना कोणताही त्याग व कितीही कष्ट पडले तरी ते सोसण्याची त्यांची तयारी आहे.

जिनांची ही द्विराष्ट्रवादाची भूमिका चुकीची होती. कारण एक समाज म्हणून हिंदू व मुस्लिम अशा सर्वच समाजघटकांचे प्रश्न एकच होते. धर्म वेगळे म्हणून त्यांचे वेगळे राष्ट्र अशी मांडणी राष्ट्रविघातक होती. जिनांना काहीही करून नवीन राष्ट्र निर्माण करायचे होते. प्रसंगी जिना धार्मिक भावना भडकविणारे जमातवादी राजकारण करीत होते. याची बीजे ब्रिटिशांनी रोवली होती.

जिनांची ही भूमिका अमान्य करून देवबंद चे अमिएते उलेमा-ए-हिंद ने जिनांना प्रखर विरोध केला होता. धर्म वेगळे म्हणून हिंदू-मुस्लिमांची वेगळी राष्ट्रे निर्माण करणे धर्मविरोधी आहे. कारण हिंदू-मुस्लिम एक राष्ट्र आहे. या दोहांचे एक राष्ट्र होण्यास धर्मांचा कोणताच अडसर नाही. म्हणून भारतीय स्वातंत्र्याच्या चळवळीत भारतीय मुस्लिमांनी काँग्रेसबरोबर रहावे अशी भूमिका देवबंदचे मौलाना हुसेन अहमद मदनी यांनी घेतली. त्यांनी संमिश्र राष्ट्रवाद आणि इस्लाम हे उर्दूतील ग्रंथ लिहून हिंदू-मुस्लिम ऐक्य व जिनांच्या द्विराष्ट्रवादाला विरोध केला. मौलाना आझाद यांनी जिनांच्या भूमिकेला विरोध करून सांगितले की, धर्माच्या नावाने जिना पुरस्कृत द्विराष्ट्रवाद हा धर्मविसंगत, चूकीचा आहे भारताचे विभाजन म्हणजे इस्लाम धर्माशी केलेला धर्मद्रोह आहे. कारण भारत हे हिंदू-मुस्लिम हे उज्वल परंपरेने निर्माण झालेले एक राष्ट्र आहे. यांच्यात भेद-भाव निर्माण करणारा द्विराष्ट्रवाद हा मानवता विरोधी आहे.

एकूणच जिनांनी मांडलेला द्विराष्ट्रवाद हा हिंदू-मुस्लिम वेगवेगळे आहेत त्यांच्यात कोणतेच साम्य नाही. पुढे ते एकत्र राहू शकणार नाही अखंड भारतात मुस्लिमांचे हितसंबंध सुरक्षित राहणार नाहीत म्हणून मुस्लिमासाठी वेगळे राष्ट्र व्हावे असा हा राष्ट्रवाद होता.

महात्मा गांधी यांनीही जिनांच्या या भूमिकेला विरोध केला होता. ते म्हणतात जिनांचा द्विराष्ट्रवाद असत्य आहे. भारतातील बहुसंख्य मुसलमान एकतर धर्मांतर केलेले किंवा पुर्वी धर्मांतर केलेल्यांचे वारस आहेत. त्यांनी केवळ धर्म बदलला म्हणजे त्यांचे वेगळे राष्ट्र होऊ शकत नाही. आज बंगाली हिंदू जी भाषा बोलतो तीच भाषा बंगाली मुसलमानही बोलतो. दोघेही एकाच तऱ्हेचे अन्न खातात. त्यांची नित्याची करमणुकीची साधने व पोषाख एकसारखे आहेत. मला तर बंगाली हिंदू व बंगाली मुसलमान ओळखताच येत नाहीत. दक्षिण भारतातील गरीब लोकांतही तसेच आहे. हाच समाज तेथे बहुसंख्य आहे. भारतात हिंदू व मुसलमान ही दोन राष्ट्रे नाहीतच ईश्वराने ज्यांना एकत्र केलेले आहे. त्यांना माणूस वेगळे करू शकणार नाही.

महात्मा गांधी, मौलाना आझाद, मौलाना हुसेन अहमद मदनी आदींची भूमिका सर्वसमावेशक होती त्याउलट जीना द्विराष्ट्रवादी भूमिका मांडत होते. जिना मुस्लिम लीगच्या अधिवेशनात बोलताना म्हणतात ''हिंदू व मुसलमान या दोन भिन्न संस्कृती आहेत. त्या ज्या मूलभूत तत्वांवर आधारलेल्या आहेत, त्या परस्पर विरोधी आहेत. म्हणूनच हिंदू व मुसलमान या दोन धर्मियांचे एक राष्ट्र होऊ शकेल हे केवळ एक स्वप्न आहे. मुसलमान हे एक स्वतंत्र राष्ट्र असल्याने त्यांना वेगळी भूमी आणि वेगळे राज्य मिळायला हवे. त्यायोगेच मुस्लिम समाज आपली धार्मिक सांस्कृतिक, आर्थिक, सामाजिक व राजकीय उन्नती करू शकेल.'' जिनांची ही भूमिका देशाची फाळणी करून वेगळे राष्ट्र निर्माण करणारी होती. त्याचबरोबर देशाच्या अखंडतेला याच भूमिकेमुळे तडे गेले आणि ब्रिटिशांची भेद-निती यशस्वी होवून भारताची फाळणी होवून भारत व पाकिस्तान अशी दोन सार्वभौम राष्ट्र निर्माण झाली.

### ४.२.३ मौलाना अबुल कलाम आझाद

- **मौलाना आझाद यांचा अल्प परिचय**

मौलाना अबुल कलाम आझाद यांचा जन्म ११ नोव्हेंबर १८८८ साली मक्का येथे झाला. त्यांचे मूळ नाव मोहिउद्दीन खैरूद्दीन अहमद असे होते. अबुल कलाम ही त्यांना मिळालेली पदवी होती. त्यांनी 'आझाद' हे स्वतंत्र टोपण नाव लावले होते. मौलाना आझाद हे बालपणापासून तीव्र बुद्धिमतेचे होते. मौलाना आझाद यांचे वडील खैरूद्दीन कलकत्यात एका शस्त्रक्रियेसाठी आले होते. लोकाग्रहास्तव हे कुटूंब तेथेच स्थायीक झाले. आईच्या निधनानंतर मौ. आझाद यांचे शिक्षण वडीलांच्या कडक शिस्तीत झाले. बालवयात त्यांच्यावर आधुनिक शिक्षणाचे संस्कार झाले नाही. त्यांना धार्मिक शिक्षण मिळाले. अरबी भाषा, भाषा व्याकरण प्रचंड बुद्धिमत्ता यामुळे वयाच्या १० व्या १२ व्या वर्षी वडीलांच्या मित्रांना धार्मिक प्रवचने देत. ते अरबस्तानात असतानाच ख्यातनाम धर्मपंडीत म्हणून प्रसिद्ध झाले होते. मौ. खेरूद्दीन आपल्या या दिग्विजयी पुत्रासह १९०७ साली भारतात आले.

आझादांच्या चरित्राचे अभ्यासकांनी तीन टप्पे पाडले असून त्यांच्या वैचारिक विकासाचा सुद्धा त्या टप्प्यां प्रमाणे अभ्यास करण्यात आला आहे. पहिला टप्पा इ.स. १९०६ ते १९१५, दुसरा टप्पा १९२० ते १९२३ आणि तिसरा टप्पा १९२३ ते १९५८. आझादांचा पहिला टप्पा इस्लाम भक्तीचा होता. त्यामध्ये त्यांनी पण इस्लामवादाचे समर्थन केले. इस्लामचे काटेकोर पालन केल्यास त्यातून आधुनिक मानवाला एक सर्वसमावेशक व परिपूर्ण विधी प्रणाली लागू शकेल असे आझादांचे म्हणणे होते. संपूर्ण समता, स्वातंत्र्य, सहिष्णुता, सद्सद विवेकाचे आणि अविष्काराचे स्वातंत्र्य, भातृभाव या सर्वांची हमी इस्लाम देतो अशा विश्वासातून १९१४ साली आझादांनी उलेमांना संघटित करण्याचा प्रयत्न केला परंतु त्यांना अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही. परंतु इस्लामभक्तीचा हा टप्पा पहिल्या महायुद्धाच्या समाप्ती बरोबरच संपला आणि देश-विदेशातील अनेक अनुभवामुळे राजकारणाच्या अध्यात्मिकरणाचे प्रयत्न निरर्थक असल्याचे आझादांच्या लक्षात आले. त्यामुळे मुस्लिमांनी राष्ट्रीय प्रवाहाशी एकरूप व्हावे आणि सर्व देश बांधवांनी स्वातंत्र्यप्राप्तीचे संघटित प्रयत्न करावे अशी आवाहने आझादांनी आपल्या आयुष्याच्या दुसऱ्या टप्प्यात केली. तिसऱ्या टप्प्यामध्ये आझाद हे राष्ट्रीय आंदोलनाचे बिनीचे नेते व धुरीण होते. भारताच्या संमिश्र व धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादीचे ते एक प्रभावी प्रवक्ते होते.

भारतात आल्यानंतर मौलाना आझाद यांनी सर सय्यद अहमद यांच्या लिखाणाचा सखोल अभ्यास केला. १९१२ साली त्यांनी 'अल हिलाल' हे नियतकालिक प्रसिद्ध केले. या नियतकालिकातील लेख वाचून सरहद्द गांधी, खान अब्दुल गफारखान हे राष्ट्रीय राजकारणात सामिल झाले. मौ. आझाद यांची भेट घेऊन त्यांनी 'सरहद्द प्रांतात रेड शर्ट (लाल डगलेवाले) नावाने लाखो अहिंसक पठाणांची फौज तयार केली. त्यांचा उद्देश गांधीवादी मार्गाने भारतीय स्वातंत्र्यासाठी अहिंसक पद्धतीने लढा देण्याचा होता. मौलाना आझाद यांनी काढलेल्या नियतकालिकाचा खप दोन वर्षात २६ हजारवर पोहोचला ज्यात ब्रिटिश साम्राज्याविरोधी प्रक्षोभक प्रचार केला जात असे. ब्रिटिशांनी त्यावर बंदी घालून मौलाना आझाद यांना तुरुंगात टाकले. तुरुंगवास संपल्यानंतर त्यांनी १९१५ साली 'अल-बलाग' हे अल हिलालचेच दुसरे रूप हे नियतकालिक प्रसिद्ध करायला सुरू केले. एकूण १९१२ ते १९२३ हा काळ मौलाना आझाद यांची मुस्लिम समाजातील लोकप्रियता पराकोटीला होती.

मौलाना आझाद ब्रिटिशविरोधी विचार मांडतात असे सांगून ब्रिटिशांनी त्यांच्यावर अनेक राज्यात प्रवेशबंदी केली. काही काळ त्यांना नजरकैदेत ठेवण्यात आले. १९२० नंतर गांधीजींची त्यांची भेट झाली. गांधीजींच्या विचारांचा विलक्षण प्रभाव त्यांच्यावर पडला. १९२१ साली त्यांना पुन्हा अटक झाली. १९२३ साली दिल्ली येथे भरलेल्या अखिल भारतीय काँग्रेसच्या खास अधिवेशनात ते अध्यक्ष झाले. अध्यक्षिय भाषणात त्यांनी हिंदू-मुस्लिम ऐक्यावर जोर दिला त्यामुळे त्यांचा सर्वत्र बहुमान झाला. मौलाना आझाद भारतीय स्वातंत्र्य चळवळीत असहकार आंदोलन, खिलाफत चळवळ, सविनय कायदेभंग १९४२ ची चलेजावची चळवळ मौलाना आझाद यांनी चढत्या क्रमाने सक्रिय सहभाग दिला. १९३० साली ते काँग्रेसचे कार्यकारी अध्यक्ष झाले. १९४७ साली मौलाना आझाद यांनी फाळणीला प्रखर विरोध करून अखंड भारताचा आग्रह धरला. अखेर देशाची फाळणी झाली. फाळणीनंतर नव्या सार्वभौम भारत देशाचे पहिले

शिक्षणमंत्री झाले. या पदावरून त्यांनी भरीव योगदान दिले. ते शेवटच्या श्वासापर्यंत भारतीय संमिश्र राष्ट्रवादाचे हिंदू-मुस्लिम ऐक्याचे अग्रदूत राहिले. २२ फेब्रुवारी १९५८ रोजी मौलाना आझाद यांनी शेवटचा श्वास घेतला.

मौलाना आझाद यांनी अल हिलाल, अल बलाक मधून विपूल लिखाण केले. फाळणीनंतरही त्यांनी स्वतःला तसेच काँग्रेसच्या नेत्यांना दोष दिले. तसेच जिनांना, ब्रिटिशांनाही त्यांनी फाळणीचे गुन्हेगार म्हटले. त्यांनी India Wins Freedom नावाने महत्त्वपूर्ण ग्रंथ लिहिला ज्यातून त्यांच्या राष्ट्रभावना दिसून येतात.

- **मौलाना आझाद यांची संमिश्र लोकसत्ताक राष्ट्रवादाची संकल्पना**

मौलाना आझाद यांनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीत सक्रिय भाग घेतला. हिंदू-मुस्लिम ऐक्य आणि संमिश्र भारतीय राष्ट्रवादाचे अग्रदूत म्हणून त्यांना ओळखले जाते. त्यांनी एकूण १३ ग्रंथ लिहिले पैकी काही उर्दू साप्ताहिके काही आत्मचरित्रपर ग्रंथ आहेत. अनेक ठिकाणी भाषणे दिली ज्यातून त्यांनी संमिश्र भारतीय राष्ट्रवादाची संकल्पना मांडली. मौलाना आझाद यांच्या एकूण लिखाण व भाषणातून संमिश्र भारतीय राष्ट्रवादाची संकल्पना प्रतिबिंबीत होते. डॉ. मोईन शाकिर यांनी 'खिलाफत टू पार्टीशन' या ग्रंथात त्यांच्या संमिश्र राष्ट्रवादाच्या (Compositive Nationalism) संकल्पनेचा परामर्श घेतला आहे. त्याचबरोबर अलीम चकील, नरहर कुरुंदकर यांनीही त्यांच्या या भूमिकेवर प्रकाश टाकलेला आहे. मौलाना आझादांबद्दल 'शिवरात्र' मधून नरहर कुरुंदकर म्हणतात मौलानांच्या एवढा मोठा कार्यकर्ता व विचारवंत आपल्या समाजावर कोणताही ठसा न ठेवता नामशेष होऊन जावा, ही गोष्ट अत्यंत करुण आणि दुःखाची आहे. (शिवरात्र ९३) स्वातंत्र्यानंतर या महान नेत्याची उपेक्षा झाली हे कोणी नाकारणार नाही. देशाचे पहिले शिक्षणमंत्री म्हणून शिक्षकदिनीही त्यांची आठवण होताना दिसत नाही.

ज्ञान, विज्ञान, सुसंस्कार, विचार, बुद्धिमत्ता जागतिक विचारप्रवाहांचे साक्षेपी आकलन असणारा, साऱ्या चराचरात समता आणि बंधुत्वाचा साक्षात्कार झालेला मानवतावाद मौलाना आझाद यांच्याजवळ होता. हिंदू-मुस्लिम ऐक्य, भारतीय संमिश्र राष्ट्रवादाचा क्रांतिकारी पुरस्कार त्यांनी केलेला होता. ते म्हणतात स्वर्गातून देवदूत जरी खाली उतरला व कुतुबमिनारच्या शिखरावरून त्याने मला सांगितले की, हिंदू-मुस्लिम ऐक्याचा नाद सोड, चोवीस तासात स्वराज्य तुझ्या मालकीचे होईल, तरी मी प्राणाहून प्रिय असलेले स्वराज्य दूर ढकलीन व हिंदू-मुस्लिम ऐक्याच्या भूमिकेवरून तसूभरही ढळणार नाही. कारण स्वराज्य नाकारल्यामुळे केवळ भारताचे नुकसान होईल. परंतु हिंदू-मुस्लिम ऐक्य नाकारल्यास अखिल मानवजातीचे भयंकर नुकसान होईल. ''हिंदू-मुस्लिम हे वेगळे नाहीत या सर्वांचे पूर्वज एकच आहेत. त्यांचे धर्म वेगळे झाले म्हणून त्यांची वेगवेगळी राष्ट्रके तयार करणे हे चुकीचे आहे. अशी भूमिका घेऊन मौलाना आझाद यांनी जिनांच्या द्विराष्ट्रवादी सिद्धांताचा प्रखर विरोध केला. मौलाना आझाद प्रतिथयश धर्मपंडित होते. अरबी भाषेचे व्याकरण व ती भाषा त्यांना अवगत होती. कुराणचे ते एक प्रसिद्ध भाष्यकार होते. प्रेषित महंमद (स.) यांनी सांगितलेल्या 'उम्म- तूल चाहिदा' (सर्वधर्मिय साहिष्णू शासन व्यवस्था) च्या सिद्धांताचा पुरस्कार करून त्यांनी असे सांगितले की, 'पवित्र कुराणचे प्रतिपादन हे उम्म- तूल-वाहिदा अर्थात सर्वधार्मिक शासन निर्माण

करण्याचे आहे. प्राप्त परिस्थितीमुळे नाईलाज म्हणून प्रेषिताला जे करावे लागते तो खरा धर्म नव्हे, त्यांनी जे करण्याचे ठरविले ते सर्वधर्मिय सरकार, निर्माण करणे, टिकविणे हा खरा धर्म आहे आणि तेच पवित्र कुराणचे प्रतिपादन आहे. जिनांचा राजकारणातील प्रवेश हिंदू-मुस्लिम ऐक्याचे दूत म्हणून झाला मात्र शेवट द्विराष्ट्रवादाचा दूत म्हणून झाला. याउलट मौलाना आझाद हे अखेरपर्यंत अखंड भारत आणि हिंदू-मुस्लिम ऐक्याचा पुरस्कार करणारे काँग्रेमधील प्रतिभाशाली नेते म्हणून राहिले.

मौलाना आझाद यांची हिंदू-मुस्लिम ऐक्याची भूमिका संधीसाधू मूळीच नव्हती. अखंड भारतात त्यांना कायमचे हिंदू-मुस्लिम ऐक्य हवे होते. त्यांनी इस्लामी विश्वबंधुत्वातून भारतीय प्रादेशिक राष्ट्रवाद जोपासला. काँग्रेसच्या रामगढ अधिवेशनात अध्यक्षीय भाषण करताना ते म्हणतात ''मला इस्लामचा अभिमान आहे. पण असा अभिमान असून देखील मला दुसऱ्याही काही भावना आहेत. त्या मला जीवनातील वास्तवतेने शिकविल्या. त्यापासून इस्लाम मला परावृत्त करू शकणार नाही. त्या म्हणजे माझ्या राष्ट्रविषयीच्या निष्ठा, मी भारतीय असल्याचा मला अभिमान आहे. अभेद्य एकी असलेल्या राष्ट्राचा मी नागरिक आहे.'' मौलाना आझाद यांची ही भूमिका भारतीय राष्ट्रीय एकात्मतेला पोषक होती. जमालुद्दीन अफगाणींच्या प्रभावातून ज्यावेळी महंमद इकबाल पॅन- इस्लामवादाचा पुरस्कार करत नेमक्या त्याचवेळी मौलाना आझाद दारूल हर्ब (शत्रूंचा प्रदेश) दारुल इस्लाम, (मुस्लिमांची सत्ता असलेला प्रदेश) पॅन इस्लामवाद, या संकल्पना नाकारून हिंदू-मुस्लिम ऐक्यावर आधारित सर्व धर्मिय समाजाला मिळून बनलेल्या संमिश्र भारतीय राष्ट्रवादाचा पुरस्कार करीत होते. मौलाना आझाद म्हणतात ''गेल्या अकराशे वर्षाच्या सामाईक इतिहासाने हिंदू- मुस्लिम संयुक्त भारतीय संस्कृती निर्माण झाली आहे. साहित्य, कला, काव्य, समाजजीवन अशा अनेक क्षेत्रात या दोन्ही समाजाची कामगिरी अमोल असून सध्याची भारताची संमिश्र संस्कृती यातून आकारास आलेली आहे. आज भारत देशाला आकार देण्याचा माझा जो हक्क आहे तो मी कधीही सोडणार नाही. पाकिस्तानची मागणी सर्वसाधारणपणे भारताला अपायकारक असली तरी ती मुसलमानांना जादा हानीकारक आहे. भारताच्या वेगवेगळ्या भागात विखुरलेल्या स्वरूपात राहण्यानेच मुस्लिमांची प्रगती होईल आणि भारतात अर्थपूर्ण कामगिरी साधता येईल. स्वतंत्र मायभूमीची कल्पना मुस्लिम समाजाला हानीकारक असून ती ज्यू धर्मियांच्या फुटीरतेशी साम्य असणारी आहे.

मौलाना आझाद यांनी सिरियाचा स्वातंत्र्यलढा पाहिला होता. सिरियातील मुस्लिम, ख्रिश्चन, डच लोक नेहमी परस्परांत हाडवैर जोपासत होते. परंतु स्वातंत्र्यासाठी सर्व मतभेद विसरून एकत्र आले होते. भारतामध्येसुद्धा विविध धर्म, जाती, पंथ आहेत, या सर्वांनी एकत्र यावे असे मौलाना आझाद यांना वाटत होते. त्याकाळात सिरियात धर्म हा देवासाठी आहे, मातृभूमी आमच्यातील प्रत्येकासाठी आहे. अशी घोषणा लोकप्रिय बनलेली होती. त्यामुळे मौलाना आझाद यांना सिरिया आणि भारत यांच्या परिस्थितीची तुलना करावीशी वाटली. त्यांचे मत असे होते की, शिक्षण आणि राजकारण या बाबतीत परिपक्व झालेला आमचा प्रगत समाजदेखील अशा घोषणा स्वीकारायला तयार नाही, हे आमचे दुर्दैव आहे. धर्मभेद, जातींमधील तंटे आणि इतर समाजाविषयी दूषितग्रह या गोष्टी राष्ट्रीय प्रगतीचा मार्ग रोखून धरीत आहेत. अशी शोकांतिका मौलाना यांनी व्यक्त केलेली दिसते.

राष्ट्रवाद आणि इस्लाम यांच्यात कोणताही संघर्ष नाही असे सांगून इस्लामचा भारतीय राष्ट्रवादाला विरोध नाही अशी भूमिका घेत मौलाना आझाद यांनी धर्मनिरपेक्ष संमिश्र भारतीय राष्ट्रवादाच्या आड इस्लाम येवू शकत नाही. जिना पुरस्कृत द्विराष्ट्रवाद हा इस्लाम विरोधी आहे असे मौलानांनी ठामपणे सांगितले होते.

भारत-पाकिस्तान फाळणीची मागणी धर्माच्या नावाने केली जात आहे हे चुकीचे आहे असे मौलाना म्हणत होते. हिंदू-मुस्लिम समस्येची सोडवणूकीचा पर्याय फाळणी मुळीच नाही. कारण हिंदू-मुस्लिम समाजाचा खरा प्रश्न हा आर्थिक स्वरुपाचा आहे. जर पाकिस्तान निर्मिती हा हिंदू-मुस्लिम समस्येवरील तोडगा असता तर मौलाना म्हणतात मी या गोष्टीला पूर्व पाठींबा दिला असता. परंतू हे जे धर्माच्या नावाने जनाब जिनांनी चालवलेले आहे तो खरा धर्म नव्हे. कारण धर्माने देवभूमीचे धर्म वेगळे आहेत म्हणून त्याचे विभाजन करावे असे कुठेच सांगितलेले नाही. मौलाना आझाद फाळणीसंदर्भात काही मूलभूत प्रश्न उपस्थित करतात ते म्हणतात ''धर्माच्या (इस्लामच्या) नावाने पाकिस्तानची मागणी होत आहे हे वस्तुस्थितीला धरून नाही कारण मुस्लिम आणि काफीर ह्याच्या पायावर लोकसमुदायांना दोन वेगवेगळ्या भूभागामध्ये स्थलांतरित करायला इस्लामने कुठे आणि केव्हा आधार दिला आहे? पैगंबरसाहेबांच्या परंपरांतून वा कुराणातून ह्याला मान्यता मिळाली आहे का? इस्लामच्या अभ्यासकांतील कुठल्या अभ्यासकानं ह्या तत्वाच्या आधारावर देवभूमीला विभागले आहे का? जर तात्विक पातळीवर आपण ही विभागणी मान्य केली तर इस्लाम ही एक वैश्विक व्यवस्था आहे, असं आपण कसं म्हणू शकू?'' मौलाना आझाद यांनी असे प्रश्न उपस्थित करून पाकिस्तान मागणीतील निरर्थकता, फोलपणा वारंवार दाखवून दिला. त्यातील संभाव्य धोक्याकडे लक्ष वेधताना मौलाना म्हणतात ''मुस्लिम लीगचे नेतृत्व आज ज्याप्रकारे वागत आहे. त्यातून हेच घडणार आहे की, पाकिस्तानात इस्लाम आणि भारतात मुस्लिम यांच दुर्भिक्ष होणार आहे.'' असे विचार १९४६ साली मौलाना आझाद यांनी मांडले जे आज सत्यात उतरत आहेत. पुढे ते म्हणतात, सध्या ज्या प्रदेशाला मिळून पाकिस्तानची मागणी होत आहे. त्या प्रदेशात उलेमांचे महत्व वाढलंय, पण प्रत्यक्षात खरा धर्म दुबळाच होत गेलाय. त्याकाळी लीग कडून सतत इस्लामचा वापर मुस्लिम समाजाची एकजूट करण्यासाठी केला जात आहे असे बोलले जात होते. मौलाना आझाद यांनी याला सडेतोड उत्तर दिले होते ते म्हणाले, इस्लाम तत्वानुसार ज्या उचित नाही, अशा गोष्टी करण्यासाठी तुम्ही इस्लामचा उपयोग करून घेत आहात. अशा प्रचंड विसंगत घटनांना मुस्लिम इतिहास साक्षी आहे. जमालच्या लढाईत कुराण ढालीवर लावली गेली होती. ते काय उचित होतं. का? करबलामध्ये पैगंबरसाहेबाच्या कुटुंबातील सदस्य पैगंबरांचे अनुयायी म्हणवणाऱ्या मुस्लिमाकडून हुतात्मा झाले ते उचित होते का? हज्जाज हा मुस्लिम सेनाधिकारी होता, मक्केवरील क्रूर हल्ल्यात त्यानं पवित्र मशिदीचीच नासधूस केली ते उचित होतं का? कुठलाही अनुचित उद्देश हा पवित्र शब्द वापरून योग्य वा पवित्र ठरत नाही. पाकिस्तानची मागणी ही मुळात धोकादायक आहे. माझ्या मताला सर्व मान्यता देतील अशी माझी अपेक्षा नाही, परंतु हे माझे प्रामाणिक मत आहे. माझ्या सद्सदविवेक बुद्धीच्या विरोधात जाणं मला शक्य नाही.'

मौलाना आझाद यांनी फाळणीचे संभाव्य धोके १९४६ सालीच मांडले होते. ज्याची प्रचिती पुढच्या काळात आली ते म्हणतात ''फाळणीचे दुष्परिणाम दोन्ही देशांना सारखेच भोगावे लागतील. हया फाळणीचा आधार धर्म असेल. नदी, किवा वाळवंट अथवा डोंगरांच्या रांगा अशा नैसर्गिक अडथळ्यांची सीमा निश्चित होणार नाही. सीमारेषा ओढली जाईल पण ती किती टिकावू असेल हे सांगणे कठिण आहे. आपण हे लक्षात घ्यायला हवे की, जी गोष्ट विद्वेषातून आकारात येते ती जोपर्यंत विद्वेष टिकेल तोपर्यंतच टिकेल. ही तीव्र विद्वेषाची भावना हिंदुस्थान आणि पाकिस्तान ह्यांच्या संबंधाला प्रदूषित करेल. मोठा मनुष्य संहार, लूट होऊन असंख्य हिंदू-मुस्लिम क्रूरतेचे बळी ठरतील. मुस्लिम लीगला पाठींबा देणारे मुस्लिम अभिजन पाकिस्तानात अर्थव्यवस्था ताब्यात घेतील. पाकिस्तानवर सतत बाह्य आंतरराष्ट्रीय सत्तेकडून नियंत्रण राहिल. भारताचे तसे होणार नाही. परंतु नव्याने आकारास आलेल्या शेजारी देशाकडून हस्तक्षेप होण्याचा व सतत त्रास होण्याची भीती वाटत राहील. असे मौलानांनी स्पष्टपणे सांगितले होते. आज आपल्याला नेमका हाच अनुभव येत आहे.''

मौलाना आझाद यांनी पूर्व पाकिस्तान आणि पश्चिम पाकिस्तान हे जास्त काळ एकत्र राहणार नाही हे ही सूचित केले. पुढे बांग्लादेशाच्या निर्मितीने त्यांच्या भाकिताला सत्यात उतरविले. जिनांची भूमिका मौलानांनी कधीच मान्य केली नाही. जिना ज्या पाकिस्तानची मागणी करत आहेत ती द्विराष्ट्रवादी भूमिका म्हणजे इस्लाम धर्माविरोधी केलेला द्रोह आहे. कारण धर्म वेगळे म्हणून वेगळी राष्ट्रके निर्माण करणे चूकीचे आहे असे त्यांचे मत होते. कारण भारतातील विविध धर्म, भाषा, जाती, पंथ, परंपरा, संस्कृतीच्या संमिश्रणातून भारताचे संमिश्र संस्कृतीच्या आधारे एक महावस्त्र विणले गेलेले आहे. या एकात्मतेला खिंडार पाडणे म्हणजे मानवतेचा खून करण्यासारखे आहे. मौलाना म्हणतात ''जिनांकडून एक मुद्दा दुर्लक्षित झालाय आणि तो म्हणजे बंगाल. त्यांना माहित नाही की बंगालला बाह्य नेतृत्वाचा तिरस्कार आहे आणि सध्याच्या नेतृत्वाला आज ना उद्या नाकारले जाईल. बंगालमधील एकूण बातावरणच असं आहे की, बाहेरून आलेलं आहे. आणि त्यांच्या अधिकारहितांना धोका निर्माण होतोय असे वाटले तर ते बंड करून उठतात. जिना, लियाकत अली असेपर्यंत पूर्व पाकिस्तानचा विश्वास अभंग राहिल. परंतु कोणतीही शुल्लक गोष्ट या प्रदेशाला वेगळं करेल कारण धर्म सोडला तर यांच्या समानतेचा एकही धागा नाही. त्यामुळे पूर्व पाकिस्तान व पश्चिम पाकिस्तान फार काळ एकत्र राहणार नाही.''

अरब राष्ट्रांचे उदाहरण देवून मौलानांनी असे स्पष्ट केले की अरब जगत है धर्म एक आहे. म्हणून एक राष्ट्र बनलेले नाहीत त्यांच्यात तीव्र स्वरूपाच्या प्रदेश भावना आहेत. प्रसंगी या राष्ट्रांत सतत संघर्ष झाल्याचे आपण पाहत आहोत. कारण प्रत्येक राष्ट्राचा राष्ट्रवाद हा प्रादेशिक राष्ट्रवाद असतो. राष्ट्राचा आधार धर्म हा एक घटक इतका प्रभावी नाही. त्यामुळे भारतीय समाज म्हणून आपण विचार करायला हवे प्रश्न धर्माचा नसून एक समाज म्हणून प्रश्न आर्थिक विकासाचा आहे. हिंदू-मुस्लिम समाजाने हा प्रश्न एकत्र बसून सामोपचाराने, सहकार्याने हा प्रश्न सोडविणे गरजेचे आहे. जे कोणी पाकिस्तानची मागणी करीत आहेत ते मुस्लिमांना दारूण आपत्तीला सामोरे जाण्यास भाग पाडत आहेत.

मौलाना आझाद हिंदू-मुस्लिम ऐक्याचे क्रांतीकारी समर्थक होते. ते एका ठिकाणी म्हणतात ''मला पक्का विश्वास आहे की, आशिया आणि आफ्रिकेला स्वातंत्र्यप्राप्ती होणं हे मुख्यतः हिंदुस्थानला स्वातंत्र्यप्राप्ती होण्यावर निर्भर आहे आणि हिंदू-मुस्लिम ऐक्य हीच हिंदुस्थानच्या खऱ्या स्वातंत्र्याची गुरुकिल्ली आहे.'' शेवटी मौलाना आझादानी असे नमूद केले की, ''मुस्लिमांनी एकजूटीने, देशवासीयांसोबत चालायला शिकावे जेव्हा हिंदुस्थानवासी त्यांच्या स्वातंत्र्यासाठी संघर्ष करीत होते, तेव्हा मुस्लिम प्रेक्षक बनून पाहत होते, अशी नोंद करण्याची संधी त्यांनी इतिहासाला मिळू देऊ नये. स्वातंत्र्यसैनिकांना घेऊन जाणारी नौका पाण्यात बुडू लागली तेव्हा, उफाळलेल्या लाटांशी टक्कर देण्याऐवजी ते किनाऱ्यावर उभे होते आणि आनंद व्यक्त करत होते असं कुणाला म्हणता येऊ नये.''

## ४.३ सारांश:

प्रस्तुत घटकामध्ये धर्म आणि राष्ट्रवाद या पार्श्वभूमीवर आपण विनायक दामोदर सावरकर, बॅरिस्टर महंमद अली जिना आणि मौलाना अबुल कलाम आझाद या तीन परंपरांचा राष्ट्रवादाच्या संदर्भात अभ्यास केला. यामध्ये आपण सावरकरांनी मांडलेली हिंदू राष्ट्रवादाची संकल्पना, हिंदू मुस्लिम समस्येचे त्यांनी केलेले विवेचन तसेच त्यांनी केलेली हिंदुत्वाची व्याख्या याची चर्चा केली. जिना यांच्या विचारांमधील उदारमतवादी दृष्टिकोनापासून ते त्यांनी मांडलेली राष्ट्रवादी भूमिका या स्थित्यंतराची चर्चा केली. व शेवटच्या भागात मौलाना आझाद यांचे हिंदू मुस्लिम ऐक्य आणि संमिश्र लोकसत्ताक राष्ट्रवादाची संकल्पना याची चर्चा केली.

धर्म आणि राष्ट्रवाद या पार्श्वभूमीवर भारतातील या प्रवाहांचा अभ्यास करता असे सारांश रुपात सांगता येते की भारतीय स्वातंत्र्य चळवळीत विकसित झालेला, विविधतेमध्ये एकात्मता प्रस्थापित करणारा सर्वसमावेशक आणि संविधानातून स्पष्ट होणारा संमिश्र धर्मनिरपेक्ष भारतीय राष्ट्रवादच हा खऱ्या अर्थाने भारतीयांचा खरा राष्ट्रवाद आहे. भारताला एक राष्ट्र म्हणून ठेवायचे असेल तर या राष्ट्रवादाला पर्याय नाही.

## ४.४ पारिभाषिक शब्द :

**राष्ट्रवाद :** एक राजकीय प्रणाली या अर्थाने राष्ट्रवाद म्हणजे राष्ट्राचे स्वातंत्र्य आणि एकता कायम राखणे, ही स्वयंसिद्ध नैतिक भूमिका होय.

## ४.५ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न व उत्तरे

**स्वयं अध्ययन प्रश्न क्र. १**

१) हिंदूत्ववादाची संकल्पना खालीलपैकी कोणत्या विचारवंतांनी मांडली?

अ) महंमद अली जिना  ब) एम. एन. रॉय

क) वि.दा. सावरकर  ड) म. गांधी

२) धर्म चिंतनाच्याबाबत सप्तशृंखलांचा सिद्धांत ......... यांनी मांडला.

अ) वि. दा. सावरकर | ब) महंमद अली जिना

क) मौलाना आझाद | ड) कौटिल्य

३) वि. दा. सावरकर यांनी खालीलपैकी कोणता ग्रंथ लिहिला.

अ) हिंदू-स्वराज्य | ब) भारताचा शोध

क) हिंदूत्व | ड) हिंदू पॉलेटी

**स्वयं अध्ययन प्रश्न क्र. २**

१) खालीलपैकी ....या विचारवंताने द्विराष्ट्र सिद्धांतांची मागणी केली.

अ) महंमद अली जिना | ब) वि. दा. सावरकर

क) मौलाना आझाद | ड) लो. टिळक

२) १९१६ साली लीगच्या लखनौ अधिवेशनात जिनांनी भारतासाठी ..... चा आग्रह धरला.

अ) सुधारणाचा | ब) हुकूमशाहीचा

क) स्वयंशासनाचा | ड) यापैकी नाही.

**स्वयं अध्ययन प्रश्न क्र. ३**

१) इंडिया विन्स फ्रिडम हा ग्रंथ..... यांनी लिहिला.

अ) मौलाना आझाद | ब) मौलाना मदनी

क) पंडित नेहरू | ड) राजीव गांधी

२) खालीलपैकी यांनी संमीश्र राष्ट्रवादाची संकल्पना मांडली.

अ) वि. दा. सावरकर | ब) मौलाना आझाद

क) बॅ. जिना | ड) यापैकी नाही.

३) मौलाना आझाद यांनी कोणते नियतकालिक सुरु केले?

अ) अल हिलाल | ब) यंग इंडिया

क) मूकनायक | ड) दिनबंधू

**स्वयं अध्ययन प्रश्न क्र. ४**

१) वि. दा. सावरकर यांच्या हिंदूत्ववादी राष्ट्रवादाचे टीकात्मक मूल्यमापन करा.

२) महंमद अली जिना यांच्या द्विराष्ट्रवाद सिद्धांत सांगून त्यावर भाष्य करा.

३) मौलाना आझाद यांची संमिश्र भारतीय राष्ट्रवादाची संकल्पना स्पष्ट करा.

**स्वयं अध्ययन प्रश्नर क्र. १ ची उत्तरे**

१) क) वि. दा. सावरकर २) अ) वि. दा. सावरकर ३) क) हिंदुत्व

**स्वयं अध्ययन प्रश्नर क्र. २ ची उत्तरे**

१) अ) महंमद अली जिना २) क) स्वयं शासनाचा

**स्वयं अध्ययन प्रश्नर क्र. ३ ची उत्तरे**

१) अ) मौलाना आझान २) ब) मौलाना आझाद ३) अ) अल हिलाल

❑❑❑